इतिहास ५८ सन् - १८७३

ले. यशवंत फों. नाईक

# गोमंतकाचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास

(श्री प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, ठाणे)

इति

मराठी
क्र०
ठाणे

ई ९०५
ग.ठ. ३०२

THE

# HISTORY OF GOA,

## ANCIENT & MODERN.

BY

YASHAVANT FONḌABÁ NÁIKA DAṆÁITA,

AND

RÁMACHANDRA GOVINDA WÁGLE.

REGISTERED UNDER ACT. XX. OF 1847.

Bombay:

ASIATIC PRINTING PRESS, KÁLKÁDEVI ROAD.

PRINTED BY H. SHRÁVAN.

1873.

*All Rights Reserved.*

# A
# HISTORIA DE GOA,

## ANTIGA E MODERNA.

POR

ESSOVONTA FONDBA NAIQUE DONAITO,

E

RAMACHANDRA GOVINDA VAGLÉ.

BOMBAIM:

NA TYPOGRAPHIA "ASIATIC,"

1873.

सं. ६ ३७२

# गोमांतकाचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास.

१५०८
२०
११८

यशवंत फोंडबा नाईक दणाईत

आणि

रामचंद्र गोविंद वागळे

ह्यांनीं

मराठींत रचिला.

सन इ० स० १८४७ चा आक्ट २० प्रमाणें रजिस्टर केलें आहे.

मुंबईंत
एशियाटिक छापखान्यांत
हरिबा श्रावण यांणीं मालकां करितां छापिला.

१८७३.

कर्त्यांनीं सर्व प्रकारचे हक्क आपल्याकडेस ठेविले आहेत.

TO

# DR. JOSEPH GERSON DA CUNHA,

MEMBER OF THE ROYAL COLLEGE OF SURGEONS OF ENGLAND; LICENTIATE OF THE ROYAL COLLEGE OF PHYSICIANS OF EDINBURGH, LICENTIATE IN MIDWIFERY; CORRESPONDING MEMBER OF THE INSTITUTE "VASCO DA GAMA," MEMBER OF THE BOMBAY BRANCH OF THE ROYAL ASIATIC SOCIETY AND OF THE MEDICAL AND PHYSICAL SOCIETY OF BOMBAY. &c. &c.

*THIS WORK*

IS MOST

RESPECTFULLY

DEDICATED AS A TOKEN

OF INTEREST HE TAKES IN ENCOURAGING LITERATURE AND PROMOTING THE WELFARE OF THE NATIVES OF GOA

By

HIS MOST OBEDIENT AND HUMBLE SERVANTS,

THE AUTHORS.

Ao Illmo e Exmo Snr.

DR. JOSÉ GERSON DA CUNHA,

LICENCIADO NA MEDICINA PELO REAL COLLEGIO DOS MEDICOS DE EDIMBURGO, MEMBRO DO REAL COLLEGIO DOS CIRURGIÕES DE INGLATERRA, LICENCIADO NA OBSTETRICIA; MEMBRO EFFECTIVO E CORRESPONDENTE DE VARIAS SOCIEDADES LITTERARIAS E SCIENTIFICAS NACIONAES E ESTRANGEIROS &c. &c.

COMO UMA PROVA DE CONSIDERAÇÃO PELO SEU MERECIMENTO, E DE RECONHECIMENTO PELO INTERESSE QUE TOMA NO BEM-ESTAR DOS SEUS PATRICIOS,

OFFERECEM E CONSAGRAM,

OS AUTHORES.

# दाक्तर जोजेफ् जरसन दा कुञ्ज,

इंग्लंदांतील सर्जन लोकांच्या राजकीय पाठशाळेचे
सभासद, एदिंबर्गांतील फिजिशन लोकांच्या रा-
जकीय पाठशाळेचे लायसनशिएट, मिडवा-
यफरीचे लायसनशिएट, "वास्को
दे गामा" इंस्टिटयुटचे कारस्पोंडिंग
सभासद, रायल एशिआटिक
सोसैटीच्या मुंबईंतील शा-
खेचे आणि मुंबईंतील
मेडीकल् आणि फि-
जिकल् सोसैटी-
चे सभासद,
इत्यादि.

यांस

त्यांची गोमांतकस्थ
लोकांत विद्यावृद्धि करण्याची
उत्कंठा, त्यांस श्रेष्ठपदप्राप्ति होण्याची
त्यांची निष्कलंक अपेक्षा, आणि सुप्रका-
शित व लोकहितेच्छापुरःसर औदार्य आणि
गांभीर्य हीं पाहून परम आदरानें साश्चर्यप्रीतिपूर्वक

हा ग्रंथ

कर्त्यांनीं नजर केला असे.

# प्रस्तावना.

फिरंगी लोकांनीं हिंदुस्थानाचा जलमार्ग शोधून काढिल्या पासून ह्या देशांत इतर युरोपस्थांचा हळूहळू प्रवेश होऊं लागला. शेवटीं हा बहुतेक देश शहाण्या इंग्रेज लोकांच्या हातीं लागल्यावर कांहीं वर्षांनीं त्यांनीं आपलें लक्ष इतर सहस्रावधि राजकीय विषयांत निमग्न असतां, आजपर्यंत कोणत्याहि युरोपस्थ लोकांनीं ज्या देशभाषेकडेस विशेषेंकरून लक्ष दिलें नाहीं त्या भाषेकडेस, व एतद्देशीय लोकांत सद्विद्येचा प्रसार व्हावा या विचाराकडेस लाविलें. तों पासून ह्या देशांत गद्यात्मक अनेक ग्रंथ इतिहासपर होऊं लागले आहेत. हें पाहून आपणहि एक लहानसा गोमांतकाचा इतिहास लिहावा, अशी आम्हास इच्छा उत्पन्न झाली. परंतु हें काम शेवटास नेण्यास त्या देशा विषयींचे पुरातन लेख, देशांतील वयातित व बहुश्रुत लोकांचा परिचय, अनेक ग्रंथावलोकन, तद्देशज्ञान, इत्याद्यनेक गोष्टींची अनुकूलता पाहिजे. ज्यापाशीं ह्या साधनांची न्यूनता आहे त्याच्या हातून ह्या प्रकारचें कृत्य सिद्धीस जाणें दुर्लभ.

पुरातन काळीं गोमांतकांत कोणकोणते राजे होऊन गेले, त्यांच्या नांदणूकी कोठें व कशा झाल्या, व त्यांनीं लोकोपयोगी कोणकोणतीं कृत्यें केलीं, या विषयीं त्याचा इत्थंभूत इतिहास लिहावा असें जर हल्लीं आपणास वाटलें,

तर या विषयीं साधन ईषन्मात्रहि कोणा जवळ नाहीं; कारण कीं, त्यांचा वृतांत स्वत: त्यांनीं लिहून ठेविला नाहीं, किंवा दुसऱ्यांनीं लिहावा तोहि त्यांनीं लिहिला नाहीं. तशांत एकादें अग्रहार पत्र किंवा खासगत लेख शोधावयास जावें, तर गोमांतकस्थ आपल्या घरांतील कागदपत्र छपवून ठेवण्या विषयीं दक्ष असल्या कारणानें त्यांकडे कोणी अशा कामाकरितां मागितले तर त्यांस असें वाटतें कीं, आमच्या लेखांची प्रसिद्धी झाली ह्मणजे त्यांचें महत्व बुडालें. पूर्वोक्त साधनें अनकूळ करून घेण्यास ग्रंथकारांस किती परिश्रम करावा लागला हें सुज्ञ वाचकांस सहज अनुमान होईल.

आह्मीं बहुत ग्रंथ वाचले नाहींत, किंवा महाराष्ट्र भाषेंत नवा ग्रंथ करण्याचा यत्न पूर्वीं कधींच केला नाहीं, व महाराष्ट्र भाषा आमची जन्मभाषाहि नव्हे; असें असून हा प्रथमच आह्मी ग्रंथ रचण्याचा यत्न केला, हें कितीएक लोकांस अप्रयोजक वाटेल यांत संशय नाहीं. एकाद्या विद्वानानें हें काम हातीं धरिलें, तर तो तें फार उत्तम करील, अशी आमची खात्री आहे; तथापि एकादा चांगला इतिहास तयार होई तों पर्यंत लोक याचा उपयोग करितील अशी आह्मी आशा बाळगितों. आतां एकादा आपण ग्रंथ रचिला असतां आपल्या कल्पनेस व भाषेस लोक दूषणें देतील, अशी भीति धरून मुळींच लेखणी हातीं धरिली नाहीं, तर आपणास लिहितां येऊन आपली बुद्धि प्रगल्भ दशेस कशी येईल? हा भाषारूप सागर फार विस्तीर्ण होय, त्यांत व्याकरणरूप नौकेंत आरोहण क

रून शोध करूं लागलों असतां त्याची लांबी, रुंदी, आणि खोली अधिकाधिक दृष्टीस पडती. म्हणून आपणास जितका शोध करून लिहितां येईल तितकें लिहून पुढील इतिहासकारांस मार्ग सुगम करून ठेवावा इतकेंच आपलें काम. आतां हें काम आम्ही या पुढील ग्रंथरचनेनें कसें व कोठपर्यंत सिद्धीस नेलें, या विषयीं यथायोग्य विचार करणें सुज्ञांकडेस आहे.

ह्या इतिहासाचे दोन भाग केले आहेत; पहिल्या भागांत गोमांतकाचें वर्णन, जाती, पुरातन आणि सांप्रतचीं हिंदु देवालयें, ख्रिस्ती धर्माचा प्रसार, धर्मसमीक्षणसभा, इत्यादि विषयांचें अनेक ग्रंथ व पूर्वकालीन लेख यांच्या आधारानें यथास्थितपणें विवरण केलें आहे. दुसऱ्या भागांत हिंदु, मुसलमान, आणि फिरंगी राज्याच्या इतिहास संस्कृत आणि कानडी ताम्रपट्ट वगैरे पुरातन लेख, व मुसलमानी, पोर्तुगेज, फ्रेंच, इंग्रजी, इत्याद्यनेक ग्रंथ यांच्या आधारानें लिहिला आहे; तर छापांत किंवा लेखांत जे दोष आढळतील त्यांची आह्मास क्षमा करून यांतील केवळ विषय ग्रहण केले म्हणजे आमच्या श्रमाचें साफल्य झालें असें आम्हीं मानूं.

पु० क०

नवीन गोवा, मार्च सन् १८७२.

# गोमांतकाचें वर्णन.

## भाग १.

### प्रकरण पहिलें.

**सह्याद्रीच्या** योगानें महाराष्ट्र देशाचे दोन विभाग झाले आहेत, त्यांतील पश्चिम भागास कोंकण असें ह्मणतात. कोंकणाचे उत्तर कोंकण आणि दक्षिण कोंकण असे दोन विभाग आहेत, त्यांतून दक्षिण कोंकणांत **गोमांतकाचा*** समावेश होतो.

**मर्यादा**—उत्तरेस, तेराखोलची नदी व सावंतवाडी संस्थान; दक्षिणेस, कारवार प्रान्त; पूर्वेस, सह्याद्रि व त्याचे पलीकडे बेळगांव जिल्हा आणि उत्तरकानडा ह्यांची सरहद्द; आणि पश्चिमेस, हिंदीमहासागर आहे.

**विस्तार**—हा देश १४°५४′ अक्षांशांपासून १५°५४′ अक्षांश पर्यंत; आणि ७३°५४′ रेखांशांपासून ७४°२६′

---

* पूर्वी हा देश परशुरामानें बाणप्रयोगेंकरून अंकित करून घेतला, ह्मणून त्यास **गोमांतक** असें ह्मणतात. **गौ** ह्मणजे बाण, त्याचें **मा** ह्म० मान, त्याचा आहे अन्त जेथें तें **गौमांत** शब्दवाच्य मानावें. **क** हा प्रत्यय संस्कृतनाममाला पुढें विकल्पें करून होतो, यास्तव **गौमांतक.** त्या शब्दाचा अपभ्रंश **गोमांतक** होय. प्राचीन काळीं **गोमान्तक** ही संज्ञा गोवा बेटासच लावीत असत; परंतु सांप्रत एथील सरकारच्या ताब्यांत जेवढा आसमंताद् प्रदेश आहे, त्या सर्वांस लावण्याची जनपद्धति आहे.

रेखांश पर्यंत पसरलेला आहे. ह्याची दक्षिणोत्तर लांबी ६१ मैल आणि पूर्वपश्चिम रुंदी ४५ मैल आहे. पृष्ठभाग १०६२ चौरस मैल आहे.

**विभाग**—गोमान्तकाचे राज्यव्यवहारसंबंधानें व कांहीं अंशीं स्वभावेंकरून ९ विभाग* आहेत; त्यांचीं नांवें, **जंजिरे-गोवा, सासष्टी, बारदेश, फोंडेमहाल** ऊर्फ **अंत्रुज, पंचमहाल, कानकोण, बत्तग्राम, सत्तरी,** आणि **पेडणेंमहाल.**

**पर्वत**—हा देश पर्वतांनीं आणि त्यांच्या शाखांनीं आच्छादित आहे, त्यांत **गोमांचल,** गोवाबेटांत; **चंद्रनाथ, कर्णसिद्ध,** आणि **दुधसागर** पंचमहालांत; **सिद्धनाथ,** अंत्रुजींत; आणि **केरी,** सत्तरी प्रान्तांत; हे पर्वत मुख्य आहेत.

**उपसागर** आणि **बंदर**—सासष्टी आणि बारदेश ह्यां द्वीपकल्पांच्या दोन शेवटांमध्यें गोवा बेटाचें भूशिर (काब) येऊन आग्वाद आणि मुगांव येथें दोन उपसागर झाले आहेत. **आग्वादच्या उपसागरांत** भाद्रपदापासून वैशाखपर्यंत पांच वांव पाणी असून, त्यांत रात्रंदिवस तारवें निर्धोक राहूं शकतात. परंतु पर्जन्य काळांत हा प्रचण्ड वाऱ्याच्या योगानें उचंबळ होऊन त्यांत तारवें नागरणें कठीण पडतें; इतकेंच नाहीं, परंतु जी नदी ह्या उपसागरास मिळते तिच्या मुखावर वालुकामय भाटी पडते, तीमुळें तींत देखील गलबतें नेतां येत नाहींत. ह्या भाटीवर पौर्णिमेच्या किंवा अमवास्येच्या उधाणांत मात्र वांव दीड वांव पाणी असतें. **मुगांव-**

*त्यांतून पहिल्या तीन विभागांस "वेल्य कोंकीस्त" (प्राचीन जिंकलेले) आणि बाकीच्यांस **"नोव कोंकीस्त"** (नवीन जिंकलेले) असें ह्मणतात.

च्या उपसागरांत साडेतीन पासून चार वांव पर्यंत किनाऱ्या जवळ पाणी असून, वृष्टिकालांतही जलयानें सुरक्षित जाऊं शकतात. हें गोमांतकाचें दक्षिण बंदर आहे.

**नद्या**—**तेराखोल ऊर्फ आरांवदेची नदी.** हिचा उगम वाडी संस्थानांतून आहे. ही पेडणें प्रांताच्या उत्तरेवरून वाहत जाऊन समुद्रास मिळते. हिची लांबी १४ मैल आहे. हिचे पुष्कळ फांटे पेडणें प्रांतांत शिरले आहेत. **कायसूव ऊर्फ कोलवाळची नदी.** हिचा उगम वाडी संस्थानांतून आहे. ही बारदेश, वत्तग्राम, आणि सत्तरी ह्यां प्रान्तांच्या उत्तरेवरून पुष्कळ वळगा वळगांनीं चालत जाऊन समुद्रास मिळते. हिची लांबी १८ मैल आहे. **बागची नदी.** हिचा उगम कुचेली गांवाच्या आसपास जे डोंगर आहेत, तेथून आहे. ही बारदेश प्रांतांतून वाहत येऊन समुद्रास मिळाली आहे. हिची लांबी ३½ मैल आहे. **मांडवी ऊर्फ गोवा नदी***. हिचा उगम पंचमहालांतून आहे. ही जंजिरेगोवाच्या उत्तरेकडून आणि बारदेश, वत्तग्राम, व पंचमहाल ह्यां प्रांतांच्या दक्षिणेकडून वाहत येऊन आग्वादच्या उपसागरास मिळते. हिची लांबी उगमापासून संगमापर्यंत ३८½ मैल आहे. ह्या नदीस आणखी लहान लहान ज्या नद्या मिळतात, त्या येणें प्रमाणें;— **ह्यापसेची नदी,** हिची लांबी १० मैल; **त्रियेची नदी,** हिची लांबी १ मैल; **असनोडेची नदी,** हिची लांबी ¾

---

*काशीभीमरथीगंगा गोदावरीयथानदी ॥ तथाकुकोण देशेतु गोवापुर्यां महानदी ॥ १ ॥ तत्रनद्यांमहाबुध्दिर्यः सकृत्स्नानमाचरेत् ॥ एकविंशत्कुलंतेन तारितंतुनसंशयः ॥ २ ॥ सूत संहिता ॥

मैल; **डिचोलीची नदी**, हिची लांबी ५ मैल; **सांखळीची नदी** हिची लांबी ४ मैल; **खांडेपारची नदी**, हिची लांबी २½ मैल आहे. याशिवाय हिचा एक फांटा गोवा बेटाच्या पश्चिमेकडून वाहत येऊन, अघशी नदीस मिळतो. ह्याची लांबी ८ मैल आहे. **सिंकेरीची नदी**. ही बारदेश प्रांतांतून वाहत येऊन मांडवी नदीस मिळती, तेणेंकरून आग्वाद हें गांव द्वीपकल्पाकार झालें आहे. हिची लांबी ३½ मैल आहे. **अघशी*** ऊर्फ **जुंवारीची नदी**. हिचा उगम पंचमहालांतून आहे. ही नदी गोवा बेटाच्या दक्षिणेकडून आणि सासष्टीच्या उत्तरेवरून पंचमहालाच्या तिरानें वाहत जाती. हिची लांबी ३९ मैल आहे. ' हिचा एक फांटा **तळावली** (सांतान ) गांवापर्यंत वाहत जातो. ह्या खेरीज हिच्या पुष्कळ शाखा सासष्टी प्रान्तांत शिरतात, त्यांत **कुशस्थली नदी** ही मुख्य आहे. **साळची नदी**. हिचा उगम **मठग्राम** शहरांतून आहे. ही सासष्टी प्रांतांतून वाहत जाऊन समुद्रास मिळते. हिची लांबी १५ मैल आहे. **तळपणची नदी**. हिचा उगम **उगें** ह्या गांवांतून आहे. ही कानकोण प्रांतांतून वाहत जाते. हिची लांबी ७ मैल आहे.

**उदकप्रवाह**– **पिर्णेचा धबधबा**, **हरवळेंचा धबधबा**, आणि **दुधसागर** असे तीन आहेत. **दुधसागर** हा ह्याच नांवाच्या पर्वतावरून ३४५ हात खालीं पडतो.

---

*गोमान्ताद्दक्षिणेभागे सागरस्यसमीपत: ।। अघशीनामगंगास्ते महाकल्मषनाशनी ।। १ ।। सह्यपादात्समद्भुता तापत्रयविनाशनी ।। ।।२।। सह्याद्रि खंड, मां० म० ।।

**बेटें**—गोवाबेट, चूडामणी, दीपवति, जुवें, कुलालद्वीप, आखाडा, वांसी, वांटसा, डोंगरी, अघशीद्वीप, ईल, रायतुरचा-जुवा, लोटलीबेट, शांताद्वीप, खोरजुवें, पनेळें, कावजा, हम-डाचा जुवा, आरावा, राणें, आणि हळर्णबेट. ह्या शिवाय दुसरीं ओसाड बेटें पुष्कळ आहेत.

**भूशलाका**—**रामाचें भूशिर**, सासष्टी प्रान्ताच्या दक्षिणेस, **काब**, गोवाबेटाच्या पश्चिमेस, **मुगांव**, सासष्टीच्या वायव्येस, **आग्वाद**, बारदेश प्रांताच्या नैर्ऋत्येस, आणि **मडकैचें टोंक**, अंत्रुजीच्या आग्नेयी दिशेस आहे.

**वारे**—जेष्ठापासून आश्विन महिन्यापर्यंत दक्षिण, पश्चिम, आणि पश्चिमेकडील उपरचा हे वारे वाहतात. सरत्या फाल्गुनांत बाहेरचा वारा सुरू होतो, तो चैत्र वैशाखांत प्रबळ होऊन वीज चमकते, आणि मोठी मेघगर्जना होती. मार्गशिर्षापासून फाल्गुन महिन्यापर्यंत तडीचा वारा वाहतो.

**हवा आणि ऋतु**— उत्तर कोंकणाच्या हवेशीं गोमांतकांतील हवेची तुलना करून पाहिली असतां एथील हवा किंचित् उष्ण असून शरीरास हितकर अशी आहे. ग्रीष्म कालांत तळीं, ओहोळ, विहिरी, इत्यादि आटून जाऊन नद्यांचे ओघ वाहतनासेही होतात. हेमंतऋतूंत प्रात:कालीं तास दोन तास कडक हिंव पडतें. मेघकालांत मोठा झड होतो, आणि अतिपर्जन्यवृष्टि होऊन नद्यांला पूर येतात, व वारा अतिशय वाहूं लागला ह्मणजे कांहीं गांव देखील बुडून जातात.

**जमीन**—ह्या देशाची जमीन जरी डोंगरी आणि ख-

डबडीत आहे, तथापि पाणी रेलचेल असल्यामुळें तिच्या अंगीं सुपीकपणा फार आहे. जेथें उदकाची सोय नाहीं तेथें केवळ पर्जन्योदकानेंच कायतें पीक होतें. एथील जमीन कांहीं वाळूची आणि कांहीं तांबड्या मातीची आहे, तीवर अन्य देशांतील अनेक प्रकारचीं झाडें लाविलीं असतां होतात.

**खनिजपदार्थ**—ह्या प्रदेशांत विशेषेंकरून सत्तरी आणि बत्तग्राम ह्यां प्रान्तांत एका प्रकारचा मऊ काळसर दगड सांपडतो, त्याचीं जोगडे लोक दगड्या, तवे, वगैरे तरतऱ्हेचीं भांडीं मोठ्या कुशलतेनें करितात, व तीं फार टिकाऊ असतात. पंचमहालांत कच्चा लोखंडी दगड सांपडतो; परंतु एथील लोकांस त्याचा उपयोग करितां येत नाहीं. येथें इमारती लायक एका प्रकारचे चिरे सांपडतात, तसे इतर प्रदेशांत फारसे नाहींत.

**रानें**—गोमांतकांत रानें ह्मटलीं ह्मणजे सर्वत्र आहेत; परंतु पेडणेंमहाल, सत्तरी, हेमाडबारसें, आणि कानकोण ह्या चार प्रान्तांत जशीं रानें आहेत तशीं येथें कोठेंच नाहींत. पेडणें महालांतील रानांचा पृष्ठभाग साडेसात चौरस मैल असून, त्यांत एकंदर ८२२६७४ वृक्ष आहेत, त्यांची किंमत सरकारानें २५६६८ रुपये धरिली आहे. सत्तरींत सुमारें सव्वाबारा चौरस मैल रानवट जमीन आहे, तींत सुमारें १६१६४११ वृक्ष असून त्यांची किंमत ४०४१०१ रुपये होते असें ठरलें आहे. हेमाडबारशांमध्यें जी चवदा चौरस मैल रानवट जमीन आहे, तींत सरासरी ३७०६१३७ उपयोगी आणि अमोल्य वृक्ष असून त्यांची किंमत १३२५३७८

रुपये आहे. कानकोण प्रान्तांत सात चौरस मैल अरण्य असून, त्यांत एकंदर २१६६७३३ मोठमोठाले वृक्ष आहेत; त्यांची किंमत सरकारद्वारें ७१८९११ रुपये ठरली आहे.

वृक्ष—एथील रानांत अनेक वन्यवृक्ष आहेत, त्यांत साग, जांबा, शिसवा, ओंट, आणि किंजल हे वृक्ष इमारती वगैरे बांधण्याचे कामांत फार उपयोगी आहेत. करमल, कलंब, असण, टेंबुरगी, बाभूळ, व पातफणस हेही वृक्ष चांगल्या प्रतीचे आहेत. फणस, चांपा, आंबा, चिंच, व दुसरे सुंदर आणि उपयुक्त वृक्ष जागोजागीं पसरले आहेत. बेल, अशोक, शिंवग, देवदार, पारंग, खैर, पिंपरी, व कुंभा हे वृक्ष सर्वत्र असतात. उंबर, रुई, वट, पिंपळ, पारसापिंपळ, सांवर, इत्यादि क्षीरवृक्ष बहुत ठिकाणीं दृष्टीस पडतात. चंदन वृक्षही कोठेंकोठें सांपडतो. एक पांढरा आणि बहुतकरून पर्णशुन्य असा वृक्ष आहे, त्यास अर्जुन वृक्ष असें ह्मणतात. नारळझाड व त्याच्या दुसऱ्या जाती सर्व ठिकाणीं आहेत. पोफळझाडी ह्मणून त्यांतील एक सुंदर जात आहे, तिची मुख्यत्वेंकरून कुळरगी गांवांत लागवड करितात. बांबू ह्या देशांत पुष्कळ होतो. ह्याची एक दुसरी जात आहे तिला वेळू असें ह्मणतात. आदांव हा वृक्ष गोमांतकाशिवाय भरतखण्डांत कोणत्याच ठिकाणीं सांपडत नाहीं. **सिरधन** ह्मणून एक गांव आहे तेथें ह्या जातीचे दोन रमणीय वृक्ष आहेत. माडुंब हा वृक्ष आदांव वृक्षाप्रमाणें ह्या देशाशिवाय कोठेंच पाहण्यांत येत नाहीं. सासष्टी प्रान्तांत **केळोशी** ह्मणून एक गांव आहे तेथें ह्या जातीचे दोन गगनचुंबित वक्ष आहेत. हे दोन प्रकारचे वृक्ष **फिरंगी** लोकांनीं आप-

ह्या देशाहून येथें आणिले असावे असें पुष्कळ लोक अनुमान करितात. ढोर आंबा ह्मणून एक साधारण वृक्ष आहे त्यांस मार्गशिर्षाच्या सुमारास वाटोळीं फळें येतात. ह्या खेरीज येथें बहुत प्रकारचे वृक्ष आहेत.

फुलें—एथील रानांत अनेक प्रकारचीं फुलें असून त्यांच्या आकृति व रंग निरनिराळे असतात. नागचांपा, कुडचांपा, सुरंग, उंड, व केवडा हीं फुलें फार सुगंधिक असून मनास आनंद करणारीं आहेत. बकुळी, आबोली, जास्वंद, कण्हेर, व दुसरीं असंख्य तऱ्हेचीं रानांत आणि परसांत होणारीं फुलें विपुळ होतात. तलावांच्या पृष्टभागांवर कमळें आणि कमोदें विकसतात. मोगरा, बटमोगरा, शेवंती, गुलाब, जाई, जुई, इत्यादि फुलें कित्येक मळ्यांत आणि बागांत लाविलेलीं दृष्टीस पडतात. ह्या शिवाय आणखी बहुत प्रकारचीं फुलें येथें पहाण्यांत येतात.

फळें—ह्या देशांत नानाप्रकारचीं फळें उत्पन्न होतात, त्यांत आंबा हें फळ अत्युत्तम आहे. ह्यांत **आफोंस,*** **फेर्नादीन**, **मालदेस**, वगैरे भेद आहेत. चिभुडें, पेरू, शिताफळें, रामफळें, कलिंगणें, व दुसरीं कित्येक जातीचीं फळें साधारण आहेत. फणस पुष्कळ असून त्यांत दोन भेद आहेत. एक रसाळ आणि दुसरा कापा. केळीं अनेक तऱ्हेचीं होतात. बारदेश प्रांतांत **मईंड** ह्या नांवाचा एक

* जे आम्रवृक्ष फिरंगी गृहस्थानीं ह्या देशांत आणून लाविले, ते नवीन असें ओळखण्याकरितां ज्याणें जो वृक्ष लाविला, त्या वृक्षास व फळास त्याच्या नांवानें ओळखूं लागले. जसें— आल्फोंस या नांवाच्या गृहस्थानें लाविलेल्यास आफोंस.

गांव आहे, तेथें एका जातीचीं केळीं होतात, त्यांची लांबी एकापासून सवा हात पर्यंत असती. पोपनीस, महाळुंगें, नारिंगें, सोननारिंगें, लिंबु हीं हीं फळें पुष्कळ होतात. भिरंड, जगम, जांब, मलाकाजांब, इत्यादि रानफळें विपुळ आहेत.

**शाकभाजी**—वांगीं* येथें पुष्कळ होतात, त्यांत मध्वगुळें ह्मणून जीं वाटोळीं वांगीं मिळतात, तीं सर्वोत्कृष्ट आहेत. त्यांचा रंग पांढरा असतो. घोसाळींच्या वल्ली पावसाच्या दिवसांत मांडवावर चढविलेल्या दृष्टीस पडतात. भेंडा, कांकडी, तोंडलीं, इत्यादि बहुतेक प्रकारची शाकभाजी येथें मिळते.

**वनस्पति**— ह्या देशांत वनस्पत्युत्पन्न पदार्थ फार व मौल्यवान आहेत, त्यांतून कित्येकांचा उपयोग एथील विद्वान वैद्य सोईवार करितात. ह्या शिवाय अनोळखी वनौषधि येथें पुष्कळ आहेत.

**कंद—गोमांतकांत** रताळूची लागवड करितात. बारदेश प्रांतांत उत्तम प्रतीचीं रताळीं होतात. तीं फार मधुर असून मोठीं असतात, व त्यांत अगदीं रेषा नसते. गणगर ज्यास येथें कांटेकणगी असें ह्मणतात, तो कंद येथें उत्कृष्ट होतो. करिंदा हा हलक्या प्रतीचा कंद असल्यामुळें त्याची वृद्धि करण्यास एथील लोक फारसे झटत नाहींत. येथें सात जातींचें अळूं सांपडतें, त्यांत माडी अळूं ह्मणून एक जात आहे, त्याच्या मुंडल्यांस माड्या असें ह्मणतात. उत्तम प्रतीच्या माड्या फोंडें आणि पंचमहाल एथें मिळतात.

---

* अशी गोष्ट सांगतात कीं, इतर वांगीं अपवित्र ह्मणून मध्वाचार्यांनीं ही पवित्र जात उत्पन्न केली. !!

**धान्यें**— प्राचीन काळापासून एथील लोक आपल्या बुद्धिकौशल्यानें शेतकीचें काम चालू करून, नाना प्रकारचीं धान्यें उत्पन्न करूं लागले, त्यामुळें हलीं ह्या सर्व देशांत धान्याचा सुकाळ झाला आहे. एथील मुख्य लागवड ह्मटली ह्मणजे भाताची, ती येथें चांगली होती. आजगा, गरगट, खोचरा, इत्यादि अनेक प्रकारचें भात पिकतें. एथें कोठें एक पीक आणि कोठें दोन पिकें होतात. ह्या प्रदेशांत तांदळावांचून दुसरें धान्य खाण्याचा फारसा प्रघात नाहीं. तांदळांत दोन प्रकार आहेत. एक सुरई आणि दुसरा उकडा. उकडा तांदूळ अपवित्र आणि फार टणक आहे. तो शूद्र आणि क्रिस्तांव लोक खातात. गहूं थोडकाच पिकतो. तो एथील उंच वर्णाचे लोक तरतऱ्हेचे पदार्थ करून खातात- डोंगराळ गांवांत नाचणी फार पिकते. हें धान्य पुष्टिकारक असून शुद्र लोकांत फार खपतें. वरी जरी हलक्या प्रतीचें धान्य आहे; तथापि एथिल हिंदु लोक त्यास पवित्र मानतात. तूर येथें विपुल पिकते. तींत तांबडी आणि पांढरी अशा दोन जाती आहेत. उडीद सर्वत्र पिकवितात. मूग फार पिकत नाहीं. चवळीच्या पांच सहा जाती आहेत, त्या सर्व **गोवा** बेटांत होतात, त्यांत हळसुंदा ही जात सर्वोत्कृष्ट आहे. ह्या खेरीज मसूर, वाटाणे, हरबरे, इत्यादि धान्यें फार पिकत नाहींत.

**मसाल्याचे पदार्थ**— काळीं मिऱ्यें बहुतकरून कुलरगी गांवांत पुष्कळ होतात. मिरची, हळद, सुंठ, व दुसरे मसाल्याचे पदार्थ सर्वत्र पिकवितात. कांदा, लसूण, इत्यादि पदार्थ येथें पुष्कळ होतात. जुवें बेटांत कांदा फार

होतो; परंतु तो बहुत दिवस टिकत नाहीं. दालचिनी कोठें कोठें सांपडते.

**जनावरें**— चित्ते, बिबळे वाघ, रानडुकर, व तरस हे मांसभक्षक वनपशु एथील रानांतील कीरें झाडींत रहातात. त्याचप्रमाणें लांडगी, कोल्हा, भालू, खेंकड, इत्यादि प्राणी अतिशय असतात, आश्वलें बहुतकरून **कानकोण** प्रांतांतील रानांत आढळतात. गवा, सांबर, व दुसरे जातीचे मृग हे कोठें कोठें सांपडतात. अनेक तऱ्हेचे वानर जंगलांत किंवा खेडे गांवांत दृष्टीस पडतात. ह्या शिवाय एथील रानांमध्यें अनेक प्रकारचे वनपशु आहेत. ह्या प्रदेशांत घोडे थोडकेच आहेत. गाढवें क्वचित् दृष्टीस पडतात. गाई, बैल, म्हशी, रेडे, बकरे, वगैरे जनावरें पुष्कळ लोक पाळतात. अति नीच जातीचे हिंदु आणि क्रिस्तांव लोक डुकरें बाळगतात. कुत्रे ह्या देशांत सर्व ठिकाणीं पहाण्यांत येतात. सर्प, दिवड, मालुंड, आर, आणि पाणसर्प हे उरग प्राणी मुख्यत्वेंकरून उष्ण काळांत दिसतात. घोरपड, गार, पाल, सरडा, विंचू, घोण, वगैरे सर्वत्र असतात. त्यांतून कांहीं विषारी आहेत आणि कांहीं पासून मुळींच उपद्रव होत नाहीं. मधमाशी, गांधीणमाशी, पतंग, इत्यादि अनेक प्रकारच्या मक्षिका येथें पहाण्यांत येतात.

**मासे**—मत्स्य येथें पुष्कळ आहेत; परंतु फार मोठे मासे मुळींच सांपडत नाहींत. मगर व दुसरे ह्या जातीचे जलचर स्थलचर प्राणी बहुत ठिकाणीं सांपडतात.

**पक्षी**—मोर हा पक्षी गोमांतकांत सांपडतो. तित्तिर, लावा, बक, बळार, कोंकारी, टांकारी, इत्यादि शिकारी पक्षी

एथील रानांत आणि नद्यांच्या काठीं असतात. करढोंक व बगळा हे पक्षी कधींकधीं दृष्टीस पडतात. कावळा, ढोंक्कावळा, घार, इत्यादि आकाशांत उडणारे पक्षी ह्या देशांत पुष्कळ आहेत. कोकिलेचे मधुरस्वर वारंवार कानीं पडतात. गिधाड व दुसरे मांसहारी पक्षी आपल्या ऋतुमध्यें अनेक येतात. कोंवडा, बदक, खबूतरें, पोपट, साळू, व इतर जातीचे पक्षी हिंदु आणि क्रिस्तांव लोक पाळतात. हिंदुस्थानांतील सर्व प्रकारचे पक्षी बहुतकरून येथें पहाण्यांत येतात.

---

## विभागांचें वर्णन.

---

# प्रकरण दुसरें.

# जजिरे गोवा.

**मर्यादा.**—उत्तरेस, गोवा नदी; दक्षिणेस, अघशी नदी; पूर्वेस, नदीच्या पलीकडे फोंडें प्रान्त; आणि पश्चिमेस, हिंदी महासागर आहे.

**विस्तार.**—ह्याची लांबी १०$\frac{१}{२}$ मैल आणि रुंदी ८ मैल आहे. पृष्ठभाग ४६ चौरस मैल आहे.

**स्थिति.**—ह्यांत एकंदर दहा बेटें असून त्यांत ४० गांव आहेत. मुख्य शहर पणजी.

जीं दहा बेटें वर सांगितलीं, तीं येणेंप्रमाणें.—

**गोवाबेट***.—ह्या बेटांत तीस गांव आहेत ह्मणून त्यास **तीसवाडी** असें ह्मणतात. ह्याची पूर्वपश्चिम लांबी ९ मैल आणि दक्षिणोत्तर रुंदी ६ मैल आहे. परीघ सुमारें २४ मैल आहे. ह्या बेटाच्या पश्चिमेस मोठी बळकट दगडी भिंत सुमारें ९ मैल लांब आहे. पूर्वी येथें हिंदुलोक राहत असत. नंतर मुसलमानलोक येऊन राहिले. सांप्रत ह्या दोन लोकांपेक्षां क्रिस्तांव लोकांची वस्ती अधिक झाली आहे.

**चोडण** (चूडामणी)†.—हें बेट बारदेश प्रान्ताच्या आग्नेय दिशेस आहे. ह्याची लांबी ४ मैल आणि रुंदी १ मैल आहे. परीघ सुमारें ९ मैल आहे. पूर्वी ह्या बेटांत केवळ हिंदु लोकांची वस्ती होती; परंतु येथें फिरंगी लोकांचा अम्मल सुरू झाल्यानंतर हें सर्व बेट क्रिस्तांव लोकांनीं भरून गेलें. पुढें एथील पाणी नासल्यामुळें बहुतेक लोक मरून गेले. सांप्रतची

---

* गोकर्णादुत्तरेभागे सप्तयोजनविस्तृतं ॥ तत्रगोवापुरीनाम नगरीपापनाशिनी ॥१॥ गोवापुर्यादर्शनेन पापंहंतिपुरार्जितं ॥ यथारवेर्दर्शनेन तमोयातिविशीर्णतां ॥२॥ गोवापुर्यांद्विजेंद्रेश स्नानार्थेमानसंयदि ॥ करोतियःसकृन्मर्त्यो संप्राप्नोतिपरंपदं ॥३॥ गोवापुर्यात्समानंच नास्तिक्षेत्रंनसंशयः ॥ तत्रसंत्यग्रजन्मानो वेदवेदांगपारगाः ॥ ४ ॥ मंत्रौषधितपोयोगबलेनजितमन्यवः ॥ यस्मिन्वसंतिविप्राश्च षट्कर्मनिरताःसदा॥५॥ सूत सं० अ० १६॥

† मुनेगोमांचलेतीर्थमिंद्रनाभाभिदंशुभं हरिचूडामणिक्षेत्रे महापुण्यकरंस्मृतं ॥१॥ स० खं० अ० ८३.

वस्ती बहुधा क्रिस्तांव लोकांची असून त्यांची संख्या सुमारें २५० आहे.

**दिवाडी** (दीपवति*).—हें बेट चोडणाच्या आग्नेय दिशेस असून गोवें शहराच्या समोर आहे. ह्याची दक्षिणोत्तर लांबी ३½ मैल आणि पूर्वपश्चिम रुंदी १½ मैल आहे. ह्या बेटांत चार गांव आहेत. त्यांचीं नांवें,—**गोलथी,न्हावेली,म्हालार,** आणि **नारवें.** पूर्वीं ह्या बेटांत सर्वत्र हिंदु लोकांची वस्ती होती; परंतु फिरंगी लोकांचा अम्मल सुरू झाल्यापासून एथें क्रिस्तांव लोकांची वस्ती झाली आहे, त्यांची संख्या सुमारें १५०० आहे.

**जुवें.**—हें बेट दिवाडीच्या ईशान्येस आहे. ह्याची लांबी २½ मैल आणि रुंदी १ मैल आहे. परीघ सुमारें ५ मैल आहे. प्राचीनकाळीं ह्या बेटांत वस्ती नव्हती; परंतु सांप्रत वस्ती बहुधा क्रिस्तांव लोकांची असून, त्यांची संख्या सुमारें ५००० आहे.

**कुंभारजुवें** ( कुलालद्वीप )—हें बेट जुवें बेटाच्या दक्षिणेस आहे. ह्याच्या पूर्वेस भूखण्डावर फोंडेंप्रान्त आणि पश्चिमेस गोवाबेट आहे. ह्याची दक्षिणोत्तर लांबी २¼ मैल आणि अतिशय रुंदी ½ मैल आहे. लोकसंख्या सुमारें २००० आहे.

**आखाडा**—हें बेट जुवें बेटाच्या वायव्येस आहे. ह्या-

---

*गंगातुमध्यमेभागे क्षेत्रंदीपवतिस्मृतं ॥ क्रोशद्वयंचविस्तिर्णं केवलंपुण्यवर्धनं ॥१॥ स० खं० अ० ८३.—ह्यास पंचक्रोशी असें ही ह्मणतात.

ची लांबी १ मैल आणि अतिशय रुंदी १/२ मैल आहे. पूर्वी हें बेट अगदीं ओसाड होतें; परंतु आलीकडे कांहीं शूद्र लोकांची वस्ती झाली आहे. लोकसंख्या २५० आहे.

**वाटसा**—हें बेट कुंभारजुव्यांच्या वायव्येस आहे. ह्याची लांबी १ मैल आणि अतिशय रुंदी ३/४ मैल आहे. एथील विहिरींचें पाणी खारट असल्यामुळें येथें फारसी वस्ती नाहीं.

**वांसी**—हें बेट दपिवतीच्या वायव्येस आहे. ह्याची लांबी १ मैल आणि रुंदी ३/४ मैल आहे. परीघ सुमारें २ मैल आहे. एथील वस्ती बहुधा क्रिस्तांव लोकांची आहे.

**डोंगरी**—हें बेट गोवा बेटाच्या आग्नेय दिशेस आहे. ह्याची लांबी १ १/२ मैल आणि रुंदी १ मैल आहे. प्राचीनकाळीं ह्या बेटांत मुळींच वस्ती नव्हती; परंतु हल्लीं ब्राह्मण, शूद्र, आणि क्रिस्तांव लोकांची बरीच वस्ती झाली आहे. लोकसंख्या २३९० आहे.

**अघशीचाजुवां** ( अघशीद्वीप ) —हें ओसाड बेट अघशी गांवाच्या दक्षिणेस आहे. ह्याची लांबी १ मैल आणि रुंदी १/२ मैल आहे.

---

## जुजिरे गोवांतिल गांवांचीं नांवें.

| | |
|---|---|
| ताळगांव | भाइंगिण |
| पणजी | जुनें गोवें |
| रायबंदर | धावज ( एळें ) |
| चिंबल | ब्रह्मपुरी |
| पानवेल ( सांपेद्र ) | गंवडाळ |

| | |
|---|---|
| गांवशी | थोरलें नेवरें |
| आजोशी ( आदोशी ) | धाकटें नेवरें |
| करंवळ | मंडूर |
| भाटी | खोरली |
| कुजीर | होडार |
| थोरली मोरंबी | मुर्डी ( मेरसी ) |
| धाकटी मोरंबी | रणवाडी |
| कालापूर | दुर्गावाडी |
| ह्यालवाडा | ह्यालार |
| तळावली ( सांतान ) | न्हावेली |
| थोरलें गोवें (गोफकपट्टण) | गोलथी |
| जुंवारी | नारोंव |
| गवाळी | काराय |
| बांबुळ्ली | चोडण |
| सिरदन ( श्रीवर्धन ) | जुवें |
| कुडक | आखाडा |
| सोळासेर | कुंभारजुवें |
| मुरकुंडी | वांटसा |
| आगशी ( अघशी ) | वांसी |
| | डोंगरी |

## सासष्टी प्रान्त.

**मर्यादा.**—उत्तरेस, अघशी नदी; दक्षिणेस, कानकोण प्रान्त; पूर्वेस, पंचमहाल; आणि पश्चिमेस, हिंदीमहासागर आहे.

**विस्तार.**—ह्याची लांबी २१ मैल आणि रुंदी १०½ मैल आहे. पृष्ठभाग १०४ चौरस मैल आहे.

**स्थिति.**—ह्यांत एकंदर ६६ गांव आणि ४ बेटें आहेत. लोकसंख्या १२५००० आहे. पूर्वी ह्या प्रांतांत सर्वत्र हिंदु लोकांची वस्ती होती; परंतु सांप्रत हा सर्व प्रांत क्रिस्तांव लोकांनीं व्यापिला आहे. मुख्य शहर मठग्राम.

## सासष्टी प्रान्तांतील गांवांचीं नांवें.

| | | |
|---|---|---|
| मठग्राम (माडगांव). | पाली. | शुद्रकेळशी. |
| वेरर्णें.(वरेण्य). | कुवेली. | कुंकळ्ळी. |
| कुडतरी (कुडस्थली). | वेळसांव. | आंबेली. |
| लोटली. | कांसावली. | असोळगें. |
| राय. (रै) | आरसी. | वरडें. |
| बाणावली (बाणवल्ली). | उत्तरडें. | सरजोडें. |
| बेताळभाटी. | गणसूव. | चिंचोर्णें. |
| कोलवें. | माजोर्डें. | देवसूव. |
| कुठ्ठाळ (कुशस्थली). | कालट. | तळावली. |
| केळोशी (कर्दली). | गांदावली. | धर्मपूर |
| नागवें. | सुरावली. | आकें. |
| सांखवाळ (शंखावली). | ढोंकली. | डउरली. |
| रासई. | वानेली | धिकरपाल. |
| चिखली. | अडसुली. | कवडी. |
| वाडें. | काडर्णें. | चांदर. |
| मुरगांव. | सरणभाटी. | गिरिडोली. |

| | | |
|---|---|---|
| चिकोळ्ण. | वारकें. | खोल. |
| इसोरसी. | आडली. | सिरली. |
| कामुर्ली | करमणें. | ऱ्हावेली. |
| आंबोडा. | महाखांजण. | |

## बेटें.

**रायतुरचाजुवां.**—हें बेट रायतूर ह्या गांवाच्या उत्तरेस आहे. ह्याचा परीघ सुमारें २ मैल आहे. येथें बहुधा क्रिस्तांव लोकांची वस्ती आहे. लोकसंख्या २०० आहे.

**लोटलीचाजुवां.**—हें बेट लोटली गांवाच्या समीप आहे. ह्याची लांबी १ मैल आणि रुंदी १/२ मैल आहे. ह्या बेटांत सुमारें १०० लोकांची वस्ती आहे.

**ईल.**—हें बेट सांखवाळी जवळ आहे. ह्याची लांबी १ मैल आणि रुंदी १/४ मैल आहे. पूर्वी ह्या बेटांत वस्ती नव्हती. सांप्रत सुमारें २०० लोक राहतात.

**शांताद्वीप.**—हें केळोशीगांवाच्या उत्तरेस आहे. ह्याची लांबी १ १/४ मैल आणि रुंदी १/२ मैल आहे. एथील पाणी खारट असल्याकारणानें येथें कोणचि राहत नाहीं.

### बारदश प्रान्त.

**मर्यादा**—उत्तरेस, कोलवाळची नदी; दक्षिणेस, मांडवी नदी; पूर्वेस, बतग्राम; आणि पश्चिमेस, हिंदीमहासागर आहे.

**विस्तार**—ह्याची लांबी १२ १/२ मैल आणि रुंदी ११ मैल आहे. पृष्ठभाग ७२ चौरस मैल आहे.

**स्थिति**—ह्यांत एकंदर ४८ गांव आणि २ बेटें आहेत. लोकसंख्या सुमारें ९७१०० आहे. मुख्य शहर म्हापसें. प्राचीन काळीं ह्या प्रान्तांत हिंदु लोकांची वस्ती होती; नंतर मुसलमान लोक येऊन राहिले. हलींची वस्ती बहुधा क्रिस्तांव लोकांचीच आहे.

---

## बारदेश प्रान्तांतील गांवांचीं नांवें.

| | | |
|---|---|---|
| म्हापसें. | गिरवाडें. | पिर्णें. |
| हळधुणें. | मईडें. | पोंबुर्पें. |
| हणजूण. | मारडें. | पुनाळें. |
| हडंपडें. | नाचनोडें. | रेवाडें. |
| आसगांव. | नानोडें. | साळगांव |
| असनोडें. | नागवें. | सांगोडें. |
| बस्तोडें. | नेरळ. | सिरोडें. |
| कळंगूट. | वालावली. | सिरसई. |
| काणकें. | ओशेल. | शिवोली. |
| कांदुळी. | पालयें. | वागाळी |
| कोलवाळ | पर्रा. | ठीयें. |
| खोरली. | पिळेर्ग. | असकई. |
| कुचेली. | वेरें | वेर्लें. |
| कामुरली | | |

---

## बेटें

**खोरजुवें**—हें बेट असनोडें गांवा जवळ आहे. ह्याची लांबी सुमारें २ मैल आणि अतिशय रुंदी १ मैल आहे.

परीघ सुमारें ४ मैल आहे. एथील सर्व वस्ती बहुधा क्रिस्तांव लोकांची असून त्यांची संख्या सुमारें २०० आहे.

**पनेळें**---हें बेट खोरजुवें बेटाच्या वायव्येस आहे. ह्या बेटाचा परीघ सुमारें २ मैल असून लोकसंख्या १५०आहे. ह्या बेटांत बहुतकरून क्रिस्तांव लोक राहतात.

---

## फोंडेंमहाल ऊर्फ अंत्रुज.

**मर्यादा**—उत्तरेस, गोवानदी; दक्षिणेस, अघशीनदी आणि पंचमहाल; पूर्वेस, वतग्राम; आणि पश्चिमेस, नदीच्या पलीकडे कुंभारजुवें आणि गोवाबेट आहे.

**विस्तार**—ह्याची लांबी २०½ मैल आणि अतिशय रुंदी १२¼ मैल आहे. पृष्ठभाग ८१ चौरस मैल आहे.

**स्थिति**—ह्यांत एकंदर २८ गांव आणि दोन बेटें* आहेत. लोकसंख्या २७६१९ आहे. मुख्यकचेरीची जागा फोंडें. ह्या प्रान्तांत बहुत करून हिंदु लोकांची वस्ती आहे.

---

## फोंडें महालांतील गांवांचीं नांवें.

| | | |
|---|---|---|
| खंडोळें. | तळावली. | पिर्योळ. |
| वरगांव. | वाडी. | बोलिंग. |
| तिंवरें. | बोरी. | कुंकळियें. |
| हटकोळग. | सिरवडें.(शिरोडें) | खंडेपार. |
| भोम. | पंचवाडी. | केरी. |
| कुंडई. | निरंकाल. | वागुर्में. |

---

* हीं बेटें अगदीं ओसाड आहेत ह्मणून त्यांविषयीं येथें लिहीत नाहीं.

| | | |
|---|---|---|
| मडकई. | कोडार. | वळवई. |
| बांदिवडें. | कुरटी. | बेतकी. |
| कवळें. | वेरें. | बेतोडें. |
| कानसें. | सावई. | फोंडें. |

## पंचमहाल.

**मर्यादा**——उत्तरेस, बतग्राम व सत्तरी; दक्षिणेस, कानकोण व कानडाप्रान्त; पूर्वेस, उत्तर कानडा; आणि पश्चिमेस, सासष्टी प्रान्त आहे.

ह्या प्रान्तांत पांच महाल आहेत, ह्मणून त्यास **पंचमहाल** असें ह्मणतात: ते पांच महाल येणेंप्रमाणें;——

**अष्टाग्रहार**——ह्याची लांबी १७ मैल आणि रुंदी १४ मैल आहे. ह्यांत एकंदर १८ गांव आहेत. लोकसंख्या सुमारें ३८०७ आहे. मुख्य ठिकाण रिवण.

**हेमाडबारसें**——ह्याची लांबी २४ मैल आणि रुंदी १७½ मैल आहे. ह्यांत एकंदर ३८ गांव आहेत. लोकसंख्या ७१५६ आहे. मुख्य ठिकाण सांगें.

**बाळ्ळी**——ह्याची लांबी १७ मैल आणि रुंदी ६¾ मैल आहे. ह्यांत एकंदर २७ गांव आहेत. लोकसंख्या ४१२७ आहे. मुख्य ठिकाण बाळ्ळी.

**चंद्रवाडी**——ह्याची लांबी १७ मैल आणि रुंदी ९ मैल आहे. ह्यांत एकंदर १९ गांव आहेत. लोकसंख्या ७५७१ आहे. मुख्य ठिकाण आमोणें.

**काकोडें**——ह्याची लांबी ३ मैल आणि रुंदी २¾ मैल आहे. ह्यांत एकंदर २ गांव आहेत. लोकसंख्या १४६१ आहे. मुख्य ठिकाण काकोडें.

## अष्टाग्रहार माहालांतील गांवांचीं नांवें.

| | | |
|---|---|---|
| भाटी | कुंभारी | रिवण |
| डोंगर | कुणंग | साळगिणें |
| नायकिणें | कुरडी | वेळियणें |
| सिंगोणें | कुरपें | वेरली |
| वेलियें | नेत्रावळी | विचुंद्रें |
| कोळवें | नुनें | जाकी |

---

## हेमाडबारसें महालांतील गांवांचीं नांवें

| | | |
|---|---|---|
| भोम | कोंप्रोई | सिरसोडें |
| मुगूळी | करंजळ | पालियें |
| सुरल | कुळें | पोचरें (पोत्रें) |
| दोंगरली | मोळें | तुडव |
| ओशल | सोनाळी | उगें |
| आगलोत | धारबांदोडें | आठबारसें |
| सांकोरडें | बांबोडबार्से | भांडोळ |
| कोडली | कोतरली | सळावली |
| सांगोडें | पिळयें | कर्मणें |
| सिगांव | कालें | कुळत्रोसें |
| काठारली | कोटी | महिसाळ |
| शळपें | दुधाळ | सांतोण |
| कामारखंड | मावाळिंगें | सांवरडें |

## बाळ्ळी महालांतील गांवांचीं नांवें.

| | | |
|---|---|---|
| आडणें | पाडी | कुर्ले |
| बाळ्ळी | पिर्ले | धावतळें (धांतोरडी.) |
| बेंदुरडे | दावें | गोक्रोळडें |
| बांदोल | नाकेरी | माइण |
| फातरपें | किटल | मगाळ |
| बारसें | वांगुरडें | मारिजील |
| कोरडें | कावरें | गिरकोण |
| खेडें | काजूर | सुलकण |
| निर्वानतळई | कोडारली | |

## चंद्रवाडी महालांतील गांवांचीं नांवें.

| | | |
|---|---|---|
| आंबावली | कुडचडें | सिरवई |
| आमोणें | मळकर्णें | होडार |
| असोळडें | नागवें | शेळडें |
| अत्रेडें | उपर्ण | पारोडें |
| चाइफी | केपें ( कुसमण ) | मुळे |
| चिकसेळवण | सेळवण | तळवडें |
| कोठब | | |

## काकोडे महालांतील गांवांचीं नांवें.

काकोडें साळयें

## कानकोण.

**मर्यादा**—उत्तरेस, बाळ्ळीमहाल; दक्षिणेस, कानडाप्रांत; पूर्वेस, अष्टाग्रहार; आणि पश्चिमेस, हिंदीमहासागर आहे.

**विस्तार**—ह्याची लांबी २० मैल आणि रुंदी १४ मैल आहे. पृष्ठभाग १०३ चौरस मैल आहे.

**स्थिति**—ह्यांत एकंदर ७ गांव आहेत. लोकसंख्या १७०८७ आहे. मुख्य ठिकाण कानकोण. पूर्वी एथील लोक अगदी रानटी स्थितींत होते; परंतु ब्राह्मण लोकांनीं त्यांस सुधारलें. सांप्रत येथील लोक मध्यमावस्थेंत आहेत.

## कानकोण प्रांतांतील गांवांचीं नांवें.

| | | |
|---|---|---|
| कानकोण. | बोर्डें. | नागारसें. |
| खोतीगांव. | गांवदोग्री. | पाळडें. |
| मावळिंगें. | पोळें. | पइंगिणी. |
| कोरगाळी. | लोलयें. | |

## बत्तग्राम.

**मर्यादा**—उत्तरेस, पेडणेंमहाल आणि सांवतवाडी संस्थान; दक्षिणेस, गोवा नदी आणि पंचमहाल; पूर्वेस, सत्तरी; आणि पश्चिमेस, बारदेश व अंत्रुज आहे.

**विस्तार**—ह्याची लांबी २० मैल आणि रुंदी ९ मैल आहे. पृष्ठभाग ६९ चौरस मैल आहे.

**स्थिति**—ह्यांत एकंदर २९ गांव आहेत. लोकसंख्या १८०९० आहे. मुख्य कचेरीची जागा डिचोली. ए-

थोल मूळचे लोक रानटी होते, त्यांस मराठे लोकांनीं सुधारलें. ब्राह्मण लोकांची वस्ती झाल्यापासून हे लोक सुधारत गेले.

## बत्तग्राम प्रान्तांतील गांवांचीं नांवें.

| | | |
|---|---|---|
| डिचोली | नारवें | सुरल |
| साळ | हातुर्ली | न्हावेली |
| मेणकुरें | मुर्डी | कुडणें |
| धुमासें | वाड्गिणी | हरवळें |
| लाटंबार्से | मयें | मावळिंगें |
| अडवळपाल | वेळगें | आमोणें |
| मूळगांव | पाळी | सरवण |
| सिरगांव | पिसुर्ले | कारापूर |
| बोरडें | उसगांव | विरडी |
| लामगांव | गांजें | |
| पिळगांव | कोठंबी | |

## सत्तरी.

**मर्यादा**—उत्तरेस, सांवतवाडी संस्थान; दक्षिणेस, पंचमहाल; पूर्वेस, बेळगांव जिल्हा; आणि पश्चिमेस, बत्तग्राम आहे.

**विस्तार**—ह्याची लांबी २० मैल आणि रुंदी १७½ मैल आहे. पृष्ठभाग १४४ चौरस मैल आहे.

**स्थिति**—ह्यांत एकंदर ८८ गांव आहेत. लोकसंख्या

८५६८ आहे. मुख्य ठिकाण सांखळी. पूर्वी ह्या प्रान्तांत अगदीं रानटी भिल्लांसारखे लोक राहत असत. नंतर ब्राह्मण लोकांनीं त्यांस सुधारलें. सांप्रत येथें कांहीं क्रिस्तांव लोकांची वस्ती झाली आहे

## सत्तरी प्रान्तांतील गांवांचीं नांवें.

आंबेडें. वुर्जुक.
आरूवी.
बोरये.
करमळी ( चांदडें)
कारापूर.
कोरावदें.
सिरवाळें.
कोडाळी.
कोलावडें. चरावडें.
म्हाडें.
भुईपाळ.
कुमारखण.
वागुयें.
सोनुस वोवळीयें
वानतें.
—पणशें..
पाडेली
आसोळें.
नागवें.
सालेळी-मोकासा-
अडवई-मोकासा.
धामशें.
कणीकरें.
मळपण.
गवाणें.
असोडें-सिरसोडें.
सरंगुळी.
शेळप-खुर्द.
खोतोडें.
मेळावली.
गुळेली-मोकासा.
साठेर.
देरोड्रें.
आंबेचागवळ.
आंबेडें-चोंदाडें.
आंबडेकोदाल.
सुर्ले.
नानेली.
शळप-बिज़ूर्क.
आंबेडें-बोबडें.
नगरगांव.
हेदाडें-सांतोडें.
भिरोडें.
सावरसें.
मासोरडें.
वेळूस.
कुडसें.
ह्याऊस.
दावें.
झरबें.
कोंपारडें.
कुडचिरें.
शिरोली.
गुळ्ळें.

| | | |
|---|---|---|
| केलवडें. | वाईगिणी | घोंटेली |
| पणसुली. | नानोडें | वण |
| चरवंदें. | उसडें | मातलिंगें |
| सिंगणें | धावें | परियें |
| मालोळी | सांवरडें-मोकासा | केर |
| आंबेली | पोडोसें | रिवें |
| खोडवें | पाल | ठाणें |
| रावण-मोकासा | हिवरेंखुर्द | बोकाळ |
| करंबळी बुर्जूक | हिवरेंबुर्जूक | खडकी |
| करंजळें | गोळावली | वेळगें |
| कडवळ | हणजूणें | सोनाड |
| पेंड्राळ | मोरलें | नाणस |

## पेडणें महाल.

**मर्यादा**—उत्तरेस, सांवतवाडी संस्थान; दक्षिणेस, पंचमहाल; पूर्वेस, बेळगांव जिल्हा; आणि पश्चिमेस, बत्तग्राम आहे.

**विस्तार**—ह्याची लांबी १७ मैल आणि रुंदी १०½ आहे. पृष्ठभाग १४४ चौरस मैल आहे.

**स्थिति**—ह्यांत एकंदर २९ गांव आणि ३ बेटें आहेत. लोकसंख्या २९९३६ आहे. मुख्य ठिकाण कसनें.

## पेडणें प्रन्तांतिल गांवांचीं नांवें.

| | | |
|---|---|---|
| हळर्ग | धारगळ | परसकडें |
| आंबेरें | इब्रामपूर | केरी |
| हरमल | मांद्रे | तांबोसें |
| पेडणें | मोप | तोरसें |
| कसारवर्णे | मोरजी | उगें |
| खाजनें | वर्जी | वारखंड |
| चांदर | पारसें | विरनोडें |
| चोपडें | पालयें | तुयें |
| कोरगांव | | |

## बेटें.

आराबा—हें बेट कोलवाळ गांवाच्या समीप आहे. ह्याची लांबी सुमारें १ मैल आणि रुंदी $\frac{1}{2}$ मैल आहे. एथील वस्ती बहुधा हिंदु लोकांची असून त्यांची संख्या २०००वर आहे.

राणें—हें बेट आराबा बेटाच्या पूर्वेस आहे. ह्याची लांबी १$\frac{3}{4}$ मैल आणि रुंदी सुमारें $\frac{1}{2}$ मैल आहे. लोकसंख्या २०० आहे.

हळर्ण—हें ओसाड बेट ह्याच नांवाच्या गांवा समोर आहे. ह्याचा परीघ सुमारें १$\frac{1}{2}$ मैल आहे.

## प्राचीन आणि अर्वाचीन शहरें.

पणजी (नवीन गोवा)--शहरें म्हटलीं म्हणजे मुळा-पासून भरभराटीस आलेलीं विरळा. मोठमोठालीं कल-कत्त्यासारिखीं शहरें जीं उदयास आलीं, तीं सुद्धां पूर्वीं नि-रुपयोगी रानवट ओसाड गांवांसारिखीं होतीं. पणजी हें शहर प्रथम कोणत्या प्रकारचें होतें ! सर्व डोंगराळ व गरीब लोकांचें खेडें होतें, परंतु सन् १७५९त बाराव्या महिन्याचे पहिले तारखेस फिरंगी लोकांनीं हें शहर आ-पली राजधानी केल्यापासून तें उदयास आलें. एथील कांहीं भागांतील पाणी खारट व रोगिष्ट असल्याकारणानें ह्या शहराची खराबी झाली, नाहीं तर खरोखर ह्या शह-रास सांप्रतच्यापेक्षां अधिक भाग्योदय प्राप्त झाला असता.

हें शहर गोवें शहराच्या पश्चिमेस सुमारें ४ मैल अं-तरावर असून मांडवी नदीच्या काठीं आहे. ह्याच्या पूर्वेस एक मोठा दगडी पूल* सुमारें २ मैल लांब आहे. एथील घरें बहुतकरून दगडी असून दोन मजली आहेत. तीं सदोदित रंगविलेलीं असतात. त्यांच्या खिडक्या हिर-व्या रंगाच्या असून पुढें सज्जे आहेत. कित्येकांस वाडे आहेत, त्यांत अनेक प्रकारचीं फुलझाडें लाविलेलीं असता-त. गल्ल्या व रस्ते विस्तीर्ण असून कोठें कोठें फरस-बंदी केले आहेत. ह्या शहराच्या मध्यभागीं उंचवठावर एक फिरंगी लोकाचें देऊळ आहे. आलीकडे तारायंत्र,

---

*हा 'मिंगेल दे नोरोन्ज' म्हणून जो गोव्याचा प्रतिनिधि इसवी सन् १६२९त झाला त्यानें पावलिस्तांच्या साह्यानें बांधिला होता.

समुद्र किनारीं सरकारी राजवाडा, सरकारी जमाखर्चाचें घर, खजीना; मांडवी, आणि धर्मोपदेशकाचेंमंदीर ह्या इमारती विस्तीर्ण असून अत्यंत शोभायमान आहेत. राजवाड्यांत सिंहासन असून प्रतिनिधि, सरसुभेदार, इत्यादिकांच्या अमोल्य तसबिरा भिंतीस टांगल्या आहेत. तेथून कांहीं अंतरावर सैन्यालय आहे. त्याच्या समोर आल्बुकेर्क साहेबाचा पुतळा एका चतुष्कोनी घुमटांत ठेविला आहे. तेथून बऱ्याच अंतरावर एक पुस्तकालय आहे. न्यायालयें, पुस्तकप्रसिद्धालयें, विद्यालयें, राजमंत्रसभागृह*, वैद्यशाला, दवाखानें, कारागृह, लेखाधिकारीगृह,† पत्रगृह‡, इत्यादि अतिसुंदर आणि अप्रतिम आलयें आहेत. ह्या शहराच्या उत्तरभागीं एक सुशोभित आणि मनोरम हिंदु देवालय आहे. एथील बंदर उत्कृष्ट असल्यामुळें व्यापार बराच चालतो. एथें व्यापारी लोकांच्या कांहीं मंडळ्या व पुष्कळ दुकानें आहेत. पूर्वी ह्या शहरांत गाड्या नवत्या, मोठमोठे श्रीमान लोक पालख्या, मेणे, माचील+, इत्यादिकांत बसून जात; परंतु सांप्रत पुष्कळ गाड्या दृष्टीस पडतात. ह्या नामांकित शहरांत घरें ३६३७ असून लोकसंख्या लष्कर खेरीज करून सुमारें १०००० आहे. ह्या शिवाय वर्षांतून हजारो लोकांचें आगमन आणि निर्गमन होतें.

**मडग्राम**—हें शहर सासष्टी द्वीपकल्पाच्या पश्चिमेकडून जी नदी समुद्रास जाऊन मिळत्ये, तिच्या उगमापासून सुमारें दीड मैल अंतरावर असून, गोवें शहराच्या दक्षि-

---

*कामराचें घर †सिक्रतारी ‡टपाल + एक वाहन आहे.

णाग्नेय दिशेस सुमारें १५ मैल अंतरावर आहे. हें शहर मोठें विस्तीर्ण असून पुष्कळ दिवसांपासून वसलेलें आहे. एथील घरें चिरेबंदी असून दोन मजली आहेत. रस्ते विस्तृत आणि स्वच्छ असतात. न्यायालय, पुस्तकप्रसिद्धालयें, राजमंत्रसभागृह, विद्यालयें, इत्यादि इमारती फारच मनोरम आहेत. शहरांतील पाणी शरीरास आरोग्यदायक आहे, त्यामुळें हें शहर बरेंच वसलें आहे. सर्व लोक बहुधा सधन असून उद्योगी आहेत. ह्या शहरास सोईवार बंदर नाहीं; तथापि व्यापार बराच चालतो. घरें ४००० असून लोकसंख्या सुमारें १३००० आहे,

**म्हापसें**—हें शहर ह्याच नांवाच्या नदीचे काठीं असून, गोवें शहरापासून सुमारें १० मैल अंतरावर आहे. घरें बहुधा दोन मजली आहेत. रस्ते व गल्या विशेष वर्णन करण्याजोग्या नाहींत. न्यायालयें, पुस्तकप्रसिद्धालयें, विद्यालयें, राजमंत्रसभागृह, सैन्यालय, इत्यादि इमारती फार चांगल्या आहेत. घरें ३१८७ असून लोकसंख्या ११००० आहे.

ह्या शिवाय **डिचोली, सांखळी,** वगैरे सर्व मुख्य ठिकाणें पहाण्याजोगीं आहेत.

**थोरलें गोवें**—हें प्राचीनकाळीं मोठें नादतें शहर होतें. **फिरिस्ता** इत्यादि मोठमोठ्या ग्रंथ कर्त्यांनीं ह्या शहराविषयीं विशेष वर्णन केलें आहे. सांप्रत हें शहर अगदीं ओसाड खेडें होऊन गेलें आहे.

**गोवें**—हें शहर तीसवाडी बेटाच्या उत्तरेस असून,

मांडवी नदीच्या काठीं आहे. हें आग्वादच्या उपसागरापासून सुमारें सहा मैल अंतरावर आहे. एथील बंदर सोईवार आणि सुरक्षित असल्यामुळें ह्या शहरास लवकरच समृद्धकाल प्राप्त झाला.

हें शहर सन १४७९त हुनावर एथील मुसलमान लोकांनीं वसविलें. सन् १५१०त फिरंगी लोकांचे स्वाधीन झाल्यापासून ह्यास उत्तरोत्तर भरभराटी येत चालली. त्यानीं आपलीं देवळें, मठ, वगैरे धर्मसंबंधी इमारती मोठ्या भव्य, विस्तीर्ण, आणि सुंदर अशा बांधिल्या; त्यांतून सांप्रत कांहीं पूर्व स्थितींत आहेत. गोदी, टंकसाळ, युद्धसंग्रहालय, राजवाडा, राजमंत्रसभागृह, इत्याद्यनेक ज्या सुंदर आणि गंभीर इमारती बांधल्या होत्या, त्यांतून पहिल्या तीन मात्र शाबूद आहेत. नौकावरोहणस्थानासमोर एक मोठा उंच दर्वाजा आहे, त्यावर **सांत काथरीन** आणि **गामासाहेब** ह्यांचे पुतळे आहेत. नवीन प्रतिनिधि किंवा सरसुभेदार आला ह्मणजे राज्यकारभाराचा अखत्यार घेण्यास त्याला ह्या दर्वाज्यांतून जावें लागतें. सांप्रत हें शहर अगदीं विगतश्रीक, उत्सादित, विनाशित आणि अरण्यमय होऊन गेलें आहे. एकादा मनुष्य नावेंत बसून, अथवा पायरस्त्यानें जवळून जाऊं लागला ह्मणजे हें एक मोठें नांदतें शहर आहे, असें त्यास वाटतें; परंतु आंत जातांच सर्व तेजोहीन, निश्चेष्टित, सामसूम, आणि धुळीस मिळालें आहे असें पाहून त्या द्रष्टाचें मानास उद्विग्नता प्राप्त होऊन त्याची आशा भंग होती; इतकेंच नाहीं, परंतु त्याची वृत्ति दे-

खील काहीं विलक्षण होऊन जाती. गोव्यांची हल्लींची स्थिति जे पहातात, त्यांचे मनांत विलक्षण प्रकारचे अनेक तरंग येऊन, पूर्वील प्रवास्यांनीं जें ह्या सुंदर नगराचें वर्णन केलें आहे, ते सर्वथा अतिशयोक्तीनें केलें नाहीं, असें तेथील जमिनीवर चोहोंकडे प्रस्तृत झालेले खोदींव व मोलवान पाषाण, शोभिवंत इमारतींचे शेषभाग, खोल आणि कुशलतेनें बांधलेल्या फरसबंदी विहिरी, वगैरे पाहून तें वर्णन वास्तविक आहे, अशी त्यांची खात्री झाल्याविना कदापिच राहत नाहीं.

ह्या नांमांकित शहरास वर्तमानकालीन दुःस्थिति प्राप्त होण्यास पुष्कळ कारणें झालीं. तीं अशीं कीं, सन १५७०त ह्या बहुजनाकीर्ण नगरांत महामारीचा उपद्रव होऊन असंख्य मनुष्यें जीवोत्सर्ग पावलीं. **धर्मसमीक्षणसभा** स्थापन झाल्यापासून तिचें अतिभयानक स्वरूप-अवलोकन करून, कांहीं लोक अन्यदेशीं पळून गेले. शहरांतील विहिरींचें पाणी नासल्यामुळें उदर रोगानें बहुत लोक मरण पावले. शेवटीं एथील राज्यकारभार **पणजी** शहरांत नेल्यापासून तर हें प्रसिद्ध नगर आरण्य आणि निर्जन होऊन गेलें आहे. पहिला फिरंगी सरदार **गामा साहेब** हिंदुस्थानास पोंचल्यानंतर हें शहर दीडशें वर्षेपर्यंत उत्तमावस्थेंत होतें.

# जाती.

---

## प्रकरण तिसरें.

### हिंदुजाती.*

**गोमांतकांत** ज्या हिंदुजाती आढळतात, त्या येणेंप्रमाणें;—**सारस्वत, बारदेशकर, पेडणेकर, किरवंत, चितपावन, कऱ्हाडे, पद्ये, गुरव, आगरीपरभू, सोनार, कांसार, सुतार, वाणी, गांवडे, मराठे, शिंपी, खारवी, गिउागरी, धनगर, सुदीर, भंडारी, हजाम, धोबी, कुंभार, बंदे, देवळी, चांभार, म्हार, आणि मांग.**

**सारस्वत**—हे गोमांतकांतील आद्य रहिवासी आहेत. स्कंदपुराणांतर्गत सह्याद्रिखंडांत†असें लिहिलें आहे कीं, पर-

---

* आलीकडे ह्या जातींविषयीं गद्यात्मक कांहीं ग्रंथ झाले आहेत; त्यांविषयीं मान्य ग्रंथाधार नसून मनास मानेल तसें पक्षपातानें लिहिलें आहे. तर असें लिहिणें हा ग्रंथकर्त्यांचा केवळ मूर्खपणा आहे. प्रत्येक ग्रंथकारानें किंवा इतिहास लिहिणारानें कोणतीही गोष्ट बरोबर शोध करून लिहिली पाहिजे; म्हणून त्या जातींविषयीं मान्य ग्रंथाधार घेऊन, त्यांच्या सद्यस्कालीक आचरणानुरूप थोडेसें एथें विवरण केलें आहे.

† पश्चात्परशुरामेण ह्यानीतामुनयोदश ॥ त्रिहोत्रवासिनश्चैव पंचगौडांतरास्तथा॥ १॥ गोमांचलेस्थापितास्ते पंचक्रोशीकुशस्थली॥ भारद्वाज:कौशिकश्च वत्स:कौंडिण्यकश्यपौ॥ २॥ वसिष्ठोजामदग्निश्च विश्वामित्रश्चगौतम: ॥ अत्रिश्चदशऋषय स्थापितास्तत्रएवहि ॥ ३॥ श्राद्धार्थंचैवयज्ञार्थं भोजनार्थंतथैवच॥

शुरामानें पंचगौडांतर्गत त्रिहोत्रपुर नामक नगरांत राहणारे दहा ब्राह्मण आणून गोमांतकांतील पंचक्रोशी, कुशस्थली, इत्यादि क्षेत्रांत त्यांची स्थापना केली. ते ब्राह्मण येणेंप्रमाणें.—**भारद्वाज, कौशिक, वत्स, कौंडिण्य, कश्यप, वसिष्ट, जमदग्नि, विश्वामित्र, गौतम,** आणि **अत्रि.** हे जे दहा ब्राह्मण आणिले त्यांचीं सहासष्ट कुळें होतीं. त्यांतून **कुशस्थली** आणि **केळोशी** ह्या दोन क्षेत्रांत **कौत्स, वत्स,**

---

मठग्रामेकुशस्थल्यां कर्दलीनाम्नितत्पुरे।।४।। विश्वेश्वरजगन्नाथ त्रैलोक्यादिमहेश्वर।।भूतंभव्यंभविष्यच सर्गस्थित्यंतकारक।।५।। कथासर्वाजगन्नाथ श्रुताचत्वत्प्रसादत: ।। दशगोत्रकराविप्रा स्त्रिहोत्रपुरवासिन:।।६।। आनीता:परशुरामेणस्वकार्यार्थस्यसिद्धये।।हेशंभोतस्यविस्तारं कथयस्वसमासत:।।७।।**ईश्वरउवाच** शृणुपुत्रसाधुपृष्टं किंयोगंचकथंस्थिति: ।। ब्राह्मणादशगोत्राश्च कुलंषट्षष्टिकंस्मृतं।।८।।कुशस्थल्यांकर्दल्यांच गोत्राणिस्थापितानिहि ।। कौत्संवत्संचकौंडिण्यं गोत्रंदशकुलान्वितं।।९।।एतेत्रिगोत्रजाविप्रा उत्तमाराजपूजिता:।। सुदर्शना:सदाचाराश्चतुरा:सर्वकर्मसु।।१०।।मठग्रामेवरेण्यंच लोटलीचकुडस्थली।-षट्षडतेषुग्रामेषु कुलानिस्थापितानिवै।।११।।चूडामणिमहाक्षेत्रे कुलानिदशएवहि ।। स्थापिताश्चत्रयेदेवा भार्गवेनतु यत्नत:।।१२।।दीपवत्यांकुलंचाष्टं स्थापितंचयथाविधि ।। गोमांचलेमध्यभागे कुलंद्वादशस्थापितं।।१३।।एवंषट्षष्टिकाविप्रा: स्थापिताचपरस्परं ।।प्रादायतेषांरामेण कुशस्थलीनिवासिनां।। ।।१४।। सासष्टिद्विजमुख्याना मधिकारंददौतदा ।।१५।। स० खं० उ० अ० १—४.।।

आणि **कौंडिण्य** ह्या तीन गोत्रस्थ ब्राह्मणांचीं दहा, दहा कुळें स्थापिलीं. हे तीन गोत्रांचे ब्राह्मण राजादिकांस पूज्य असून सर्व कर्मांत चतुर आणि उत्तम आचाराचे असे होत. बाकी जीं गोत्रें आणि कुळें राहिलीं, त्यांतून **मठग्राम**, **वरेण्य**, **लोटली**, आणि **कुडस्थली** ह्या चार ग्रामांत सहा, सहा कुळें; **चुडामणी** महा क्षेत्रांत दहा कुळें; आणि **दीपवति** व **गोमांचलाच्या** मध्यभागीं बारा कुळें स्थापिलीं. ह्याप्रमाणें **परशुरामानें** सासष्ट कुलांची स्थापना करून त्यांतील मुख्य ब्राह्मणांस शाण्णव गांवांचा अधिकार* दिला. दशविध†ब्राह्मणांमध्यें देशपरत्वें निरनिराळे दोष‡ आहेत, त्यांतून त्रिहोत्र्यांस (सारस्वतांस) मत्स्याहार

---

*हा अधिकार अजून पावेतों त्यांकडेसच वंशपरंपरेनें चालत आहे. सांप्रत जरी गोमांतक देश फिरंगी सरकाराच्या स्वाधीन आहे; तथापि वे त्या गांवांचा कर (खंड) सरकारास देऊन, त्या गांवांचें उत्पन्न आपापल्यांत वांटून घेतात. जे सारस्वत ब्राह्मण फिरंगी पाद्र्यांनीं बलात्कारें करून बाटविले त्यांस देखील हा अधिकार आहे.

†द्राविडाश्चैवतैलंगा कर्नाटामध्यदेशगाः॥गुर्जराश्चैवपंचैते द्राविडा:पंचकथ्यते ॥१॥सारस्वता:कान्यकुब्जा उत्कलामैथिलाश्चये ॥ गौडाश्चपंचधाश्चैव दशविप्रा:प्रकीर्तित: ॥ स्कं० पु० स० खं० उ० अ० १.

‡चर्मांबुगुर्जरेचैव देशदोष:प्रकल्प्यते॥ दक्षिणेदासिगमनंदोषश्चैवमहाद्भुतं ॥१॥ नदंतधोतं कर्नाटेकाश्मीरे भट्टमारिजा:तैलंगेगोत्राहनंचप्रारब्धंतुद्राविडे ॥२॥ एवंदेशेचदोषाश्च स्वदेशेचप्रकल्प्यते ॥ गुर्जरीकच्छहीनातु विधवाचसकंचुकी ॥ ३ ॥ त्रिहोत्राश्चकनोजाश्च मत्स्यभुङ्मांसभोजना: ॥ कान्यकुब्जेभ्रातृगामी देशदोषा:प्रकीर्तिता:॥४॥स० खं० उ०

करण्याचा दोष आहे. तथापि ऋषिकुलश्रेष्टच आहे, आणि त्याविषयीं कोणीच शंका* घेऊं नये.!!

ज्यावेळीं परशुरामानें ह्या ब्राह्मणांस शाण्णव ग्रामांचा अधिकार दिला, त्यावेळीं कित्येक भिक्षुकी सोडून गृहस्थाश्रमी झाले. पुढें जसजसी राज्यक्रांति होत गेली, तसतसी त्यांची भिक्षुक वृतिही कमी होत गेली. हलीं सारस्वतांत वैदिक, शास्त्री, आचार्य, भिक्षुक, भट्ट, हरिदास, पुराणीक, इत्यादिकांपेक्षां व्यापारी आणि रोजगारी पुष्कळ आहेत. हे संतोषी, शुचिर्भूत, दयाळू, देवभोळे, आणि आदरातिथ्य करणारे आहेत; परंतु त्यांच्या अंगी जो आपसांत हेवा मत्छर करण्याचा दुर्गुण आहे तो विशेष आहे. सारस्वतांत दोन मत भेद आहेत. एक स्मार्त आणि दुसरा वैष्णव.† ह्यांनीं मोठमोठाले हुद्दे चालविले ह्मणून त्यांस देशपांडे, सरदेसाई, शेणवी,‡ नायक, कामत, प्रभू,

---

*एवंऋषिकुलंश्रेष्टं ब्राह्मण्यंचैवविस्तरं ॥ सर्वकर्मसुशुध्यंच नात्रतस्यविचारणा ॥१॥ स्कं॰पु॰स॰खं॰उ॰अ॰१.

† यांस येथें सासष्टीकर असेंही ह्मणतात. कारण सासष्टी प्रान्तांत पूर्वी हेच मुख्याधिकारी होते.

‡ अलीकडे कांहीं मराठी आणि इंग्रजी ग्रंथ झाले आहेत, त्यांत शेणवी हा शब्द सर्व सारस्वतांच्या जात्याभिधानाकडे लावला; त्यावरून ते ग्रंथकर्ते केवळ अज्ञान दिसून येतात. कारण शेणवी हा शब्द वृतिवाचक असून सर्वांस लागू आहे असें नाहीं. ज्यांस शेणवी हें उपनाम प्राप्त झालें, त्यांचे वंशज मात्र आपल्या नामापुढें लावतात. अशी कथा आहे कीं, कर्नाटक देशाचा भायराजा मयुरवर्मा त्याचा

पई, भांडारी, केणी, मंत्री, महाजन, इत्याद्यनेक उपनामवाचक किताब प्राप्त झाले. हे कुकोण देशांत राहत असल्याकारणानें त्यांस कोंकणे* असें ही ह्मणतात.

**बारदेशकर.**—हे सारस्वतांतील वैष्णव सांप्रदायी ब्राह्मण होत. हे आलीकडे अपंक्त झाल्यामुळें त्यांविषयीं व्यासोक्त ग्रंथाधार नाहीं. ह्यांच्या पूर्वजांनीं कांहीं अयोग्य कृत्य केलें, त्यामुळें त्यांस अपंक्त ठेविलें असावें. गोमांतकांतील बारदेशकर कांहीं व्यापारी आणि कांहीं रोजगारी आहेत. हे ब्राह्मण **जमदग्नि, वत्स, भारद्वाज, अत्रि, वसिष्ट** इत्यादि सात गोत्रांचे आहेत.

---

नातू शिखीवर्मा यानें कांहीं सारस्वतांस शाण्णव गांवांचा अधिकार दिला होता: ह्मणून त्यांस **शाण्णवी** ह्या नांवानें लोक हाक मारूं लागले. दुसरें असें वर्णन आहे कीं, परशुरामानें ब्राह्मण (गोमांतकांत) सासष्टी आणि तीसवाडी ह्या दोन प्रांतांत स्थापिले, आणि त्यांतील मुख्य ब्राह्मणांस सर्व गांवांचा ह्मणजे सासष्टींतील ६६ गांव आणि तीसवाडींतील ३० गांव मिळून शाण्णव गांवांचा अधिकार दिला; तेव्हां त्यांस लोक शाण्णवी (शाण्णव गांवचे अधिकारी) असें ह्मणूं लागले. ही गोष्ट वरील गोष्टीपेक्षां सुयुक्तिक दिसती, आणि सांप्रत जे ब्राह्मण अधिकारी आहेत, त्यांस पूर्वीपासून ह्या दोनच प्रांतांचा अधिकार आहे; ह्यावरून ह्या गोष्टीस प्रमाण मानण्यास बराच आधार ही दिसतो. शेणवी हा शाण्णवी ह्या पदाचा अपभ्रंश आहे. सांप्रत कित्येक लोक शानई, शणई, असें ही ह्मणतात. परंतु हा शब्द सर्वांस लागू नसून जातिवाचक नाहीं. गोमांतकांत शेणवी हा शब्द मोठ्या पदवीचा आहे असें समजतात, व एकाद्या गृहस्थास बहुमानानें हाक मारणें झालें ह्मणजे त्याच्या नामापुढें **शेणवी** ह्या शब्दाची योजना करून त्यास हाक मारितात. शेणवी हा शब्द जातिवाचक आहे, किंवा शेणवी ह्मणून एक जात आहे, असें कोणत्याच पुरातन मान्य ग्रंथांत सांपडत नाहीं.

*कुकोणदेशगा यस्मात्कोंकणानामतोभवन् ॥ सू० सं०

**पेडणेकर.**— हे सारस्वतांतलेच होते. ह्यांविषयीं असा लेख सांपडतो कीं, "कोणी एके समयीं पेडणें येथें एका ब्राह्मणाचे घरीं विवाह होता. तेव्हां त्यानें सर्व प्रांतांतील ब्राह्मणांस आमंत्रण पत्रें पाठविलीं. **सासष्टी, चोडण, तीसवाडी, बारदेश,** इत्यादि प्रांतांतील ब्राह्मण ह्या समारंभास जमले होते. सर्व विवाह विधि संपल्यानंतर नोवरीस होम प्रदक्षणा करितेवेळीं पदर सांभाळण्यास सांगितलें. तेव्हा तिनें असें उत्तर केलें कीं, हे सर्व पूर्वींच मला ठाऊक आहे. हें त्या नोवरीचें भाषण ऐकून सर्व विद्वान ब्राह्मण आपल्यांतच कुरकुर करूं लागले. शेवटीं त्यांनीं असा निश्चय केला कीं, हें दुसरें लग्न असावें. ह्मणून त्यां पेडणेकर ब्राह्मणांस अपंक्त ठेवून ते आपल्या गांवीं गेले." ह्या गोष्टीस आज शेकडो वर्षे होऊन गेलीं. सांप्रत हे अपंक्तच आहेत.

**किरवंत**—हे एथें अगदीं थोडके आहेत. ह्यांचा आचारविचार जसा असावा तसा नाहीं. ह्यांच्या उत्पत्तिविषयीं निर्णयात्मक ग्रंथाधार सांपडत नाहीं.

**चितपावन**—हे सह्याद्रीच्या खालीं **चिपळूण** ह्मणून एक गांव आहे, तेथील मूळचे राहणारे. ह्यांच्या उत्पत्तिविषयीं सह्याद्रि खण्डांत अशी कथा* आहे कीं, "कोणे

---

*श्राद्धार्थंचैव यज्ञार्थं मंत्रिता:सर्वब्राह्मणा: ।। नागताऋषय: सर्वे क्रुद्धोभूद्भार्गवोमुनि: ।। १ ।। सूर्योदयेतुस्नानार्थं गत: सागरदर्शने ।। चितास्थानेतुसहसा ह्यागतांश्चददर्शस:।।२।। काजाति:कश्चधर्मश्च कस्थानेचैववासनं ।। कथयध्वंचसंस्था-

एकेसमयीं **परशुरामानें** श्राद्धयज्ञार्थ सर्व ब्रह्मणांस आमंत्रण केलें, परंतु ते आले नाहींत. यास्तव तो कोपायमान होऊन स्नान करण्यास सागराप्रत गेला. तेथें चितास्थानीं कांहीं कैवर्तक आले होते, त्यांस सर्व विद्यायुक्त ब्राह्मण्य व चवदा गोत्रें देऊन, त्यांचीं साठ कुळें पवित्र केलीं, आणि त्यांस असें सांगितलें कीं, माझ्या प्रसादेंकरून तुह्मी गौरवर्ण युक्त घारे सुनेत्र, चांगलीं स्वरूपें, इत्यादिकेंकरून युक्त व्हाल. जर तुह्मास विपत्ति प्राप्त झाली, तर माझें चिंतन करा, ह्मणजे मी येऊन तुमची विपत्ति दूर करीन. कांहीं दिवस गेल्यावर ह्याची परीक्षा पाहूं ह्मणून त्यांनीं **परशुरामास** हाक मारिली. त्यावेळीं **परशुराम** येऊन पहातो, तों ते सर्व समृद्ध आहेत. ते-

---

ध्ये कारणंतस्यविद्यते ॥ ३ ॥ कैवर्तकाऊचुः ॥ ज्ञातिपृच्छांसिहेराम ज्ञातिःकैवर्तकीतिच ॥ सिंधुतीरेकृतोवासो व्याधकर्मविशारदाः ॥ ४ ॥ तेषांषष्टिकुलंश्रुत्वा पवित्रमकरोत्तदा ॥ ब्राह्मण्यंचततोदत्वा सर्वविद्यासुलक्षणं ॥ ५ ॥ चितास्थानेपवित्रत्वा च्चित्पावनउदाहृतः ॥ चतुर्दशगोत्रकुलं स्थापितंचानुरंगके ॥ ६ ॥ सर्वेचगौरवर्णास्ते सुनेत्राश्चसुदर्शनाः ॥ सर्वविद्यानुकूलाश्च भार्गवस्यप्रसादतः ॥ ७ ॥ धनधान्यसमृद्धाश्च यूयंभवतसर्वदा ॥ यदाकदावायुष्माकं विपत्तिर्जायतेभुवि ॥ ८ ॥ तदाऽह्वयितुमांसर्वे समवेताःसुखाप्तये ॥ आगत्याहंतदाविप्रा वःकार्यंसाधयेक्षणात् ॥ ९ ॥ गतेबहुदिनेदेवि स्वकार्यंकृतवान्स्थितः ॥ कुचोद्यंचैवमादाय स्वामिबुद्धिपरीक्षणात् ॥ १० ॥ आक्रंदितंतदातेषां श्रुत्वा-

व्हां त्यास मोठा राग आला, आणि त्यांस श्राप देऊन पतित केलें."

पेशव्यांस राज्य प्राप्त झाल्यापासून इतर प्रदेशांतील चितपावन जसे सुधारले तसे एथील चितपावन सुधारले नाहींत. ह्यांच्या ज्ञातिबांधवांचा जसा आचारविचार आहे, तसा ह्यांचा नाहीं. एक दोन घरें उत्तमाचाराचीं मिळतील. हे येथें थोडकेच आहेत. ह्यांची वस्ती बहुधा **नवीन जिंकलेल्यां** प्रान्तांत आहे. हे शूद्रांच्या घरीं वृत्ति चालवितात, ह्मणून त्यांस एथील लोक तुच्छ मानतात. हे कोठें कोठें देवाचे पुजारी आहेत. जर हे चितपावन आपल्या ज्ञातिबांधवांचा कित्ता घेऊन आपल्या रीतीभाती सुधारतील, तर खरोखर ते एथें सर्वमान्य होतील.

---

राम:कृपानिधि: ॥ श्रीरामउ० ॥ किमर्थंक्रंदितंविप्रा भवद्भिर्मीलितैरिह ॥ ११ ॥ किंदु:खंभवतामद्य नाशयाम्यचिरादहं ॥ स्कंदउ० इतितस्यवच:श्रुत्वा प्रत्यूचुस्तेभयान्विता: ॥ १२ ॥ केवलंतुपरीक्षार्थं क्रदितंमीलितैर्विभो ॥ इतितेषांवच:श्रुत्वा क्रोधसंरक्तलोचन: ॥ १३ ॥ शापंचप्राप्यतेतस्य कुत्सिताश्चदरिद्रिण: ॥ सेवासर्वत्रकर्तार इदंनिश्चयभाषणं ॥१४॥ कन्याविक्रयकाराश्च पुण्यविक्रयकारिण:॥ शप्त्वेत्थंभार्गवोरामो महेंद्रंतपसेययौ ॥ १५ ॥ गतेतुभार्गवेरामे तत्क्षेत्रस्थाद्विजातय:॥ शापग्रस्ता:सदु:खार्ता:शूद्रप्रायास्तदाभवन ॥ १६ ॥ सह्याद्रेश्चतलेग्राम श्चितपोळननामत: ॥ तत्रैवस्थापिताविप्रा यावच्चंद्रदिवाकरौ ॥ १७ ॥ स० खं० अ० ८१

**कऱ्हाडे**—हे कऱ्हाड नामक प्रांतांतील मूळचे राहणारे. **सह्याद्रि खण्डांत** अशी कथा* आहे कीं, "हे खऱ्हाच्या हाडापासून उत्पन्न झाले. ह्यांची कुलदेवी **मातृका** हिला ते प्रतिवर्षी पुजेच्या वेळेस बळी देत असतात. जर ह्यांनीं देवीच्यावरदानाप्रमाणें यज्ञ केला, तर त्यांचा सर्वत्र जय होतो. ह्यांस पुरीश, अत्रि, कौशिक, वत्स, हारित, शांडिल्य, मांडव्य, देवराज, आणि सुदर्शन ह्या दहा ऋषींपासून गोत्रें मिळालीं."

कऱ्हाडे **नवीन जिंकलेल्यां** प्रांतांत पुष्कळ आहेत.

---

*महादेव उवाच ॥ शृणुपुत्रप्रवक्ष्यामि इतिहासंपुरातनं ॥ कराष्ट्रनामादेशोस्ति दशयोजनविस्तृत: ॥१॥ वेदवत्याश्चोत्तरे कोइनासंगदक्षिणे ॥ कराष्ट्रनामदेशश्च दुष्टदेश:प्रकीर्तित: ॥२॥ सर्वलोकाश्चकठिना दुर्जना:पापकार्मिण: ॥ तद्देशजाश्चविप्रास्तु काराष्ट्रइतिनामत: ॥३॥ पापकर्मरतानष्टा व्यभिच्यारसमुद्भवा: ॥ खरस्यअस्तियोगेन रेतंक्षिप्तंविभावकं ॥४॥ तेनतेषांसमुत्पत्ति र्जातावैपापकर्मिणां ॥ तद्देशेमातृकादेवी महादुष्टाकुरूपिणी ॥५॥ नकृतायेनसाहत्या कुलंतस्यक्षयंव्रजेत् ॥ एवंपुरातयादेव्या वरोदत्तोद्विजान्किल ॥६॥ तेषांसंसर्गमात्रेण सचैलस्नानमाचरेत ॥ स्कंद- उ० ॥ ॥किंगोत्रंचकथंजात: किन्नामगृहणादपि ॥ ७ ॥ ई्श्व०उ०॥ पुरीशमत्रिगोत्रंच कौशिकंवत्सहारितं ॥ शांडिल्यंचैवमांडव्यं देवराजसुदर्शनं ॥८॥ ब्रह्महत्यांप्रकुर्वंति प्रतिसंवत्सरेह्यमी ॥ तस्यादेव्या:कृतोयज्ञ: सर्वत्राविजयप्रद:॥९॥ स० खं० अ० ८२ ॥

हे शूद्रांच्याघरीं उपाध्ये आहेत. हे देवी उपासक आहेत. ह्यांच्या रीतीभाती अगदीं अयोग्य आहेत. हे एकादें हलकें कृत्य करण्यास मागें पुढें पहात नाहींत, ह्मणून एथील इतर ब्राह्मण त्यांस तुच्छ मानतात. ह्यांचे इतर प्रदेशांतील ज्ञातिबांधव आलीकडे जसे सुधारले तसे हे सुधारले नाहींत.

**पद्ये**—हे येथें पुष्कळ आहेत. सह्याद्रिखंडात* असें सांगितलें आहे कीं, "कऱ्हाड्यांतील पद्य ह्या नामातें धारण करणाऱ्यां तीन पुरुषांपासून ह्यांची उत्पत्ति आहे. हे सर्व कर्मांत बहिष्कृत आहेत. जर कदाचित् हे एखाद्या मंगल कार्यास आले तर त्या सर्व कार्याचा नाश होतो."!!

पद्यांस गोमांतकांत **केरचेभट** असें ह्मणतात. हे येथें शूद्रप्राय आहेत. ह्यांचा धंदा बहुधा शेतकीचा असतो. एक दोन घरें मात्र चांगल्या आचाराचीं आहेत.

**गुरव**—हे येथें थोडकेच आहेत. हे देवालयांत चाकर असतात. हे शूद्र असून ब्राह्मणां घरचें अन्न मात्र घेतात. हे सुरापान करीत नाहींत.

---

* तन्मध्यगास्त्रयोविप्राः पद्ययेनामधारकाः ॥ पदमात्रंतुगायत्री पारगाःकोंकणेस्थिताः ॥१॥ श्राद्धेवामौंजिकर्मेवामांगल्येवासुकर्मसु ॥ ह्यागताःपद्ययोविप्राः कार्यनाशोनसंशयः ॥२॥ वर्जयेत्सर्वकार्येषु ॥ सर्वधर्मेषुवर्जयेत ॥३॥ स० खं० अ० ८२

**सोनार***—हे येथें पुष्कळ आहेत. हे अभिमानी आणि अतिव्ययी आहेत. एथील इतर लोक त्यांस छत्री, मशाल, वगैरे लग्नाच्या वेळीं घेऊं देत नाहींत. आणि वधुवरांस घोड्यावर बसवून नेण्याचाहि त्यांस अधिकार नाहीं. जर त्यानीं छत्री लाविली तर सर्वलोक मारावयास उठतात. हे हक्क आपणास असावे ह्मणून आज शेकडो वर्षां पासून ते प्रयत्न करीत आहेत, परंतु अजून पावेतों त्यांचा मनोरथ सिद्धीस जात नाहीं. एकदा त्यांनीं हजारो रुपये खर्च करून छत्री, मशाल, वगैरे घेण्याचा हुकूम **पोर्तुगाल** देशाहून आणिला; परंतु एथील लोकांनीं त्यांच्या विरुद्ध अर्ज करून, तो ही हुकूम रद्द केला. ह्यावरून हें ह्या लोकांचें कृत्य हट्टनिग्रहाचें दिसतें!! ह्यांचा आचार इतर प्रदेशांतील सोनारांपेक्षां कांहीं अंशीं चांगला आहे.

**कांसार**—हे येथें थोडकेच आहेत. ह्यांत दोन प्रकार आहेत. पहिल्या प्रकारचे कांसार तांबावत करून विकतात. 'दुसऱ्या प्रकारचे कांसार बांगड्या वगैरे कांचीच्या वस्तु करून विकतात. ह्यांचा आचार सोनारांपेक्षां वाईट आहे.

**आगरी परभू**—हे गोमांतकाशिवाय इतर प्रदेशांत आढळत नाहींत. ह्यांचा धंदा शेतकीचा असतो.

---

* शूद्रांशयनमारोप्य ब्राह्मणश्चेत्कथंचन ॥ जनयेद्ग्राम्यधर्मेण तस्यांपारसवंसुतं ॥ १ ॥ महाशूद्रासविख्यात: शूद्रेभ्य: किंचिदुत्तम: ॥ स्वर्णकारस्यतस्येह स्नानंधोत्रंपवित्रकं ॥२॥ शूद्रकमलाकर पृ० ८३.

**लोहार ( सुतार )***—हे येथें थोडकेच आहेत. हे लोखंडी आणि लांकूड काम करून पोट भरतात. हे क्वचित् सुरापान करितात.

**वाणी**—हे आपणास वैश्य ह्मणून घेतात. ह्यांचा धंदा बहुतकरून दुकानदारीचा असतो. हे सोनारांचे प्रतिस्पर्द्धी आहेत!!

**गांवडे**—हे शूद्र असून स्वच्छ असतात. ह्यांचा धंदा शेतकीचा आहे. हे सुरापान क्वचित् करितात.

**मराठे**—हे आपणास श्रेष्ठ ह्मणून घेतात. हे शेतकी करून उदर पोषण करितात. हे बहुधा **नवीन जिंकलेल्यां** प्रांतांत पुष्कळ आहेत.

**सुदीर**†—ही जात गोमांतकाशिवाय इतर प्रदेशांत पहाण्यांत येत नाहीं. ह्यांत पुष्कळ भेद आहेत.

**शिंपी**—हे येथें थोडकेच आहेत. ह्याचा धंदा शिवण काम करण्याचा आहे. ह्यांतून कित्येक सुरापान करितात.

---

* सूचकाद्विप्रकन्यायां जातस्तक्षकउच्यते ॥ शिल्पकर्माणिच्यान्यानि प्रासादलक्षणंतथा ॥ १ ॥ शूद्रायांवैश्यसंसर्गात् विधिनासूचकःस्मृतः ॥ २ ॥ उशनस्मृ० अ० १ श्लोक ४३ —तक्षातुवर्धकीस्त्वष्टाथिस्थमरः ॥ कां० २ शूद्रवर्ग. श्लो० ९ ॥ —योमागधीक्षत्रियोर्जातउल्मुकसंज्ञकः ॥ सलोहकर्मणाजीवे दुत्तमश्वांत्यजातितः ॥ १ ॥ लोहकारइतिख्यातो लौहकर्मास्यजीवनः ॥ शूद्रक० पृ० ८३

† हा शूद्र ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे.

**खारवी**—हे येथें पुष्कळ आहेत. ह्यांचा धंदा मासळी मारून तिचा विक्रय करण्याचा आहे. हे अतिसुरापान करितात.

**भंडारी***—हे येथें पुष्कळ आहेत. ह्यांचा धंदा ताड, माड, इत्यादिकांपासून सुरा काढून तिजपासून दारू करून विकण्याचा आहे. ह्यांत कांहीं भिन्न जाती आहेत.

**मिठागरी**—हे येथें थोडकेच आहेत. हे शेतकी करून पोट भरितात. ह्यांत एक दुसरी जात आहे त्यांस **कातकरी** असें ह्मणतात.

**धनगर**†—हे **नवीन जिंकलेल्यां** प्रांतांत पुष्कळ आहेत. ह्यांचा धंदा दुध, लोणी, इत्यादि विकण्याचा असतो. कित्येक शेतकी करून पोट भरतात.

**हजाम**‡—हे येथें अगदी थोडके आहेत. हे आपणास श्रेष्ठ ह्मणून घेतात. हे बंदे, देवळी, इत्यादिकांची हजामत करीत नाहींत.

---

* आभीरस्त्रीलभेद्वेनात्पुत्रंशौंडिकसंज्ञिकं ॥ सुरांसकृत्वावीक्रीय कुर्यातेनंचवर्तनं ॥ १ ॥ शू० क० पृ० ८४

† वैशायांशूद्रसंसर्गा ज्जातोवैदेहिकःस्मृतः ॥ अजानांपालनंकुर्य्या न्महिषीणांगवामपि ॥१॥ दधिक्षीराज्यनक्राणां विक्रायाज्जीवनंभवेत ॥१॥ उ० स्मृ० अ० १ श्लोक० २०

‡ उग्रायांमागधाज्जात कुंतलश्मश्रुकर्मकृत् सनापितइतिप्रोक्तः क्षौरकर्मविधानकृत ॥१॥ शू० क०

बंदे, देवळी, इत्यादि—हे देवालयांत चाकरेस असतात. कित्येक वाद्य, गायन, इत्यादिकांवर पोट भरतात. कलावती ह्याच जातीच्या आहेत, त्यांस हजामांच्या घरीं कोणत्याच कार्यास आमंत्रण केलें असतां त्या जात नाहींत.

**धोबी***—हे येथें फार थोडे आहेत, ह्याचा धंदा वस्त्रें, प्रावरणें, इ० धुऊन त्यावर पोट भरण्याचा असतो.

**कुंभार**†—हे येथें थोडकेच आहेत. ह्यांचा धंदा मातीचीं भांडीं करून विकण्याचा असतो. हे **नवीन जिंकलेल्यां** प्रांतांत पुष्कळ आहेत.

**चांभार.**‡ ⎫
**म्हार.** ⎬ हे अतिशूद्रांत गणिले जातात. ह्यांचा धंदा त्यांच्या नांवांप्रमाणेंच आहे. ह्यांचा समूदाय येथें थोडा आहे.
**मांग.** ⎭

# क्रिस्तांव जाती

**पोर्तुगेज**—पोर्तुगाल देशाहून प्रतिनिधि, न्यायाधिश, मुख्यधर्मोपदेशक, लष्करीकामदार, लष्करीशिपाई, इत्या-

---

* पुकशाद्वैश्यकन्यायां जातोरजकउच्यते ॥ नृपायांशूद्रसंसर्गाज्जात:पुकशउच्यते ॥ उ० स्मृ० अ० १ श्लो० १८

† वैश्यायांविप्रतश्चौर्यात्कुंभार:सउच्यते ॥ उ०स्मृ ०अ०१ श्लो०३२.

‡ वैदहिकातुविप्रायां जाताश्चर्मोपजाविन: ॥ उ० स्मृ० अ० १ श्लो० २१

दि जे येतात त्यांस पोर्तुगेज असें ह्मणतात. हे येथें फार थोडके आहेत.

**मिस्तीस**—पोर्तुगाल देशचे राहणारे असून येथें एक, दोन पिढ्या स्थाईक झाले ह्मणजे त्यांस **मिस्तीस** असें ह्मणतात. हे सर्व प्रतिष्ठित आहेत. ह्यांस पोर्तुगाल देशांत युरोपस्थांप्रमाणेंच मानतात; परंतु गोमांतकांत ह्यांस **मिश्रझालेले पोर्तुगेज*** असें ह्मणतात. हे येथें थोडकेच आहेत.

**क्रिस्तांव ब्राह्मण**—पूर्वी बाटविलेल्यां ब्राह्मणांस क्रिस्तांव **ब्राम्हण** असें ह्मणतात. ह्यांस येथें मोठा मान आहे. पहिल्या दोन वर्गांस जो हक्क आहे तो जरी ह्यांस नाहीं, तथापि न्यायाधिश, मामलतदार, वकील, लष्करीकामदार, इत्यादिकांचे हुद्दे ह्यांस मिळतात. हे वरील दोन जातींपेक्षां अधिक आहेत.

**चारडे**—हे पूर्वी पासून आपणांस क्षत्रीय ह्मणून घेतात. हे येथें पुष्कळ आहेत. ह्यांस क्रिस्तांव ब्राह्मणांपेक्षां नीच मानतात.

**शूद्र**—हे येथें सर्वत्र पसरले आहेत. पुरातनकालीं ह्यांस इतर क्रिस्तांव आपल्या देवळांत घेत नसत; परंतु आलीकडे त्यांस धर्म कथन ऐकण्यास जाण्याचा हुकूम झाला आहे.

**अतिशूद्र**—ह्मार, मांग, काफरी, इत्यादी जे लोक पूर्वी बाटविले त्यांस **अतिशूद्र** ही संज्ञा आहे. हे येथें फार थोडके आहेत.

---

* मिस्तीस

ह्या शिवाय गोमांतकांत गुर्जीर, मुसलमान, पारशी, चिनी, इत्यादि लोक कोठें कोठें पहाण्यांत येतात.

---

# प्रकरण चौथें.

—ooo—

## प्राचीन आणि अर्वाचीन हिंदु देवालयें.

ज्यावेळीं परशुरामानें त्रिहोत्रपुराहून ब्राह्मण गोमांतकांत*. आणिले, त्यावेळीं त्यांचे कुलदेवही आणून येथें स्थापन केले. हे देव मोठे जाज्वल असून, भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारे आहेत; व त्यां सर्व देवांचें स्मरण केल्यानें संचित करून ठेविलेल्या पापाचा नाश होतो, असें स्कंदपुराणांत वर्णन आहे.

---

*येथें गोमाचल पर्वत आहे, ह्मणून ही ह्या देशास गोमांतक हें नांव प्राप्त झालें असावें. ह्या पर्वताचें वर्णन हरिवंशांतील विष्णुपर्वांत व विजयध्वजी भागवताच्या दशमस्कंदांत आहे.

†आनिताभार्गवेणैते गोमांताख्येचपर्वते ।। मांगिरीशो महादेवो महालक्ष्मीश्चह्मालसा ।। १ ।। शांतादुर्गाचनागेश: सप्तकोटेश्वरंशुभं ।। तथाचबहुलादेवा: परशुरामेणचानिता:।। ।। २ ।। स्थापिताभक्तकार्यार्थं तत्रैवचशुभस्थले ।। तेदेवावीर्यवंताश्च भक्ताभिष्टप्रदायका: ।। ३ ।। स्मरणात्धरतेतेषां पापंसत्यंवदाम्यहं ।। ४ ।। स्कंद पु० स० खं० उ० अ० १–४.

**श्रीमंगेश,***( मांगिरीश )—ह्या देवाचें देवालय पूर्वी **कुशस्थली**† ह्या गांवांत होतें. सांप्रत प्रियोळ गांवाचा भाग ज्यास **मंगेशी** असें ह्मणतात तेथें आहे. हें

---

*स्कंदउवाच ।। घटोद्भवशृणुष्वेदं मांगिशस्यकथानकं ।। यशृत्वामनुजा:सर्वे कृतकृत्यभवंतिहीं ।। १ ।। अथाशिवारिकलशै रष्टोत्तरशतानीच ।। संस्नापयतिदेवेशं सोमृतत्वायकल्पते ।। २ ।। नारिकेरोद्भवैस्तोयै: प्रत्यहंयोभवन्नर: ।। यस्नापयतिभूतेश मपुत्र:पुत्रवान्भवेत् ।। ३ ।। तन्नद्यास्तोयमादाय पितृन्स्तर्पयतिद्विज: ।। प्रत्यहंतिलसंयुक्तं मोदतेदिविदेववत् ।। ४ ।। मांगिशसंन्निधौविप्रा गोदानंय:प्रयच्छति।। गोरोमसंख्यावर्षाणि मोदतेशिवमंदिरे ।। ५ ।। स्नानंगंगासमंयस्या अघाश्या:पावनंपरं ।। यदिलभ्येतहिकलौ बहुतीर्थै: किमल्पकै: ।। ६ ।। अत्यल्पमात्रमपिय द्दतस्रवतिचाक्षयं ।। यत्रमांगिश्वरोदेवो यत्रसाजगदंबिका ।। ७ ।। अघाशिनीयत्रनदि‡ तत्रमुक्तिर्नसंशय: ।। स्मृतौमांगिशपादाब्जं श्रुतौमांगीशसत्कथां ।। ८ ।। स्तुतौमांगिशसन्नाम जन्मभाजोनते नरा: ।। मुनेमांगीशसन्नाम ये:कर्णविषयीकृतं इति— ।।९।। स्कं०स०खं०पू०मा०म०अ०६.

† कुशस्थलीतिनाम्नावै जनोद्धारकरीवरा ।। स्थळोद्विजन्मनांपुण्या क्षेत्रभूमिमहामुने ।। १ ।। द्वारावतिसमाख्याता शंभो:प्रियतमामत: ।। पूगनारिंगवृक्षौश्च सुफलैर्नालिकेरकै: ।।२।। नानापुष्पलताकीर्णै र्नानाफलसमन्वित: ।।

‡ नदिकाइति क्वचित्पाठ:

देवालय एका उंचवटावर आहे. ह्याच्या तीन्ही बाजूस भव्य अग्रशाला व समोर एक सुशोभित सज्जा आहे. तेथून कांहीं अंतरावर एक फरसबंदी तळी आहे. ह्या देवालयाच्या समीप एक खांब सुमारें ५० हात उंच आहे. ह्या देवाचे भक्त **कौंडिण्य** आणि **वत्स** ह्या दोन गोत्रांचे स्मार्त ब्राह्मण आहेत.

**श्री शांतादुर्गा***—ह्या देवीचें देवालय प्राचीनकाळीं **केळोशि** ( कर्दली ) ह्या गांवांत होतें. सांप्रत **कवळें** येथें आहे. हें देवालय मोठें विस्तीर्ण असून, ह्याच्या दोन्हीं बाजूस अग्रशाला आहेत. एथील सज्जाखालीं एक

---

* ततोभगवतीदेवी प्रसन्नाभून्महामुने ।। तस्यकामवरंदातुं कन्यारूपेणसंस्थिता· ।। १ ।। सखिद्वयेनयुक्तावै चामरव्यजनादिभिः ।। स्तूयमानादेवगणै र्नागकन्याभिरर्चिता ।। २ ।। तदग्रेसंस्थिताबाला सर्वाभरणभूषिता ।। नागनूपरशब्देन चलंतीसमुपागता ।। ३ ।। तांदृष्ट्वासहसातस्थौ ननामचरणाब्जयोः ।। तुष्टावपरयाभक्त्या शांतिसूक्तेनभूयसा ।।४ ।। यांसदासर्वभूतानि स्थावराणिचराणिच ।। सायंप्रातर्नमस्यंति सामांसंध्याभिरक्षतु ।। ५ ।। क्षीरेणस्नापितोदेवि चंदनेमानुलेपिते ।। बिल्वपत्रार्चितेदेवि दुर्गेहंशरणांगतः ।। ६ ।। नमोभगवतेशांते सर्वमंगलदायिनि ।। नागपीठेस्थितेभद्रे त्राह्यस्मान्कुलदेवते ।। ७ ।। इतिस्तुत्वानमस्कृत्वा श्रीसूक्तेश्चपुनःपुनः ।। तस्यैवंजपतःसाधो शांतोनाममहामुनि ।।८।। इति० शां० म०

छानदार तळी व समोर एक मनोरम खांब सुमारें ४० हात उंच आहे. ह्या देवीचे भक्त **कौशिक** गोत्राचे स्मार्त ब्राह्मण आहेत. आलीकडे **भारद्वाज*** आणि **वत्स** ह्या दोन गोत्रांचे ब्राह्मण भजतात. **कवळें** हा गांव देवीस इनाम आहे.

**श्री म्हालसा†**— ह्या देवीचें देवालय पूर्वी वे-

---

*ह्या गोत्राचा पाणंदिकर उपनामक एक ब्राह्मण केळोशी येथें पुरोहित होता, त्यानें अविचाराचें कृत्य केलें ह्मणून त्याची वृत्ति काढून टाकिली. सांप्रत त्याचे वंशज ह्याच देवीस भजतात.

†ह्या गोत्राचे ब्राह्मण दुसऱ्या गांवांतून आणून त्यांस ह्या देवीनें वर दिला, ह्मणून सांप्रत त्यांस वरदे हें उपनाम आहे. अशी कथा आहे कीं, "कोणे एके समयीं केळोशी आणि कुशस्थली ह्या दोन गांवांतील ब्राह्मणांमध्यें कांहीं कलह उत्पन्न झाला, त्यामुळें कुशस्थलीनिवासी ब्राह्मण केळोशी एथील ब्राह्मणाची मुलगी करीत नाहींसे झाले. तेव्हां केळोशींतील देवीनें (शांतादुर्गेनें) आपल्या भक्तांवर आलेलें संकट दूर करण्याकरितां कुशस्थलींतील कांहीं वत्स गोत्री ब्राह्मण आणवून, त्यांस वर दिला आणि आपल्या गांवांत त्यांस ठेवून त्यांतील एका ब्राह्मणाबरोबर त्या मुलीचें लग्न लावून दिलें."— गोमां० लेख०

+ सूतउवाच ॥ अथरामाज्ञयासर्वे वरुणापुरवासिनः ॥ महालसांतथादेवीं स्तुत्वानत्वायथोदितं ॥ १ ॥ पूजयित्वायथान्यायं सर्वेतांशरणंययुः कृतांजलीपुटोभूत्वा स्वानुभूतंनिवेदयन् ॥२॥ नमोदेवीजगद्धात्रि सृष्टिस्थित्यंतकारिणि ॥ त्वामद्यशरणंयाता श्चंडासुरभयार्दिताः ॥३॥ एवंस्तुतातदादेवी संतुष्टासावचोब्रवीत् ॥ माभैष्टविप्रातंदैत्यं घातयिष्येनसंशयः ॥ ४ ॥ इत्युक्त्वाखड्गमादाय हंतुंचंडासुरंययौ ॥ शिरोजहारदैत्यस्य हत्वासूरचमुंतथा ॥ ५ ॥ ताछिरंवामह-

रणें* ह्या गांवांत होतें. सांप्रत प्रियोळाचा भाग ज्यास म्हाडदोळ असें ह्मणतात तेथें आहे. ह्या देवालयासमोर एक मोठा सभामंडप आहे. ह्या देवीचें देवालय जसें मनोरम दिसतें तसें येथें कोणतेंच दिसत नाहीं. ह्या देवळाच्या दोन्ही बाजूस अग्रशाला आणि समोर एक खांब सुमारें ४९ हात उंच आहे. ह्या देवीचे भक्त **कौशिक, भारद्वाज**, इत्यादि पांच गोत्रांचे वैष्णव ब्राह्मण आहेत.

**श्रीमहालक्ष्मी**—ह्या देवीचें देवालय प्राचीनकालीं **कोलवें** ह्या गांवांत होतें. सांप्रत **बांदिवडें** येथें आहे. ह्या देवस्थलास **महालक्ष्मी** असें ह्मणतात. हें देवालय

---

स्तेन गृहीत्वाह्मालसाययौ ॥ अथदेवगणाःसर्वे सिद्धचारणगुह्यकाः ॥ ६ ॥ मुमुचुःकुसुमारंशं संततंकर्मतत्तदा ॥ महामायेमहालक्ष्मी महायोगिन्यधीश्वरि ॥ ७ ॥ जयेतिविजयेत्येवं सर्वलोकनमस्कृताः ॥ स्तुतासंपूजितादेवी सर्वलोकफलप्रदा ॥ ८ ॥ बभूवलोकविख्याता सर्वमंगलदायिनि ॥ तदासर्वेजनपदा वरुणापुरमाययौ ॥ ९ ॥ उत्सवंकारयामासुः महाफलसमृद्धये ॥ माघमासिसितपक्षे षष्ट्यांभक्तिसमन्विताः येचर्यंतिनराभक्तया देवींत्रिभुवनेश्वरीं ॥ १० ॥ इति. स्कं० ह्या म०

* सूतऊवाच ॥ वरुणस्यपुरीरम्यां नानारत्नसमन्विता ॥ तत्क्षेत्रनाममहात्म्यं श्रृणुभार्गवनंदनं ॥१॥ तत्रसर्वेजनपदा नित्यंधर्मपरायणाः ॥ राममाराधयंसर्वे वेदतत्वार्थकोविदाः ॥२॥ ज्योतिष्ठोमेनाविधिना सर्वलोकहितायच ॥ रामप्रत्यक्षरामेति देवोयत्राक्षिगोचरा ॥ ३ ॥ स० खं०

चांगल्या रीतीनें बांधिलें आहे. ह्या देवळाचा चौक मोठा असून विस्तीर्ण आहे.

**श्री नागेश***—ह्या देवाचें देवालय मुळापासून **बांदिवडें** ह्या गांवांतच आहे. ह्या देवस्थानास **नागेशी** असें ह्मणतात. हें देवालय रमणीय आहे. ह्याच्या दोन्ही बाजूस साधारण अग्रशाला आहेत. एथील तळी पहाण्यासारिखी आहे. ह्या देवाचे भक्त **वत्स, कौशिक,** इत्यादि गोत्रांचे वैष्णव ब्राह्मण आहेत.

**श्री रामनाथ**—ह्या देवाचें देवालय पूर्वी **लोटली** ह्या गांवांत होतें. सांप्रत **बांदिवडें** येथें आहे. ह्याच्या एका बाजूस एक साधारण धर्मशाला आणि समोर एक सज्जा आहे. ह्या देवस्थळास **रामनाथी** असें ह्मणतात. ह्या देवाचे भक्त **वत्स** आणि **कौंडिण्य** गोत्रांचे वैष्णव ब्राह्मण आहेत.

हीं सदरहू सहा देवस्थानें मोठीं प्रख्यात आहेत. ह्या देवालयांचा खर्च चालविण्याकरितां राजेलोकांनी व श्रीमान् गृहस्थांनीं शेतें, वाड्या, वगैरे इनामें करून दिलीं आहेत. ह्यांच्या सेवेस पुजारी, वाजंत्री, कलावती, भाविणी इत्यादिकांच्या नेमणुका आहेत. येथें सदोदित पुराण आणि हरिकीर्तन होत असतें. बारमहा मोठमोठाले उत्साह होत असतात. ह्या देवांच्या महाजनांनीं प्रत्येक देवालयांत एक कमावीसदार नेमलेला असतो.

---

* हा देव कांहीं दिवसपर्यंत गुप्त होऊन नंतर प्रगट झाला, असें कित्येक लोक सांगतात !!

**श्री दामोधर**—ह्या देवाचें देवालय पूर्वी **मठग्राम** शहरांत होतें. सांप्रत **जांबावली** ह्या गांवांत आहे. ह्या देवाचे भक्त **कौशिक, भारद्वाज, अत्रि,** इत्यादि पांच गोत्रांचे वैष्णव ब्राह्मण आहेत.

**श्री कामाक्षा***—ह्या देवीचें देवालय प्राचीनकाळीं **राय** ह्या गांवांत होतें. हल्लीं **शिरवडें** येथें आहे. हें स्थळ मोठें विस्तीर्ण असून पहाण्यासारिखें आहे. ह्या देवीचे भक्त **वत्स, कौंडिण्य,** इत्यादि गोत्रांचे वैष्णव ब्राह्मण आहेत.

---

* नमःकामाक्षिकेतुभ्यं भक्तानांभयनाशिनी ॥ सर्वकल्याण-देदेवि ब्रह्मेंद्राद्यभिवंदिते ॥१॥ नमोदेव्यैनमोशैव्ये वैष्णव्यै-तेनमोनमः ॥ हितायैहितकारिण्यै नमोदेविशुभप्रदे ॥ २ ॥ शुभायैशुभकारिण्यै नमोदेविशुभप्रदे ॥ शूलादिधारितेदेवि शुभगेबलवर्धिनि ॥३॥ भक्तसंकटघोरघ्ने देविभूयोनमोस्तु-ते ॥ ३ ॥ इतिस्तुताम्बिकाद्यैं प्रसन्नासासुरेश्वरी ॥ ४ ॥ शिवमेवास्तुसर्वत्र नाशिवंकुत्रचितवा ॥ तदाविष्णुशिवाद्यैश्च सहितारैपुरगमत् ॥ ५ ॥ तदष्टकेतनेदिव्ये तस्योदेवी-चभैरवः ॥ तस्यदेवालयेरम्ये यावंटापट्टघंटिते ॥ ६ ॥ तस्यगर्जनमात्रेण सर्वसंकटनाशनं ॥ **कामाक्ष्युवाच** ॥ मद्भक्तानांयदाकाले संकटंजायतेमहत् ॥ ७ ॥ चोरप्रेतपि-शाचादि क्षयंकुर्याद्विदारणं ॥ घंटायास्तेनमात्रेण भैरवस्यम-होजसः ॥ ८ ॥ सानिध्यंजायतेतत्र सर्वसंकटमुक्तये ॥९॥ स० खं० का० म०

**श्री गजानन**—ह्या देवाचें देवालय पूर्वी **हेळें** येथें होतें. तूर्त **खंडोळें** ह्या गांवांत आहे. हें देवालय लहान असून फार सुंदर आहे. ह्या देवाचे भक्त **भारद्वाज**, **वत्स**, इत्यादि गोत्रांचे वैष्णव ब्राह्मण आहेत.

**श्री लक्ष्मीनारायण**—ह्या देवाचें देवालय पुरातन-काळीं **आदोशी** ह्या गांवांत होतें. सांप्रत **कुंडई** येथें आहे. ह्या देवाचे भक्त **भारद्वाज**, **कौशिक**, इत्यादि गोत्रांचे वैष्णव ब्राह्मण आहेत.

**श्री नरसिंह** आणि **विजयदुर्गा***—ह्या दोन दे-

---

* अगस्त्युवाच ॥ पार्वत्याश्चरितंस्कंदं कथयस्वममाग्रत: ॥ यस्यस्मरणत:पुसां लभ्यतेवांछितंफलं॥१॥स्कंदउवाच॥ मांगिशाज्ञासमादाय सागरादर्शनेसुखं ॥ सागरंद्रष्टुकामासा शांकरीशंकरप्रिया ॥२॥ सर्व्वाद्वयेनसंयुक्ताविचचारसरित्तटे॥ विजितोयंमहासत्वो दैत्यराजोतिदारुण: ॥३ विजयासिमहाभागे गीर्वाणपतिवंदिते ॥ मनोरमेणनाम्नात्र विजयेतिप्रकाशिता॥४॥ तिष्टात्रत्ममहेशानि ऋषिणांभयशांतये ॥ तानुवाचततोदेवी गभीरांत:स्मितासती ॥५॥ वरंददामिभोविप्रा योवैमनसिवर्तते तुष्टायांमयिविप्रेंद्रा दुर्लभांकिंजगत्रये ॥६॥ द्विजाऊचु: ॥ वयंऋषिकुलोद्भुता स्तापसाशरणार्थिन: ॥ तस्मात्वांशरणंप्राप्ता रक्षरक्षसदाशिवे ॥ ७ ॥ वरदासियदादेवि वरोस्माकंप्रदीयतां ॥ सागरस्यांतिकेह्येषा पुरीशंखावलीशुभा ॥८॥स्थानंतेरोचतांदेवी निवासार्थंसदानघे त्वयात्वत्रैवस्थातव्यं लोकानांहितकाम्यया॥९॥विजयेतिचदुर्गेति नाम्नांविख्यातविक्रमा अत्रदैत्यभयंनित्यं तदुपाकुरुसर्वदा ॥१०॥मां०म०अ०

वांचीं देवालयें पूर्वी **शंखावली*** ह्या गांवांत होतीं. परंतु सांप्रत श्री नरसिंहाचें देवालय वेलंगास आणि विजयदुर्गेचें देवालय केरीस आहे. ह्या दोन देवांचे भक्त **जामदग्नि**,**वत्स**, **भारद्वाज**, **कौशिक** इत्यादि गोत्रांचे वैष्णव ब्राह्मण आहेत.

श्री **भगवति**—ह्या देवीचें देवालय पूर्वी **चिमल** ह्या गांवांत होतें. सांप्रत **महाशेल** ग्रामांत आहे. ह्यादेवीचे भक्त **कौशिक**,**वत्स**,इत्यादि गोत्रांचे वैष्णव ब्राह्मण आहेत.

श्री **देवकीकृष्ण**,**रवळनाथ**,इत्यादि देवांचीं देवालयें पूर्वी **चूडामणि** वेटांत होतीं. सांप्रत **महाशेल** आणि **मये** ह्या दोन गांवांत आहेत. ह्या देवांचे भक्त **भारद्वाज**,**अत्री**,**काश्यप**,**वत्स**,**जमदग्नि**,इत्यादि गोत्रांचे वैष्णव ब्राह्मण आहेत.

श्री **वेताळ**,**सांतेरी**,**अमृतेश्वर**,**रवळनाथ**, इत्यादि देव **आमोणें** येथें आहेत. ह्या देवांचे भक्त **कश्यप**, **वत्स**, **भारद्वाज**, इत्यादि गोत्रांचे ब्राह्मण आहेत.

श्री **क्षेत्रपाळ**—ह्या देवाचें देवालय **हातुर्लीं** ह्या गांवांत आहे. ह्या देवाचे भक्त **अत्रि** गोत्री ब्राह्मण आहेत.

श्री **चंद्रेश्वर**–ह्या देवाचें देवालय **पारोडें** येथें **चंद्रनाथ** पर्वतावर आहे. येथें १०८ तीर्थें आहेत असें सांगतात. ह्या देवाचें स्थळ मोठें रमणीय आहे. ह्या देवास सर्व लोक भजतात.

---

* गोमांतादक्षिणेभागे पारावारसमीपतः स्पुरंतिचपवित्रास्ते नाम्नाशंखावलीतिच ॥१॥ क्षेत्रस्यापिचमहात्म्यं श्रवणात्पापनाशनं ॥ वैकुंठतुल्याभूमौतु नृहरेःप्रीतिदायिनः ॥ २ ॥ आवलिर्यत्रशंखानां नित्यमायातिसागरात शंखावलीइतिख्याता तस्यनामबभूवयत् ॥ ३ ॥स० खं० मां० म० अ०

श्री सप्तकोटीश्वर*—ह्या देवाचें देवालय पूर्वी दीपवति बेटांतील नारवें ह्या गांवांत होतें सांप्रत बतग्रामी नारवें येथें आहे. ह्यां देवास सर्व लोक भजतात.

श्री हटकेश्वर†—ह्या देवाचें देवालय नारवें ह्या गांवांत आहे. हें फार जीर्ण होऊन गेलें आहे. ह्या देवास सर्व लोक भजतात.

ह्या शिवाय गोमांतकांत दुसरी हिंदुदेवालयें सुमारें १००० आहेत.

---

* पंचनद्यांनर:स्नात्वा सप्तकोटिश्वरंशिवं॥संपूज्यविधिवद्देवं सर्वेप्सितभाग्भवेत ॥४॥ सप्तकोटीश्वरंलिंगं पूजयत्वायथाविधि येपश्यंतिनरास्तेवै मुक्तिभाजोनसंशय: ॥ मां म० अ०॥३॥

—सप्तर्षीस्थापितंलिगं सप्तकोटीश्वरंतत:॥ मंजुळेश्वर महा०॥ सप्तकोटीश्वरंनामं भक्तानांपालकोहर: ॥ धातुनाचैवलिंगचकल्पितंसुमनोहरं ॥ १ ॥ दर्शनाहरतेपापंस्पर्शनान्मोक्षमान्पुयात ॥ जवाधिकंचकेदारं वीर्यवंतमहद्भुतं ॥२॥ भक्तानांचहितार्थाय स्थापितंपृथ्वीतले. स०खं०उ० अ०३॥

† गोवापुरोत्तरेभागे हाटकाख्यपुरंमहत्॥तस्याधिपशिव: साक्षात् गौरीशश्चंद्रशेखर: ॥ १ ॥ हाटकेश:पंचवक्त्रो लोकपालैश्चपूजित: ॥ हरिसंकर्षणाख्यंच नित्यंपूजयतेस्वयं ॥२॥ अद्यापिदृश्यतेविप्रा श्रावणेमासिचाद्भुतं॥निर्माल्याणिचपत्राणि बिल्वानिकुसुमान्यपि॥३॥नदीपंचकसंयोन् महाक्षेत्रमहोदधे॥ द्विपस्यपरीतोगंगा ब्रह्महत्याघनाशिनी ॥४॥ स० खं०उ०

# प्रकरण पांचवें.

---

## क्रिस्ती धर्माचा प्रसार.

फिरंगीलोकांनीं गोवें घेतल्यानंतर प्रथमतः त्यांनीं एतद्देशीय लोकांच्या स्त्रियांवर बलात्कार करून, त्यांबरोबर लग्नें लाविलीं. सन् १५४१ त गोव्यांतील पाद्र्यांनीं हिंदुलोकांस बाटविण्याविषयीं फार प्रयत्न केले; परंतु ते त्यांचे सिद्धीस गेले नाहींत.

सन् १५४८त **गोवाबेटांत** पाद्रीलोकांनीं फारच प्रजापीडन चालवून, कितीएक लोकांस बाटविलें. पुढें **बारेत** नामक जेजुईत संप्रदायी पाद्री गोव्यांचा मुख्य-धर्मोपदेशक झाला. तो बाहेरदेशीं जाण्यास असमर्थ होता, त्यामुळें त्यानें आपलें अधिष्ठान **चूडामणि** बेटांत घालून, बहुत लोकांस बाटविलें. ह्या बेटाच्या वायव्येस **दीपवति** ह्मणून जें बेट आहे, तेथें त्यानें हळूहळू प्रवेश करून, तेथील लोकांस अतिशय त्रास दिले. जो हिंदु रस्त्यांत भेटेल त्यास पकडून तो लागलाच बाप्तिस्मा देई. ह्याप्रमाणें त्या धर्मवेड्या पाद्र्यानें कांहीं दिवसपर्यंत असाच क्रम चालविला. त्यावेळीं **गोवाबेटांतील** सर्व लोक त्रासून गेले. सन् १५६०त **गास्पर** ह्या नांवाचा पाद्री गोव्यांचा मुख्यधर्मोपदेशक झाला, त्यानें **सासष्टीप्रांत-स्थलोक** व्यापाराच्या उद्देशानें **गोवें** शहरांत आले होते, त्यांतून ४०९ असामींस पकडून, एका दिवसांत बाटविलें.

त्यावेळीं **गोवावेटांतील** सर्व हिंदु लोक भयाभीत होऊन, आपले **कुलदेवांसहित** अन्यदेशीं पळून गेले.

ह्यावेळीं **सासष्टीप्रांत** मोठा जनपदायुत असून देवप्रतिमा पूजकांचें आदिस्थान होता. एके दिवशीं अशी गोष्ट घडून आली कीं, गोव्यांतील कांहीं पाद्री लोकांनीं **सासष्टी** एथील अधिकारी ब्राह्मणाची मुलगी फसवून आणून बाटविली. तेव्हां तिच्या बापानें **गोवा सरकारांत** त्यां पाद्यांच्या विरुद्ध फिर्यादी केली. फिरंगी न्यायाधिश मोठा शहाणा व विचारशील होता, त्यामुळें त्यानें वादीच्या तर्फे इनसाफ केला. नंतर एक पाद्री **सासष्टी प्रांताचे** तरीवरून जात असतां, नोर देण्यास नाकबूल गेला, ह्मणून तेथील लोकांनीं त्यास सिक्षा केली. ह्या दोन गोष्टीवरून सर्व गोव्यांतील पाद्री क्रोधायमान होऊन; त्यांनीं **पोर्तुगेज सरकारास** अशी विनंती केली कीं, **सासष्टीप्रांतस्थ** लोकांस आपल्या धर्मांत आणिलें पाहिजे, आणि ते जर हा पवित्र धर्म स्विकारण्यास नाकारतील, तर त्यांस आह्मी मोठीच सिक्षा करूं. ह्मणून आह्मास ह्या कृत्यास आपण मदत करावी. त्यावेळीं गोव्यांच्या प्रतिनिधीनें एक महानौकासमूह तयार करवून पाद्यांचे साह्यार्थ पाठविला. त्याकाळीं त्या दुष्ट पाद्यांनीं **सासष्टींतील** सुमारें १२०० हिंदु देवालयें मोडून टाकून बहुत लोकांस उपद्रव करून जातिभ्रष्ट केलें.

अशा क्रोधोन्मत्त पाद्यांकडे संग्राम करणें निरर्थक आहे, असें अवशेष राहिलेल्यां रहिवाशांनीं जाणून, ते त्यांबरोबर मित्रत्वानें वागूं लागले. नंतर फिरंगी लोक अन्य ठिकाणीं

लढाईस गुंतले आहेत, असें कळतांच **सासष्ट ग्रामस्थांनीं** ही संधी साधून आपलीं सर्व देवालयें पुन: बांधिलीं, आणि पाद्र्यांनीं बांधलेलीं देवळें बहुतेक मोडून टाकिलीं.

आपण केलेले सर्व प्रयत्न निर्फळ झाले, असें पाद्र्यांस समजतांच त्यांनीं पुन्हा सरकारद्वारें अरमार तयार करवून, **सासष्टीप्रांतस्थ** लोकांवर एकदम हल्ला केला. त्यावेळीं त्यांनीं हिंदुलोकांचीं सर्व देवालयें मोडून टाकिलीं; इतकेंच नाहीं, परंतु तेथील प्राय: सर्व गांव जाळून लुटून उद्वस्त करून सोडिले. या भयप्रद प्रसंगीं **सासष्टीनिवासी** सर्व हिंदुलोक नग्न उघडे पोरांबाळांशुद्धां आपले कुलदेव घेऊन जिकडेतिकडे पळून गेले. जातानां कांहीं देव नद्यांत बुडवून टाकिले. ज्यामूर्ति चुकून मागें राहिल्या होत्या त्यांचे **बेर्न** नामक पाद्र्यानें सोऱ्यानें फोडून तुकडे तुकडे केले.!!

पुढें कांहीं वर्षांनंतर पाद्र्यांनीं त्यां पळून गेलेल्यां हिंदुलोकांस ह्या वसतिहीन आणि निर्जन प्रांतांत येऊन पुन: वसाहत करण्याची परवानगी दिली; परंतु देवालयें बांधण्याची व मूर्तिपूजा करण्याची मात्र मनाई होती. **सासष्टीप्रांत** पूर्ववत् वसत चालला. त्यावेळीं पाद्र्यांनीं असा निश्चय केला कीं, आपण येथें एक मोठें सुंदर देऊळ बांधावें. ह्मणजे भोळे हिंदुलोक त्याच्या सौंदर्यास भुलून आपला तारक **येशू ख्रिस्त** ह्यास भजूं लागतील; ह्मणून सन् १६१३ त मुख्य धर्माधिकाऱ्यानें जेजुइत् सांप्रदायी पांच पाद्री व कांहीं युरोपस्थ **सासष्टीस** पाठविले. ते ह्या प्रांतांत एका उत्तम स्थळीं आपल्या देवळाचा पाया घालण्याचे

नगरींत असतां, जवळच्या गल्लींत एक ब्राह्मण मोठ्यानें ओरडला कीं, "सूड उगविण्याचा समय हाच रे हाच!"

असा त्या ब्राह्मणाचा शब्द ऐकतांच एथील लहान मोठीं सर्व मनुष्यें एकदम उठलीं, आणि ज्या मार्गानें ते पाद्री आले होते ते सर्व मार्ग बंद करून चोहोंकडून मारा! मारा! असा ध्वनि करूं लागले. तेव्हां ते सर्व पाद्री विस्मयान्वित होऊन भयकंपित झाले. येथें कांहीं तरी दगा आहे असा त्यांचा निश्चय होऊन ते तेथल्या तेथेंच स्तब्ध राहिले. त्यावेळीं अकस्मात हजारो भाले त्यांचे छातीवर येऊन पडले, तेणेकरून त्यांच्या शरीरांतून रक्ताच्या धारा वाहूं लागल्या. नंतर ते सर्व गतप्राण होऊन भूमीवर पडले. त्यावेळीं गोव्याच्या प्रतिनिधीस स्वत: शस्त्र धरणें अवश्य पडल्यामुळें तो सैन्यानिशीं **सासष्टीस** गेला, आणि तेथील लोकांस पुन्हा देवालयें बांधण्यास हुकूम देण्याची तजवीज केली. **सासष्टी** बाटविल्यानंतर सुमारें ५० वर्षांनीं **बार्देशप्रांत** बाटविला.

---

## गोव्यांतील क्रिस्ती पंथ

**फ्रांसिस्कन**—हा पंथ फिरंगी लोकांनीं **गोवें** घेतल्यानंतर लागलाच येथें स्थापन झाला. ह्या पंथांतील पाद्री मोठे धर्मभोळे असून स्वभावानें फार नम्र असत. त्यांचा पोशाख काळा असे. ह्या पाद्र्यांनीं **गोवें** शहरांत ११ ईमारती बांधिल्या होत्या त्यांतून सांप्रत कांहीं शाबूद आहेत.

**जेजुईत**×— हा पंथ सन् १५४३त येथें स्थापन झाला. ह्या पंथांतील पाद्र्यांनीं प्रथमतः **सांपावल** नामक देवळाचा अखत्यार घेतला ह्मणून त्यांस लोक **पावलिस्त** असें ह्मणूं लागले. हे पाद्री मोठे श्रीमान्, विद्वान्, शहाणे, कपटी, आणी धर्माभिमानी होते. ह्यांच्या चातुर्याची व शक्तीची इतकी कीर्ति हिंदुस्थानभर पसरली होती कीं, त्यांस **अकबर** बादशहानें सुद्धा आपल्या दरबारांत बोलावून नेले होते. ह्या पाद्र्यांनीं **गोवें** शहरांत १० इमारती बांधिल्या होत्या, त्यांतून कांहीं सांप्रत मोडकळ स्थितींत आहेत.

**दोमिनिकन**—हा पंथ सन् १५४८त येथें स्थापन झाला. ह्या पंथांतील पाद्री क्रिस्ती धर्मशास्त्रांत फार निपुण होते. ह्यांचा पोशाख पांढरा असे. ह्यांनीं गोव्यांत दहा इमारती बांधिल्या होत्या, त्यांतून सांप्रत कांहींचे शेषभाग मात्र राहिले आहेत.

**अगोस्तिन**—हा पंथ सन् १५७२ त येथें स्थापन झाला. ह्या पंथातील पाद्री फार स्वधर्माभिमानी होते. ह्यांचा पोशाख पांढरा असे. नंतर त्यांस काळा पोशाख करण्याचा हुकूम झाला. ह्यांनीं गोव्यांत ८ इमारती बांधिल्या होत्या, त्यांतून कांहीं पूर्वस्थितींत आहेत.

**कार्मेलित**—हा पंथ सन् १६०७त येथें स्थापन झाला. ह्या पंथांतील पाद्री फार गरीब असून स्वभावानेंही अतिशय नम्र असत. ह्यां पाद्र्यांनीं **गोवें** शहरांत

× कित्येक लोक असें सांगतात कीं, हे मोठे जादूगिर होते; परंतु या विषयीं कोणत्य. । ग्रंथांत आढळत नाहीं.

काहीं इमारती बांधिल्या होत्या, त्यांचे शेष भाग मात्र राहिले आहेत.

**सांत कायतान**—हा पंथ सन् १६८१त येथें स्थापन झाला. ह्या पंथांतील पाद्र्यांनीं चार इमारती **गोवें** शहरांत बांधिल्या होत्या, त्यांतून सांप्रत एक दोन इमारती शाबूद आहेत.

ह्या खेरीज **फिलिपनेरी, संतमोनिका,** इत्यादि पंथ येथें स्थापन झाले होते, त्यांचे मठ मात्र शाबूद आहेत.

---

## संत फ्रांसिस झेवियर.×

झेवियर हा सन् १५०६त स्पेन* देशांत **नावारी** ह्मणून एक गांव आहे तेथें जन्मला. ह्यानें आपला सर्व विद्याभ्यास **पारीस**† शहरांत केला. हा इग्नास्यु-**लोयल** याचा शिष्य होता. हा सन् १५४२ सालांत हिंदुस्थानांत आला. हा **जेजूईत** संप्रदायी उपदेशक होता. हा फार आवेशी आणि मेहनती असल्याकारणानें त्यानें पुष्कळ देश फिरून (**लंका, मलाका, जापान, हिंदुस्थान** वगैरे ठिकाणीं) उपदेश केला. ह्यानें सन् १५४३त **जेजुईत** पंथाच्या लोकांस **गोव्यांत** आणिलें. ह्यानें सुमारें १२०००० लोकांस बाटविलें व ५० मनुष्यांस जिवदान दिलें, असें पोर्तुगेज आणि इंग्रज ग्रंथकार वर्णन करितात.

---

× फिरंगी भाषेंत ह्याचा उच्चार 'सांत फ्रांसिस्क शावियर' असा होतो.

*फिर० भा० यस्पान्ज.    † फ्रान्स देशाची राजधानी.

ज्यावेळीं हा उपदेश करण्यास जाई त्यावेळीं बरोबर एक घंटा नेत असे आणि ती वाजवून तो लोकांस जमवीत असे. एक ग्रंथकार असें लिहितो कीं, एका महिन्यांत त्यानें १०००० लोकांस बाटविलें !!

पुढें सन १५५२ सालीं **चीन देशांत** प्रवेश करीत असतां तो आजारी पडून **सान्स्यान** बेटांत मरण पावला. पुढें सन् १५५४त तिसऱ्या महिन्याचे सोळाव्या तारखेस त्याचें प्रेत **गोवें** येथें आणून **सांपावलाच्या** देवळांत ठेविलें. नंतर सन् १५८४त तें प्रेत तेथून मोठ्या समारंभानें आणून **बोंजेजुसच्या** मठांत ठेविलें. ते अजून पावेतों तेथेंच आहे.

**संत झेवीयर** हा आकाशांत घेतला गेला असें **रोमशहरांतील** मुख्य धर्माधिकाऱ्यानें मानून त्यास तीन वर्षांनीं साधु ठरविलें.!!

"**संत फ्रांसिस** हा मर्त्य देह त्यागून आकाशांत चढून गेल्याला पुष्कळ वर्षें होऊन गेलीं. तरी त्याचें शरीर अद्यापि यथासांग आहे. त्याच्या डोक्यावर थोडके केंस आहेत. तोंड कांहीं उघडें कांहीं झांकलें आहे. त्या वरून त्याची वृत्ति शांत दिसून येती. त्याचे कांहीं दांत अगदीं शाबूद आहेत. त्याचा उजवा बाहू नाहीं. तो सन् १६१४त नवेंबराच्या तिसऱ्या तारखेस कापून त्याचे चार विभाग करून एक **रोम** शहरास, दुसरा **मलाकास**, तिसरा **कोचीनास**, आणि चवथा **माकाव** येथें पाठविले. डावा बाहू वांकलेला असून हात छातीवर आहे."

# धर्मसमीक्षणसभा.

प्रथमत: ही सभा दोमिनिक पांथिक एका विरक्त पुरुषानें इसवी सनाच्या बाराव्या शतकांत युरोपखंडांत स्थापिली होती, त्यांतील मुख्य पारिपत्यदार व सभाध्यक्ष हे कित्येक लट्ठनिरंजन पांथ्यांकडे कुस देऊन, क्याथलिक धर्मानुवर्ती देशांत धर्मोपदेश करण्यास, व जे पाखण्ड मतानें चालतात असा ज्यांचा अंदेशा येईल त्यांच्या वर्तणूकेचीं वास्तविक लक्षणें व त्यांची स्थिति त्यांचा गुप्तपणें शोध करण्यास, व त्यांची यथातथ्य हाकिकत असेल तिचें इत्थंभूत निरूपण करण्यास त्यांस पाठवीत असत. त्या कुसधाऱ्यांनीं असें न करितां केवळ धर्मनिष्पत्ति करण्यास कित्येक देश तर रक्तमय करून टाकिले. उगाच कोणाचाही वहमा घेऊन त्याला ते नानाप्रकारें यातना करीत. या प्रकारें त्यांनीं आपला क्रम कांहीं दिवसपर्यंत चालविला.

पुढें ही सभा सन् १५५७त पोर्तुगाल देशचा बादशहा तिसरा दोंजुवांव यानें आपल्या देशांत स्थापन केली, त्यांतलि सभाध्यक्षानें हिंदुस्थानांत स्वधर्माचा प्रसार करावयास व पोर्तुगालच्या बादशहानें जो हक्क रोम शहरांतलि धर्माध्यक्षास हिंदुस्थानांत कबूल केला होता, तो व्यवस्थापन करण्यास ही सभा इसवी सन् १५६०त गोवें शहरांत स्थापन केली. ह्या सभेंतील पाद्री पहिल्यानें याहुदी धर्मानें वर्तणाऱ्यांचा पिच्छा घेऊन, त्यांस ते अतिदंडनानें वागवीत; परंतु उत्तरोत्तर

सर्वांचा पाठलाग करून, त्यांस ते अतिशय त्रास देऊं लागले.

जे खरोखर गुन्हेगार असतील त्यांसच ते त्रास देत, इतकेंच नाहीं, परंतु कोणाचाही अंदेशा आला ह्मणजे त्यास पकडून नेऊन, सहनाशक्य यातना देत; तेणें-करून गोमांतकांतील सर्व लोक गात्रभंग होऊन गेले होते. त्यां क्रुस धाऱ्यांची फेरी गांवांत आली ह्मणजे बायको नवरा ह्मणत नसे, नवरा बायको ह्मणत नसे, मुलगा बाप ह्मणत नसे, बाप मुलगा ह्मणत नसे; याप्रमाणें सर्व लोकांची अवस्था होऊन जाई.

ह्या यमदूतांनीं एकाद्या मनुष्यास जरी रपाटून बांधिलें, किंवा त्याला दुःसह यातना केल्या; तथापि कोणत्यात्र प्रकारचा विकळाप करण्यास त्यास धीर होत नसे.

त्यांनीं एथील हिंदु लोकांस मुख्यत्वेंकरून ब्राह्मणांस अतिशय त्रास दिले. ते असे कीं, त्यांस यज्ञोपवीत धारण करण्यास देऊं नये. ते बाहेर जातांनां तें धोतराच्या आंत गच्च बांधून ठेवीत. लग्न किंवा व्रतबंध करण्यास परवानगी नव्हती. ते परकीय राज्यांत जाऊन आपल्या विधि संपादीत. तुळशीवृंदावन दरवाज्यांत असूं देऊं नये. ते मग वृंदावनें मागदारीं बांधीत. गंद, विभूति, मुद्राधारण, इत्यादि त्यांस केवळ जादूच वाटे. गणपति पुजूं देऊं नये. ते एका लहान कागदावर गणपतीचें चित्र काढून आपला वेळ संपादून घेत. कोणी गणपतीच्या ऐवजीं नारळ पुजीत. ह्या खेरीज हिंदुलोकांचे जेवढे धर्मसंस्कार आहेत, तेवढे करण्यास मनाई होती.

आतां ह्या भयंकर आणि त्रासदायक सभेचे कसकसे कामगार होते, कैदीस ठेवण्याचें तुरुंग कसें होतें, व ते कैदीस कोणत्या तऱ्हेनें पकडून यातना करीत, ह्या विषयीं **देलन** नामक फ्रेंच शस्त्रवैद्यानें स्वानुभवरूपें ह्या **धर्मसमीक्षणसभे** विषयीं एक ग्रंथ लिहिला आहे, त्यांतून संक्षेपत: येथें लिहितों.

ह्या सभेचे दहाप्रकारचे कामगार पाद्री होते, ते येणें प्रमाणें;—**मुख्यसभाध्यक्ष**, **मुख्यपारपित्यदार**, **सामान्यचौकशीदार**,, **सहकारीसभासद** (धर्म संबंधी कायदे जाणणारा), **गुणविशिष्टक**, **चिटणिस**, **परपक्षावादी** (कैदीचा खटला उभा करणारा), **खजीनदार** (कैदीचा माल ताब्यांत ठेवणारा), **दंडनायक**, आणी **कारागृहाध्यक्ष**.

तुरुंगास **सांतकाज** (पवित्र गृह) असें ह्मणत असत. तुरुंग फार मोठें असून त्यांत दोनशें कैदी रहाण्यापुरती जागा होती. त्यास दोन रांगांनीं ढेलजा होत्या. प्रत्येक ढेलजीस कांहीं खण होते. त्यां सर्व ढेलाजांस भुयारें होतीं. वरच्या रांगेंतलि खणांस सुमारें ४½ हात उंच लोखंडी जाळ्या होत्या, त्यांतून आंत थोडा उजेड पडे. खालची रांग जमिनींत असून, तींत अगदीं अंधार असे, ह्या सर्वांस एक मोठा लोखंडी दरवाजा असे, तो बंद केला ह्मणजे खालच्या रांगेंत लेशमात्र वारा जात नसे, ह्मणून तो दररोज सकाळचे सहा पासून अकरा तास पर्यंत उघडा ठेवीत.

एकाद्या मनुष्यास तुरुंगांत घातलें ह्मणजे **धर्मसमी-**

क्षणसभाध्यक्ष त्याकडून नांव, हुदा, इत्यादि लिहून घेऊन त्याचा शोध करी, आणि जर त्यानें सांगितल्याप्रमाणें त्याची खात्री पटली तर त्या कैदीची जिनगी त्यास मिळाली, नाहींतर जरी तो अपराधी ठरला नाहीं तथापि ती त्यास मिळत नसे. पुरुष असो किंवा बायको असो, राव असो किंवा रंक असो, ते त्यांस एकच तऱ्हेनें वागवीत. कांहीं दिवस कैदी तुरंगांत राहिल्यावर त्यास बाहेर काढून त्यानें जो अपराध केला असेल तो त्याकडून कबूल करवीत.. जर त्यानें कोणतीही गोष्ट नाहीं ह्मटली तर त्यास दुःसह यातना देऊन कबूल करवीत. देलन ह्मणतो कीं," नवेंबर आणि दिसेंबर ह्या दोन महिन्यांत पुरुषांच्या कर्कश किंकाळ्या माझ्या कानीं पडत."

यातना करण्याची जागा जमिनीखालीं होती, त्यांत अगदी अंधःकार असे. यातना करण्याच्यावेळीं सभाध्यक्ष एका उंच स्थानावर बसून दंडनायकाकरवीं यातना करण्यास लावी. कैदी ह्मातारा असो, किंवा तरुण असो, पुरुष असो, किंवा बायको असो, त्याच्या अंगावरचें कपडे काढून खरबरीत तागाच्या कापडानें त्यास रपाटून बांधीत. कांहीं वेळानें तो कपडा सोडला ह्मणजे त्यास अंग जळल्यासारिखें वाटे. दुसरी यातना करण्याची चाल अशी होती कीं, कैदीस पाठच्या हातांनीं बांधून गाडीवरून ओढून लोंबत ठेवीत. नंतर त्याच्या पायास जड वस्तु बांधून कांहीं वेळानें त्यास हिसका देऊन खालीं पाडीत, ह्मणजे तो जरी सशक्त असला तथापि प्राणास मुके.

कैदीचा इनसाफ करण्याची चाल अशी होती कीं,

प्रारंभीं कारागृहाध्यक्ष कैदीस धर्मसभेंत नेई. तेथें मध्य भागीं एक वाटोळें मेज असून एका बाजूस सभाध्यक्ष व दुसऱ्या बाजूस चिटणीस बसलेला असे. कैदीस प्रमाण-पूर्वक कबूल करवून मग ते घंटेसारखा आवाज करीत, ह्मणजे कारागृहाध्यक्ष पुन्हा येऊन त्यास शंखळा बंधन करून तुरुंगांत टाकी. कांहीं दिवस गेल्यावर त्यास तुरं-गांतून बाहेर काढून पुन: कबूल करवीत आणि क्रुसावर प्रमाण करावयास लावीत.

याप्रमाणें तुरुंगांत पुष्कळ कैदी जमले ह्मणजे त्यांची सुटका करण्यास एक दिवस नेमीत. या कृत्यास आवत देफे (धर्माचें कृत्य) असें ह्मणत.

नंतर त्या दिवशीं सर्व कैदीस एका सज्जावर उभे क-रीत. त्यांत बायकांचा पोशाख पुरुषांसारिखा असे. ज्यां कैदीस जाळावयाचें असेल त्यांस इतर कैदीपासून कांहीं अंतरावर उभे करून त्यांबरोबर कबूल करविणारे पाद्री देत. प्रत्येक कैदीच्या हातांत एक बिनपेटविलेली मेण-बत्ती असे. त्यांस पिवळा पोषाक देऊन मागें पुढें सांत अंद्रुचा क्रुस रंगविलेला त्यांच्या हातांत देत. ह्या सों-गास सावबेनीत असें ह्मणत. कैदींचीं तसबिर एका कपड्यावर काढून ती तसबीर जळत्या मशालीवर भूत पिशाच्या सहित जळत आहे असें करून दाखवीत.

दुसऱ्या दिवशीं लोकांस कळविण्यासाठीं शहरांतील मु-ख्य देवळाची घाट वाजवीत, तेणेंकरून गांव्यांतील सर्व लोक हा मौज पाहाण्यास येत. नंतर त्या सज्जावरून कैदीस एकामागून एक खालीं आणून, दरवाज्याजवळ जो

मुख्य सभाध्यक्ष बसलेला असे त्याच्या समोर उभे करीत. तेव्हां तो त्यांस कांहीं पाद्र्यांच्या स्वाधीन करी. मग ते पाद्री त्या बिचाऱ्यां बंदिवानांस घेऊन **सांत फ्रांसिस्क** किंवा **सांतदोमिंग** ह्या देवळांत जात. तेथें एक उंच-स्थान केलेलें असे, त्यावर प्रतिनिधि; धर्मसमीक्षणसभाध्यक्ष, चिटनीस, इत्यादि मुख्याधिकारी बसलेले असत त्यां समोर त्यां कैदींस उभेकरून **आगोस्तीन** पंथाच्या पाद्रीकडून त्यांस अर्धा तास स्वधर्म कथन करवीत.

हें कृत्य झाल्यानंतर दोघे पाद्री धर्माध्यापकासनावर उभे राहून त्यांस कसकशा दंडाज्ञा ठरल्या आहेत त्या वाचून दाखवीत. नंतर कांहीं पाषाण हृदय पाद्री येऊन त्यां बंदिवानांच्या छातीवर मुष्टिप्रहार करीत, व त्यांस तुह्मी कोणत्या धर्मांत मरूं इच्छितां असें विचारीत. कारण हिंदु किंवा **याहुदी** धर्मांत मरणारांस ते जिवंत जाळीत, आणि **क्याथलिक** धर्मी ह्मणून मरणारांस श्वासावरोध-करून मग जाळीत.

अशा ह्या निष्पाप अपराधी लोकांस जाळण्याची जागा नदीच्या किनाऱ्याजवळ होती. ज्यांस जिवंत जाळिलें असेल त्यांचे प्रथमत: चेहरे काढून **दोमिनिक** देवळांत नेत, व त्यांसभोवतालीं राक्षस, भूतें, ज्वाळा, इत्यादि देखावे काढलेले असत.

ह्याप्रकारची अतिभयंकर आणि निर्दोष प्राण्यांचा निरापराधें नाशकरणारी ही दुष्ट सभा* **इंग्रज** सरकारच्या सांगण्यावरून **पोर्तुगेज** सरकारचे हुकमानें सन् १८१२ त बंद झाली.

* ह्या सभेस पोर्तु० भा० इंकिज़ीसांव आणि इं० भा० इन्किजिशन असें ह्मणतात.

# प्रकरण सातवें.

---

## राज्यस्थिति.

**सरकार**—गोमांतकाचा राज्यकारभार चालविण्या करितां पोर्तुगाल देशच्या राजाकडून एक मुख्याधिकारी येत असतो, त्यास **प्रतिनिधि*** किंवा **सरसुभेदार†** असा किताब असतो. तो चांगला विद्वान असून, मोठ्या कुळांतला असला पाहिजे. त्यास दरसाल ३६००० असरफ्या‡ वेतन§ मिळतें. ह्याशिवाय दुसऱ्या खर्चाबद्दल त्यास बऱ्याच रकमेची नेमणूक असते. त्यास लष्करी आणि दिवाणी कामदारांची नेमणूक पाहिजे तेथें करण्याचा पूर्ण अधिकार असतो. तसाच धर्मसंबंधी नेमणूका

---

* पोर्तुगेज भाषेत 'विजरेई', आणि इंग्रजी भाषेत 'व्हायसरॉय', असें ह्मणतात.

† पोर्तु० भा० 'गोवेर्नादोरजराल', आणि इंग्र० भा० 'गव्हर्नर जनरल', असें ह्मणतात.

‡ हें एक गोमांतकी नाणें आहे. दोन असरफ्या ह्मणजे एक रुपया.

§ हें वेतन अगदी थोडकें दिसतें; परंतु सांप्रतच्या राज्यस्थितिप्रमाणें तें अधिक समजलें पाहिजे. फिरंगी लोकांच्या समृद्धिकलांत हें खरोखर सात आठ पट जास्त होतें. कारण **लिंचस्तन** नामक एक प्रवासी सन् १५८३त गोव्यांत गेला होता. त्यानें आपल्या प्रवासाचा सविस्तर वृत्तांत जुन्या फ्रेन्च भाषेत लिहिला, त्यांत तो ह्मणतो कीं, "गोव्यांचें प्रतिनिधित्व जगांतील मोठ्या हुद्यां पैकींच आहे."

करण्याचा अखत्यार त्यासच असतो; परंतु त्यास **मुख्य-धर्मोपदेशकाचें** मात्र अनुमोदन घ्यावें लागतें.

जर त्यास देवाज्ञा झाली, किंवा दुसऱ्या देशीं जावें लागलें, तर पोर्तुगाल देशाहून एक बंदकेलेलें पत्र आणिलेलें असतें, तें त्यावेळीं उघडतात, आणि त्यांत ज्यांचीं नांवें लिहिलीं असतील, ते कांहीं दिवस राज्यकारभार चालवितात. ह्या पत्रांत सर्वदा **मुख्यधर्मोपदेशकाचें** नांव पहिलें असतें.

नवीन **सरसुभेदार** आला ह्मणजे माजी **सरसुभेदार** त्यास गोवें शहरांतील **बोंजेजूस** नामक देवळांत राज्याचा अखत्यार देतो. त्याची बदली बहुतकरून तीन वर्षांनीं होत असती. तो पणजी शहरांत एक राजवाडा आहे. तेथें राहतो. त्यास राज्यसंबंधी मसलत देण्याकरितां ह्या राजवाड्यांत एक मंत्रीसमाज भरत असतो, त्यांत चार सभासद असतात; एक **सेनाधिपति**, दुसरा **सरकार तर्फेचा वकील**, तिसरा **समुद्र, नद्या**, इत्यादिकांवरचा **मुख्याधिकारी**, आणि चौथा **सरचिटनीस**.

**न्यायखातें**—गोमांतकांत पूर्वीं तीन न्यायालयें होतीं; परंतु सांप्रत प्रत्येक प्रांतांत एक न्यायालय आहे. मुख्य न्यायालय पणजी शहरांत आहे, तेथें इतर न्यायालयांतून अर्जी येत असतात. येथें नेमलेल्या दिवशीं **श्रोतृसमाज*** भरत असतो. प्रत्येक प्रांतांत एक **वाहिवाटदार** किंवा **तहसीलदार** असतो. गांवखात्याचा अधिकार **राजमंत्रसभासदांच्या**†हातीं आहे. ह्या सभेंत बारा असामी नेमलेले असतात. ह्या शिवाय

---

 * अवदीयेंस. † कांम्र.

प्राचीन जिंकलेल्यां प्रान्तांतील प्रत्येक गांवांत बहुधा एक **ग्रामाधिकारी*** असतो. नवीन जिंकलेल्यां प्रान्तांत कुल परंपरागत एक **कुळकरणी** आहे.

**लष्करी खातें**—ह्या खात्यावर जो मुख्याधिकारी असतो त्यास '**मार्शालदेकांप**' हा किताब असतो. पूर्वी येथें पुष्कळ सैन्य होतें, परंतु सांप्रत अगदीं थोडकें आहे. **फोंडें** आणि **डिचोली** येथें पायदळाच्या दोन पटालनी असतात. **मडग्राम** आणि **म्हापसें** ह्या दोन शहरांत वनछेदकांच्या दोन टोळ्या आहेत. **पणजी** शहरांत गोलंदाज व दुसरे पुष्कळ लष्करी शिपाई आहेत. प्रत्येक पटालनीवर एक अधिकारी असतो, त्यास **कोर्नेल** असें ह्मणतात. तसेच पायरीं पायरीचे पुष्कळ अम्मलदार आहेत. प्रत्येक **वादित्रगणांत** चाळीस वादक असतात. एथील सांप्रतच्या सैन्याची संख्या सुमारें ३,००० आहे.

---

# किल्ले.

———000———

**तेराखोलचा किल्ला** हा **आरांवदें** नदीच्या कांठीं असून **गोमांतकाच्या** उत्तर सरहद्दीवर आहे. हा लढाईच्या कामांत फार सोईवार ठिकाणीं आहे. ह्या किल्ल्यांत नेहमीं सरकारी पाहरा असतो. हा इ० स० १७४६त फिरंगी लोकांनीं भोंसल्याकडून जिंकून घेऊन '**सांत त्रिनिदाद**' नामक देवीस अर्पण केला.

---

*रेजीदोर.

**हळर्णचा किल्ला** हा पेडणें प्रांताच्या ईशान्येस असून कोलवाळ नदीच्या कांठीं आहे. येथें सरकारी पहारा असतो. हा किल्ला इ० स० १७४६त पांचव्या महिन्याचे चौथे तारखेस वाडीच्या सांवताकडून फिरंगी लोकांनीं आपल्या स्वाधीन करून घेतला.

**चापोर ऊर्फ कायसूवचा किल्ला** हा कोलवाळ नदीच्या मुखावर आहे. ऐथें दारूखाना, तुरूंग, आणि तोफखाना असून पाण्याचा पुरवटा बराच आहे. ह्या किल्ल्याचा पाया सन १७१७त **'दोंमेनेजीस्'** यानें घातला.

**सांखळीचा किल्ला** हा सांखळी नदीच्याकांठीं आहे. यांत गुन्हेगार लोकांस बंदीवान ठेवितात. हा किल्ला इ० स० १७४६त सांवताकडून फिरंगी लोकांनीं घेतला.

**आग्वादचा किल्ला** हा आग्वादउपसागराचे कांठीं असून बारदेश प्रांताच्या दक्षिण सीमेवर आहे. ह्याचा तट फार उंच असून उत्कृष्ट दगडाचा आहे. किल्ल्याच्या उत्तर बाजूस एक उंच दीपस्तंभ आहे, तो तारवांस रस्ता दाखविण्याकरितां रोज पेटावितात. ह्या किल्ल्याचे कामांत जरी मुळींच नकासगिरी नाहीं, तथापि याची अतिविस्तीर्णता आणि बांधणाराचें चातुर्य पाहून मनावर गांभीर्याचा ठसा उठतो. हा सन १६१२त फिरंगी लोकांनीं बांधिला.

**रेइशमाग** हा किल्ला मांडवी नदीच्याकांठीं आहे. यांतील तुरूंग आणि सरकारी अम्मलदार रहाण्याचें घर हीं उत्तम रीतीनें बांधिलीं आहेत. किल्ल्याच्या दरवाज्यापासून सुमारें २२५ हात अंतरावर एक पाण्याचा झरा

आहे, त्याचें पाणी फार हितकारक आहे. हा किल्ला सन १५५१त 'आफोन्स' ह्या नांवाच्या प्रतिनिधीनें बांधिला. पुढें १५८९त आणि १७०७त याचा जीर्णोद्धार करून शेजारीं दोन बुरूज उभारले.

**मुगांवचा किल्ला** हा सासष्टी प्रांताच्या उत्तर सीमेवर आहे. यांत तोफखाना, बंदीखाना, इत्यादि इमारती चांगल्या प्रतीच्या आहेत. हा किल्ला सन १६२४त **'दोंफ्रासिस्क'** या प्रतिनिधीनें बांधिला.

**काबचा किल्ला** हा रामाचे भूशिरावर आहे. ह्यांत तोफखाना, बंदीखाना, आणि सरकारी कामदार रहाण्याचें घर हीं उत्तमं आलयें असून मजबूद आहेत. किल्ल्यांत दोन झरे आणि एक चतुष्कोन विहीर आहे. हा इ०स० १४७०त पोर्तुगेज लोकांनी संवेदच्या राजाकडून घेतला.

ह्या खेरीज येथें मोडलेले किल्ले सुमारें २४ आहेत.

**कारखाने**—येथें गूळ आणि साखर करण्याचे कारखाने पुष्कळ आहेत. गूळ करण्याची रीति अशी आहे कीं, ऊंस पक्क झाला ह्मणजे तो कापून रस काढण्यासाठीं घाण्यास लावतात. नंतर तो रस एकत्र करून त्यांत वनस्पतींची राख मिश्र करितात. आणि कढईत घालून त्याची तार निघे इतका तो कढवितात. मग मोठ्या सावधगिरीनें खालीं काढून साच्यांत ओततात. त्यांतून बाईट जो भाग रहातो त्यास **काकवी** असें ह्मणतात. ताडी, माडी, काजू इत्यादिकांची दारू काढण्याचे कारखाने बहुत ठिकाणीं आहेत. मेणबत्ती जशा येथें स्वच्छ तयार होतात, तशा हिंदुस्थानांत कोणत्याच ठिकाणीं होत नाहींत.

तेल काढण्याचे कारखाने सर्वत्र आहेत. सरकारी युद्धशस्त्रें करण्याचा कारखाना **गोवें** शहरांत आहे. बंदूकीची दारू **पानवेल** ह्या गांवांत तयार करितात.

**हस्तकौशल्य— बारदेश** प्रांतांत हस्तकौशल्यानें केलेल्या वस्तु पुष्कळ आहेत, त्यांत पायमोजे हे उत्कृष्ट होय. ते हातानें तयार करितात, त्यामुळें पुष्कळ गरीब व विधवा स्त्रियांस रोजगार सांपडतो. **पणजी** शहरांत कोष्टी अनेक रंगाचीं वस्त्रें विणतात. काशिदा येथें चांगल्या रीतीनें काढतात. ह्याशिवाय येथें दुसऱ्या कांहीं वस्तु हस्त कौशल्यानें तयार करितात.

**विद्यालयें**—गोमांतकांत तीन पाठशाळा आहेत, त्यांत अनेक शास्त्रें शिकवितात. प्रत्येक मुख्य शहरांत **पोर्तुगेज, लातीन, फ्रेंच, इंग्रजी,** इत्यादि भाषा शिकविण्याचीं आलयें आहेत. ह्याशिवाय सरकारानें बहुधा प्रत्येक गांवांत एक शाळा स्थापन केली आहे. सरकारी मराठी शाळा पणजी शहरांत मात्र आहे. एथील हिंदु लोक प्रत्येक गांवांत लहान शाळा घालून आपल्या मुलांस शिकवितात.

**भाषा—गोमांतकी** ऊर्फ **कोंकणी** भाषा ही **महाराष्ट्र** भाषेहून निराळी भाषा ह्मटल्यास चिंता नाहीं. कित्येक लोक इचा धि:कार करितात; परंतु ती इतकी वाईट आणि त्रासदायक कां झाली, ह्याचा शोध ते पुरतेपणीं करीत नाहींत.

आतां ह्या भाषेच्या आद्यस्वरूपाचा शोध, अवदशेचा

इतिहास, तिची सांप्रतची स्थिति, इत्यादि विषयांचें यथास्थित विवरण करणें हा इतिहास लिहिणाराचा प्रस्ताव खरा; परंतु ह्या भाषेविषयीं निराळा पुरातन लेख किंवा ग्रंथाधार कोठेंच सांपडत नाहीं; तथापि भाषानुभवरूपें थोडेसें येथें विवरण करितों.

पूर्वीं गोमांतकदेशवासी प्रय: सर्व ब्राह्मण असून **सारस्वती** ऊर्फ **संस्कृत बालभाषा** बोलत असत. पुढें त्यांनीं इची उपेक्षा केल्यामुळें तिचें आद्यस्वरूप बदलून ती केवळ भिन्नच भाषा होऊन राहिली. नंतर ह्या प्रदेशांत तिला कोणीच आवरून धरणारा, किंवा तिच्या मूळस्वरूपाचा शोध करणारा, किंवा तिची माता जी **संस्कृत** भाषा इचें पुष्टिकारक दुग्ध पाजून तिला आपल्या आश्रयमंदिरांत पोषण करणारा नसल्यामुळें ती निराश्रित होऊन, सैरावैरा धांवत सुटली. अशा स्थितींत असतां येथें **कदंब** वंशांतील राजांचें प्राबल्य झालें, आणि त्यांची जी **कानडी** भाषा इचे दीर्घस्वर ह्या भाषेंत मिश्र होऊन, एथील लोक कांहीं विलक्षण स्वरानें बोलूं लागले. नंतर हा देश **विजयानगर** एथील राजांच्या स्वाधीन झाला. त्यांचीं भाषा ही कानडीच होती, तेणेंकरून ह्या भाषेस दीर्घस्वरांचें अधिकच पुष्टिकरण आलें. पुढें सुमारें पंधराव्या शतकाचे शेवटीं ह्या देशांत मुसलमानांचें प्राबल्य झालें, तेव्हां ह्या भाषेंत यवनी शब्दांची मिसळ होऊन गेली.

सन् १५१० त फिरंगी लोकांचा अम्मल सुरू झाला, तोंपासून तर ह्या भाषेचें स्वरूप अगदी बिघडत चाललें.

अशा प्रसंगीं **नायकस्वामी,*** **सांतबानायक,**† इत्यादि प्राकृत कवींनीं बालभाषेचा अगदीं लोप होतो असें जाणून, तिजविषयीं कांहीं शोध केला, आणि तिचें बहुत अवलंबन करून भक्तिज्ञानवैराग्योपदेशपर प्रबंध, पदें, ओव्या, इत्याद्यनेक कविता रचून एथील लोकांच्या मनांत ह्या भाषेची अभिवृद्धि करण्याची योग्यता आणिली. **पांडुरंगबोवा**‡ केसरे ह्यानें ह्यांचाच कित्ता घेऊन कांहीं पदें व ग्रंथ रचिले. ह्यांची असंभव्य कविताशक्ति, संस्कृत आणि प्राकृत भाषेंतील शब्दांची योग्य योजना, आणि आश्चर्यकारक बुद्धिस्फुरण हीं पाहून विद्वज्जनांच्यांनीं मान्यता दिल्याखेरीज रहावत नाहीं. परंतु एथील लोकांनीं ह्यांकडे कानाडोळा करून तिला अगदींच आपल्या विद्यामंदिरांतून हाकून दिलें, ही किती लाजेची गोष्ट आहे!

सांप्रत ही भाषा इतकी बिघडून गेली आहे कीं, जर कोणी एकादा ही भाषा बोलला, तर संस्कृत किंवा महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्यास देखील समजण्याची मुशकील पडते. एथें तरी ही सर्वत्र सारिखी आहे असें नाहीं. प्रत्येक प्रांताच्या भाषेंत फरक असतोच असतो.

---

* हा नामांकित कवि मंगेशी एथील रहाणारा होता. ह्याच्या जन्मकाला विषयीं बरोबर माहिती नाहीं. ह्यानें आपलें सर्व आयुष्य ईश्वरसेवनेंत घालविलें. सांप्रत ह्यांची समाधि ह्याच गांवांत आहे.

† हा कुलालद्वीप एथील रहाणारा होता. ह्याची समाधि सांवतवाडी येथें आहे.

‡ हा विद्वान कवि फोंडें एथील रहाणारा होता.

अजून पर्वतों एथील ब्राह्मण लोकांच्या अंगीं फार चांगली कविता शक्ति आहे, आणि जर ते आपल्या बुद्धि-कौशल्यानें तिचा योग्य उपयोग करून त्यांच्या भाषेच्या अंगीं जी लोकाप्रियता आहे, ती दूर करण्यास प्रयत्न कर-तील, आणि तिच्या बालांस (शब्दांस) व्याकरण रूपानें आवरून धरून तिला जगत्या पंथास लावतील, तर निःसं-शय ही भाषा विद्वज्जनांस मान्य होईलच होईल.

**बकिनान साहेबांच्या** शोधाप्रमाणें गोमांतकापासून दक्षिणेस सुमारें पंचावन मैलपर्यंत ही भाषा बोलतात. **रवरेंड एच मोग्लींग** साहेब ह्मणतो कीं, "कोंकणी भाषा बोलणारे ब्राह्मण ही भाषा मराराष्ट्र भाषेहून निराळी असून ह्या भाषेचें व्याकरण ही निराळें आहे असें मानितात."

**सर अर्स्कीन पेरी साहेब** ह्यांच्या सांगण्यावरून **मर्फी साहेबानें** ह्या **गोमांतकी उर्फ कोंकणी** भाषे विषयीं बहुमूल्य व्याख्या लिहिली आहे. ती अशी कीं, "**कोंक-णी** भाषेचें व्याकरण तपासून पाहिलें असतां तें महाराष्ट्र भाषेच्या व्याकरणा सारिखेंच आहे, असें निश्चितपणें सिद्ध होते. नामें, क्रियाविशेषणें, एकाच विभक्ति रूपानें चा-लतात. परंतु सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां किंचित् रूपभेद आहे. ह्या भाषेंतील विशेष लक्षण ह्मटलें ह्म-णजे जे शब्द हिंदी आणि महाराष्ट्र भाषेंत आकारान्त, ते कोंकणी भाषेंत ओकारान्त असतात. **गुजराथी आणि मारवाडी** ह्या दोन भाषेंत असाच प्रकार आढळतो. **महाराष्ट्र** भाषेंतील कांहीं अडचणी **कोंकणी** भाषेवरून समजून येतात. जें **कोंकणी** भाषेंत नियम वि-

रुद्ध किंवा अपूर्ण आहे, तें महाराष्ट्र भाषेंत यथाविधि आणि पूर्ण आढळतें. कोंकणी भाषेस विशेष ब्राह्मण जातीय अधिकाराचें स्वरूप आहे. कारण ह्या भाषेंत साहजिक वस्तूंला सामान्य व्यवहारांत पुष्कळ संस्कृत शब्द आहेत. असे हिंदुस्थानांत कोणत्याच ठिकाणीं उपयोग करीत नाहींत, इतकें मला ठाऊक आहे. हे शब्द शेणवी ब्राह्मण शुद्धरीतीनें उच्चारितात, आणि गोमांतकांतील साधारण क्रिस्तांव लोक त्यांचा अपभ्रंश करून बोलतात. पाणी, झाड, गवत, इत्यादि साधारण शब्दांस संस्कृत शब्द आहेत. उदा० उदक, वृक्ष, तृण, हे शब्द शेणवी ब्राह्मण बोलतात; व उदीक, रुख, तण हे शब्द क्रिस्तांव बोलतात."

संस्कृत भाषा येथें ब्राह्मण लोकांत फार व्यापक आहे. ह्या भाषेंत महेश्वरभट्ट, रघुनाथभट्ट,* इत्याद्यनेक विद्वान् आणि कवि होऊन गेले, त्यांत महेश्वरभट्टी हे मोठे प-

---

*हा विद्वान महाशेल एथील राहणारा होता.

† हा नामांकित विद्वान् महाशेल एथील रहाणारा होता. ह्याच्या बापाचें नांव रामचंद्रभट्ट असें होतें. ह्याचा जन्म इसवी सन् १७११त झाला. ह्यानें आपलें अध्ययन स्वदेशांनच संपादिलें. न्यायशास्त्र आणि धर्मशास्त्र या दोन्हींमध्यें हा प्रामाणिक मताचा असून लोकांमध्यें ह्याची मान्यता मोठी असे. अभिधानग्रंथ ह्मणजे कोश त्यामध्यें ह्याची माहिती फार होती. ह्यानें विश्वप्रकाश द्विरूपकोश, एकाक्षरीकोश इत्यादि कोश रचिले, त्याची पूर्वोत्तर हिंदुस्थानांत प्रसिद्धि आहे. भगवद्गीता, अमरकोश, मुहूर्तमाला, सिद्धांत, गीतगोविंद, इत्यादि ग्रंथांवर ह्यानें टीका केल्या आहेत. ह्याशिवाय आणखीहि ह्याचे ग्रंथ असावे असा तर्क होतो. असें सांगतात कीं, ह्या टीका जेव्हां केल्या तेव्हां ह्याचें वय सुमारें तीस बत्तीस वर्षांचें होतें. एकदा काशींतील पंडितास व शास्त्र्यांस दोन

ख्यात संकृत भाषामिश्र होते. एथील लोकांस हिंदुस्थानी भाषा बोलतां येत नाहीं, परंतु ती बोलली असतां समजते. पणजी शहर खेरीज करून येथे **गुजराथी** भाषा जाणणारे विरळा. फिरंगी लोकांचा अमल सुरू झाल्या पासून **पोर्तुगेज** भाषा चोहोंकडे प्रस्तृत होऊन गेली आहे. ही भाषा बहुत करून उंचवर्णाचे हिंदु आणि

---

संस्कृत श्लोकांचा अर्थ बरोबर करितां आला नाहीं. ह्मणून त्यांनीं ते श्लोक बहुत ठिकाणीं पाठविले; परंतु कोणीच यथायोग्य अर्थाचा उलघडा केला नाहीं. शेवटीं हे श्लोक महेश्वरभट्टजीकडे काशींतील शास्त्री स्वतः घेऊन आले. महेश्वरभट्टजीस ते श्लोक पाहून पहिल्यानें अर्थ समजला नाहीं. ह्मणून महेश्वरभट्टजीनें त्या शास्त्र्यांस असें सांगितलें कीं, जर तुह्मी दोन दिवस माझ्या घरीं रहाल तर मी ह्या श्लोकांचा अर्थ तुह्मास करून देईन. हें त्या शास्त्र्यांनीं कबूल केल्यावर महेश्वरभट्टजीनें सरस्वतीची स्तुति केली. नंतर हा एकांत स्थळीं बसलेला असतांनां एकाएकीं त्या श्लोकांचा अर्थ ह्याच्या लक्षांत आला. तेव्हां ह्यानें त्या दोन श्लोकांचा अर्थ वीस कागद करून दिला. सांप्रत ह्या श्लोकांच्या दोन नकला महेश्वरभट्टजीच्या घरीं एक आणि दुसरी श्रीमंत खेमसांवत सरदेसाई सांवतवाडीसंस्थान ह्यांकडे आहे असें सांगतात.

ह्याच्या विद्वत्तेवरून ह्यास जी प्रतिष्ठा मिळाली होती ती ह्यानें आपलें सर्व आयुष्य सदाचरण आणि ईश्वरसेवन ह्यांत घालवल्यामुळें अधिक वाढली. हिंदुस्थानांत ह्याची कीर्ति चहूंकडे पसरली. हा धर्माविषयीं आपलें मन कधीं खोटें देत नसे, ह्यामुळें कोठें ग्रामण्य किंवा धर्मप्रकरणीं वाद पडला असतां लोक ह्याजवळ येऊन खऱ्या खोट्याचा निवाडा करून घेत असत. हा मनुष्य मोठा परोपकारी असून मोठा साधा असे. ह्यानें काव्य, अलंकार, न्याय, आणि धर्म ह्या शास्त्रांमध्यें कित्येक विद्यार्थी पढवून तयार केले. ह्याच्या वंशजांनींही ह्याच मार्गाचें अवलंबन केलें. महेश्वरभट्टाचें कधीं नांव घेतलें ह्मणजे ते त्याची स्तुति करून नमस्कार करीत. महेश्वरभट्टजी वैकुंठवासी झाले, तेव्हां त्याचें वय ९८ वर्षांचें होतें. ही गोष्ट इसवी सन १८१७ मध्यें घडली.—कविचरित्र; दक्षिणेंतील कवि; गोमांत० ले०—

क्रिस्तांव लोक संपादन करितात. कित्येक लोक **फ्रेंच**,* **ग्रीक**† इत्यादि भाषा शिकतात. सांप्रत हिंदु, पोर्तुगेज, आणि क्रिस्तांव ह्या लोकांमध्यें **इंग्रजी** भाषा जाणणारे पुष्कळ मिळतील.

लिपी—**देवनगरी** जिला **बालबोध** लिपी असें ह्मणतात, ती येथें सर्वव्यापक आहे. **मोडीची** लिपी पत्रव्यवहार व हिशेब ठेवण्यास मात्र चालते. नवीन जिंकून घेतलेल्यां प्रांतांत ह्या लिपींत सरकारी दस्ताऐवज, अर्जी, वगैरे लिहितात. **कानडी** लिपी कदंब व विजयानगर राजांच्या कारकीर्दींत ह्या प्रदेशांत सर्वत्र पसरली होती; ती आजपर्यंत चालू आहे; आणि तींत पत्रें, हिशेब, वगैरे लिहितात. विजापूर एथील आदिलशाईच्या वेळीं **फारसी** (मुसलमानी) लिपीचा थोडा प्रसार झाला होता, परंतु सांप्रत तिचा अगदीं लोप झाला आहे. कोठें कोठें शिक्के, पट्टे, वगैरे मात्र सांपडतात. गुजराथ देशांतील लोक येथें थोडकेच असल्यामुळें **गुजराथी** लिपीचा फारसा प्रघात नाहीं; ईत एथील गुर्जर व्यापारी लोक मात्र हिशेब व अपसांत पत्रें लिहितात. पोर्तुगेज लोकांचें राज्य झाल्यापासून हल्लीं **फिरंगी** लिपीचा इतका फैलावा झाला आहे कीं, बहुतकरून सर्व अर्जी, फारखती, दस्ताऐवज, इत्यादि ह्या लिपींत चालवितात.

**व्यापार**—प्राचीनकाळीं गोमांतकांत आरबस्थान, मलाका, जपान, चीन, बंगाल, खंबायत, पेगू, जावा, तिबेट, इराण, आफ्रिका, अमेरिका, इत्यादि अनेक देशां-

---

* फ्रांसेज. † ग्रेग.

तून व्यापारी लोक उदीम करण्या करितां येत असत; परंतु अर्वाचीनकाळचा व्यापार विशेष वर्णन करण्या सारिखा नाहीं. एथील कांहीं लोक बाहेर देशाशीं व्यापार करितात. येथून बाहेरदेशीं पाठविण्याचे मुख्य जिन्नस ह्मटले ह्मणजे मीठ, नारळ, सुपारी, भात, मिऱ्यें, दालचिनी, सुंभ, गुंद, खोबरें, मेण, सण, जाळें, मिरच्या, काजू, चुना, चिंच, आमसोलें, बहुतप्रकारची फळफळावळ, दारू, गूळ, कोंबडीं, इत्यादि पदार्थ आहेत. कांहीं लोक देशांतच व्यापार करितात. मध्यम प्रतीचे लोक इंग्रजी राज्यांतून तरतऱ्हेचा माल नेतात. गोमांतकांतील पहिल्या प्रतीचे लोक पोर्तुगाल, चीन, इत्यादि देशांतील व्यापार करितात. सत्तरी, बत्तग्राम, फोंडें, इत्यादि प्रांतांत घांटी माल पुष्कळ येतो. आणि एथून नारळ, सुपारी, खोबरें, मीठ, वगैरे जिन्नस रवाना होतात.

**नौकानयन**—ह्या प्रदेशांत जिकडे तिकडे नद्या पसरल्या आहेत, त्यामुळें एका गांवांतून दुसऱ्या गांवांत किंवा एका बेटांतून दुसऱ्या बेटांत जाण्यास होडींतून जावें लागतें. येथें पुष्कळ होड्या आहेत. तरी सर्व गोमांतकांत १०४ आहेत, त्यांतून ३५ सरकारी आहेत, व बाकीच्यांचें उत्पन्न गांवकरी किंवा मालक घेतात.

**कृषिकर्म**—येथें नांगराला व कृषिकर्माच्या इतर सामान्य अवतांला बैल, रेडे, वगैरे लावण्याची चाल आहे. कृषिकर्माचीं आवतें आबडधोबड आहेत, तीं येणेंप्रमाणें,—नांगर, दांताळें, कुदळ, खुरपें, वळई, इत्यादि. ह्या प्रदेशांतील शेतकऱ्यांस जरी कृषिविद्या माहीत नाहीं.

तथापि त्यांस ती निर्वाहा पुरती ठावूक आहे.

**उत्पन्न**—एथील पहिल्या प्रतीचें उत्पन्न ह्मटलें ह्मणजे मीठ, नारळ, भात, सुपारी, आणि नाचणी हें आहे. उडीद, कुळीद, तूर, पाकड, मका, कापूस, सण, हळद, कांदा, सुंठ, काफी, इत्यादि दुसऱ्या प्रतीचें उत्पन्न. ह्या शिवाय अनेक तऱ्हेचें उत्पन्न आहे.

**लोकसंख्या**—गोमांतकाचा पृष्ठभाग १०६२ चौरस-मैल असून त्यांतील लोकसंख्या सुमारें ४००००० आहे. परंतु हें सांप्रतच्या वस्तीचें मान. पूर्वीं हिंदु आणि मुसलमान लोकांच्या कारकीर्दींत लोकांची संख्या ह्या पेक्षां खरोखर अधिक होती. सांप्रतची वस्ती तरी सर्वत्र एकसारिखी आहे असें नाहीं. ठिकठिकाणच्या वस्तींत फरक आहे. जंजिरेगोवांत दर चौरस मैलास ९८९ मनुष्यें पडतात. सासष्टी सारिख्या विस्तृत प्रांतांत सरासरी दर चौरस मैलास ९४५मनुष्यें भरतात. बारदेश प्रांतांत वस्ती फार दाट असून सुमारें दरचौरस मैलास १३३१ मनुष्यें आहेत. नविन जिंकून घेतलेल्यां प्रांतांत वस्ती पातळ आहे. दर चौरस मैलास १४४ माणसें धरिलीं असतां अतिशयोक्ति होईल. गोमांतकांत मोठमोठे गांव व शहरें आहेत; परंतु त्यांत एक शहरसुद्धां भरवस्तीचें नाहीं. एथील भरवस्तीचें शहर ह्मटलें ह्मणजे **मठग्राम.**

# देशस्थिति व लोकांच्या रीतिभाती.

ह्या देशांतील स्वराज्य नष्ट झालें, आणि विद्या, ज्ञान, कलाकौशल्य, आणि व्यापार हीं उत्तरोत्तर क्षीण आणि विगलित होत गेलीं, किंबहुना अगदींच ध्वंसित झालीं, त्यामुळें एथील प्रथमस्थित जे हिंदुलोक ह्यांच्या दुःस्थितीस आणि दैन्यास पारावार नाहींसा झाला आहे. त्यांचीं शरीरें व अंतःकरणें निःसत्व आणि उदासीन होऊन गेलीं आहेत. श्रीमान् असोत, किंवा निर्धन असोत, आपण ह्मणजे कःपदार्थ असें त्यांस वाटतें. एखादा यःकश्चित् विदेशीय मनुष्य पाहिला ह्मणजे निष्प्रयोजन त्याच्या नादीं लागून, ते आपल्या पुनरपि अलभ्य जीविताचा काल निरर्थक व्यय करितात. कोणती गोष्ट करावी आणि कोणती न करावी ह्याचें त्यांस मुळींच भान रहात नाहीं. ते आपल्या ख्यालीखुशालींत असले ह्मणजे मग कायदा, मन, सारासारविचार, व प्रतिष्ठा हीं कांहीं एक मानीत नाहींत. बाहेर देशीं गेले ह्मणजे आपल्या देशास विसरून ते स्वदेशाची आणि देशबांधवांची निंदा आणि उपहास करण्यास लागतात; व पूर्वी आपण कोणत्या स्थितींत होतों, ह्याचें त्यांस मुळींच भान राहत नाहीं. कोणी ह्मणतो कीं, गोमांतक गगनचुंबित

दैन्यरूप पर्वताखालीं अभिनिविष्ट होऊन गेलें आहे; कोणी ह्मणतो कीं, अविद्यारूप दानवाचें तें केवळ दास होऊन राहिलें आहे; कोणी ह्मणतो कीं, अज्ञानरूप महानदीस पूर येऊन त्यांत तें वाहून जात आहे; कोणी ह्मणतो कीं, भोग साधनांत निमग्न होऊन त्याच्या आयुष्याचा कालक्षेप होत चालला आहे; कोणी ह्मणतो कीं, त्यास आलस्यरूप गाढ, कुंभकर्णी, आणि दीर्घ निद्रा लागली आहे. प्राचीनकाळीं उत्तमावस्थेंत असलेला जो हा गोमांतक देश ह्याप्रकारचीं श्रवणायोग्य दूषणें लावून घेण्यास कां पात्र झाला, ह्याचा जर सर्वलोक क्षणभर विचार करतील तर त्यांच्या लक्षांत येईल कीं, स्वदेशप्रीति हीच कारणभूत होय. जे आपल्या देशाचे उत्कर्षाविषयीं प्रीतिपूर्वक झटत नाहींत, त्यांसारिखे कोणीच अधम आहेत असें वाटत नाहीं. प्रत्येक मनुष्य आपल्या मातेची सेवा करण्यास जसा ऋणी असतो त्याहूनही तो स्वदेशाविषयीं विशेष ऋणी असला पाहिजे. ज्या देशांत जो जन्मला, किंवा ज्याचे वाडवडिलांनीं आपला कालक्षेप ज्या देशांत केला, किंवा जेथें ज्याचे वाडवडील येऊन प्रथम स्थाईक झाले, अशा देशाविषयीं तो ऋणी आहे असें निःसंशय सिद्ध होतें. ज्या प्रमाणें तो आईची काळजी वाळगितो, त्याप्रमाणें त्यास स्वदेशाची व तेथील एतद्देशीय लोकांची काळजी वाळगिली पाहिजे. ज्या देशांतील लोकांमध्यें स्वदेशप्रीति वास करिते त्या देशांतील लोकांमध्यें ऐक्य असतें. हे गुण गोमांतक देशवासी लोकांमध्यें वास करीत नाहींत, ह्मणून एथील प्रथमस्थित लोक फुटलेल्या जहाजा सारिखे

सर्वत्र पसरले आहेत. जे ह्या देशांतून बाहेरदेशीं गेले ते ह्या देशास मुकलेच असें समजावें.

पूर्वी गामांतक देश ज्यावेळीं भरभराटींत होता त्या-वेळीं हा देश विद्वान, लौकिकी, गुणीजन, इत्यादि पुरुषांनीं मंडित होता, परंतु सांप्रतची स्थिति तशी नाहीं, कारण ह्या देशाची स्थिति अशी कांहीं चमत्कारिक होऊन गेली आहे कीं, एथील श्रीमान् आणि अइनीचे गृहस्थ देश सुधारण्या-कडे मुळींच लक्ष देत नाहींत. दैववशात् त्यांत एखादा विद्वान् झाला तर स्वदेश सुधारण्याकडे लक्ष न देतां अज-गरवृत्तीनें व ख्यालीखुशालींत आपला वेळ घालवितो. स्व-देशप्रीति ह्मणजे काय हें त्यास मुळींच माहीत नसतें. सांप्र-त कितीएक लोक स्वदेशप्रीतीनें देश सुधारण्याविषयीं झटत आहेत, हें एक सुचिन्हच समजलें पाहिजे.

एथील प्रथमस्थित हिंदुलोक आदरातिथ्य करणारे आहेत. हे फार भितरे, मत्सरी, व तिरस्कारी आहेत. गोमांतकस्थ ब्राह्मण जातिभेदाचा विचार फार ठेवितात. ते दहा हात धोतरें नेसतात. अंगरखे गुडग्याच्या खालीं क्-चित् असतात. पागोटीं एकाप्रकारची घालतात, त्यांस गोमांतकीं पागोटीं असें ह्मणतात. अंगावर शेले किंवा अंगवस्त्रें बाळगतात. ते बाहेर देशीं गेले ह्मणजे अंग-वस्त्रें मुळींच घेत नाहींत. बायकांनां हलके मानितात; परंतु त्यांशीं ते ममतेनें वागतात. एथील चित्पावन क्-चित् आंगरखा घालतात, ते बहुदा पंचे नेसतात. ह्यांत एक वाईट चाल आहे, ती अशी कीं, श्रीमान् असले तथापि ते आपली कन्या विक्रय करितात. कऱ्हाडे विषप्रयोग क-

रून जामातास मारितात, असें अजून पावेतों एथील लोक मानतात. पद्ये पंचे नेसतात, व कांबळी वाळगतात. कित्येक लंगोटी घालतात. सांप्रत शूद्रादि लोक मोठ्या किनारीचीं धोतरें नेसूं लागले आहेत. फेटा बांधण्याची चाल एथील लोकांत सर्व व्यापक आहे. वैष्णव ब्राह्मण व सोनार लोक मखमालीच्या टोप्या घालतात. हे सर्व लोक एकच भाषा बोलतात. जे प्रवासी गोमांतकांत जाऊन आले आहेत, ते बहुधा असें ह्मणतात कीं, "ह्या प्रदेशांतील लोकांमध्यें कितीएक उत्तम गुण आहेत, पण साधारणत: पाहूं गेल्यास ते कांहीं रानटी अवस्थेंत आहेत." कारण ते ह्मणतात कीं, "खरी सुधारणा ह्मणून जी कांहीं आहे तिनें ह्या देशावर अगदींच इतराजी केली आहे. एथील लोक बूट, स्टाकींग, वगैरे घालीत नाहींत, व सुरापानही करीत नाहींत. एक एक ब्राह्मण हात हातभर उटी व नाम रानटी लोकांसारिखें कपाळभर लावितो. ते सदोदीत मूर्तींचें पूजन करितात. त्यांचा पूर्ण विश्वास आपल्या कुलदेवांवर असतो." तर ह्याचें कारण असें आहे कीं, ज्यावेळीं फिरंगीलोक धर्मसंबंधी जुलूम चालवून एथील लोकांस बाटवूं लागले, त्यावेळीं ते त्रासून अधिकाधिक पवित्रपणा धारण करून विविक्त स्थलीं ह्मणजे जेथें त्या ख्रिस्ती लोकांचा प्रवेश होत नाहीं, अशा ठिकाणीं जाऊन राहिले; त्यामुळें अजून पावेतों कांहीं खऱ्या हिंदुधर्माचें स्वरूप ह्मणून जें आहे तें येथें राहिलें आहे. राज्यकर्ते फिरंगी लोक ह्यांपासून जर त्यांस धर्माची मोकळीक असती, तर हे लोक कधींच रीफोर्मड् होऊन (सुधारून) गेले असते. फिरंगी

लोकांपासून हिंदुधर्मास मोकळीक मिळाल्या पासून आलीकडे एथील लोकांची एक चमत्कारिक चाल पडून गेली आहे कीं, कोणी एकानें एक वेळ कांहीं केलें ह्मणजे दुसऱ्यास त्या प्रमाणें करण्याची इच्छा उत्पन्न होऊन तो तसें करण्यास प्रवृत्त होतो.

ह्या देशांत श्रीमान् कुटुंबें बरींच आहेत. एथील श्रीमान लोक फार उधळे आहेत. त्यांची समजूत अशी आहे कीं, ज्याच्या घरीं चाकर लोक फार व पाहुणे फार त्याची प्रतिष्ठा मोठी. एकादा पाहुणा एकाच्या येथें भोजनास येऊन तो दुसऱ्याचे घरीं गेला, तर ज्याचे तेथें तो प्रथम उतरला असेल त्याला फार राग येतो. यामुळें कोणी एकादा प्रसिद्ध मनुष्य ऐथें आला, तर त्यास मोठीच अडचण पडते कीं, आपण कोणाचे घरीं उतरावें व कोणाचे घरीं उतरलेंच पाहिजे. एकाचे घरीं उतरल्यास दुसऱ्यास राग येतो, व ह्या कारणावरून कधींकधीं वैमनस्य ही पडतें. गोमांतकांतील नीच लोकांची स्थिति फार वाईट आहे. मोठे लोक त्यां गरीबां पासून सक्तीनें काम घेतात, व कांहीं चूक झाल्यास त्यांस निर्दयपणानें मारितात.

एथील पहिले प्रतीचे विद्वान् आपल्या पुस्तकाशींच कर्मणूक करितात. दुसरे प्रतीचे ह्मणजे थोडे शिकलेले हे आपल्या रिकाम्या वेळीं चार पांच मित्र जमवून सोंगट्या, गंजिफा, वगैरे खेळतात, नाहींतर भाकड गोष्टी बोलत बसतात. एथील कित्येक लोक जुगार खेळतात. येथें जसें खेळाचें महात्म्य असतें तसें दुसऱ्या कोठेंच नसेल.

जत्रा वगैरे उत्साह असले ह्मणजे जुगार खेळण्याची परवानगी सरकारापासून मिळत होती, परंतु सांप्रत ती सरकारानें बंद केली.

एथील उंच वर्णाचे क्रिस्तांव लोक बहुधा सधन आहेत. अतिनीच जातीचे लोक स्वयंपाकी (बुटलेर) आसतात. हे आपल्या देशाची प्रीति करणारे आहेत. ह्यांचा पोशाख युरोपस्थांप्रमाणें काळा असतो. हे बाहेर देशीं गेले ह्मणजे बहुधा आपल्या देशाचा मोठेपणा सांगतात, व वर्षांतून एकदा स्वदेशाचें दर्शन घेण्यास व आपल्या जुन्यां इष्टमित्रांस भेटावयास जातात. हे अन्य देशी कधींच. स्थाईक होत नाहींत. झाले तरी स्वदेश प्रीति वागवितात.

---

**पहिला भाग समाप्त.**

# गोमांतकाचा इतिहास.

## भाग २.

## प्रकरण पहिलें.

**गोमांतक** हा देश प्राचीन कालापासून प्रख्यात आहे. कथाकार असें वर्णन करितात कीं, **परशुरामानें** कांहीं ब्राह्मण गौड देशांतील **त्रिहोत्र*** नामक नगरांतून आणून, त्यांची एथें स्थापना केली, आणि त्यांस एथील सर्व अधिकार दिला; यावरून त्यांनीं कांहीं काळपर्यंत स्वतंत्र राज्य केलें असावें. ह्या ब्राह्मणांची राजधानी **मठग्राम**† हें शहर होतें.

पुढें ह्या देशाचा इतिहास यथायोग्य मिळत नाहीं. कांहीं दंतकथा चालत आल्या आहेत, आणि कोठें ग्रंथ वगैरे पुरातन हस्तलेख कालावधि शिवाय सांपडतात; परंतु त्यांवर पूर्ण विश्वास ठेवितां येत नाहीं.

कित्येक ताम्रपट्टांवरून असें सिद्ध होतें कीं, गोमांतक

---

*यास सांप्रत **तिरहूत** असें ह्मणतात.

†या ठिकाणीं परशुराम स्थापित मठ होता ह्मणून यास मठग्राम हें नांव पडलें आहे.— गोमांतकांतील लेख.

प्राचीनकाळीं **कदंब** राजांच्या स्वाधीन होतें. ह्यांचा **मूळ पुरुष त्रिलोचन ऊर्फ जयंत*** कदंब ह्या नांवाचा

---

* पुरागौरीशेनप्रमदजलबिंदुःपुरजये कदंबस्याबालेनिजनिटलपट्टाद्विनिहितः ससर्जक्ष्मापालंकमपिचतुरंभोधिजयिनं चतुर्व्बाहुंत्र्यक्षंकलितशरचापासिफलकं ॥ सोमसूर्य्यवदुदग्रतेजसो राजवंशविततेःप्रवर्त्तकः यस्त्रिलोचनकदंबइत्यसौ दिक्षुदिक्षुभुवनेषुघोष्यते ॥ लेख, नंबर पहिला— ॥ उदधिमथनकालेमंथनान्मंदराद्रे र्न्यपतदमृतबिंदु(:)कापिभूमौसएव । अजनिजितवसंतानोकह(:)श्रीकदंबः सुरतरुगुणसारैस्तै(:)कदंबीकृतैर्वा ॥ त्रिपुरविजयलक्ष्मीसंगमे नगशत्रोरलिकफलकजातस्वेदाबिंदोर्बभूव । क्षितितलमुपयातात्तत्कदंबोपकंठे तरुणतरणिकांतानंतलक्ष्मोर्जयतः ॥ बिभ्राणोमणिकुंडले सफलक(:)खड्गीसबाणासनः । तूणीरस्पृहयालुपाणिकमलःसाकंचतुर्भिर्भुजैः ॥ वीरोभद्रइवापरःपृथुयशा भालस्थलीलोचनः। क्षात्रोधर्म इवाश्रितस्तनुमिमां त्रातुंत्रैलोकीमिमां ॥ क्षोणीरक्षाक्षममरितृणश्रेषिशोषाग्रबीजं धर्मस्यैकायतनमतनूद्भासिभास्वत्प्रतापं। तंसंवीक्ष्यक्षितितलमिदंसान्वयः पालयेति प्रादायास्मिन्झटिति ( ? ) गिरिजाजानिराज्यंचकार ॥ सद्वृत्तशुद्धतरपार्थिवमौक्तिकानां संभूतिहेतुरवनीभृतएषःवंशः। आचंद्रतारकमिलातलशांतिहेतो र्जागर्तियस्यचविचित्रमकंटकश्रीः ॥ लेख नं० २ ॥ गौरीपतेःपुरजयोत्सवकेलीःभाजः स्वेदोदबिंदुनिकरान्निट ( टि ) लप्रसूतात् । जात न्कदंबतरुमूलमुपागताद्विख्यातस्त्रिलोचनकदंबइतित्रिलोक्यां ॥ सेषुचापासिफलकैर्जयदैर्बाहुभिर्युतः । उपायैरिवराजयोजयंतइतिविश्रुतः ॥ लेख नं० ॥८॥

होता. **त्रिनेत्र कदंब** ह्मणून कोणी राजा इसवी सन् ११० त राज्य करीत होता तो हाच असावा, असें कित्येक ग्रंथकर्ते* लिहितात. ह्या पुरुषाच्या उत्पत्ति विषयीं असे लेख सांपडतात कीं, कोणी एका कालीं श्री **माहादेव** परिश्रान्त झाला असतां त्याच्या मस्तका पासून एक घर्म बिंदु कदंब वृक्षा खालीं पाण्याचें पात्र होतें, त्यांत पडतांच तो उत्पन्न झाला. जरी ही गोष्ट अविश्वासनीय आहे, तथापि त्यां लेखांवरून असें निश्चित होतें कीं, तो मोठा भाग्यशाली आणि महान पुरुष असावा.

ह्या कदंब वंशामध्यें कांहीं कुलप्रदीप आणि दिग्विभावित भूपाल† झाले, त्यांनीं अठरा अश्वमेध करून पृथ्वीवर नानाप्रकारच्या लोकोपयोगी वस्तु उत्पन्न केल्या, त्यांत **गूहल्लदेव**‡ नामक राजा मोठा पराक्रमी आणि लोकचक्षु असा होता. त्यानें आपल्या भुजबलें करून पुष्कळ वाघ मारिले, ह्मणून त्यास सर्व लोक **व्याघ्रमारी** असें ह्मणूं लागले.

---

* बकिंग्हाम याचा प्रवास—भाग ३. पृष्ठ १११.

† तस्यान्वये कोपिनृपावभूवु: कादंब भूपाल कुलप्रदीपा: यदश्वमेधेषु निखातयूपै: पुण्यद्रुमैरंकुरितेव पृथ्वी।। तस्याष्टादशवाजिमेधकृतिविख्यातेन्वये भूमिपा भूयांसो हिबभूवुरेषुंच महायोगीश्वराग्रेसर: ।। लेख नं० १ आणि ८

‡ तेषांकुलेभूदथलोकचक्षु गूहल्लदेव:प्रसरत्प्रताप: यत्तेजसावैरितमश्चमूना मुद्दामभीमासुगुहासुवास: ।। नूनंभुजापंजरपोषितस्य स्वशौर्यसिंहस्यबलंदिदृक्षु: । व्याघ्राननेकानन्मृगयासु निघ्नन्यो व्याघ्रमारीत्यभवप्रसिद्ध: ।। ले० नं० १

त्यास शष्टदेव* या नांवाचा मुलगा होता. तो मोठा शूर आणि दानशील असा होता. त्यानें लंकेच्या राजावर प्रबल सैन्य पाठवून त्यास जिंकिलें. ह्या राजाचीं समीपस्थ राजां बरोबर पुष्कळ युद्धें झालीं, त्यांत त्यानें बहुतेक राजांस आणि त्यांच्या बायकांस बंदीवान करून त्यांस आपल्या सेवेस लाविलें होतें. हे राजे इसवी† ४७९ पर्यंत स्वमतानुसरणपूर्वक राज्य करीत होते, असें पुष्कळ मुद्रित लेखांच्या आधारावरून समजतें. नंतर चालुक्य‡

---

* दुर्योधनानीकजयायभूय: कालेकलौपांडवपुंगवेषुपुण्योदय: षष्टइवाविरासीत्तस्यात्मज: कोपिचषष्टदेव: ।। नसेतुबंधोनचदुर्गरोधोनवानरानीकपतिप्रयास: नो वा सुमित्रात्मज संभ्रमो भूलंकापतिस्तस्य तथापि वश्य: ।। बंदीकृताराति नृपांगनानांतस्यार्थिनां वेश्मनिकिंकरीणां विलासवापीजल हारिणीनांमंजीरनादानुचरामराला: ।।लें० नं० १।। हेलासाधितसिंहलादिसकल द्वीपो र्थिचिंतामणिस्त्रैलोक्योत्सववत्सल: समजनिश्रीषष्टदेवोनृप: ।। लें० न० ८

† मुंबई गव्हरमेंन्ठ रेकर्डस् नं० ११५.

‡ हे राजे महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्या सरहद्दीवर बेदर शहराच्या पश्चिमेस कल्याण ह्मणून जो गांव आहे, तेथें राज्य करीत होते. या राजवंशांतील शेवटल्या पुरुषास त्याच्या प्रधानानें मारून आपण गादी बळकाविली. ह्या वेळीं ह्म० सुमारें बाराव्या शतकाचे समाप्तीस लिंगाईत जातीच्या लोकांचें प्राबल्य वाढत चाललें होतें. एलफिन्स्टनकृत हि० इ० पृ०–११०—ह्यांच्या राज्याची मर्यादा–उत्तरेस, नर्मदा नदी; पश्चिमेस, महासागर; आग्नेयीस, कानडा प्रदेश; आणि नैर्ऋत्येस नगर उर्फ विनूर आणि संवदे; हे प्रांत होते. मुं० ग० रे० नं० ११५, आणि रॉएल एशिआटिक सोसाइटी, लंडन.

राजांनीं ह्यांस जिंकून ते त्यांकडून खंडणी घेऊं लागले.

इसवी सन् ८९९ त **चालुक्य** राजांचा मुलूक **राठ*** वंशांतील राजांनीं घेतला. नंतर इसवी सन् ९७४† त राजमुकुटमणी **तैलप** नामक कोणी एक आख्यासंपन्न पुरुष **चालुक्य** कुलांत उत्पन्न झाला, त्यानें आपल्या पूर्वजांचें राज्य **राठ** राजांकडून परत घेतलें. शष्टदेवास **जयकेशी**‡ नामक मुलगा होता. त्यानें **चालुक्य** राजां-

---

* हे राजे जैन धर्माचे होते. त्यांची राजधानी बेळगांव जिल्ह्यांत परसगडाजवळ सऊंदती (सुगंधवति) हा गांव होता—ग० रे० न. ११५.

† मुं० ग० रे० नं० ए० ३—येलीयट्स कलेक्शन.

‡ कापर्द्दिकद्वीपनृपालकाल: समानमानेक्षितचंडचोल: हेलासमुन्मूलितकामदेवस्तस्यात्मजो भूज्जयकेशिदेव:॥ यस्मिन्महींशासतिमंडलस्था:प्रोद्यत्प्रतापप्रसरत्प्रचंडा: करोत्करै:क्षांतदिगंतराला:तिग्मद्युतेर्नैवपरेबभूवु: ॥ आंदोलिकाभिर्मणिदंडिकाभि: प्रांतस्फुरत्कांचनकुंडलीभिर्गत्तागताभि:खलुपंडितानां पूर्णांतरायत्पुरराजवीथी ॥ ले० नं० १॥ तदन्वयसुधासिंधुसंव र्धनकलानिधि: जात:श्रीजयकेशीतिकरैरानंदयन्जगत्॥ यश्च(श्चा)लुक्यंनिजेराज्येस्थापयन्विजितालुप: ॥ कदंबितकदंबोलंकृतार्थीकृतवान्प्रभु: ॥ शौर्यश्रीपारिरंभविश्रमभुजादंड: प्रचंडोद्यम:चंचच्चंद्रमरीचिनिर्मलयश:पुंजैर्जगद्रायन् चक्रेगोपकपट्टनेस्थिरपदंश्रीमू र्तिनाथाद्यशोहद्योद्यद्दिरदावलीविलसितस्तद्देवताभ्राड्भुवि ॥ ले० नं० २ ॥ तत:प्रादुरभूच्छ्रीमानजयकेसीमहीपति: । यत्कीर्तिक्षीरवाराशौलोकैर्यादोगणायितं ॥ चालुक्यचोलभूपालैकांच्यामिन्त्रैविधयय: पेर्मट्टितूर्यनिर्घोषोप्यासीद्रायपितामह: ॥ ले० नं० ३ ॥

बरोबर सख्य राखून आपलें स्वातंत्र्य मिळविलें, आणि गोपकपट्टण (थोरलें गोवें) आपली राजधानी करून तो मुखत्यारीनें राज्य करूं लागला.

जयकेशीनंतर त्याचा पुत्र विजयादित्य* हा सिंहासनारूढ झाला. तो मोठा पंडित आणि सर्व विद्यासुलक्षण होता. त्याला समुद्रांत फिरणें फार आवडे, ह्मणून तो नौकेंत बसून समुद्रवलयांकित गोवाच्या आसपास जीं द्वीपें आहेत, त्यांच्या भोंवतालीं फिरत असे. त्यानें एथील प्रतिष्टित आणि विद्वान ब्राह्मणांस पुष्कळ गांव अग्रहार दिले, असें एका कानडी ताम्रपटांत लिहिलें आहे. ह्या राजानें गोमांतकांत किती वर्षें राज्य केलें हें बरोबर समजत नाहीं, परंतु कित्येक लेखांच्या कालमानावरून त्यानें सुमारें वीस वर्षें राज्य केलें असावें.

---

* यस्माद विरभूद्विरो विजयादित्यभूपतिः यत्प्रतापादभूद्रमे नसंतापकथाश्रुतिः ॥ यात्रोत्सवेपोतपरं पराभिर्विवद्दितो वारिधिरूर्मिघोषैः द्वीपांतरेषुद्विपतां पुरस्ताद्वंदीवयद्विक्रमघोषणोभून् ॥ सकोंकणक्ष्मातलरत्नदीपा ॥ ले० नं० १ यस्मादप्युदगादगादिव रविःप्रात्पन्महीपाद्मिनीमाशापूर्ति करैःकरैःसविजयादित्यः समानंदयन् । सर्वक्ष्माभृद्दग्रमूर्धसुसदान्यस्तात्मपादोदयो दूरेवैरितमः समूहमभितो रुंधन्नवंध्यप्रभः ॥ ले० नं० २ ॥ यस्मादाविरभूद्वीरो विजयादित्यभूपतिः । यस्यासिःशतृ(त्रु) वीरेभ्योरणेस्वर्गापवर्गदः ॥ ले० नं० ३

त्यास **जयकेशी*** या नांवाचा मुलगा होता. त्याच्या कारकीर्दीत अभिज्ञ आणि प्रथित पंडितांच्या पालख्या त्याच्या दाराशीं झुलत असत. तो विद्यार्थ्यांस अधिकाधिक ज्ञान संपादन करण्यास उत्तेजन देई. त्याच्या राज्यांतील तरूण स्त्रिया आपल्या विश्रांति मंदिरांत त्या

---

* तस्मादथासीज्जयकेशिभूप: साहित्यलीलाललिताभिलाप: संभावितानेक सुधीकलाप: ।। यन्मदिरद्वारी विडंबिते इछत्रावली पंडित मंडलीनां उत्कंधरै:केलिसरोमरालैर्मेने शरन्मेघपरंपरेति ।। रणत्कंकणवाचालवल्लकीकलगीतिभि: यस्यकिंनरकन्याभिर्गीतये चरितावली ।। चालुक्यवंशेथजत्प्रकाश: प्रादुर्बभूवोर्जितकोशदश: दिशांपती नामपिचित्तवर्ती पराक्रमी विक्रमचक्रवर्त्ती ।। छत्रच्छायेक्रांतदिवचक्रवाले यस्यस्फीतेनप्रताप: परेषांएतच्चित्रं वैरिवारांगनानां चित्तेष्वेव प्रादुरासीत्प्रताप: ।। उपयेमेसुतांतस्य जयकेशि महीपति: समैललमहादेविं जानकीमिवराघव: ।। इच्छेवधातुर्जननी प्रजानामाज्ञेव विष्णोर्जगतां नियंत्रीत्रयीव धर्मप्रतिबोधयंती विश्वंभरा भूमिरिवाभवद्या ।। ले० नं० १ जतिस्तत (:) श्री जयकेशि(दे)व: स्वरूपसंपज्जितपंचबाण: वाग्देवतामंदिरामिंदुमौले(:) श्रीपादपंकेरुहचंचरीक: ।। विप्रसंप्रोषणोदग्र(:) समग्रगुणिनांगुरु: । पुपोषशरणायातान्विप्रभावानरीनपि ।। सुतांचालुक्यमाणिक्यविक्रमार्कमहीपते: । श्रीमैललमहादेवीमुवाहनृपति(:)स्मतां ।। यापारिजातद्रुमपल्लवाभां कांतिंनितांतंकरपल्लवेन । पुष्णातिपुष्णातिसदार्थिसार्थंतेनैवदानांबुसुधान्वितेव ।। ले० न० २ ।। बिभ्रदभ्रांतकीर्ति: श्रीजयकेशीनृपोभवत् ।।ले०न० ३।।

च्या शौर्याचे गीत गाऊन आपला रिकामा वेळ घालवीत असत. ह्यानें चालुक्य माणिक्य **विक्रमार्क** महीपाति याची मुलगी **मैलाल महादेवी** इजबरोबर लग्न केलें. ह्याच्या आधिपत्यकालांत **द्वारसमुद्रचाबल्लाळ** राजा यानें इ०स० ११२८त **कोंकणांत** बंड केलें, आणि **गोवापुरी** घेण्यास आला, तेव्हां **विक्रम** राजानें आपल्या प्रधानास सैन्यानिशीं पाठवून त्यास पिटून लाविलें. **जयकेशी** राजानें आपला वृद्धापकाल श्री **सप्तकोटीश्वराचे** सेवेंत घालविला.

त्यास **शिवचित्तवीरपर्माडीदेव**×आणि **विष्णुचित्त** असे दोन मुलगे होते. इसवी सन् ११५०त **शिवचित्त** राज्यपदारूढ झाला. त्यानें पांड्य वंशांतील **कमलादेवी**

---

+संपत्स (मा) राधित भूमि देवस्तयो: सुतो भूच्छिव चित्तदेव: ॥ पर्माडिदेवा परनाम धेय: ॥ साम्राज्य भोगोचितभागधेय: यस्मिन्प्रजा:पाति रजोविकारा: परंप्रचारेषु तुरंगमाणां निरंकुशोन्मार्गविनोदली [ला: परं] द्विपानांमदविभ्रमेषु ॥ निलींपकन्याकरदाडिमीभि: प्रलोभिता:पंजरकेलीकीरा:जेतुंत्वरंते सुरवादिवृंदंय दीयदानावलिघोषणासु ॥ यत्कीर्तिगानेषु गणेश्वराणामुत्तंसगंगां [वृझ लज्य] लाभि: धाराधरासाराधियासमंतादुभ्राम्यते चातकचक्रवालं ॥ आसीत्सोमान्वये श्रीमान्कामदेवमहीपाति: दोर्दंडखंडितारातिप्रताप:प्रथितोन्नति: ॥ नाम्नाचट्टलदेवीति पांड्यन्वयमहो-(धे:आसी)चंद्रकलाकाचित्प्रसरत्कीर्तिचंद्रिका ॥ सोमवंशसुधासिंधुजन्मन: कल्पशाखिन:कामदेवस्य तस्यासीत्तत:-त्कांताकल्पलतेवसा ॥ मेनाहिमवतो:पुत्रीं पार्वतीवतयो-

नामक राजकन्ये बरोबर लग्न केलें. तो महान विद्वान, गंभीर, पराक्रमी, आणि उदार असा होता.

---

उदंभून्कम(लादेवी)कुमारीकुलपावनी ।। ताभ्यांदत्ताचसातस्मै-शिवचित्त महीभुजेमेनकागिरि राजाभ्यांगिरिजेवेंदुमौलये।।वसु-धरेवोर्जितवैरिवृत्ते राज्ञेव शक्तित्रयासिद्धिसूत्ते: साम्राज्यलक्ष्मी-रिह पुण्यमुर्ते [:सा प्रे] यसीतस्यवशंवदाभूत् । सातस्यमु-ख्यामहिषी प्रियासुप्रेम्ण:पदं (मान) भरस्यभूमि: सारोहि-णीचंद्रमास: किलैकातारां तरेभ्योबहुमानपात्रं ।।भालेषुभूपाल विलासिनीनांस्पुरंतितस्या (प:) दयावकांर्का:सौभाग्यसिद्धर-धिदेवताया जेतुंजगतीवकृतांघ्रिमुद्रा: ।। तस्या:प्रदातुं कि-लयावतीच्छा तावत्सभ*र्थिजनस्यवांच्छा मनोरथानामतिभू-मयस्तां: प्रधानलीला [वि] पुलाशयानां ।। तेकल्पवल्लीका-कला पास्ता:कामधनोरपि दुग्धधारा:तस्याश्चतादानविनोद-लीला: शक्या: [प्रमातुंन] हिमादृशानां आकर्ण्यनंदनवने वनदेवतानांतत्कीर्तिगीतिषु मदस्खलदक्षराणि आपनकेली-कलितानिविडंबयंत: क्रीडाशुका:सुरवधूरवहासयंति।। ले० न० ।। १ ।।

अभूदमुष्यांजयकेशिदेवा द्वीरोकुमार:परमर्दिदेव: । प्रख्यातकीर्ति:शिवचित्तनाम्ना धाम्नामहिम्नाहरिसद्वितीय: ।। विद्याधामविवेककेलिसदनं सौजन्यसन्मांदिरं । गांभिर्यैकनिके-तनं सुभगताकांतानितांतंवर: । औदार्यावसथंपराक्रम गुणा-वासंनृपश्रीगृहं । शौर्यश्रीनिजवासवेश्म विमलश्लोकास्पदंयं-विदु: ।। यद्विद्रुन्मणिमंदिरेषुरतये यात: (ता:) स्वकांतं (तां)-तिकं । तद्भितिप्रतिबिंबितानि सहसासंवीक्ष्यवैलक्ष्यत: । क:-कांत:प्रतिबिंबितं किमकृथंशय्यास्वहो पंचधाकुर्म:किन्वितिमु-

**शिवचित्त** ह्यावरोदर* त्याचा बंधु **विष्णुचित्त** किंवा **विजयार्क ऊर्फ विक्रमार्क** हा राज्यकारभार चालवीत होता,

---

ग्धभाव विभवादाय तियाग्यंगना: ।। अनु द्तशिवचित: सज्जनौघानुव (वृ) त्त:परिहृतपरिवित्त: पापकोपाग्निवृत: । अमलितनिजवृत:तत्व (०वृत्तस्तत्व०) चिंताप्रवृत:प्रभवति शिवचित्त:सत्सुसंपन्नचित्त: ।। ले० न० ।। तस्मादस्थामनिसुजनो वरिपेर्माडिदेवक्षोणीपालो विजयविजयादित्य पृथ्वीश्वरोपि । श्रीमच्छर्वीतत्रिदश विनतात्पर्वतस्यात्मजायां श्रीहेरंबस्त्रिभुवननुतस्तारं कारिश्चयद्रत्न्शरीरं शर्वस्यप्रकृतिसुभगं नित्यमितिथ:प्रतिज्ञाय प्रज्ञाविंदितपरमार्थस्थिरमति: । तुलामारुह्योच्चैर्जतगति विनुतंप्राप्य विजयंतयोराध: श्रीमानजनिशिवचित्तक्षितिपति: ।। ले०न०

*तदभ्राताविजयार्क देवनृपति:सोजन्य जन्मावनिर्लोकोतुंगपराक्रमैकवसति:साहित्यनित्योत्सव: । गोकर्णेशवरप्रसादजनितश्रीसंपदामास्पदं वाणीभूषणभूमिपालइतिचख्यातिंपरांप्रापय: ।। भुगौकृतेप्रासेधनुषिविषमेचासिफलके वरेवाद्येगीतेसरसकविताशास्त्रविसरे । तुरंगाद्यारोहेस्मृतिषुचपुराणेषुपुरुजात्परिज्ञानाधीभूज्जगाति बहुविद्याधरइति ।। वीरजेगन्नेत्रसुधानिधानेयत्रेक्षितेमोहजुषांद्विषांद्राक् । हस्तान्निसवादपिकामिनीनामस्त्राणिवस्त्राणिचानिष्पतंति ।। पुर:सरीपुण्यकृतांमनीषिणां दवीयसीपातकिनांशरीरिणांमनस्विनीनामिहमार्गदर्शिनीतश्रेयसीचांद्रमसीवदीधिति: ।। विराजतेनूनमरालकेशीमरालमंदक्रमणाभिरामा । सरस्वतीभूषणभूमिपस्यसर्वांगलक्ष्मीर्विजयार्कनाम्न: ।।

असें अनेक ताम्रपट्टांच्या आधारांवरून समजतें. हा सर्व विद्यांत निपुण असून महान्पराक्रमी होता. तसाच फार देवभक्तिपरायण ही होता.

विष्णुचित्त राजास **वीरजयकेशी*** या नांवाचा मुलगा **पट्टमहादेवी** नामक राणी पासून झाला. तो इ०स० ११७० त गादीवर बसला. तो मोठा दानशील आणि बलाढ्य असून श्री **सप्तकोटीश्वराच्या**† सेवेंत तत्पर होता. पुढें याच्या कारकीर्दीविषयीं बरोबर समजत नाहीं.

इसवी सन् ११९३ त बल्लाळ‡ राजांनीं त्या कदंब

---

* लक्ष्म्यांपट्टमहादेव्यां विजयादित्यभूपतेः जयकेशीनृपो जातः कादंबांबुधिचंद्रमाः ॥ यदीयैरारूढद्विप हयरथैरात्तविजयैरधीशैः सेनानांचतुरुदधिवेलासुनिहितान् । जयस्तंभानेतसपदि खलुदंष्ट्राजलगजाः द्दढालानाशंकाविदधति मुहुर्मज्जनविधिं ॥ यत्कीर्तिसारसुधयाधवलीकृतासु दिग्भित्तिषुप्रणाहितांजनबिंदुशोभां ॥ तन्वंतिवैरिवदनानिनिरस्तादेश कोशानुतापमलिनानिदिगंतभांजि ॥ यदीयैरुद्दामद्वीरदनिकरैरंबरतलेसमुत्क्षिप्तं वैरिक्षितिपतिबृहद्दांतिविसरं । सहस्राक्षः प्रेक्ष्याक्षितिधराधिया पक्षदलनप्रयोगायप्रायः स्मरतिपुनरप्यषकुलिशंयश्चद्यदीयरिपवो गिरिकंदरासुतीव्रक्षुधाहतवहेधनतामुतेनाः । कंदार्थिः प्रहरणैर्नयनांतवांत पाथोभिषेकमृदुलामवनिंखनंति ॥

† गो० ले० नं० १६.

‡ हे राजे आपणास यादव नामक राजपूत वंशाचे ह्मणवीत. त्यांची सत्ता सर्व कर्नाटक, मलबार, तामील देश, आणि तैलंगणाचा कांहीं भाग इतक्यांवर होती. इसवी सन् १३१० चे सुमारास मुसलमान लोकांनीं ह्यांचें राज्य बुडविलें—एलफिन्स्तन.

राजास जिंकून इ०सन १२१२पर्यंत त्याकडून ते खंडणी घेऊं लागले. नंतर **देवागिरीच्या** *राजांचें प्राबल्य झालें. त्यावेळीं कदंबराजां कडून त्यांनींही १३१४ पर्यंत खंडणी घेतली. इसवी सन १३१३ त **मुसलमान** लोकांनीं देवगिरीच्या **यादव** वंशाची समाप्ति केल्यावर मुसलमान लोक **गोमांतकांत** येऊन बंड करूं लागले. त्यांनीं एथील पुष्कळ देवालयें मोडून टाकिलीं, आणि राज्याधिकाऱ्यास हाकून देऊन अंधाधुंद रीतीनें राज्य करूं लागले. इतक्यांत असें झालें कीं, उत्तर **हिंदुस्थानांतील** दिल्ली एथील **तगलक** वंशाचा बादशहा-**ग्यासुदीन** यानें आपला मुलगा **यूनाखान** यास **दक्षिणेंत** अव्यवस्था झाल्यामुळें बंदोबस्त करण्यास पाठविलें. त्यानें इसवी सन १३२३ त **तैलंगण** देशाची **वरंगूळ** नामक राजधानी जिंकून तेथील हिंदुराजास बंदीवान केलें. त्यावेळीं त्याचा गुरु विद्यारण्य माधव† व त्याचे खजीनदार बु-

*बाराव्या शतकाच्या प्रारंभि या राजांनीं देवगिरी येथें राज्य स्थापिलें होतें.

†श्रीगणाधिपतयेनमः ।। अविघ्नमस्तु ।। नमस्तुंगशिरश्चुंबिचंद्रमाचरचारवे ।। त्रैलोक्यनगरारंभमूलस्तंभायशंभवे ।। लीलाक्रोलःसजयतिहरिः कुंदलक्ष्मींदधद्यद्दष्टानालेनलिनमिनभूमंडलंतद्विभाति ।। यत्रस्वर्णक्षितिधरपतिःकर्णिकावर्षपांक्तिः पत्रश्रेणीकुलशिखरिणःकेसराणांप्रसारः ।। तस्मिन्भारतवर्षदक्षिणदलेदेशोस्तिकर्णाटकः स्तन्मध्येसरिदुत्तमाविजयतेसातुंगभद्राभिधा यत्तीरेदुरिताटवीहुतवहदेवोविरूपाक्ष इत्यास्ते सततमंतेणसुमनःस्रोतस्विनीचिंतनं ।। यस्योप-

काराय आणि हरिहरराय यांचे मनांत असें आलें कीं, कोठें तरी जाऊन स्वतंत्र राज्य स्थापन करावें. ह्मणून ते तुंगभद्रा नदीच्या काठीं आले, आणि इसवी सन् १३ २६ त त्यांनीं विजयनगर नामें शहर वसविलें. एका वर्षानंतर बुक्करायानें माधवास प्रधान नेमून, त्याकडून आपणास राज्यभिषेक करविला.

---

कंठेविजयाभिधाना सादुर्जयराजातिराजधानी ॥ यस्यांत्रिरूपाक्षकटाक्ष दग्ध मुज्जीवयंतिस्मरमुत्पलाक्ष्य: ॥ वंशेयदोरभिनवांशइवाच्युतस्य श्रीसंगमादजनिसंगररंगभीम: ॥ श्रीबुक्कराजइति धिक्कृतशत्रुरेष तामध्यतिष्टदधमध्यमलोकपाल: ॥ अथभुवंभवगामिन: ॥ सुतंहरिहरिदीशपराक्रमंम् जगदिन:समजीगमलेख दादरात्सचनुरंबुद्धिमेखलाम् ॥ आकर्णस्छसरिद्वरोत्तरतटादापूर्वपाथोनिधरासेतो खनिंचिरादवतिसत्यापश्चिमांबोनिधे: ॥ स्छानेस्मिन्गुणनामभिर्हरिहरोराजाधिराजादिभी रांजोर्वीपतिमौलिमालितपदांभोजेमहीवल्लभे ॥ तस्याज्ञयामाधवमंत्रिवर्य: प्रशाज्जयंतीपुरराज्य मृह्यं मयन्मंत्रशक्त्यावपुहत्सृजंतो प्यरातय:स्वास्थ्यमहोभजंते आशांतविश्रांतयशा:समंत्री दिशोजिगीषुर्महताबलेन ॥ गोवाभिधांकोंकणराजधानीं मन्येनमन्येहृणदर्णवेन ॥ प्रतिष्टितांस्तत्रतुरुष्कसधा नुत्पाद्यदोर्ष्णाभुवनैकवीर:उन्मूलितानामकरोत्प्रतिष्टां श्रीसत्पनाथादिसुधाभुजांय: यस्मिन्नृतेक्षितितलेसतिकीर्तिशेषं सन्मात्रिभिर्हरिहसेनुपातिर्विचार्य ॥ गोवापुरेंनहिमंत्रिणमादरेण रापदेसम भिषिच्यपरोज्ययंत्या:॥ आत्रेयान्वयवारिधावुदभवन्मंत्रावित्रकागर्भत: साक्षाद्रसाभिधद्विजवराद्योभास्करस्याग्रज: ॥ विद्याशंकरसत्कृपामृतरसासारेण-

**हरिहरराय** इसवी सन् १३६७त गादीवर बसला. तो **दक्षिणहिंदुस्थानांत** सुखानें राज्य करीत होता. त्याचा प्रधान **विद्यारण्य माधव** ह्यानें पुष्कळ सैन्यानिशीं **गोमांतकांत** येऊन तेथील **मुसलमानांस** हाकून दिलें; आणि गोमांतक स्वाधीन करून घेतल्यावर **तुर्कशहांनीं** मोडलेलीं देवालयें पुन्हा बांधिलीं. एका ताम्रपट्टांत असे लिहिलें आहे कीं, **माधवानें सप्तकोटीश्वराची** पुनरपि स्थापना करिते वेळीं **गोमांचळ** तीर्थाकडे जेवढी जमीन आहे, तेथें एथील कांहीं ब्राह्मण आणून स्थापिले, आणि ती जमीन त्यांस अग्रहार देऊन तेथील तीर्थास **माधवतीर्थ** असे नांव दिलें. त्या वसाहत केलेल्या जाग्यास तेव्हां पासून **ब्रह्मपुरी** हें नांव पडलें. **माधव** स्वर्गवासी झाल्यावर **हरिहरानें नरहरिमंत्री** यास प्रधान नेमून **गोमांतकांत** पाठविलें.

**विजयनगरच्या** ताब्यांत **मुदगूळ** ह्मणून एक शहर

---

सर्वर्द्धितो विद्वल्कल्पमहोरुहोनरहरिः क्षोणीपतिर्भासते।।कृत्वासत्पदानिसत्पसुमहाद्वापेषुभभृच्छिला मास्थायार्थविमुच्यशात्रवयशोलाजान्प्रतापानले।। प्रत्यक्षेणविलोकितुंदिवसपिप्राप्ततथारुंधती मित्थंकीर्तिवधूःसदानरहरिक्ष्मापतेवरम् ।। स्वास्तिश्रीशकेत्रयोदशाधिकत्रिशतोत्तरसहस्रे गतेवर्तमानप्रजापतिसंवत्सरेवैशाखेमासकृष्णपक्षे अमवास्यायांसौम्यदिनेसूर्योपिरागपुण्यकालेस्वस्तिश्रीमन्महामंत्रीश्वरउपनिषन्मार्गप्रवर्तकाचार्यःश्रीमन्माधवराजःकुचरविषय वर्तिनकुचरनामनंग्रामंमाधवपुरामतिप्रथितनामदेयसर्वमान्यमग्रहारकृत्वा — इ० इ० इ० ले० नं०.

होतें तेथें एक सोनार राहत असे. त्यास एक अतिसुंदर मुलगी होती. तिच्या सौंदर्याची जनश्रुति दक्षिणेंतील ब्राह्मणी* राजा **फिरोजशहा** यास समजतांच त्यानें इसवी सन् १४०६ त कांहीं लष्करी लोक तिला पकडून आणण्यासाठीं पाठविले. त्यावेळीं तो बिचारा सोनार आपल्या मुली सहित दुसऱ्या देशांत पळून गेला. इकडे त्याशिपायांनीं हें वर्तमान **फिरोजशहा यास** सांगतांच त्यास **विजयनगरचा** राजा **कृष्णराय** याचा त्या सोनारास पळविण्याचे कामांत संशय येऊन त्याचा सूड उगवण्याकरितां तीस हजार स्वार व मोठें पायदळ घेऊन तो स्वत: विजयनगरावर चाल करून आला. त्यावेळीं उभयपक्षांची भयंकर लढाई होऊन **कृष्णरायाचे** सैन्याचा अगदीं मोड झाला; तेव्हां त्यानें भिऊन **फिरोजशहायाकडे** तहाचें बोलणें लाविलें. **फिरोजशहा यानें कृष्णरायास** असें सांगून पाठविलें

---

*मुसलमान राजांस ब्राह्मणी राजे ह्मणण्याचें कारण असें आहे कीं, पूर्वीं दिल्ली शहरांत कांगो नामें एक ब्राह्मण राहत होता. त्यानें **जफीरखान** जो या राजवंशाचा मूळपुरुष यास बाळपणांत विकत घेऊन आपल्या घरचे कामासाठीं बाळगलें होतें. नंतर कांहीं दिवसांनीं तो उत्तम गुणी आहे असें जाणून त्या ब्राह्मणानें कांहीं द्रव्य न घेतां त्यास दास्यमुक्त केलें; आणि पदरचें कांहीं द्रव्य देऊन संतोषयुक्त बोलिला कीं, तुला लक्ष्मी प्रसन्न असो. पुढें जेव्हां त्यास दैवयोगानें दक्षिणेंतील राज्य प्राप्त झालें, तेव्हां त्या ब्राह्मणाचे उपकार व आशिर्वाद स्मरून त्यानें आपल्या नांवास **कांगो ब्राह्मणी** अशीं अक्षरें लाविलीं; आणि त्या ब्राह्मणास बोलावून आणून जामदारखान्याचें कामावर नेमिलें. ह्यावंशांत पुढें जे पुरुष झाले त्यांनींहि हेंच नांव धारण केलें, या कारणास्तव या वंशांतील राजांस **ब्राह्मणी राजे** असें ह्मणतात. ह्यांचे राज्य इ० स० १५२४ त अगदीं बुडालें. ग्रान्ट् डफ् आणि फिरिस्ता.—

कीं, जर तुह्मी आपली मुलगी, चाळीस लक्ष रुपये, पांचमण मोत्यें, पन्नास हत्ती, आणि वांकापुरप्रांत इतकें आह्मास द्याल तर आह्मी तुह्मांबरोबर तह करूं. ह्या त्याच्या मागण्या कृष्णराया यास मान्य करण्यांस कठीण वाटल्यावरून तो निरुपायास्तव गोमांतकांतील रामाचे भूशिर येथील रानांत साहा महिने लपून राहिला. परंतु अरण्यज्वरानें त्याच्या शरीरास समाधान नाहींसें झाल्यामुळें तो आपल्या राज्यास परत गेला.

इकडे फिरोजशहा यानें कृष्णरायायाचे कन्येबरोबर बलात्कारानें लग्न लावून तो आल्यावर त्याशीं तह केला.

पुढें १४६८ पर्यंत वरील तहाप्रमाणें दोन हीं राज्यें सख्यत्वानें वागत होतीं; परंतु याचवर्षीं मुसलमान राजा दुसरा महंमदशहा ब्राह्मणी यानें अविहितपणें विजयनगर येथील खजीनदारास आपले पदरच्या कांहीं वादकांस द्रव्य देण्याचा हुकूम केला, तो त्यानें सरकारी आज्ञेवरून मानिला नाहीं; यास्तव विजयानगरच्या राजाबरोबर महंमदशहा यानें लढाई सुरू केली.

---

# प्रकरण दुसरें.

## मुसलमानराजांची कारकीर्द.

ब्राह्मणी राजाचा प्रधानामात्य मलिक् ऊल् तिजूर काजी जहान ऊर्फ महंमद गावन यानें इ०स० १४६९त १२० लढाऊ तारवें गोवाबेटावर समुद्रांतून हला करण्या-

करितां पाठविली, आणि तो स्वत: निवडक सैन्यानिशीं खुष्कीनें युद्धास आला. त्यानें एका वर्षानंतर **अमराजी** नामें **विजयनगरच्या** राजप्रतिनिधि कडून **गोवा***बेट घेतलें. **अमराजी** यावेळीं **शिवराय याचे** मुलांच्या बालावस्थेंत **विजयनगर** येथें राज्यकारभार चालवीत होता.

इकडे या जयाचें वर्तमान **महंमदशहा** यास समजतांच त्यानें आपल्या राजधानींत सात दिवसपर्यंत **जयानंदाची** नौबत करवून दुसरे यथाक्रम पुष्कळ उत्साह केले. **काजी जहान** यानें जिंकून घेतलेल्या किल्ल्याचे रक्षणार्थ यथेच्छ फौज व बहुत प्रकारचा पुरवठा ठेऊन तो **बेदर**† येथें परत गेला. आमात्य आला असें कळतांच **महंमदशहा यानें** सात दिवसपर्यंत त्याची भेट घेतली, व त्यास राजकीय वस्त्रें व मोठे किताब दिले. त्यावेळीं त्या प्रधानानें अशी आदरपुर:सर विनंती केली कीं, **गोवाचा** अधिकार **खुशकुदन्** यास द्यावा, कारण तें जिंकून घेण्यांत त्यानें रणभूमीवर फार शौर्य दाखविलें आहे. ही गोष्ट **महंमदशहा यानें** मान्य करून **खुशकुदन्** यास **किस्वरखान** असा किताब दिला, आणि त्यास **गोमांतकांत** पाठविलें.

पुढें इसवी सन १४७२त **विजयनगरच्या** राजप्रतिनिधीनें बेळगांव येथील राजा **विक्रमराय** यास प्रोत्साहन दिल्यामुळें तो **गोवा** परत घेण्यास आला, तसाच **अमराजीचा** करद बांकापुरचा सरदारही आला. परंतु ही

---

* हें बेट राजधानीचें स्थान असल्याकारणानें तें जिंकून घेताच सांप्रतचें गोमांतक व कोंकणाचा कांहीं भाग मुसलमान लोकांचे सत्तेखालीं गेला.

† महंमदशहा ह्या ब्राह्मणी राजाची राजधानी.

बातमी **महंमदशहा यास** समजतांच त्यानें बेळगांवावर एकदम हल्ला करून **विक्रमराय** यास परत जाऊन तहाचें बोलणें लावण्याचें भाग पाडिलें. असें असतां **महमदशहा यानें** त्यास आपलें अधिनत्व दाखविण्याकरितां बेळगांवचा किल्ला छापा घालून घेतला. त्यावेळीं **विक्रमराय** सविनय होऊन **महमदशहा याच्या** समोर आला, आणि आपण केलेल्या अपराधाबद्दल क्षमा मागितली.

यासुमारास **होनावर** एथील मुसलमान सरदार **मलीक हासीम्** यास तेथील हिंदुराजानें **अमराजी याच्या** सांगण्यावरून फार त्रास दिले, ह्मणून तो त्याराजाचे जुलमापासून मुक्त होण्यासाठीं ब्राह्मणी राज्याच्या आश्रयांखालीं **गोमांतकांत** येऊन राहिला. इकडे **दाक्षिणेंतील** दरबारांत राजप्रकरणीं कांहीं नवीन फेरफार होऊन, **मलीक ऊल् तिजूर** याचे मसलतीनें **गोव्याचा** अधिकार **फकीर-ऊल् मुल्क्** यास प्राप्त झाला. ह्याचे कारकीर्दींत विजयनगरच्या राजप्रतिनिधीनें गोमांतक परत घेण्याचा उद्धेशानें इसवी सन् १४८१त **गोव्यावर** मोठ्या लष्करानें स्वारी केली. हें वर्तमान **अहंमदशहा** यास कळतांच त्यानें **यूसफ आदिलखान,** (ज्याचें महत्व यावेळीं वाढत चाललें होतें) यास **विजापूर** येथील फौजेनिशीं **कोंकणांत** पाठवून **अमराजी याला** स्वराज्यांत परत घालविलें.

इसवी सन् १४८६त **बहादुर जीलनी** ह्मणून कोणीएका लष्करी कामदारानें मोठ्या हिकमतीनें आणि महत्सायासानें **गोवा** बेट आपल्या स्वाधीन करून घेतलें, आणि नंतर कांहीं वर्षें पर्यंत **महंमदशहा यास** नसजमजतां आपणास

स्वतन्त्र ह्मणवूं लागला; परंतु याचा हा क्रम फार दिवस चालला नाहीं. कारण १४९५ त त्या अधमानें स्वराजा बरोबर प्रसिद्धपणें जी लढाई केली तींत तो मारला गेला.

यानंतर **महंमदशहा** यानें **मुलुक् इयल मुलक्** या सरदारास मोठ्या सन्मानानें **गोव्याचा** अधिकार दिला; परंतु सुमारें दोन वर्षांनंतर या सुभेदारास देवाज्ञा होऊन ह्या प्रदेशांतील सुभेदारीचे कामावर त्याच्या मुलाची योजना झाली. यानवीन सुभेदारानें आपल्या बापाचें नांव धारण करून सन् १४९७त आपण *__यूसफ आदिलशहा__ याचा जाहागिरदार असें कबूल केलें. यावरून सांप्रतचें सर्व **गोमांतक** आदिलशाई राज्याच्या अमलांत आलें. त्यापैकीं पुढें सन् १५१०त पोर्तुगेज लोकांनीं **यूसफ** याकडून **गोवा** बेट जिंकून घेतलें.

---

*ह्या पुरुषानें ब्राह्मणी राज्याच्या मोडत्या काळांत कांहीं मुलूक बळकावून इसवी सन् १४८९त विजापूर येथें स्वतंत्र गादी स्थापिली. हा आपल्यास सुलतान किंवा राजा ह्मणवी; तथापि ब्राह्मणी राजाचें केवळ नांवाचें मात्र प्राधान्य मानीत असे.—दे डॅगेन.

# प्रकरण तिसरें.

———ooo———

## पोर्तुगेज* राज्याचा इतिहास.

### पोर्तुगेज हिंदुस्थानास कसे आले ह्याविषयीं.

पोर्तुगाल† हा देश युरोप खंडाच्या पश्चिमेस आहे. एथील राज्यासंबंधीं प्राचीनकालचा इतिहास दुर्बोध आणि मोघम आहे. रोमन‡ लोकांच्या आधिपत्यकालांत पोर्तुगेज लोक शौर्य आणि क्रौर्य याविषयीं मात्र प्रसिद्ध होते. मध्यावस्थाकालांत§ आरब लोकांनीं ह्या देशांत 'आलगार्वी' नामक राज्याची स्थापना करून, एथिल लोकांस फार उपद्रव केले; तेणेंकरून ते लोक अगदीं दबून गेले होते. पुढें अकराव्या शतकाच्या समाप्तीस यांणीं मोठ्या लढाया मारून, त्या आरब लोकांस आपल्या देशांतून हाकून लाविलें; इतकेंच नाहीं, परंतु आफ्रिकाखंडपर्यंत त्यांचा पाट-

---

* कित्येक लोक 'पोर्तुगीज' असें ह्मणतात; परंतु फिरंगी भाषेंत ह्या शब्दाचा शुद्धउच्चार 'पोर्तुगेज' असा होतो—

† प्राचीनकालीं ह्या देशास 'लुजितानया', आणि एथील लोकांस 'लुजितान', ह्मणत.

‡ रोमन ह्मणून लोक होऊन गेले. त्यांचें राज्य इसवी सनाच्या पूर्वीं फार मोठें व बलाढ्य होतें. त्यांची राजधानी रोम शहर.

§ युरोप संबंधीं इतिहासाचे कालाच्यासंबंधानें विद्वज्जनांनीं तीन भाग केले आहेत: पहिला, अज्ञानकाल; दुसरा, मध्यावस्थाकाल; आणि तिसरा, सज्ञानकाल. पोर्तुगेज लोकांनीं हिंदुस्थानाचा जलमार्ग शोधून काढल्यापासून सज्ञानकालास प्रारंभ होतो.

त्याग करून, त्यांपासून **मोरोको, फेज**, इत्यादि संस्थानें घेतलीं. ह्यावेळीं युरोपस्थांस पूर्वेकडील देशांचें परिज्ञान नव्हतें. **आरब** लोक ह्या देशांतील पदार्थ नेऊन **वेनीस, जिनोवा**, इत्यादि शहरांत विक्रीत, आणि तेथून ते पदार्थ **पोर्तुगाल, फ्रांस, इंग्लंद**, वगैरे बहुत देशांत जात; त्यामुळें हे देश फार समृद्ध व श्रीमान् असावेत असें त्यांस वाटे.

**फिरंगी** लोकांचीं **आरब** लोकांबरोबर पुष्कळ दिवस युद्धें चाललीं होतीं; त्यामुळें ते लोक धीट, उद्योगी, आणि चपळ होऊन गेले होते. त्यांनीं **आरब** लोकांस स्वदेशांतून घालविल्यावर, त्यांच्या सद्योग स्वभावास देश जिंकणें वगैरे काम नसल्याकारणानें त्यांनीं आपलीं अंतःकरणें अज्ञात देश शोधून काढण्याकडे लाविलीं.

त्यांचा मुख्य आशय हिंदुस्थानाचा जलमार्ग शोधून काढण्याचा असल्यामुळें त्यांनीं **आफ्रिका** खंडाच्या पश्चिमबाजूनें शोध चालविला. पुढें त्यांस आफ्रिकेची बरीच माहिती होत गेली. तेथील लोकांच्या सांगण्यावरून त्यांस असें विदित झालें कीं, पूर्वेकडे एक मोठें क्रिस्ती राज्य आहे. हें राज्य **आबिसिनीया*** याचें असावें असें पोर्तुगाल देशच्या **जुवांव बादशहानें** अनुमान करून, तेथील राजाबरोबर मैत्रि करण्यास आरबीभाषाकोविद दोन मनुष्य पायवाटेनें प्रवास करावयास पाठविले. त्या-

---

*ह्या देशांत फ्रुमेन्तीयस् नामक पुरुषानें इसवी सनाचे चौथ्या शतकाचे प्रारंभीं क्रिस्ती धर्मचा प्रसार केला; तो फिनिशीया देशांतला होता.

चप्रमाणें **बार्थलम्य दियाज** यास इसवी सन् १४८६ त कांहीं जहाजें देऊन दक्षिणआफ्रिकाखंडाची माहिती आणण्याकरितां पाठविलें. हा पुरुष मोठा धैर्यवान असून, नौकानयनविद्येंत निपुण होता. त्याच्या तारवांवरचा पुरवठा संपून समुद्रांत फार संकटें आलीं. नाविकांनीं माघारां जाण्याकरितां पुष्कळ बखेडे केले; तथापि त्याचें धैर्य खचलें नाहीं, व त्यानें दक्षिणेकडे जाण्याचा निश्चय हीं सोडला नाहीं. शेवटीं तो मोठ्या दीर्घ प्रयत्नानें आफ्रिकेच्या दक्षिणशेवटास जाऊन पोहंचला, तेथें मोठे तुफान झालें; ह्मणून त्यानें **'काव तोरमेंतोज'** (वादळी भूशिर) असें त्यास नांव दिलें

राजानें पाठविलेले दोन प्रवासी **केरो*** शहरीं गेले. त्या पैकीं एक तेथें मरणपावला, आणि दुसरा जलमार्गानें **हिंदुस्थानाकडे** आला, आणि **मलबार** किनाऱ्यावरील **गोवें**, **कालिकोट**, आणि **कानानूर** हीं प्रसिद्ध शहरें पाहिलीं. तो पुन्हा **केरो** शहरीं गेल्यावर त्यास तेथें त्याच्या शोधार्थ राजानें पाठविलेले दोन **यहुदी†** भेटले. तेव्हां त्यानें आपल्या प्रवासाचा सविस्तर वृतांत त्यांबरोबर राजास लिहून पाठविला. याशिवाय त्यानें राजास एक पत्र लिहिलें होतें. तें असें कीं, 'माझ्या स्वानुभवावरून व लोकांनीं सांगितलेल्या उपलब्धिवरून हिंदुस्थानास जाण्याचा जलमार्ग आफ्रिकेच्या भोंवतालून सांपडतो असें निःसंशयसिद्ध होतें.' हा वृतांत जेव्हां युरोपांत प्रसिद्ध झाला,

---

*मिसर देशाची राजधानी. † हे लोक पालस्तान देशांतील राहणारे. फिरंगी लोक यांस 'जुदेव' ह्मणतात.

आणि दियाज याच्या हकिकतीशीं याचा मेळ पडला; तेव्हां **फिरंगी** लोकांस हिंदुस्थानाचा जलमार्ग निःसंदेह सांपडतो अशी सर्व **युरोपस्थांची** खात्री झाली.

इसवी सन् १४९५त **जुवांव** राजा मरण पावला. त्याचा पुतण्या **दों मनवेल** सिंहासनारूढ झाला. त्यास ही नवीन शोधाची अत्यंत आवड होती. अशा अनिश्चित कृत्यास द्रव्य व्यय करणें अयोग्य आहे, असें त्याच्या प्रिय मित्रांनीं त्यास सांगितलें, तथापि त्याकडे लक्ष न देतां त्यानें नवीन शोधार्थ जलयानें पाठविण्याची सिद्धता केली. अतिमहान समुद्रांतून निभून जाण्या सारखीं दृढसंधि जहाजें बांधण्याचें काम **दियाज** यास सांगितलें. सर्व तयारी झाल्यावर राजानें आपल्या राज्यांतील अमीर, उमराव, सरदार, इत्यादि वडे लोकांची सभा भरवून, सर्वांसमक्ष आपला घरगुती कारभारी **वास्को दे गामा** यास नवीन शोध लावण्यास जाणाऱ्यां जहाजांचा अधिकार दिला. तो गृरस्थ कुलीन, शहाणा, शूर, आणि सद्गुणी असून नौकानयनविद्येंत प्रविण होता. 'मी माझी सफर माझ्या सामर्थ्याची पराकाष्टा करून सिद्धीस नेईन, अशी गामा यानें शपथ वाहिली. तेव्हां राजानें आपलें रेशमी कापडाचें निशाण त्याच्या स्वाधीन केलें. नंतर गामा खलाशांसहवर्तमान एका मठांत गेला, आणि तेथें **क्याथोलिक** धर्मपर्य्यायानुरूप कांहीं विधि करून, बंदरावर आला. ***लिजबोव** नगरवासी लोक हा आनंदकारक समारंभ अवलोकन करण्या करि-

---

*हा पोर्तुगालदेशाची राजधानी. इंग्रजलोक यास 'लिजबन' ह्मणतात—

तां किनाऱ्यावर जमले होते. जलपर्यटन करणाऱ्यांस सुरक्षित ठेवून यश द्यावें ह्मणून उच्चस्वरानें जगनियंत्याची प्रार्थना केली.

नाविक जनांस हा प्रसंग केवळ दुःखावह होता. गलबतांवर चढून शिडें सोडल्या नंतर त्यांनीं किनाऱ्याकडे अवलोकन केलें. त्या वेळीं सकल इष्टमित्र त्यांच्या दृष्टीस पडले. हे पुनः कोठून आपल्या दृष्टीस पडणार! जमिन तरी पुनः दिसेल काय? ह्या अमर्याद समुद्रांतून कशाचें परत येणें! ईश्वर आपल्यास सुरक्षित ठेवील काय? अशा अनेक दुःखान्वित कल्पना मनांत आणून ते सर्व म्लान वदन झाले; व कित्येकांच्या नेत्रांतून अश्रुधारा ही वाहूं लागल्या.

इसवी सन् १४९७ त सातव्या महिन्याचे आठवे तारखेस **गामा** यानें तीन तारवें हाकारलीं. त्याकाळीं किनाऱ्या वरील सर्व लोकांनीं आनंदप्रदर्शक एकच गजर केला. **गामायानें** त्यांतून एका गलबतावर आपल्या बंधूस मुख्याधिकारी नेमिलें होतें. **गामा लिजबोव** शहरांतून ज्या वेळेस निघाला ती वेळ सर्व वर्षामध्यें फारच प्रतिकूळ होती. पोर्तुगेज इतिहासकार ह्मणतात कीं, त्यांस तोंडचावारा सतत पांच महिने पर्यंत लागल्यामुळें त्यांचे बहुत हाल झाले. कांहीं दिवसां नंतर **गामा** एका समुद्रतीरीं उतरला, आणि त्यास **'संतहेलेन'** असें नांव दिलें.

पुढें त्याचीं गलबतें सरळ चालल्या वरून तो **उत्तमा-**

शादर्शक* भूशिराजवळ येऊन पोहंचला. त्यावेळीं सर्व नाविकांचीं अंत:करणें गाढ आणि गंभीर मनोविकारानें व्याप्त होऊन, ते मोठे चिंताक्रांत झाले. कारण या ठिकाणीं मोठें तुफान होतें, असें त्यास प्रथम आलेल्या खलाशां कडून समजलें होतें. येथेंच कायती प्रारब्धाची परीक्षा आहे, असें गामा देखील मानीत होता; परंतु पश्चिम वारा चांगला लागल्यामुळें त्या भयंकर भूशलाकेस वळसा घालून, गलबतें सुरक्षित आलीकडे हिंदीमहासागरांत आलीं. जलप्रवास्यांनीं आफ्रिकेचा पूर्व किनारा अवलोकन करून जयानंदसूचक वाद्यें वाजविलीं.

कांहीं वेळ तसाच चालून सांब्रासच्या† उपसागरांत गामा गोडें पाणी वगैरे घेण्याकरितां वर्त्यास उतरला. किनाऱ्याजवळ होड्या गेल्या तों शेजारच्या टेकडीवर सुमारें नव्वद मनुष्यें फिरंगी लोकांनीं पाहिलीं. तीं संत हेलेन एथील लोकांसारिखीं होतीं. हत्यारबंद होऊन सावधगिरीनें फिरंगी लोक किनाऱ्यावर उतरले, आणि त्यांस घंटा वगैरे क्षुल्लक वस्तु दिल्या; त्यामुळें ते आनंदी होऊन युरोपस्थांस पाहिजे तो जिन्नस देऊं लागले. या

*दियाज स्वदेशीं परत गेल्यावर, त्यानें राजास आपल्या जलपर्यटनाची मर्यादा सांगताच त्यास आनंदयुक्त महत्वाकांक्षा उत्पन्न होऊन त्यानें ज्या भूशिरास 'काबनोरमेंतोज' ( वादळी भूशिर ) असें नांव दिलें होतें, तें राजानें बदलून 'काव दे बोव यसपरांस' (उत्तमाशादर्शकभूशिर) असें नांव दिलें. इंग्रज लोक यास 'केप ऑफ गुड् होप' ह्मणतात. हें सदई शब्दाचें भाषांतर आहे.

†यास 'मोसेलचा उपसागर' असें ह्मणतात. वलंदेजी लोकांनीं फिरंगी लोकांनंतर हें नांव दिलें आहे.

रीतीनें तीन दिवस गुदरल्यावर, चौथ्या दिवशीं त्या लोकांची संख्या वाढूं लागली. तेणेंकरून कांहीं तरी दगा आहे, असें **गामा** यास भासलें; ह्मणून त्यांस भय दाखविण्याकरितां तोफांचे आवाज काढून, त्या आतिथ्यविमुख किनाऱ्यापासून तो पुढें चालता झाला.

तेथून निघाल्यावर त्यांस या अज्ञान सागरांत पहिल्यानेंच एक मोठें वादळ झालें. त्या प्रसंगीं सर्व नाविक जनांनीं जीवाची आस्था सोडिली; परंतु ईश्वरकृपेनें लवकरच तुफान बंद होऊन, गलबतें सरळ चालूं लागलीं. कांहीं दिवसांनंतर ते **नाताळच्या** किनाऱ्याकडे जाऊन पोहंचले. तेव्हां तेथें एका नदीच्या मुखाजवळ ते उतरले. तेथील लोकांच्या अंगावर सोईवार चर्मी वस्त्रें होतीं, त्यावरून हे लोक पूर्वी पाहिलेल्या लोकां पेक्षां अधिक सुधारलेले दिसत होते. त्यांनीं **फिरंगी** खलाशांस खुणांनीं आपल्या खेड्याकडे बोलाविलें. त्यांच्या झोपड्या तृणानें शाकारलेल्या होत्या. पांच दिवस **गामा** तेथें राहिला, आणि त्या नदीस **रियु दे पाज** (शांततेची नदी) असें नांव देऊन, पुढें चालता झाला.

किनाऱ्यानें जात असतां पुष्कळ उदकभ्रमर लागले, तेणेंकरून नौकानयनास अतिशय प्रतिबंध झाला, ह्मणून **गामा** किनारा सोडून दूर समुद्रांत गेला. कांहीं दिवसांनंतर तो पुनः एका बंदरांत उतरला. तेथील लोकांच्या अंगावर रेशमीं आणि कापसाचीं वस्त्र प्रावर्णें होतीं. **फिरंगी** लोकांबरोबर एक आरबी भाषा जाणणारा होता, त्या बरोबर कित्येक लोक संभाषण करूं

लागले. त्यांनीं सांगितलें कीं, पूर्वेकडे एक मोठा विस्तीर्ण देश आहे, तेथें गौरवर्णाचे लोक रहातात. यावरून पूर्वेकडील सुधारलेले देश समीप आले असा **गामा** याचा दृढनिश्चय झाला. तारवांची डागडुजी करण्याकरितां कांहीं कालपर्यंत तेथेंच रहावें असा **गामा** याचा संकेत होता; परंतु दुर्दैवानें त्यावर एक संकट आलें, तें असें कीं, खलाशांत एक विलक्षण रोग उत्पन्न झाला; तेणेंकरून त्यांतील कांहीं लोक मरण पावले. ह्मणून **गामा** यानें ह्या रोगकारक किनाऱ्यापासून आपलीं जहाजें पुढें चालविलीं.

इसवी सन् १४९८त दुसऱ्या महिन्याचे चोविसावें तारखेस गामा **मोसांबीक** बंदरीं पोहंचला. हें बंदर अविच्छिन्नभूमी पासून सुमारें ३ मैल अंतरावर असून, दोन बेटांच्या शेवटांनीं झालें आहे. तेथें त्याच्या जहाजां जवळ कांहीं नावा आल्या. त्यांतील लोकांचीं वस्त्रें कापडाचीं होतीं, व डोक्यास रेशमीं पागोटीं होतीं. आपण आतां सुधारलेल्या देशांत आलों, असें फिरंगी लोकांस वाटलें. तुह्मी कोण ! कशास आलां !, असें त्या लोकांनीं **गामा** यास विचारलें; तेव्हां 'मला **पोर्तुगाल** देशच्या बादशहानें **हिंदुस्थानास** पाठविलें आहे' असें त्यानें सांगितलें. हे लोक परधर्मी आहेत असें समजतांच त्या लोकांस शत्रुता उत्पन्न झाली-

कांहीं खाद्यसामग्री, गोडें उदक, व दोन मार्गदर्शक येवढें आह्मास द्या, **असें** गामा यानें त्यांस सांगितलें. जरी मनांत वैरभाव होता, तथापि तुह्मास लागेल तें आह्मी देऊं, असें त्यांनीं कबूल केल्यावरून गामा तेथें कांहीं वेळ

पर्यंत राहिला. तेथचा राजा **गामा** याच्या भेटीस आला. **गामा** यानें त्याची सानंद भेट घेतली. या प्रमाणें बराच काळ चाललें असतां एके दिवशीं **फिरंगी** लोकांच्या दोन होड्या बंदरीं गेल्या होत्या, त्यांवर तद्देशीय लोकांनीं एकदम हल्ला केला. त्यामुळें उभय पक्षांत दारूण युद्ध झालें. **फिरंगी** लोकांनीं पुष्कळ तोफा सोडिल्या. त्या वेळीं **गामा** सर्व **मोसांबिकाची** राख रांगोळी करील असें भय प्राप्त होऊन शत्रु त्यास शरण आले, आणि त्याच्या ह्मणण्या प्रमाणें सर्व तयारी करून दिली. चौथ्या महिन्याचे पहिले तारखेस **गामा** तेथून निघाला, तो **किलोवा** शहर मागें घालून **मोंबाज** येथें पोहंचला. हे शहर उंचवटावर असून समुद्रांतून बेटाकार दिसत होतें. किनाऱ्या जवळ जातांनां कोणी चार गृहस्थ होडींत बसून त्यांकडे आले. कोठें जातां? येथें येण्याचें प्रयोजन काय? वगैरे विचारूं लागले. तुह्मास लागेल ती अन्न सामग्री आह्मी देऊं, असें त्यांनीं **गामा** यास सांगितलें. परंतु त्यास त्यांचा विश्वास येईना. त्यास वारंवार तेथील राजा कडील बोलावणी येत. स्वत: जाण्यास धीर होईना, ह्मणून त्यानें दोन खलाशांस शहरांत पाठविलें. त्यांचा राजानें चांगला आदरसत्कार केला. हें वार्तमान गामा यास सांगतांच, तो निर्धास्त होऊन शहरांत जाण्यास निघाला. कर्मधर्म संयोगानें अशी गोष्ट घडून आली कीं, **गामा** याची होडी एका खडकावर आदळली, त्याकाळीं **युरोपस्थ** खलाशांनीं ओरडून एकच आकांत केला. त्या बरोबर **मोसांबीक** येथील मार्गदर्शन व गलबतावर कांहीं तद्देशीय **आरब** होते, ते समुद्रां

उड्या टाकून भराभर पोहून तडीस गेले. हें पाहून कांहीं तरी दगा आहे अशी **गामा** याची खात्री होऊन, तो पूर्वस्थळीं माघारा गेला. युरोपस्थांवर हल्ला करण्यास पुष्कळ लोक टपले होते. ह्मणून त्यास सावधागिरीनें राहावें लागलें. शेवटीं शत्रूंची एक होडी फिरंगी लोकांनीं पकडून ती वरचे तेरा मनुष्यांपासून मिलींदा शहराचा मार्ग माहित करून घेतला, आणि त्यांस सोडून दिलें- नंतर **गामा मिलींदा** शहरास गेला. **मिलींदा** हें शहर शोभिवंत असून, चित्रविचित्र, बहुरंगी, आणि प्रचुरकुसुम वृक्ष बागा आणि ताडवृक्ष त्याच्या सभोतालीं असल्यामुळे त्यास उत्तम सौंदर्य आलें होतें. एथील राजास महंमदी धर्माभिमान असून, तो व्यवहारी कामांत फार कुशल होता. त्यानें **गामा** यास शहरांत बोलाविलें; परंतु **गामा** यानें शहाणपणानें त्यास असें सांगून पाठविलें कीं, मला न उतरण्या विषयीं **पोर्तुगाल** देशच्या बादशहाची सक्त ताकीद आहे. तेव्हां राजास मोठें आश्चर्य वाटून तो **गामा** यास भेटण्या करितां होडींतून आला. **गामा** ही आपल्या खलाशांस उत्तम वस्त्रें देऊन त्यांसहवर्तमान त्यास भेटण्या करितां एका होडींत बसून त्याच्या नावेजवळ गेला. **आफ्रिका** खंडस्थ लोकांच्या मनांत आपल्या सामर्थ्याचें महत्व भरावें, ह्मणून कांहीं तोफांचे आवाज काढिले. त्यामुळें ते लोक इतके भिऊन गेले कीं, पुढें येण्यास त्यांस धीर होईना. शेवटीं ते परत जाण्याच्या बेतांत आले, तेव्हां **गामा** यानें तोफा बंद करण्यास हुकूम केला. नंतर परस्परांच्या आनंदानें भेटी झाल्या.

गलबतां सभोंतालीं फिरून प्रत्येक भाग राजानें उत्तम रीतीनें तपासला, आणि गलबतें कशीं बांधतात वगैरे सर्व चौकशी केली. त्या उभयतांच्या स्नेहभावानें गोष्टी झाल्यामुळें बहुत लोक गलबतें पहावयास गेले. त्यांत कितीएक गुजराथी वाणी होते. नंतर राजानें एक गुजराथी मार्गदर्शक त्याच्या स्वाधीन केला.

त्या मार्गदर्शकास समागमें घेऊन चौथ्या महिन्याचे सव्विसावे तारखेस आफ्रिकेचा किनारा सोडून, **गामा** यानें हिंदीमहासागरांत गलबतें हाकारलीं. वारा अनुकूळ असल्यामुळे तारवें फार त्वरेनें चाललीं. त्या शहरापासून निघाल्यावर विसावे दिवशीं दर्यावर्दी यांस एक उंच आणि भव्य असा किनारा दृष्टीस पडला. तो किनारा **हिंदुस्थानाचा** आहे असें त्यांस मार्गदर्शकानें सांगताच ते फार आनंदित होऊन त्यांनीं जयसूचक वाद्यें वाजविलीं. गलबतें जवळ आलीं त्यावेळीं किनाऱ्यावर एक सुशोभित, जनपदायुत, आणि विस्तीर्ण असें शहर त्यांच्या दृष्टीस पडलें.

जें **भरतखंड** युरोपस्थांस केवळ स्वप्नसृष्टीप्रमाणें होतें, ज्याच्या अनुपम संपत्तीविषयीं बहुतकालापासून सर्व युरोपांत प्रख्याती होती, ज्यांतील सर्वोत्तम पदार्थ पाहून, तें स्वर्गतुल्य आहे असें त्यांस वाटत असे, ज्याचा शोध लावण्याकडे बहुत वर्षांपासून हजारों लोकांचीं ध्यानें लागलीं होतीं, ज्याच्या अपूर्व दर्शनाची इच्छा आणि ईर्ष्या सर्व युरोपस्थांच्या ठायीं वारंवार जागृत होऊन, त्याच्या अस्तित्वाविषयीं कधींकधीं त्यांस अश्रद्धेयता वाटत असे, ज्यास जलमार्ग सांपडण्याविषयीं कित्येक भूगोलशास्त्रज्ञांनीं

नेक प्रकारचे तर्कनिश्चय केले होते, व ज्याकरितां यावत्कालपर्यंत बहुत पराक्रमी नाविकांचे श्रम व्यर्थ गेले, अशा **भरतखंडाचा** किनारा जेव्हां **पोर्तुगेज** लोकांनीं पाहिला, तेव्हां त्यांस किती आनंद झाला असेल ! आपले प्रयत्न सफळ झाले ह्मणून सर्व शक्तिमान परमेश्वराचे आभार मानून, सर्वांनीं एकचित्तें व आनंदानें मन:पूर्वक त्याची स्तुति केली.

कांहीं वेळानें गलबतें **कलिकोट** बंदरीं येऊन ठेपलीं. आतां कोणत्या रीतीनें राजाचें दर्शन घ्यावें आणि व्यापाराचें हक्क स्वदेशास कसे संपादावे हा **गामा** यास विचार पडला. या वेळीं उत्तर **हिंदुस्थानांत** मुसलमान लोकांनीं आपलें राज्य पूर्वीच स्थापन केलें होतें, परंतु दक्षिण हिंदुस्थानांत त्यांचा फारसा प्रवेश नसून तेथें पुष्कळ हिंदुसंस्थानें होतीं, त्यांत **मलबार** किनाऱ्यावर एक मोठें बलाढ्य राज्य होतें त्याची राजधानी **कलिकोट** नगर. एथील राजास **सामरीन** ( राजाधिराज ) असे ह्मणत असत. तो **नायर** जातीचा असून हिंदुधर्माभिमानी होता, तथापि तो सर्व धर्मांच्या लोकांस आपल्या राज्यांत व्यापारकरण्यास परवानगी देई. ह्या वेळीं **मिसर** देशांतिल आणि **आरबस्थानांतील** मुसलमान लोक इकडे व्यापारास येत असत. ते अन्य देशांतील व्यापाऱ्यांचा मत्सर करीत. प्रथम कोणास किनाऱ्यावर पाठवावें असा **गामा** यास विचार पडला. एकाद्या विदेशांत युरोपस्थ लोक जाऊं लागले ह्मणजे भयंकर प्रसंगीं पुढें करण्यास्तव राजाचे अनुमोदनानें फांसीची वगैरे शिक्षा झालेले मनुष्य

बरोबर घेत, तसा एक मनुष्य बरोबर देऊन, **मिलींदा** एथील मार्गदर्शकास **गामा** यानें किनाऱ्यावर पाठविलें. शहरांत जाऊन एक दिवस झाला तरी ते परत आले नाहींत. यामुळें **गामा** यास मोठी चिंता प्राप्त झाली. परंतु दुसरे दिवशीं होडींत बसून तीन मनुष्य आले, त्यांत **गामा** यानें पाठविलेले दोन असामी होते. त्यांनीं त्यास सर्व झालेलें वर्तमान निवेदित केलें. नंतर **गामा यानें** त्या तिसऱ्या मुसलमान गृहस्थांबरोबर दोन मनुष्य पाठऊन, त्यांकडून राजास आपला उद्देश कळविला. तेव्हां राजानें त्यास आपल्या देशांत येण्याची परवानगी देऊन बंदरावर येऊन भेटून जाण्यास सांगितलें. परकीय लोकांच्या हातीं आपल्या प्रमुखानें जावें हें खलाशांस ठीक वाटलें नाहीं; परंतु इतक्या लांब येऊन देश पाहिल्याविना परत जाणें हें अगदीं अयोग्य आहे, असा विचार करून जीवाची आशा न धरितां राजाकडे जाण्यास **गामा** निघाला. तेथें कदाचित् आपण कैद झालों, किंवा दुसरा एकादा प्रसंग प्राप्त झाला, तर कोणत्या प्रकारें परत जावें वगैरे सर्व तजवीज आश्रित जनांस सांगून ठेविली.

**गामा** आपल्या खलाशांसहवर्तमान किनाऱ्यावर उतरला, त्याकालीं खलशांनीं यंत्रवाद्यें वाजविलीं. इतक्यांत **गामा** राजानें पाठविलेल्या पालखींत बसून सर्व मंडळीसहित एक नदी उतरून पलीकडे गेला. राजमंदिरा जवळ पोहंचतांच, एक वृद्ध व परममान्य ब्राह्मण **गामा** समोर आला, आणि त्याचा हात धरून त्यास राजा समोर नेलें. राजाचें आसन बरेंच उंच होतें. त्याचा पोशाक जरजरी होता.

पागोटें रेशमी असून, त्यावर सोन्याचे अलंकार होते. कानांत चकचकीत हिऱ्यांचीं कुंडलें होतीं. एका बाजूस एक वृद्ध मनुष्य तबक घेऊन उभा होता. त्यांत पानसुपारीचे पुडे होते. विचारपूस व आदरसत्कार झाल्यावर, राजानें गामा यास असें कळविलें कीं, अवकाशानुसार त्याचा माल तपसला जाईल. असें सांगून नंतर त्यास एक सुरक्षित स्थल रहाण्यास दिलें. दुसरे दिवशीं प्रात:कालीं फिरंगी सरदारानें राजाच्या दर्शनास जाण्याचा बेत केला. तेव्हां इतर लोकांनीं त्यास असें सुचविलें कीं, जर तुमची राजास भेटण्याची इच्छा आहे, तर राजास कांहीं नजराणा बरोबर नेला पाहिजे. गामा जवळ राजयोग्य वस्त्रें, किंवा जवाहीर वगैरे कांहींच नव्हतें. तांबडें कापड, सहा टोप्या, पितळेच्या कांहीं वस्तु, पोवळीं, मध, साखर हे जिन्नस आपल्या संग्रहांतून नजर करण्यास त्यानें काढिले. हें पाहून राजानें पाठविलेला कोतवाल व इतर सर्व लोक पोट धरून हसूं लागले. ते ह्मणाले कीं, एखादा निर्धन व्यापारी देखिल राजास असला नजराणा करीत नाहीं. तर अशा प्रकारचा नजराणा सामरीन महाराजांस करणें अनुचित आहे. मुळींच करूं नये हे बरें! पूर्ण विचार करून गामा तेच पदार्थ घेऊन राजाकडे गेला, आणि अशी विनंती केली कीं, 'आह्मी पोर्तुगाल देशाहून निघालों तेव्हां हिंदुस्थानास पोंचूं असा दृढ निश्चय नव्हता; यास्तव तेथून कोणत्याच अमोल्य वस्तु बरोबर आणिल्या नाहींत. दुसऱ्याखेपेस योग्य नजराणा आणल्याशिवाय येणार नाहीं.'

गामा याचें राजाकडे बरेंच वजन पडत चाललें, हें पाहून मुसलमान लोकांस अत्यंत वाईट वाटूं लागलें. त्यांस अशी भीति प्राप्त झाली कीं, या लोकांचा व्यापार सुरू झाल्यानें आपल्यास सर्व प्रकारें अपाय होईल; ह्मणून ते युरोपस्थांचा नाश करण्यास सिद्ध झाले. त्यांनीं राजास असें कळविलें कीं, हे नवीन लोक चांचे आहेत. युरोपखंडस्थ समुद्रांत फार कहर करून हे येथें पळून आले आहेत. तर अशा दुष्ट लोकांस आपल्या देशांत येऊं देणें हे मोठें, भयावह आहे.

अशा सांगण्यावरून राजाचें मन फिरलें. आपणावर आलेला आरोप खोटा करून दाखविण्या करितां त्या प्रसंगीं गामा याकडे कांहींच साधन नव्हतें. तथापि राजानें ती गोष्ट विचारतांच, त्यानें खरा मजकूर होता तो त्यास सांगितला. राजानें त्यास परत जाण्यास सांगितल्यावर, तो पालखींत बसून समुद्र किनाऱ्या कडे जात असतां राजाच्या कोतवालानें मुसलमान लोकांच्या सांगण्यावरून कांहीं नायर लोक घेऊन त्यास रस्त्यांत गांठलें; आणि आदरपुरःसर संभाषण करून, त्यास रात्रीं किनाऱ्यावर ठेवून घेतलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो जाण्यास निघाला. तेव्हां कोतवाल ह्मणूं लागला कीं, तुह्मी आपलीं गलबतें किनाऱ्या जवळ आणा, ह्मणजे राजास जो तुमचा संशय आला आहे, तो नाहींसा होईल. गलबतें जाळून टाकण्याचा त्याचा उद्देश आहे, असें गामा यानें जाणून त्यास असें सांगितलें कीं, जहाजें फार मोठीं आहेत. तीं किनाऱ्या जवळ आणण्याची सोय नाहीं. या नंतर गामा मोठ्या प्र-

यासनें आपल्या गलबतांवर गेला. कालिकोट नगरवासी लोक फिरंगी लोकांच्या गलबतांवर जाऊं नये ह्मणून मुसलमान लोकांनीं पुष्कळ प्रयत्न केले; परंतु ते त्यांचे सफळ झाले नाहींत; ह्मणून फिरंगी दोन खलाशांस त्यांनीं कैद केलें.

एके दिवशीं एका नावेंत बसून कांहीं श्रीमान् लोक जहाजें पहाण्यास गेले होते, त्यांस गामा यानें बंदीवान करून ठेविलें, व राजास असें पत्र लिहून पाठविलें कीं, आमचे दोन मनुष्य पाठवून द्या, ह्मणजे हे तुमचे लोक तुह्मास परत मिळतील. राजानें ते दोन मनुष्य परत केल्यावर गामा यानें त्यांतून कांहीं पोर्तुगाल देशच्या राजास दाखविण्या करितां अटकावून इतरांस सोडून दिलें. हें त्याचें कृत्य पाहून, राजास फार क्रोध आला. त्यानें त्याच्या तारवांचा नाश करण्या करितां कालिकोट तयारी चालविली. इतक्यांत गोवें एथील एक हेर गामाच्या हातीं लागला. त्यास शिक्षा करितांच सामरीन राजाच्या सांगण्यावरून गोव्यांचा राजा यूसफ आदिलशहा ह्यानें फिरंगी लोकांवर हल्ला करण्याची तजवीज केली आहे, असें त्यानें सांगितलें. नंतर गामा यानें असा विचार केला कीं, आतां येथें रहाणें ठीक नाहीं; ह्मणून तो स्वदेशास परत जाण्या करितां निघाला,

परत जातानां फिरंगी लोकांचे बरेच हाल झाले. रोगानें पुष्कळ खलाशी मृत्यु पावून ते इतके कमी झाले कीं,त्यांच्यानें तीन तारवांची व्यवस्था राखवेना;यास्तव गामा यानें एक गलबत जाळून टाकिलें. त्यानें परत जात अस-

तां पुष्कळ बेटें पाहिलीं. झांजीबार किनारा संपल्यावर गामा यास ताजे जिन्नस मिळाले, त्यामुळें राहिलेले सर्व खलाशी पुनरपि ताजे तवाने झाले. नंतर तो **उत्तमाशादर्शक भूशलाका** वलांडून, निर्विघ्नपणें **आत्लांतिक महासागरांत** गेला. पुढें वाटेंत त्यास कांहीं प्रतिरोध आला नाहीं; परंतु **मादिरा** बेटांकडे पोहंचल्यावर त्याचा बंधु **पावल्** हा मरणपावला, त्यामुळें गामा यास अतिशय दुःख झालें. दोन वर्षें दोन महिन्यानंतर ह्मणजें इसवी सन् १४९९० त आठव्या महिन्याचे एकुणतिसावे तारखेस **गामा तेगस*** नदींत शिरला. त्याबरोबर जलपर्यटन करण्यास जे १०८ खलाशी होते, त्यांतून ५५ खलाशी सुखरूप स्वदेशीं पोंहचले. नंतर गामा जमिनीवर उत्तरून **बेथलेम** नामक मठांत गेला, आणि परमेश्वराची प्रार्थना केली. पोर्तुगाल देशच्या बादशहास हें वर्तमान समजतांच त्यानें तोफांचा गडगडाट व वाद्यांचा गजर करण्यास हुकूम केला. मग गामा यानें एकाद्याविजयी पुरुषाप्रमाणें **लिजबोव** शहरांत प्रवेश केला, त्याच्या आगमन प्रीत्यर्थ महोत्साह करवून राजानें त्यास व त्याचे संततीस 'दों' हा किताब व दुसऱ्या मोठाल्या पदव्या देऊन जाहागिरी करून दिली.

---

* पोर्तु० भा० "तेज" ह्मणतात.

# प्रकरण चौथें.

———000———

गामा याच्या सफळ जलपर्यटनानंतर एक क्षण नदवडितां पोर्तुगालच्या बादशहानें हिंदुस्थानांत व्यापार चालविण्याकरितां आणि राज्यसंपादन करण्याकरितां तेरा तारवें आणि बाराशें लोक पाठवून त्यांचा अधिकार काब्राल यास देण्याचा निश्चय केला. काब्राल हा नाविक विद्येंत फार युक्तिमान होता. इसवी सन् १५०० त तिसऱ्या महिन्याचे आठवे तारखेस 'बेथलेम' नामक मठांत धर्म कथन संपल्यावर, सर्वांसमक्ष आपलें पवित्र निशाण बादशहानें काब्राल याच्या स्वाधीन केलें. तो बादशहाच्या हस्ताचें चुंबन घेऊन तारवावर चढला. ही मौज पाहण्याकरितां किनाऱ्यावर पुष्कळ लोक जमले होते. दुसरे दिवशीं त्या सर्वांसन्मुख काब्राल यानें आपलीं गलबतें हाकारिलीं. जलपर्यटन उत्तम प्रकारें सिद्धीस जावें ह्मणून सर्वांनीं महशद्धें ईश्वराची प्रार्थना केली. आत्लांतिक महासागरांतून जातानां आफ्रिकाखंड चुकविण्यासाठीं काब्राल यानें आपल्या जहाजांचा झोंक पश्चिमेकडे धरिला. त्यावेळीं अकस्मात विशाल, सुपीक, आणि प्रचुरवृक्ष असा एक अज्ञात किनारा त्याच्या दृष्टीस पडला. तो किनारा फलोत्पादक ब्राझील देशाचा होता. तेथून गलबतें हाकारून काब्राल उत्त-

**माशादर्शक** भूशिराकडे जाण्यास निघाला. त्यास मार्गांत मोठें वादळ लागलें, त्यामुळें त्याचीं ४ तारवें नाश पावलीं. त्यांतील एका तारवावर मोठा नामांकित **बार्थलम्य दियाज** होता. जो पुरुष नौकागमनविद्येंत फार प्रवीण व कुशल होता, ज्यास आपल्या जलपर्यटनाची प्रसिद्धि व्हावी ह्मणून फार इच्छा होती, ज्यास नाविकविद्येच्या सिद्धांतांत व ते सिद्ध करण्यांत पूर्णज्ञान होतें, ज्यानें नवीन जलमार्ग व देश शोधून काढण्याविषयीं प्राचीनकाळच्या शिष्ट ग्रंथकारांचीं प्रमाणें व मतें अवलोकन केलीं होतीं, जो सर्वां पूर्वीं या स्थलापर्यंत येऊन स्वदेशास परत गेला होता, तो त्याच स्थलीं अनापेक्ष मरणपावला; तेव्हां त्याच्या देशबांधवांस किती दु:ख झालें असेल!

पुढें त्या कीर्तिमान भूशलाकेस वळसा घालून हिंदुस्थानास येत असतां **काब्राल** यानें **किलोवा, मिलिंदा**, इत्यादि शहरें पाहिलीं. आफ्रिका खंडस्थ तीर सोडल्यावर कांहीं दिवसां नंतर हिंदीमहासागर वलांडून त्यानें **आद्यद्वीप** बेटावर वर्वा केला. नंतर **काब्राल** नव्या महिन्याचे तेराव्या तारखेस **कलिकोट** बंदरीं येऊन ठेपला.

पूर्वाधिकाऱ्यानें नेलेले सर्व कैदी **काब्राल** यानें **सामरीन** राजाकडे परत केले. त्या कैदींस पोर्तुगाल देशांत उत्तम प्रकारें वागविल्यामुळे त्यांनीं तेथील लोकांचें फार प्रशंसन केलें; तेणें करून राजा मोठा संतोषयुक्त झाला, आणि **काब्राल** यास आपल्या शहरांत वखार बांधून व्यापार चालविण्यास मोकळीक दिली.

एके दिवशीं एका तारवावरून सात हत्ती **कोची** येथे

जात होते, त्यांतील एक हत्ती **सामरीन** यास पाहिजे असें जाणून त्या राजाची प्रसन्नता संपादन करण्यास्तव **काब्राल** यानें तोफांच्या गोळ्यांनीं तें तारूं कालिकोट बंदरांत आणून राजाच्या स्वाधिन केलें. परंतु या सामर्थ्याच्या अनाभिज्ञ प्रयोगानें राजाचें अणुमात्र समाधान न-होतां उलटा, तो आत्मरक्षणाविषयीं भयाभीत झाला. मुसलमान लोक पहिल्यापासून **युरोपस्थांचे** बद्ध वैरी होते. त्यामुळे नवनवे कूट रचून ते राजास भर देऊं लागले. शेवटीं फिरंगी लोकांस एतद्देशीय व्यापाऱ्यां कडून माल मिळेनासा झाला. त्या वेळीं ही गोष्ट **काब्राल** यानें राजाच्या कानावर आणिली. राजानें त्यास असें सांगितलें कीं, जर तुह्मास व्यापारी लोक संतोषानें माल देत नाहींत, तर तुह्मी तो बलात्कारानें घेऊन त्याची योग्य किंमत असेल ती मालकास द्यावी.

अशी राजाची परवानगी मिळतांच मसाल्यानें भरलेलें एक मुसलमानांचें गलबत युरोपस्थांनीं पकडलें, आणि राजाचे आज्ञे प्रमाणें त्यावरील मालाची योग्य किंमत ते मालकास देण्याला कबूल झाले. या कृत्यानें नगरवासी लोक अतिशय क्रुद्ध होऊन, त्यांनीं फिरंगी वखारीवर तीनही बाजूंनीं हल्ला केला, आणि वखार आपल्या ताब्यांत घेऊन त्यांतील सत्तर मनुष्यांस ठार मारिलें. त्या वेळीं बाकीचे मनुष्य समुद्रांत उड्या टाकून तारां कडे बचावले.

अशा तऱ्हेचा कृतोपद्रव युरोपस्थ सरदारास सहन होईना, ह्मणून त्यानें मुसलमानांचा सूड उगविण्यासाठीं त्यांचीं बंदरांतील दहा गलबतें लुटून त्या वरील खलाशां-

स बंदीवान केलें. नंतर आपलें आरमार* किनाऱ्यां जवळ नेऊन **काब्राल** यानें शहरावर तोफखान्याचा प्रचण्ड मारा सुरू केला. शहराच्या कित्येक भागांस आग लावून तो **कोची** बंदराकडे निघून गेला.

**कोची** एथील राजा **सामरीन** राजाचा करद असतां, त्यानें ही यावेळीं आपल्या अधिपति विरुद्ध बंड केलें होतें; ह्मणून फिरंगी लोक त्याच्या बंदरी गेल्यावर त्यानें त्याचें उत्तम आतिथ्य केलें. उभयतांचा व्यापाराचा सला झाल्यावर **काब्राल** यानें आपलीं कांहीं जहाजें मिऱ्यांनीं भरून तो स्वदेशास परत गेला.

इसवी सन १५०२त गामा दुसऱ्यानें हिंदुस्थानास आला. ह्या खेपेस त्या बरोबर वीस लढाऊ गलबतें होतीं. येत असतां मार्गांत त्यास **मिसर** देशच्या सुलतानाचें एक मोठें जहाज भेटलें. त्यावर शंभर **मक्केस** जाणारे यात्रेकरू होते. आपलें तारूं फिरंगी लोकांनीं पकडूं नये ह्मणून ते लोक जीवावर उदार होऊन लढले. परंतु वीस मुलें खेरीज करून गलबतावरील सर्व मुसलमान लोक मारले गेले. **कलिकोटास** पोहचतांच गामा यानें राजास असा निरोप पाठविला कीं, 'आमच्या देश बांधवांस मारण्याचें कारण काय? याचा अमुक वेळांत आह्मास जबाब द्यावा.' नेमलेल्या अवकाशांत प्रत्युतर न मिळाल्या मुळें गामा फार क्रोधयुक्त झाला; आणि पूर्वाधिकाऱ्या प्रमाणें शहरावर तोफांचा मारा चालवून तें बहुत ठिकाणीं जाळून टांकिलें.

---

*हा पोर्तुगीज भाषेंतील शब्द आहे. याचा अर्थ नौकासमूह.

इतक्यांत **सामरीन** राजा **कोचीच्या** राजावर आणि तेथील फिरंगी लोकांवर असंख्य सैन्यानिशीं हल्ला करण्यास आला. सर्व सैन्य एक सारखें राजधानीवर चालून आलें. त्यावेळीं **कोचीचे** दरबारांतील मंत्र्यांनीं राजास असा उपदेश केला कीं, फिरंगी लोकांस आक्रमण करणाऱ्या राजाचे स्वाधीन करून आपला बचाव करावा. परंतु राजा **युरोपस्थांचा** दृढसौहृद सहकारी होता, त्यामुळें त्या विश्वासघातक्यांच्या सांगण्याकडे दुर्लक्ष करून, राजानें आपलें सर्व सैन्य सिद्ध केलें, आणि शत्रूला लढाई देण्यास पुढें सरसावला. त्यावेळीं दोघांचें तुंबळ युद्ध झालें, त्यांत **कोची** एथील राजघराण्यांतील तीन पुरुष मोठ्या शौर्यानें लढत असतां युद्धांत पडले, आणि फौजेचा अगदीं मोड होऊन तिची चहुंकडे फाटाफूट झाली. अशा भयप्रद प्रसंगीं त्या निश्चल राजाचें धैर्य खचलें नाहीं. जिकडे पळून जाई तिकडे फिरंगी लोकांस तो आपल्या बरोबर नेई. तो या प्रकारचे निर्वाणीच्या स्थितींत असतां **फ्रान्सिस्क आल्बुकेर्क** नामक सरदार नौकासमूहासहित पोर्तुगाल देशाहून हिंदुस्थानास आला. तो **कोची** एथे गेल्यावर त्यास असें समजलें कीं, एथील राजा **सामरीन** राजाच्या भयानें **वायपीन** नामक बेटांत आश्रा धरून राहिला आहे. **फ्रान्सिस्क** त्यास मदत करण्यास सिद्ध झाला, हें वर्तमान **सामरीन** राजास समजतांच तो भयाभीत होऊन सैन्यानिशीं आपल्या राज्यांत परत गेला. फिरंगी सरदारानें कोचीच्या राजास **वायपीन** बेटांतून आणून राज्यावर पुन्हा स्थापिलें. या सुमारास पोर्तुगेज

बादशहानें पाठविलेला परम विख्यात **आल्फोन्स आल्बुकेर्क** या नांवाचा सरदार **फ्रांसिस्क** यास येऊन मिळाला. त्याबरोबर नऊ तारवें व बरीच फौज होती.

हें नवीन सैन्य आल्याचें समजतांच **सामरीन** राजानें आपल्या सैन्याची तयारी करून, तो नौकासमूहासवर्तमान शत्रूसमेत लढाई करण्यास आला. त्याच्याबरोबर ८० लढाऊ जहाजें असून त्यांवर ३८० तोफा आणि ४००० सैन्य होतें. उभयतांचें युद्ध कांहीं दिवसपर्यंत मोठ्या आवेशानें होऊन, शेवटीं **आशियाखण्डस्थ** लोक पूर्ण पराजय पावले. **युरोपस्थांनीं** त्यांचीं आठ तारवें व तेरा तोफा लढाईंत घेऊन त्यांचा कांहीं कोशपर्यंत पाठलाग केला.

या यशस्कर जयानंतर **आल्बुकेर्क** यानें कोचीच्या राजाचे रक्षणार्थ कांहीं सैन्य व चार तारवें ठेवून, त्यावर **पाचेक** नामक पुरुषास मुख्याधिकारी नेमिलें. **पाचेक** हा मोठा बुद्धिमान, शूर, सद्गुणी, आणि दयाशील असा होता. **आल्बुकेर्क** नामक दोनही पुरुष स्वदेशास परत गेल्यावर **सामरीन** राजानें ५०,००० लष्करानिशीं **कोचीवर** स्वारी केली. त्यावेळीं कोचीच्या राजाची जय मिळविण्याची संपूर्ण आशा **पाचेक** या अधिकाऱ्यावर अवलंबून होती. **पाचेक** यानें राजास धैर्य देऊन आपलें व राजाचें कांहीं सैन्य बरोबर घेऊन शत्रूस टक्कर देण्यास कृतनिश्चयानें उभा राहिला. त्यावेळीं **सामरीन** राजाचें अपरिमित सैन्य पाहून कोचीच्या राजाचे सर्व लोक **पाचेक** यास सोडून पळून गेले. तेव्हां **युरोपस्थांचे** शौर्य दाखविण्या करितां त्यांतून

तीन हिंदुसरदारांस मात्र पाचेक यानें ठेवून घेतलें. प्रथमत: शत्रूच्या आरमारानें युरोपस्थांच्या चार तारवांवर हल्ला केला. त्यावेळीं पाचेक यानें तोफांचा मारा अशा चातुर्यानें शत्रूवर चालविला कीं, तेणेंकरून त्यांचीं सर्व तारवें नाश झालीं. अशा कृत्यानें ते मोठे क्रुद्ध होऊन जमिनीवरून युद्ध करूं लागले. शेवटीं शत्रु पराभव होऊन पळून गेले. या लढाईंत फिरंगी लोकांचे कांहीं लोक जखमी झाले. शत्रूचे एक हजारावर जायां झाले.

ह्या नंतर सामरीन राजानें यथाक्रम पुष्कळ हल्ले केले; परंतु प्रत्येकांत तो पराजय पावला; आणि शेवटल्या हल्ल्यांत त्याच्या सैन्यांत रोग उत्पन्न झाल्यामुळे त्याचे पुष्कळ लोक मरण पावले.

या युद्धाने युरोपखंडस्थ लोकांस हिंदुस्थानांत राज्याचा पाया स्थापन करण्याचा मार्ग दाखविला असें ह्मणण्यास कांहीं बाधा येत नाहीं. कारण थोडक्याच युरोपस्थ फौजेनें पूर्वदेशीय असंख्य सैन्याचा पराजय होतो, अशी युरोपस्थांची खात्री होऊन, त्यांस पूर्वेकडील राज्यें जिंकण्याची अपेक्षा उत्पन्न झाली.

इसवी सन् १५०५ त पोर्तुगालच्या बादशहानें दों फ्रान्सिस्क दे आल्मेद यास प्रतिनिधि असें प्रतिष्ठानाम देऊन हिंदुस्थानास रवाना केलें. त्याबरोबर २२ तारवें आणि १५०० गोरे लोक होते. प्रतिनिधि मलबार किनाऱ्यावर पोहंचला तेंव्हांच त्यास लढण्याचें प्राप्त झालें. कारण युरोपस्थांस समूळ हाकून देण्यास गुजराथचा राजा महंमद आणि क्रोधाक्रान्त व भग्नाश झालेले वेनीस ये-

थील व्यापाऱ्यांनीं **मिसर** देशच्या सुलतानास साह्य व उत्तेजन दिल्यामुळें त्यानें महानौकासमूह देऊन **मीर-हुसेन** नामक सरदारास पाठविलें होतें. हें वर्तमान **आल्मेद** यास समजतांच त्यानें आपला मुलगा **दों लोरेन्स** यास शत्रूवर हल्ला करावा ह्मणून निरोप पाठविला, त्यावेळीं तो **चौल** बंदरीं होता. बापाचा निरोप पोहंचतांच तो शत्रूस बाहेर समुद्रांत गांठण्यास तयार झाला. इतक्यांत शत्रूचीं जहाजें बंदरांत येऊन ठेपलीं. उभयतांच्या युद्धास प्रारंभ झाला. लढाई सतत दोन दिवसपर्यंत चालली होती. तिसरे दिवशीं **दों लोरेन्स** बाहेर समुद्रांत जात असतां त्याचें जहाज एकाएकीं कर्वीस अडकलें. तेंव्हां शत्रूनें त्याच्या जहाजांस नौकावेष्टन घालून, त्यावर तोफांचा मारा सुरू केला. अशा सोक्षमोक्षाच्यावेळीं **लोरेन्स** अलौकिक शौर्यानें लढला; परंतु शत्रूच्या मारापुढें त्याचा कांहींच उपाय चालला नाहीं. शेवटीं या लढाईत **दों लोरेन्स** व त्याचे १४० शिपाई मरण पावले, व शत्रूचेंही फार नुकसान झालें.

इसवी सन् १५०८त **आफोन्स आल्बुकर्क** यास सर-सुभेदार नेमून पोर्तुगालच्या बादशहानें हिंदुस्थास पाठविलें. त्यासमागमें मोठें बलाढ्य सैन्य होतें. येत असतां अरबस्थान देशाच्या किनाऱ्यावर उतरून त्यानें **कुरीयत, मस्कत** व दुसरीं कित्येक प्रसिद्ध बंदरें घेतलीं. नंतर त्यानें **उरमजा**वर हल्ला करून तें स्वाधीन करून घेतलें, त्यावेळीं त्याच्या तीन कामदारांनीं अविश्वास्य विपलायन केलें, त्यामुळें त्या जयानें त्यास विशेष फायदा झाला नाहीं.

ज्यावेळीं आल्बुकेर्क हिंदुस्थानास पोहंचला त्यावेळीं आल्मेद पुत्रशोकानें फार क्रुद्ध होऊन गेला होता; ह्मणून त्यानें आपला अधिकार आल्बुकेर्क याच्या स्वाधीन केला नाहीं. नौकासमूह सिद्ध करून मुसलमानांचा सूड उगविण्याकरितां १९ जहाजें व १६०० लोक घेऊन आल्मेद निघाला. प्रथमत: त्यानें दाबूळ शहरावरहल्ला करण्याचा निश्चय केला. कारण तेथील लोकांनीं मुसलमानांस व मिसर देशच्या राजास मदत केली होती. या वर्षाचे बाराव्या महिन्याचे विसावे तारखेस तो दाबूळ बंदरीं उतरला: त्यावेळीं नगरवासी लोक मोठ्या शौर्यानें लढले. शेवटीं आल्मेद यानें तेथील लोकांस लुटून शहराची राखरांगोळी केली.

ज्या मुसलमानांच्या आरमारानें फिरंगी लोकांच्या आरमाराचा चौलाकडे अपजय केला होता, तें आरमार खंबायतच्या आखातांत आहे असें आल्मेद यास समजतांच, तो नौकासमूहासहवर्तमान तिकडे जाण्यास निघाला. जातांना मार्गांत शत्रूचें एक तारूं मुंबई बंदरीं पकडलें. नंतर तेथून सरळ चालून आल्मेद यानें शत्रूवर हल्ला केला. त्यावेळीं शत्रु मोठ्या निकरानें लढले. परंतु फिरंगी लोक नौकायुद्धांत निपुण असल्याकारणानें मुसलमानांचा पूर्ण पराजय झाला. शेवटीं शत्रु फिरंगी लोकांस शरण आले. त्यावेळीं आल्मेद यानें त्यांस असें सांगितलें कीं,जर तुह्मीं आमचा शत्रु मीरहुसेन यास आमच्या स्वाधीन कराल तर आह्मीं तुमच्याशीं तह करूं. ही अट्ट मलिकइयाज यास नापसंत झाली. त्यानें युरोपस्थ बंदीवानांची सुटका करण्याचें

मात्र कबूल केलें. शेवटीं परस्परांचा तह झाला. शत्रूनें सर्व युरोपस्थ कैदी सोडून दिले. आल्मेद यानें तसें न करितां शत्रूचे सर्व कैदींची कानानुरा समोर निर्दयपणें कत्तल करून आपल्या कीर्तीस डाग लावून घेतला.

---

## प्रकरण पांचवें.

### पोर्तुगेजांनीं आपल्या राज्याचा पाया हिंदुस्थानांत कसा स्थापन केला ह्याविषयीं.

इसवी सन् १५०९त आल्मेद यानें आपलें राजप्रतिनिधित्व आल्बुकेर्क याच्या स्वाधीन केलें. त्यावेळीं राज्यें जिंकण्याच्या अपरिमित कल्पना आल्बुकेर्क याच्या मनांत येऊं लागल्या. प्रथमतः त्यानें कलिकोटावर छापा घालण्याचा निश्चय केला. नंतर कोतिन्ज नामक मित्रा सहित त्यानें कलिकोट बंदरीं प्रवेश केला. त्यावेळीं रात्र होती. शत्रु येईल असें कोणाच्या ध्यानींमनीं नव्हतें. शहरांत सर्व लोक निद्रासुखांत निमग्न होऊन सर्वत्र सामसूम झालें होतें. नौकावरूढ होण्याविषयीं फिरंगी लोक अत्यंत आसक्त आणि हर्षयुक्त होते, त्यामुळें रात्रभर त्यांस झोंप आली नाहीं.

दिशा फांकल्यावर लश्करा सहवर्तमान आल्बुकेर्क किनाऱ्यावर उतरला, आणि एकदम हला करून शहराचा कांहीं भाग व्यापला; तों कोतिन्ज यानें राजवाड्यावर हला करण्याचें योजिलें. त्यावेळीं आल्बुकेर्क यानें त्यास

असें सांगितलें कीं, 'आपलें परत येणें न झाल्यास कोणत्या रीतीनें परत यावें वगैरे तजवीज केल्याशिवाय अशा महत् कृत्यास हात घालणें केवळ भयावह आहे.' परंतु हा बुद्धिवाद न ऐकतां शहरांतून कोतिन्ज मोठ्या शौर्यानें राजवाड्याजवळ गेला. त्यावेळीं तेथील रक्षकांनीं त्यास कांहींच प्रतिरोध केला नाहीं. दरवाजा उघडून तो आंत गेला, आणि थोडक्याच वेळांत सर्व राजवाडा त्यानें स्वाधीन करून घेतला.

कोतिन्ज अशा जयानें गर्विष्ट होऊन कांहीं सैन्यानिशीं राजवाड्यांत विश्रांति व सौख्य घेत राहिला. इतक्यांत शत्रु तीस हजारांवर जमून फिरंगी लोकांस घालवून देण्यास सिद्ध झाले. पहिल्यानें त्यांनीं आल्बुकेर्क यावर हल्ला केला. कित्येक छपरांवर उभे राहून फिरंगी लोकांवर भाले वगैरे शस्त्रें फेकूं लागले, त्यामुळें बहुत फिरंगी लोक जायां झाले. आपल्यावर आलेलें संकट निवारण करण्यास आतां कोणताच उपाय राहिला नाहीं असें जाणून आल्बुकेर्क यानें शहराच्या कांहीं भागास आग लाविली. त्यामुळें शत्रु जिकडे तिकडे पळून गेले. अशी अनुकूळ संधि साधून आल्बुकेर्क आपल्या जहाजांकडे परतला.

इकडे कोतिन्ज यानें जो राजवाडा हस्तगत करून घेतला होता, त्या सभोंवतीं शत्रूंचा रगाडा पडून त्यास आग लावून दिली. त्यावेळीं आपला बचाव करण्याकरितां कोतिन्ज यानें सर्व शक्ति वेंचली. परंतु शत्रु असंख्य होते, त्यामुळें त्यास युद्धफळी फोडून जातां आलें नाहीं.

या भयंकर प्रसंगीं कोतिन्ज व दुसरे कित्येक पहिल्या प्रतीचे फिरंगी सरदार रणांगणांत पडले.

अशा अशुभ प्रारंभानें आल्बुकेर्क कांहीं वेळ पर्यंत मृतप्राय होऊन तेथून कोची येथें जाण्यास निघाला. तेथें पोहंचल्यावर पुन: पूर्वस्थितीवर येऊन तो पहिल्या प्रमाणें देश जिंकण्याचे विचार करूं लागला. तेव्हां तुळव देशचा तिमोजी नामें एक समुद्रांतला लुटारू आल्बुकेर्क यास येऊन मिळाला. तो फिरंगी लोकांचा अति विश्वासु मित्र होता. त्यानें आल्बुकेर्क याचें लक्ष गोवें शहरा कडे लावून त्यास असें सुचविलें कीं, यूसफ आदिलशहा सामन्त देशवासी राजांबरोबर युद्धास गुंतला असून तें शहर अगदीं निराश्रित ठेविलें आहे. ही संधि न दवडितां मोठ्या त्वरेनें नौकासमूह सिद्ध करून तिमोजी सहित इसवी सन् १५१० त दुसऱ्या महिन्याचे पंचविसावे तारखेस आल्बुकेर्क आग्वादच्या उपसागरांत प्राप्त झाला. मांडवी नदींत प्रवेश करित असतां तिच्या कांठीं शहराच्या रक्षणार्थ जितके किल्ले होते तितके प्रतिरोधा शिवाय त्यानें हस्तगत करून घेतले. नंतर आपलीं सर्व जहाजें गोवें शहराच्या भिंतीसन्मुख आणिलीं. तेव्हां तेथील व्यापारी लोकांस असा भय प्राप्त झाला कीं, शत्रु एकदम हल्ला करून शहराचा नाश करतील, ह्मणून त्यांनीं गुप्तपणें आल्बुकेर्क याकडे मध्यस्थ पाठविले. आणि त्यांबरोबर असें सांगून पाठविलें कीं 'जर आह्मांस तुह्मांपासून व्यापारास मोकळीक आणि ग्रामी मालमत्तेस निर्भयता असेल तर निर्धास्त हें न;

तुह्मीं आपल्या ताब्यांत घ्यावें.' आल्बुकेर्क यानें ही गोष्ट मान्य करून त्याच महिन्याचे २७वे तारखेस गोवें शहर आपल्या स्वाधीन करून घेतलें. वचनाप्रमाणें व्यवस्था व शांतता होण्यास फार प्रयत्न केले; विजयनगरच्या राजाकडे वकील पाठविला; आणि उरमज व इराण एथील वकील गोव्यांच्या अधिकाऱ्याकडे आले होते त्यांचा अतिशय आदरसत्कार करून त्यांस उत्तम वस्त्रें दिलीं.

यांप्रमाणें आल्बुकेर्क साहेब वर्तत असतां यूसफ आदिल शहा यास फिरंगी लोकांच्या हातीं गोवें लागलें असे समजलें. त्यावेळीं मोठा उद्विग्न होऊन ज्या राजांबरोबर युद्धास गुंतला होता त्यांशीं तह करून तो ४०,००० निवडक स्वारांनिशीं गोवें परत घेण्यास आला. तेवेळीं गोव्यांतील फिरंगी लोकांत दोन पक्ष झाले. प्रतिपक्षाचें ह्मणणें असें होतें कीं, शत्रु प्रबळ आहे, त्यां पुढें आमचें कांहींच चालायाचें नाहीं. यास्तव लढाई न करितां शहर सोडून देऊन सर्वांचे प्राण रक्षण करणें हें बरें. आल्बुकेर्क व त्याच्या पक्षाच्या लोकांचें ह्मणणें असें होतें कीं, अनायासें सांपडलेलें याप्रकारचें कीर्तिमान् आणि श्रीमान् शहर सोडून देणें हें आह्मां रणशूरांस अगदीं अयोग्य आहे. यास्तव सोडून न देतां शहर रक्षण करण्यास युद्ध करणें हें बरें. आल्बुकेर्क याचा ह्या प्रकारचा दुराग्रह जाणून प्रतिपक्षी लोकांनीं सैन्य रणांगणीं बळी न जावें या हेतूनें त्यास पदच्युत करण्याचें योजिलें. हें वर्तमान आल्बुकेर्क यास समजतांच त्यानें परिवर्तक शिपाई यांच्या प्रमुखांस एका गुप्त सभे-

त गाठून एकाएकीं त्यांस कैद केलें. यावेळीं परिवर्तक शिपाई त्यास शरण येऊन अतःपर माझी राजनिष्टेनें वागूं अशी त्यांनीं शपथ वाहिली.

यूसफ आदिलशहा अगदीं जवळ येऊन ठेपला. आतां कोणत्या रीतीनें हल्ला करून गोवें शहर आपल्या ताब्यांत घ्यावें हा त्यास विचार पडला. इकडे आल्बुकेर्क आत्म रक्षणार्थ तयारी करीत होता. त्यानें गोवा बेटांतील वर्दी करण्याच्या सर्व जागा बंद करून टाकल्या. जे बेटाचे भाग हल्ला करण्यास उद्घाटित होते, त्याठिकाणीं निवडक व बलाढ्य सैन्य ठेऊन कांहीं मोरचे उभारिले, . इतक्यांत शत्रूनें एकदम हल्ला केला परंतु फिरंगी लोक यावेळीं मोठे सावध होते, त्यामुळें यूसफ याचा पूर्ण पराजय करून त्याची जय मिळविण्याची आशा नष्ट केली.

कांहीं दिवसां नंतर एकदा नशीबाची परीक्षा पहावी या उद्देशानें यूसफ यानें गोवा बेटावर पुन्हा छापा घालण्याचें योजिलें. पांचव्या महिन्याचे १७ वे तारखेस दोन पटालमी गोवा बेटावर पाठविण्यास त्यानें सिद्ध केल्या त्यावेळीं रात्र चंद्रहीन होती. वारा अतिशय वाहत असून मेघवृष्टि होत होती. सावधगिरीनें व फिरंगी लोकांस नसमजतां पटालमी नदी उतरून गोवा बेटांत शिरल्या, आणि त्यांनीं ओरडून एकच आकांत केला. तेव्हां आल्बुकेर्क मोठा विस्मयान्वित व भयाभीत होऊन शत्रूस मागें हटविण्याची युक्ति योजूं लागला. परंतु नगरवासी लोकांचा दंगा व लष्करी लोकांचा शहर सोडून देण्याचा

दृढनिश्चय यांहींकरून **आल्बुकेर्क** निरुपाय होऊन एका नदी तीरस्थ किल्ल्यांत जाऊन राहिला. शेवटीं **कमालखान** नामक **यूसफाचा** सेनाधिपति यानें **गोवें** घेऊन **आल्बुकेर्क** होता त्या किल्ल्यास वेढा दिला, आणि फिरंगी लोकांचीं लढाऊ जहाजें जाळण्यास राळ, गंधक, वगैरे ज्वालाग्राही पदार्थ जमा केले. ह्या परिध्वंसी कृत्याचा निषेध करण्यास **आल्बुकेर्क** असमर्थ होता, ह्मणून त्यानें किल्ला रिकामा करून सर्व तोफा, गोळे, वगैरे पुष्कळ प्रकारची युद्ध सामग्री गुप्तपणें तारवांवर नेऊन ठेवण्याचा निश्चय केला; तो लष्करा सहवर्तमान निःशब्द तारवाकडे जात असतां कांहीं वस्तूंचा आकस्मिक विदार शब्द झाला; तेणें करून शत्रु सावध होऊन त्यास प्रतिबंध करण्यास एकदम सरसावले. त्यावेळीं स्परस्परांचा क्षणभर भंयकर प्रसंग होऊन **आल्बुकेर्क** मोठ्या प्रयासानें तार्वावर गेला. शेवटीं किल्ला शत्रूंच्या हातीं लागला. नंतर **पणजी** येथें तळ देऊन ते वारंवार फिरंगी लोकांस उपद्रव करण्यासाठीं लढाऊ जहाजें पाठवूं लागले.

कांहीं दिवस गेल्यावर **आल्बुकेर्क** यानें एक नौकासमूह तयार करून मुकाट्यानें पणजी जवळ आला, आणि सैन्य किनाऱ्यावर उतरवून रणढोल, रणतुऱ्या, व महाध्वनिक आरोळ्यांचा एकच गजर केला. तेव्हां शत्रु जागृत होऊन भयविप्लुत झाले, आणि फिरंगी लोकांस प्रतिरोध नकरितां पळून गेले.

नंतर **यूसफ आदिलशहा** फिरंगी लोकांवर हल्ला करण्यास नौकासमूह पाठवीत आहे असें जाणून **आल्बुकेर्क**

यानें आपल्या पुतण्यास कांहीं तारवें व लष्कर देऊन त्यां समागमें लढाई करण्यास पाठविलें. उभयतांची कांहीं वेळपर्यंत लढाई होऊन फिरंगी लोक जय पावले. तेणेंकरून शत्रूचा गर्व उतरून फिरंगी लोकांचें शौर्य व हिंम्मत हीं पूर्ववत् सचेतन झालीं. नंतर **आल्बुकर्क** **कानानूर** येथें गेला आणि दुसरी फौज जमा करून पुन्हा गोव्यांवर हल्ला करण्याचा विचार करूं लागला.

इकडे **यूसफ आदिलशहा** याच्या प्रकृतीस कांहीं विकार होऊन तो मरण पावला. त्याचा मुलगा **इस्मायल आदिलशहा** राज्य पदारूढ झाला. तो **विजयनगरच्या** राजाबरोबर लढाईस गुंतला आहे, अशी अनकूळ संधि पाहून **आल्बुकर्क** तेवीस तारवें, १५०० शिपाई, व **तिमोजीच्या** आरमारावरचा अध्यक्ष **महादुराव**, यांसहित त्याच वर्षी अकराव्या महिन्याच्या २४ वे तारखेस **गोवें** शहराच्या सन्मुख आला.

दुसरे दिवशीं सकाळीं फिरंगी लोकांनीं शहरावर तोफांचा भयंकर मारा सुरू केला, त्यावेळीं सर्व किनारा धुरानें व्याप्त होऊन, त्यांतून विस्तवाच्या चमका उडूं लागल्या. नंतर सुभेदार जमिनीवर उतरला आणि त्यानें सैन्याच्या दोन टोळ्या करून शहराच्या दोन भागांवर हल्ले केले. त्यावेळीं शत्रु दुर्गाच्या आंत पळून गेले आणि दरवाजा बंद करूं लागले. तेव्हां **फर्नांद** नामक शिपायानें आंत भाला सारून दिला. दरवाजा उघडून फिरंगी लोक शहरांत शिरले, त्यावेळीं शत्रु पळून न जातां फिरंगी लोकांस प्रतिबंध करण्यास राजवाड्यांतच राहिले. जे

शिपाई त्या वाड्यांत शिरले होते त्यांची त्यांनीं कत्तल केली. शेवटीं फिरंगी लोकांनीं त्यांस हाकून देऊन इसवी सन १५१०त सत्ताविसावे तारखेस गोवें शहर आपल्या स्वाधीन करून घेतलें.

**आल्बुकेर्क** साहेबाच्या मनांत जे विचार घोळत होते ते पूर्ण करण्याची संधि आली. प्रथमतः त्यानें गोवा बेटास चहुंकडून तटबंदी करून दुसरीं पुष्कळ उपयुक्त कृत्यें केलीं. नंतर प्रसिद्ध दरबारांत वकील पाठवून जे परकीय राजांकडून वकील आले होते त्यांस आपल्या ऐश्वर्यानें व औदार्यानें दीपविलें. एतद्देशीय लोकांचीं मनें आपल्या सरकाराकडे लावण्याकरितां त्यांच्या बाईकांचीं लग्नें आपल्या शिपायां बरोबर लावून देऊन त्यानें त्यांस मोठमोठे अधिकार दिले !! एक इतिहासकार असें वर्णन करितो कीं ज्यावेळीं एकदम पुष्कळ लग्नें मोठ्या उत्साहानें झालीं त्यावेळीं रात्र चंद्रहीन होती. तेव्हां एकाएकीं सर्व दिवे विझले, तेणेंकरून नवरा बायकोस परस्परांत ओळखण्याची पंचाइत पडली, व कित्येकांच्या बायकाही बदलल्या. दुसरे दिवशीं ही अज्ञानानें झालेली गोष्ट जेव्हां समजली, तेव्हां त्यांच्यामध्यें अशी तोड निघाली कीं, गतरात्रीं प्रारब्धगत्या जी स्त्री ज्या पुरुषाची शयन सखी झाली, त्यापुरुषानें देवळांतील कराराकडे लक्ष न देतां तिजवर तृप्त असावें!! नंतर गोव्यांतील राज्यव्यवस्था नीट करून **आलबुकेर्क** दूरचीं राज्यें जिंकण्याचे विचार करूं लागला.

इकडे असें झालें कीं सन् १५०८त **सिकैर** नामक एक फिरंगी सरदार मलाकास गेला होता त्याचा ते-

थील राजानें चांगला आदरसत्कार केला, त्यामुळें तेथें जे अन्यदेशीय व्यापारी होते त्यांच्या पोटांत दुखूं लागलें. त्यांनीं फिरंगी लोकांचा नाश करण्याकरितां राजास मसलत दिली. त्यावेळीं त्याच्यानें युरोपस्थांस उघडपणें पकडवत नाहीं ह्मणून त्यानें त्यां विरुद्ध दगलबाजीचा कूट रचिला. परंतु तो लागलाच उघाडीस आला. त्यावेळीं एकदम त्यानें फिरंगी लोकांच्या गलबतांवर हल्ला करून कित्येक फिरंगी लोकांस ठार मारिलें. आणि कित्येकांस त्यांच्या देशबांधवांनीं ह्या अयोग्य कृत्याचा सूड उगवूं नये ह्मणून ओलीस ठेविलें हें वर्तमान **आल्बुकेर्क** यास गोवें येथें समजतांच त्यास मोठा क्रोध येऊन तो १४०० लोकांनिशीं मलाका शहरावर गेला, आणि तेथील राजास असें सांगून पाठविलें कीं, जे माझे देश बांधव तुह्मी कैद केले आहेत त्यांस सत्वर सोडून द्यावें. ही गोष्ट राजानें मान्य केली नाहीं. ह्मणून **आल्बुकेर्क** आपला अधिकार आणि शक्ति दाखविण्यास सिद्ध झाला. तेंव्हां राजा इतका भयाभीत झाला कीं, त्यानें लागलेच सर्व युरोपस्थ कैदी सोडून दिले, इतकेंच नाहीं, परंतु जसा **आल्बुकेर्क** सांगेल त्या प्रमाणें ऐकण्यास सिद्ध झाला. जेथें मला योग्य स्थळ मिळेल तेथें मी किल्ला बांधीन, व जे आमचे लोक तुह्मी विनाकारण मारिले त्या बद्दलचें नुकसान भरून घेईन, असें त्यानें राजास सांगितलें. ही गोष्ट राजानें मान्य केली नाहीं, ह्मणून **आल्बुकेर्क** यानें **मलकावर** एकदम हल्ला केला. शहर रक्षणार्थ शत्रूचे सुमारें तीस हजार लोक होते, त्यांनीं फिरंगी लोकांस प्रतिरोध केला नाहीं.

शेवटीं **आल्बुकेर्क** यानें तें शहर स्वाधीन करून घेतलें. तेथें एक मोठा किल्ला बांधून **जावा, सुमात्रा,** आणि **सियाम** येथें वकील पाठविले.

**आल्बुकेर्क** साहेब लढाईस गुंतला आहे अशी संधि पाहून विजापुरच्या राजानें सन् १५११त दुसऱ्या महिन्याचे १८ वे तारखेस गोव्यांवर मोठें सैन्य पाठविलें. त्याच्या मुख्य सरदारानें गोवा बेटांत उतरून भाणस्तार एथें एक मोठा मजबूद किल्ला बांधिला, आणि कांहीं-वेळानें गोवेंशहरास वेढा दिला. हें वर्तमान **आल्बुकेर्क** यास समजतांच तो मोठ्या त्वरेनें आला, आणि त्यानें शत्रूस हाकून दिलें.

नंतर **आल्बुकेर्क** यानें **आदनावर** दोन हल्ले केले; परंतु त्याचें कांहीं चाललें नाहीं. पुढें सन् १५१४त चौथ्या महिन्याचे सत्ताविसावे तारखेस उर्मजावर हल्ला करून तें घेतलें. याप्रमाणें **आल्बुकेर्क** साहेबानें हिंदुस्थानांत पोर्तुगेज राज्याचा दृढ पाया घातला.

आतां **आल्बुकेर्क** याच्या यशस्वी प्रतापाचा अंत होत आला. त्याची प्रकृति युद्धश्रमानें अगदीं श्रांत होऊन शरीर गतसत्व झालें, त्यामुळें तो गोव्यांस येण्यास निघाला. येत असतां **खंबायतच्या** किनाऱ्याकडे **लोपेज संवारेज** नामक पुरुषास **पोर्तुगाल** देशच्या बादशहानें हिंदुस्थानाचा प्रतिनिधि नेमिलें, असें त्यास हृदयछेदक वर्तमान समजलें. त्यावेळीं तो कांहीं वेळ पर्यंत निचेतन झाला. या पुरुषास पोर्तुगालच्या राजानें एकदम पदच्युत करण्याचें कारण **पोर्तुगेज** ग्रंथकार लिहीत नाहींत.

हा मृत्युवत प्रहार बसल्यावर त्या शूर योद्ध्यानें वांचण्याचें इच्छिलें नाहीं. तो प्राणांत होण्याच्या व्यथेंत असतां आश्रित जनांनीं त्यास असें सुचविलें कीं, कृतघ्न बादशाहाचा हुकूम न मानितां आपण सर्व हिंदीमहासागरावर हुकूम चालवावा. परंतु त्या राजनिष्ट पुरुषानें त्यांकडे मुळींच लक्ष न देतां मरणाची प्रतिक्षा करूं लागला. प्राणोत्क्रमण होत असतां जवळच्या मित्रांनीं त्याच्या पुत्रावर पोर्तुगालच्या बादशाहाची कृपा व्हावी एतदर्थ एक संक्षिप्त पत्र लिहिण्यास सांगितलें; तें असें कीं, "महाराज, माझ्या दिर्घायुष्यांत ज्यावेळीं आपली सेवा करण्याचा मला सन्मान होता, त्यावेळीं जीं मी आपणास पत्रें लिहिलीं त्यांतील हें शेवटचें पत्र आहे. आपल्या राज्यांत कान्राल दे आल्बुकेर्क ह्मणून माझा मुलगा आहे, त्यावर माझ्या लायकीप्रमाणें महाराजांनीं लोभ ठेवावा ही विनंती. इंदियाच्या राज्यव्यवस्थे विषयीं ह्मणाल तर ती आपणास स्वत: साक्ष देईल."

गोवें शहरासन्मुख पोंचतांच त्यानें मुख्य पाद्र्याकडून प्रायश्चित्त घेतलें, आणि सन् १५१५त बाराव्या महिन्याचे सोळावे तारखेस ह्या विख्यात पुरुषानें प्राण सोडिला.

**आल्बुकेर्क** साहेब निवर्तल्यावर नवीन प्रतिनिधि **लोपेज सुवारेज** यानें आरबस्थानाच्या किनाऱ्यावरील **आदान** बंदरावर स्वारी केली. त्यावेळीं हें बंदर फार प्रसिद्ध असून तांबड्या समुद्रांतील व्यापाराचें मुख्य उतारपेठ होतें. फिरंगी लोक **आदान** शहरावर हल्ला करण्याच्या बेतांत आहेत असें तेथील रहिवाशांनीं जाणून

अतिशय नम्रपणा धारण केला. त्यामुळें फिरंगी लोकांनीं त्यांच्या नम्रपणावर विश्वास ठेऊन किल्ला वगैरे बांधण्याची हइगई केली; त्यावेळीं शत्रूंनीं ती संधि साधून फिरंगी लोकांचें कांहीं एक चालूं दिलें नाहीं.

इतक्यांत **अंकुसखान** नामक विजापुरचा सरदार मोठ्या सैन्यानिशीं युरोपस्थांशीं लढण्यास कोकणांत आला. फिरंगी लोकांचीं व त्याची **फोंडे** ह्या शहराजवळ मोठी भयंकर लढाई झाली; परंतु शत्रूचा एक सरदार फिरंगी लोकांस वश झाल्यामुळें लढाईचा कांहीं निर्णायक शेवट झाला नाहीं.

इसवी सन् १५१७त **चिनांत** प्रवेश करून फिरंगी लोक त्या देशाबरोबर व्यापार चालवूं लागले. त्याचवर्षीं तेथील राजाकडून चांचे लोकांच्या पारिपत्या बद्दल बक्षीस ह्मणून **माकाव** बेट त्यांस मिळालें.

इसवी सन् १५१८त सरसुभेदारानें २५० घोडेस्वार आणि ८०० शिपाई इतक्या फौजेनिशीं भूखंडस्थित **आदिलशाई** राज्यावर हल्ला करून कांहीं मुलुक हस्तगत केला. पुढें ४८ तारवांचें आरमार तयार करून फिरंगी लोकांनीं **दीवेवर** हल्ला केला; परंतु तेथील किल्लेकऱ्यांच्या अतिशय प्रतिरोधामुळें त्यांस मागें हटावें लागलें. कांहीं दिवस गेल्यावर सरसुभेदारानें एक बलाढ्य नौकासमूह सिद्ध करून **दीवेवर** पुन्हा स्वारी केली. त्यावेळीं शत्रूबरोबर एक दारुण युद्ध झालें, त्यांत फिरंगी लोकांचें एका गलबताचा नाश झाला.

सन् १५२२त विजापुरच्या राजानें मोठ्या लष्करास-वर्तमान गोमांतकांत येऊन फिरंगी लोकांनीं जो भूखंडस्थित मुलुक घेतला होता तो परत घेतला.

इकडे गुजराथच्या राजानें फिरंगी लोकांस उत्तर कोंकणांतून हाकून देण्यासाठीं **चौलाकडे** ८० लढाऊ गलबतें पाठविलीं. त्यावेळीं **अहंमदनगरचा** राजा युरोपस्थांस साह्य होऊन शत्रूंस त्यांनीं पूर्ण पराजित केलें; इतकेंच नाहीं, परंतु त्यांच्या ७२ तारवांचा नाश करून त्यांनीं बांधलेला किल्लाही घेतला. नंतर **गोव्यांच्या सुभेदारानें** समुद्रकिनाऱ्यावरील गुजराथी राजाचीं संस्थानें **ठाणें** व **वसई** ह्यांवर एक बळकट नौकासमूह पाठविला, आणि तेथील अधिकाऱ्यांकडून खंडणी घेतली. त्याचवेळीं **मुंबई**बेटही जिंकून घेतलें.

सन् १५३०त युरोपस्थांनीं तापीनदींतून जाऊन **सुरत** हें प्रसिद्ध शहर लुटलें. बंदरांतील व्यापारी लोकांचीं तारवें स्वरक्षणार्थ सरसावलीं, तथापि पोर्तुगेजांपुढें कांहीं न चालतां त्यांतील २० तारवांचा नाश झाला. त्यासमयीं **गुजराथचे** राजानें **चौल** येथील किल्ल्यावर हल्ला केल्याचें वर्तमान गोव्यांतील सरसुभेदारास समजतांच त्यानें कुमकेसाठीं एक टोळी पाठविली, परंतु तिचा पराजय आक्रामकांनीं केल्यामुळें ती परत आली.

ह्या प्रकारच्या शत्रुविग्रहामुळें गोव्यांचा सरसुभेदार **नुन्ज दे कुन्ज** ह्यानें **दीव** बेट हल्ला करून घेण्याची हीच संधि आहे असें जाणून मुंबई बंदरांत एक

मोठें बलवान आरमार* सिद्ध केलें, आणि येत असतां इसवी सन् १५३०त दुसऱ्या महिन्याचे सातव्या तारखेस वेटी नामक शत्रूच्या शहरावर छापा घालून तें घेतलें. त्या शहरांत शत्रूच्या ६० मोठाल्या तोफा फिरंगी लोकांस सांपडल्या. नंतर त्याच महिन्याचे सोळावे तारखेस तो भयजनक नौकासमूह दीवे समोर गेला. त्यावेळीं तेथील राजा बहादुरशहा हा माळव्यांत स्वारीस गेला होता. अशा संधीस त्या अरमारानें दीवेवर जबरदस्त हल्ला केला; परंतु तेथील रखवालदार व मुख्यत्वेंकरून तेथील किल्ल्याचा सुभेदार मुस्ताफखान यानें शौर्यें करून तो मागें हटविला. गोंव्यांस परत येत असतां त्या आरमारानें मुजफराबाद हें शत्रूचें शहर जाळिलें आणि वसई, तारापूर, ठाणें, व माहीम हीं स्थानें जिंकून घेतलीं. पुढें तीन वर्षांनंतर बाहादुरशाहाच्या सुभेदाराकडून फिरंगी लोकांनीं दमण बंदर हस्तगत करून घेतलें.

या सुमारास बाहादुरशाहानें दिल्लीचा बादशहा हुमायून ह्या बरोबर युद्धाची कळी पेटविली आणि तींत तो पराजित होऊन दीव येथें पळून गेला. तेथें असतां साह्यासाठीं फिरंगी लोकांच्या सर सुभेदाराबरोबर त्यानें सल्ला केला. तो असा कीं, फिरंगी लोकांनीं दीव येथें वखार बांधावी व त्याबद्दल बहादुरास राज्य मिळण्याविषयीं त्यांनीं मदत करावी. या

* तें असें—४०० तारवें, त्यांवर ३६०० गोरे शिपाई, १४०० गोरे खलाशी, २००० काळे शिपाई, ८००० आफ्रिकाखंडस्थ काफ्री, या खेरीज ५००० काळे खलाशी, ह्मणजे एकंदर त्या बळसंपन्न आरमारावर २०,००० लढाऊ लोक होते.

सल्ल्याप्रमाणें फिरंगी अधिकाऱ्यानें ५०० युरोपस्थ लोकांची टोळी **बहादुराचे** स्वाधीन केली. इतक्यांत असें वर्तमान घडलें कीं, **गुजराथ** देश ज्या मोंगल सरदारांनीं व्यापिला होता त्या सरदारांत बखेडे उद्भवल्यामुळें, ते लोक तें राज्य सोडून गेले; त्यांचे मागें जेव्हां **बाहादुराची** स्वराज्यांत स्थिरस्थावर झाली तेव्हां त्याचें लक्ष पुनः **दीवे** कडे लागलें. कारण फिरंगी लोक हे आपल्या तेथील नव्या वखारीस तटबंदी करीत होते; तेव्हां ते तिचा किल्ला करीत आहेत असें त्यास वाटलें, ह्मणून तो **दीवेस** इ० स० १२३७त आला. गोव्यांचा सरसुभेदार **नुञ्ज दे कुञ्ज** यास पकडण्याच्या उद्देशानें कांहीं बोलणें करावयाचें आहे असें निमित्त करून **बहादुरानें** त्यास बोलाऊन नेलें. सरसुभेदार **दीवेस** पोंचल्यावर त्याचा आणि **बहादुराचा** किल्ल्याचें तटबंदी संबंधी कांहीं संवाद झाला; तो बाहेरून दिसण्यांत मैत्रीच्या नात्याचा दिसत होता खरा, परंतु फिरंगी आणि मुसलमान यांच्या इतिहासावरून उभयपक्षीं विश्वासघात करण्याचा बेत होता, व प्रत्येक आपला अभिप्राय पार पडण्यासाठीं संधि पहात होता, असें पुढील वृत्तांतावरून स्पष्ट दिसतें. जेव्हां सरसुभेदारास **बहादुरशहानें** आपल्या भेटीस बोलाविलें, तेव्हां त्यानें अजारीपणाचें सोंग घेतलें, ह्मणून त्याची आशंका दूर करण्यास्तव तेरा मानकरी व कांहीं सेवक यां सहित **बहादुरशहा** सरसुभेदाराचे गलबतावर गेला. तो तेथें असतां सरसुभेदार व त्याजवळचे लोक यांची कांहीं खलबतें व

खुणा झाल्या, तेणें करून बहादुरशहा भयचकित होऊन त्वरेनें निरोप घेऊन तडीस जाण्यासाठीं आपल्या मचव्यांत बसला.

बहादुरशहा किनाऱ्याकडे जात असतां सरसुभेदारानें **दीव** येथील वखारीचा सुभेदार '**मानुएल दे सौज़**' यास राजाला बोळवावा एतदर्थ त्याकडे पाठविलें. कर्म धर्म संयोगानें असें झालें कीं, राजाचे मचव्यावर तो सुभेदार चडतेवेळीं त्याचा पाय चुकून तो समुद्रांत पडला, तेव्हां जी मंडळी त्याबरोबर होती, तिनें त्यास वर घेऊन **बहादुरा**जवळ नेलें. सुभेदार समुद्रांत पडला असें पाहून कांहीं फिरंगीं गृहस्थ एका होडीनें **बहादुरच्या** मचव्याकडे येऊन त्वरेनें आंत शिरले. ह्या त्यांच्या शीघ्रतेमुळें राजाचे मनांत कांहीं दग्याचा संशय येऊन त्यानें सुभेदारास मारण्याचा आपल्या लोकांस हुकूम केला. तो तो बजावीत असतां मचव्यांतील एका परिवारित फिरंगी शिपायानें **बहादुराचे** अंगावर तुटून त्यास शस्त्र घात केला. तेव्हां तेथे दोनही पक्षांचा भयंकर प्रसंग झाला. त्यांत प्रत्येक तर्फेचे पुष्कळ लोक प्राणास मुकले. **बहादुरशहा** पळून जात असतां एका गोऱ्या शिपायानें त्यास भाल्यानें भोसकलें. तसेंच दुसऱ्या कित्येकांनीं केलें, तेव्हां तो गतप्राण होऊन समुद्रांत पडला. कांहींवेळ पर्यंत त्याचें प्रेत पाण्यावर दिसत होतें; परंतु तें लागलेंच तळीं गेलें. त्याच प्रमाणें **मानुएल दे सौज़** याची दशा झाली. राजास व आपले सुभेदारास सन्मानानें मूठ माती देण्यासाठीं सरसुभेदारानें त्यांच्या शवांचा फार शोध

करविला, परंतु थांग लागला नाहीं*. हें वर्तमान हिंदुस्थानीं सन् ९४३ रमज्यान, ता० ३ ह्मणजे इ० स० १५३७ दुसरा महिना, ता० १४, या दिवशीं घडलें.

**मानुएल दे सौज** ह्याच्या मरणानंतर **दीव** येथील सुभेदारीचे कामावर **'सिल्वैर'** नामक कामदाराची नेमणूक झाली. **गुजराथचा** राजा **बाहदुरशहा** ह्याच्या अपमृत्युमुळें एतद्देशीय लोकांचे मनांत **फिरंगी** लोकांविषयीं विरोधता उत्पन्न झाली होती, ती नाहींसी व्हावी ह्मणून नवीन सुभेदारानें अतिशय प्रयत्न केला व तो कांहींसा सिद्धीसही गेला. परंतु त्यावेळीं **खोज्या ज्याफर** ह्मणून एक मुसलमान सरदार **युरोपस्थांचा** केवळ शत्रु होता, त्यानें सर्व मुलखांत चेतवाचेतव करून **गुजराथ** देशांतील २०,००० लोक जमविले, आणि सन् १५३८चे प्रारंभीं **दीवच्या** किल्ल्यास वेढा दिला. **मिसर देशाचा** सरसुभेदार **सुलेमान आगा** ह्यानें **कुस्तान्तुनीया** येथील पादशाहाचे आज्ञेनें ७० तारवें व ७,००० निवडक तुर्की शिपाई इतक्या फौजेनिशीं जाऊन समुद्राच्या बाजूनें तो वेढा पुरा केला. **सिल-**

---

* परधर्मी लोकांवर विश्वास ठेवूं नये असा त्या दोन्ही पक्षांचे लोकांचा सारखाच अभिप्राय असल्यामुळें एका पक्षकाराचे कृत्यावर अनकूल प्रेक्षा करावी अशी त्याची योग्यता दिसत नाहीं. ज्याअर्थी फिरंगी लोकांच्या तारवावर बहादूर सहपरिवाराशिवाय गेला, त्याअर्थीं त्याचे मनांत त्याच वेळीं विश्वास घात करण्याचा निश्चय असेल असें संभवत नाहीं; आणि फिरंगी लोकांचा उद्देश तरी त्यास पकडण्याचा असावा. मारण्याचा नसावा. यास्तव जो कलह झाला तो परस्परांच्या भीतिमुळें न समजून झाला असें दिसतें— एल्फिन्स्टनकृत हि० इ०

वैर त्याचे लोक फक्त ६०० असून त्यांतील बहुतेक आजारी होते. **गोव्यांचा** सरसुभेदार **नुञ्ज दे कुञ्ज** यास च्युताधिकार केल्यामुळे **गोव्याहूनही** कुमक पोंचली नाहीं. असें असतां किल्लेकऱ्यांनीं मोठ्या शौर्यानें किल्ल्याचें रक्षण केलें, इतकेंच नाहीं; परंतु कितीएकवेळां आंतून बाहेर येऊन शत्रूंचा अतिशय नाश केला, व त्यांचे सर्व प्रयत्न निर्फळ केले. या वेढ्यांत किल्ल्यांतील सर्व बायका देखील शूर पुरुषाप्रमाणें लढल्या. त्यांत सुभेदाराची स्त्री 'दोना इजाबेल' ही प्रमुख होती. शत्रूनें सतत चालविलेल्या तोफांचे भयंकर भडिमारापासून मोर्चांच्या ज्या भिंती पडत, त्या त्या लागल्याच उभारीत. छापा घालून किल्ला घेण्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ गेल्यामुळें शेवटीं शत्रूनें रात्रसमयीं अकस्मात एक जबरदस्त हल्ला करून किल्ल्याच्या एका बुरजांत प्रवेश केला. तेव्हां तर किल्लेकऱ्यांनीं अलौकिकपणें लढून शत्रूच्या १५०० लोकांची तेथेंच कत्तल केली; आणि त्यांस पिटून बाहेर लावून दिलें. यानंतर किल्ल्यांतील लोकांत केवळ ४० शिपाई युद्धाच्या कामास उपयोगी होते ह्मणून त्यांची टिकाव धरण्याची शेवटली आशा नष्ट झाली. अशा स्थितींत असतां त्यांच्या आनंदयुक्त आश्चर्यास **सुलेमान** आगा किल्ला घेण्यास अशक्य असें समजून त्याचा वेढा उठवून जय मिळविण्याच्या संधीस नौकासमूहा सहवर्तमान स्वदेशास परत गेला.

सन् १५४३त विजापुरचे दरबारांतील मानकरी मंडळीनें **इब्राहिम आदिलशाह** यास पदच्युत करून त्या-

चा बंधु **अबदुल्ला*** यास सिंहासनावर बसवावा असें संगनमत केलें. परंतु तें असमयीं प्रसिद्धीस आल्यामुळें अबदुल्ला आपल्या बंधूच्या क्रोधापासून बचावण्यास फिरंगी सरकारचे आश्रयाखालीं गोव्यांस पळून आला. तेव्हां प्रतिनिधीनें मोठ्या सन्मानानें त्याचें आदरातिथ्य करून त्यास ठेऊन घेतलें.

**अबदुल्ला** गोव्यांस पळाला आहे असें समजतांच **इब्राइमशहानें** बेलगांवचा सुभेदार **आसदखान** याच्या द्वारें प्रतिनिधीकडे असें बोलणें लाविलें कीं, तुमचे सरकारानें सर्व कोंकण आणि दहा लक्ष रुपये घेऊन अबदुल्ला यास आमचे स्वाधीन करावा. हें बोलणें चाललें असतां **आसदखान** एकाएकीं मरण पावला. तेव्हां प्रतिनिधीनें विजापुरकरास असें सांगून पाठविलें कीं, जर तुह्मी मयत **आसदखान** याचें सर्व द्रव्य आमचे सरकारास द्याल, तर आह्मी अबदुल्ला यास तुमचे स्वाधीन करूं. ही अट **इब्राइम** यास मान्य होऊन **शमसुद्दीन** नामक सरदार त्याकडून एक कोटी दुकत† घेऊन गोव्यांस आला. हें द्रव्य **आसद** खानाचे मालमतेचा एक दशांश आहे असें ह्मणून गोवा सरकारानें अबदुल्ला यास विजापुरीं पाठविलें नाहीं.

याकाळीं फिरंगी लोकांच्या शेजारच्या राजां बरोबर

---

*यास पोर्तुगेज ग्रन्थकार 'मल्लु खान' ह्मणतात.

† एका प्रकारचें चलनी नाणें होतें. त्याची किंमत २ $\frac{1}{12}$ कंपनी रुपये—चेम्बर्स एन् सीक्लोपीडिया.

लढाया चालल्या होत्या त्यामध्यें बहुत शहरांचा नाश होऊन रक्ताचे पूर वाहिले*.

इसवी सन् १५४५त **गुजराथचा** राजा **महंमदशहा** ह्यानें **खोज्या ज्याफर** ह्याचे साह्यानें **दीवेस** पुनः वेढा दिला. हा वेढा आठ महिनेपर्यंत होता. किल्ल्याचे रक्षक अगदीं थोडके होते, तथापि त्यांनीं मोठ्या शौर्यानें लढून शत्रूचे सर्व हल्ले निष्फळ केले. या वेढ्यांत देखील फिरंगी लोकांच्या बायका मोठ्या हिमतीनें लढल्या. एका हल्ल्यांत शत्रूचा सेनापति **खोज्या ज्याफर** तोफेच्या गोळ्यानें मारला गेला. तेव्हां त्याचा मुलगा **रूमीखान** ह्यानें आपल्या बापाचे स्थानीं होऊन वेढा पूर्ववत चालविला. शेवटीं किल्लेकऱ्यांची अन्नसामग्री संपून ते निर्वाणीच्या स्थितींत येऊन ठेपले. अशा प्रसंगीं **जुवांव दे कास्त्र** ह्या नांवाचा नवा प्रतिनिधि इसवी सन् १५४८ त **गोव्यांस** आला. तो मोठा राजकारणी आणि महान् योद्धा होता. **दीवेच्या** वेढ्याचें वर्तमान ऐकतांच त्यानें आपल्या मुलास तेथील सुभेदाराचे मदतीस पाठविलें, आणि नंतर आपण स्वतः तेथें गेला. त्यानें मार्गांतील शत्रूचीं गलबतें पकडून त्यांवरील लोकांस देहांत शासन केलें. नंतर त्यानें **अनसूत** व दुसरीं शहरें यांचा फार नाश

---

*कर्नाटकाच्या किनाऱ्यावर एका लहान राज्याचे राणीनें यूरोपस्थांस खंडणी देणें नाकारिलें, ह्मणून तिचें मुख्य शहर बैतखोल याचा नाश करून तिला शिक्षा केली.—मौन्तगोमरी. "जाळण्याच्या पूर्वी बैतखोल शहर सजीव प्राण्यांच्या रक्तानें वाहविलें; नंतर त्याच्या आसमंतांत सर्व मुलुक उजाड केला आणि सर्व झाडें कापून टाकिलीं."— फारीय ई सौज.

केला, आणि ब्राह्मणांच्या व वाण्यांच्या सुंदर स्त्रियांचीही कत्तल केली.* सारांश त्या खाटक्यांनीं तारुण्य किंवा सौंदर्य, वार्धक्याची पवित्रता, किंवा बाळपणाचा निरुपद्रविकपणा,† यांकडे कांहींच लक्ष दिलें नाहीं. दीवस पोंचल्या नंतर प्रतिनिधीनें शत्रूशीं तुंबळ युद्ध करून किल्ल्याचा वेढा उठविला, आणि शेवटल्या लढाईंत त्याचा पूर्ण पराजय केला. क्रिस्ती धर्माची वृद्धि करण्यासाठीं या युद्धांत पाद्री देखील मोठ्या आवेशानें लढले. रणभूमीवरील अपजया नंतर शत्रु शहरांत पळून गेले; तथापि क्रोधयुक्त झालेल्या फिरंगी सैन्यानें त्यांचे मागें लागून फारच कत्तल उडविली. सर्व घरें आणि गल्ल्या रक्तानें वाहिल्या. पुरुषांची कर्मगति स्त्रियांस चुकली नाहीं. तान्हीं बालकें स्तनपान करीत असतां त्यांचे व त्यांच्या आयांचे एकाच खड्गघातानें त्यांनीं तुकडे केले. पहिल्यानें त्यांनीं रत्नें, सोनें, व रूपें, यांची लूट काढिली. दुसऱ्या लुटींत त्यांस शत्रूचीं निशाणें, २०० मोठाल्या तोफा, व युद्धसामग्री सांपडली†." ह्या युद्धांत फिरंग्यांचे १०० शिपाई पडले. आणि शत्रूचीं रूमीखान, दुसरे कांहीं सरदार, व इतर शिपाई वगैरे मनुष्यें पांच हजारांवर मारलीं गेलीं.

अशा विभवशाली जया नंतर खंबायत किनाऱ्याची नासधूळ करण्यास ३० लढाऊ तारवें प्रतिनिधीनें पाठविलीं. त्यांवरील मुख्य सरदारानें गोगा नामक शहरावर छापा

---

* मॅन्न गोमरीकृत हिंदुस्थानचा इतिहास भाग १ पृष्ठ. ११९.

† फारीय इ सौज.

घालून ज्युनाखान नांवाच्या हबसी सरदारास युद्ध-धृत करून त्या शहराचा विध्वंस केला. प्रतिनिधीची स्वारी गोंव्यांस परत येतेवेळीं शत्रूचीं जीं गलबतें सांपडलीं त्यांचीं पूर्वोक्त व्यवस्थे प्रमाणेच दशा झाली.

गोंवें नगराचे नौकावरोहनावर उतरल्या नंतर जयवाद्यें वाजवीत जुवांव दे कास्त्र त्या सुंदर शहरांत शिरला. त्यानें आपल्या मस्तकावर तजाचे पानांचा मुकुट धारण केला होता. क्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याकरितां वरील स्वारींत सर्व पाद्री लोकांत 'फ्रा आंतोनी' नामक एक पाद्री प्रमुख झाला होता, तो हातांत क्रुसाची मूर्ति घेऊन समोर चालिला. मागें शृंखळा घातलेले सहाशें बंदीवान होते. पुढें गुजराथचें राजकीय निशाण धुळींत लोळत होतें. शहराचे सर्व रस्ते रेशमी कपड्यांनीं आस्तरण केले होते. त्यांवर सोन्याचीं व रूप्याचीं फुलें पसरलीं होतीं. तो विजयी योद्धा जात असतां युरोपस्थांच्या सुंदर कुलस्त्रिया आपल्या शोभिवंत घरांच्या खिडक्यांतून त्याच्या पायांकडे कोमल फुलें टाकून सुवासिक पाण्याचे बिंदु शिंपूं लागल्या. ह्या प्रकारचा जयोत्साह फिरंगी लोकांचे कारकीर्दींत गोवें शहरांत पूर्वी कधींच झाला नव्हता.

या प्रतिनिधी बरोबर विजापुरचे राजानें तह केला. त्यांत असें ठरलें कीं, सासष्टी आणि बारदेश ह्या दोन प्रांतांचा सर्व प्रकारचा हक्क आदिलशाई सरकारानें सोडून ते प्रांत गोंवा सरकारास द्यावे, आणि त्याबद्दल प्रतिनिधीनें आबदुल्ला ख्रास विजापुरकराचे स्वाधी-

न करावा. या तहाच्या कांहीं अटी पुरविण्यांत बेबनाव झाल्या मुळें विजापुरचे राजानें मोठें सैन्य देऊन सलाबतजंग नामक सरदारास बारदेश परत घेण्याकरितां पाठविलें. तो सरदार गोमांतकांत येऊन तें काम अडथळ्या शिवाय सिद्धीस नेणार इतक्यांत गोव्यांहून एक सैन्य जाऊन त्याची पुढें येण्याची चाल बंद केली. तेव्हां तो सरदार मागें हटून फोंड्याच्या घाटाकडे गेला. तेथेंही फिरंगी सैन्यानें त्यास गांठून त्याबरोबर लढाई केली. शत्रु जीवावर उदार होऊन मोठ्या निकरानें लढले; तथापि त्यांचा मुख्य सरदार सलाबतजंग मारला जाऊन त्यांची दाणादाण झाली.

ह्या पराभवा नंतर गोवा सरकारावर जय मिळविणें कठीण आहे असें जाणून विजापुरचे राजानें प्रतिनिधी बरोबर एकोप्याचा सल्ला केला. हें वर्तमान दक्षिणेंतील सर्व मुसलमान राजांस समजतांच त्यांनींही पोर्तुगेज सरकाराशीं तह करून आपले वकील गोव्यांस पाठविले. या नंतर सर्वत्र शांतता झाली.

पुढें सन् १५५४त अबदुल्ल खानानें ३००० युरोपस्थ पायदळ आणि २०० तुरुकस्वार इतकी फौज गोवा सरकाराकडून घेऊन तो आपणास विजापुरचा राजा ह्मणऊं लागला. त्यास साह्यार्थ प्रथमतः पुष्कळ लोक मिळाले आणि शेवटीं त्याचाच जय होईल असा सुमार दिसूं लागला. त्यानें फोंडें जवळचा मर्दनगड हा किल्ला तेथील रखवालदारां कडून घेऊन गोव्यांचा सेनाध्यक्ष आंतोनी दे नोरोन्ज याचे स्वाधीन केला. त-

सेंच सर्व कोंकण सई करून गोवा सरकारास दिलें. तेव्हां त्याचा वसूल फिरंगी लोक घेऊं लागले. नंतर अबदुल्ल खानानें बरेंच सैन्य जमवून विजापुरावर स्वारी केली. त्यावेळीं त्याचें इब्राइमशहाचे फौजे बरोबर युद्ध होऊन अबदुल्ल याचे सैन्याचा अगदीं अपजय झाला,आणि तो शत्रुचे हातीं सांपडून प्राणास मुकला.

पुढें अबदुल्ला याचे मरणानंतर विजापुरचे राजानें मोठें सैन्य पाठवून फिरंगी लोकांकडून कोंकण परत घेतलें. नंतर त्या लष्करानें बारदेश प्रांतावर हल्ला केला. हें वर्त्तमान सरसुभेदारास समजलें, तेव्हां त्यानें त्यांस प्रतिरोध करण्याकरितां ४००० शिपाई आणि तीनशें घोडे स्वार इतकें लष्कर गोव्यांहून रवाना केलें. ह्या लष्करास बारदेश प्रांताचे सरहद्दीवर शत्रूंची गांठ पडली, त्यावेळीं दोनही पक्षांचें तुंबळ युद्ध झालें. मुसलमान लोक हातघाईवर येऊन लढले. शेवटीं फिरंगी सैन्य एकदांच निकरानें हल्ला करून शत्रूंच्या रांगा फोडून आंत शिरलें. तेव्हां शत्रूंची दाणादाण होऊन ते फोंडे शहराकडे पळून गेले.

ह्या रीतीनें आदीलशाई राजा बरोबर लढाई झाल्या नंतर इसवी सन् १५५८त फिरंगी लोकांनीं दमणबंदर परत घेऊन तेथील किल्याचे रक्षणार्थ १२०० शिबंदी लोक ठेविले. पुढें ह्याच वर्षीं त्यांनीं बुलसर हें शत्रूचें शहर छापा घालून घेतलें; परंतु गुजराथचे राजाचें बलाढ्य सैन्य आल्यामुळें तें फार दिवस फिरंगी लोकांचे हातीं टिकलें नाहीं.

सन् १५६९त गोव्यांतील सरसुभेदारानें हुनावर शहरावर स्वारी केली. त्यावेळीं सरसुभेदारा बरोबर १३० लढाऊ तारवें व ३०००शिपाई होते. शत्रूंच्या हातीं शहर जाऊं नये ह्मणून रहिवासी लोकांनीं जबरदस्त अडथळा केला, परंतु त्यांच्या मारापुढें त्यांचें कांहींच चाललें नाहीं. शेवटीं हें बंदरी शहर फिरंगी लोकांच्या स्वाधीन झालें.

सन् १५७० त फिरंगी लोकांच्या संस्थानावर अतिभयंकर विघ्न उद्भवलें. तें असें कीं, विजापुरचा राजा **अली आदीलशहा** अहंमद, नगरचा **निजामशहा**. आणि कालिकोटचा **सामरीम**, हे दक्षिणेंतील तीन प्रबल राजे एकत्र होऊन हिंदुस्थानाच्या किनाऱ्यापासून पोर्तुगेज लोकांस हांकून देण्यास सिद्ध झाले. त्यावेळीं **दोंलुईस दे आताईद** हा गोव्यांचा सरसुभेदार होता. पहिल्यानें दोनही मुसलमान राजांनीं युरोपस्थांवर दोन ठिकाणीं एकदम हल्ले केले. विजापुरच्या राजानें १००००० पायदळ, ३५००० स्वार, २०४० हत्ती, आणि ३५० तोफा इतकें लष्कर फोंडच्या घाटानें गोव्यांत आणिलें. नदी उतरून गोवा बेटांत शिरण्यासाठीं शत्रूनें फार प्रयत्न केला; परंतु दों **लुईस** यानें प्रत्येक हल्ल्यांत त्यास मागें हटविलें. बेटाच्या रक्षणार्थ ह्मटलें ह्मणजे ७०० शिपाई, १३०० पाद्री, व ३० तोफा होत्या. असें असतां सरसुभेदार कांहींच डगमगला नाहीं. पुढें लवकरच जवळच्या प्रांतांतून कांहीं कुमक मिळाल्यामुळें शत्रूचे सैन्यावर मोठ्या शौर्यानें त्यानें छापा घातला. दोन महिने लो-

टल्यावरं आदीलशहानें अगदीं त्रासून प्रतिनिधी बरोबर पत्रव्यवहार चालविला; परंतु ज्याअर्थी उभयपक्षकारांनीं वेढ्याचा शेवट करण्याची इच्छा एकमेकांस तुच्छ मानून गर्वानें छपविली होती, त्याअर्थी तो पत्रव्यवहार नसाच राहिला. नंतर सरसुभेदारास चहुंकडून मदत येऊं लागली, त्यावेळीं फिरंगी लोकांची शक्ति इतकी वाढली कीं, पुढें जय मिळविण्याची शत्रूंस किंचितही आशा राहिली नाहीं. असें असतां अल्ली यानें आपल्या खासगी स्वारांचा सरदार **सुलेमान आगा** यास येकदां गोवा वेटावर हल्ला करण्यास हुकूम केला. तेव्हां त्या सरदारानें ५००० निवडक स्वारांनिशीं इतका जबरदस्त आणि आकस्मित हल्ला केला कीं, सुरसुभेदारानें त्यास अडविण्या साठीं अतिशय प्रतिरोध केला, तथापि त्याचें कांहींच चाललें नाहीं. शेवटीं त्यानें लागलीच वेटांतील सर्व फौज जमवून शत्रूवर निर्धारानें हल्ला केला, आणि त्यास हाकून दिलें. नदीच्या दुसऱ्या कांठावरून जेव्हां अल्ली यानें असें निबंधशील युद्ध आणि आपले सैन्याचें पलायन अवलोकन केलें, तेव्हां त्याचें हृदय बोधानें आणि उद्योग भंगानें अतिशय संतप्त झालें. शेवटीं अल्ली आदीलशहा अगदीं भग्नाश होऊन सुमारें आठव्या महिन्याचे समाप्तीस आपल्या फौजेसह स्वराज्यास चालता झाला. या स्वारींत विजापुरकर राजाचे १२००० लोक, ३०० हत्ती, व ४००० घोडे मारले गेले.

इकडे मुर्तज निजामशहा यानें ३४००० घोडेस्वार १००००० पायदळ, १६००० पथ शोधक, ३६०

हत्ती, असंख्य बैल, ७० मोठाल्या तोफा, आणि अनेक देशांतील व्यापारी वगैरे इतर मंडळी सुमारें ४०००, इतक्या इतमामानें कोंकणांत येऊन चौलावर जबरदस्त हल्ला केला. त्या वेळीं लुईस फ्रेर ह्या नांवाचा सुभेदार चौल येथें होता. शत्रु प्राप्त झाला त्यावेळीं त्या जवळ सर्व २००० फौज होती. असें असतां त्या सुभेदारानें आपल्या बुद्धीचा आणि शौर्याचा भरवंसा धरून शत्रूंच्या असंख्य सैन्याशीं टक्कर देण्याचा निश्चय केला. चौल हें भूखंडावर असून त्याच्या बाजूस संरक्षणार्थ एक लहान भिंत असल्यामुळें शहरांत शिरतानां त्यास शत्रूंस विशेष प्रतिबंध करितां आला नाहीं. परंतु नंतर आंतील सर्व फिरंगी लोक सरकारी वाड्यांत आणि खासगी घरांत राहून मोठ्या निकरानें कित्येक महिने पर्यंत लढले. तथापि शत्रूनें भयंकर हल्ला करून फिरंगी लोकांस समूळ हाकून देण्याचें योजिलें, आणि साहाव्या महिन्याचे एकुणतिसावे तारखेस त्यांवर हल्ला केला. फिरंगी लोकांची लहान टोळी एकसारिखी इमारतीवर उभी होती. प्रथमत: उभय पक्षांकडून तोफांचा मारा सुरू होऊन नंतर भयावह दारूण युद्ध झालें. त्यांत पहिल्यानें मुसलमानांचा जय होईल असा सुमार दिसूं लागला; परंतु शेवटीं फिरंगी लोकांचा पराक्रम जययुक्त होऊन शत्रूंची दाणादाण झाली. ह्या युद्धांत ३००० वर शत्रूचे लोक मारले गेले व फिरंगी लोकांचें बरेंच नुकसान झालें. नंतर निजामशहानें तहाचें बोलणें लाविलें, तेव्हां उभयतांमध्यें आपआपल्या राज्याचे रक्षणाच्या कामांत एकमेकांस मदत करावी असा तह ठरला.

ह्याप्रमाणें दोन्ही मुसलमान राजांनीं यथास्थितपणें छकड खाल्यावर तिसरा राजा **सामरीन** यानें सुमारें ११०००००लोकांनिशीं **कलिकोटा जवळ चाल** ह्मणून **फिरंगी** लोकांचा एक किल्ला होता त्यास वेढा दिला. तेथील अधिकाऱ्याचे स्वाधीन लोक अगदीं थोडके असल्यामुळें तो तें स्थळ आक्रमण करणाऱ्या राजाचे स्वाधीन करण्याच्या बेतांत होता, इतक्यांत गोव्याहून बरीच कुमक आणि पोटगीचें सामान पोंचलें,तेव्हां **सामरीन** यानें वेढा उठविला. नंतर त्या राजा बरोबर तह झाला.

पुढें इ० स० १५७०चे समाप्तीस गोव्याचे प्रतिनिधीनें हिंदुस्थानांतील सर्व राजांबरोबर तह केले.

या सुमारास गोव्यांच्या सत्तेखालीं फिरंगी लोकांचीं जीं संस्थानें होतीं तीं येणेंप्रमाणें:—गुजराष्ट्राच्या किनाऱ्यावर; * **दीव**. हिंदुस्थानाच्या पश्चिम किनाऱ्यावर; **दमण**,* **दाबूल**, **वसई**, **साष्टीबेट**, **मुंबई**, **माहीम**, **तारापूर**, **करंज्याबेट**, **कलीकोट**, आणि **कोची**, हीं संस्थानें; आणि **हुनावर**, **बर्सलूर**, **मंगळूर**, **काननूर**, व **काननूर** यथें काटबंदी केलेल्या मजबूद वखारी. सिंहलद्विपांत; **कांहीं बंदरें**. चौल मंडल किनाऱ्यावर; **निगापटण**, **मत्छलीपटण**, आणि **मलीयापूर**. बंगालांत; **व्यापाराच्या कांहीं जागा**. इराणी आखातांत; **ऊर्मज व बसोरा**. आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर; **सोफाला**,* **मोसांबीक**,* आणि **मोंबास***. सुंदा बेटांत; **तिमोर***, व **सोलोर***. चिनेच्या कांठीं; **मकाव**.* आरबस्थनांत ; **मस्कत**. या खेरीज हिंदुस्था-

---

* हीं संस्थानें मात्र सांप्रतकाळीं फिरंगी लोकांच्या ताब्यांत आहेत.

नाच्या पुर्वेकडील बेटांत पुष्कळ वसाहती होत्या.

पुढें दाहा वर्षें पर्यंत कांहीं ऐतिहासिक विशेष गोष्टी घडून आल्या नाहींत, परंतु सन १५८१त मोंगल लोकांचें एक प्रबल सैन्य येऊन दमण वर पडलें. तेव्हां तेथील अधिकाऱ्यानें मोठया शौर्यानें लढून त्यांस पिटून लाविलें.

सन् १५८५त **संगमेश्वर** येथील नाईकानें पोर्तुगेज लोकांविरुद्ध कांहीं गैरवर्तणूक केल्यामुळें गोव्यांच्या सरसुभेदारानें त्यावर हल्ला करण्यास्तव **विजयदुर्ग** नदींत एक मोठें आरमार पाठविलें. तसेंच सरसुभेदाराचे कुमकेसाठीं विजापुरचे राजानें **रुस्तमखान** नामक आपल्या फोंडे येथील सुभेदारास खुष्कीनें पाठविलें. हीं दोनही लष्करें पोहंतांच नाईकाची पांचावर धारण बसून तो अरण्यांत पळून गेला. नंतर त्याबरोबर फिरंगी सुभेदाराचा तह झाला.

सन् १५९२त **अहंमद नगरचा** राजा बरहन निजामशहा ह्यानें मोठ्या सैन्यानिशीं चौलावर पुनः हल्ला केला. तेथील किल्ल्याचे रक्षणार्थ सुमारें ३००० लोक होते, त्यांनीं मोठ्या हिमतीनें किल्ल्याचें रक्षण केलें. इतकेंच नाहीं, परंतु कितीएकवेळां आंतून बाहेरून शत्रूंचा फार नाश केला. तेव्हां **निजामशहा** अगदीं त्रासून वेढा उठवून जात असतां फिरंगी लोकांनीं मागें लागून त्याचे ५ हत्ती, ७५ तोफा, आणि पुष्कळ लोक बंदीवान केले. यांत निजामशाई सेनापति **फरहदखान*** हा होता, याशिवाय शत्रूंचे लोक १०,००० रांवर मारले गेले. फिरंगी लोकांचें फारसें नुकसान झालें नाहीं.

---

* पुढें या सरदारानें युरोपांत जाऊन क्रिस्ती धर्म स्वीकारला.

# प्रकरण साहावें.

## इ० स० १६०० पासून १८०० पर्यंत झालेलें वर्तमान.

इसवी सन् १६००त वलंदेजी लोक हिंदुस्थानास आले. तेसमयीं फिरंगी लोकांचा अधिकार आणि ऐश्वर्य हीं अवलोकन करून ते त्यांची स्पर्धा करूं लागले. त्यांस असें वाटलें कीं, हिंदुस्थानांतील सर्व संपत्ति लुटून फिरंगी लोक आपला देश स्वर्णमय करून टाकतील. यास्तव त्यांचा पिच्छा पुरवून जितकीं संस्थानें त्यांच्या स्वाधीन आहेत, तितकीं आपण आपल्या अधिकारांत आणावीं. अशा द्रोहशील विचारांत ते निमग्न असतां कर्मधर्मसंयोगानें फिरंगी लोकांचीं जलयानें गोव्यांहून मलाकास जात होतीं, त्यांतून एका जलयानानें वलंदेजांस गांठलें. त्यावेळीं उभयपक्षांचें कांहींवेळ समुद्रयुद्ध झालें; परंतु त्या ठिकाणीं फिरंगी लोकांचीं दुसरीं जलयानें पोहंचतांच शत्रु भयांत होऊन मागें हटले.

नंतर फिरंगी लोकांनीं पूर्व समुद्रांतील इंग्रजांच्या व्यापारी जहाजांवर अकस्मात हल्ला केला, त्याकाळीं परस्परांमध्यें मोठी भयंकर लढाई झाली. ती बहुत दिवस चालली. तेणेंकरून इंग्रजांस हानी अतिशय आली. ह्मणून ते मोठे क्रुद्ध होऊन शत्रूंचा नाश करण्यास सिद्ध झाले. तेव्हां फिरंगी लोकांचें एक मोठें लढाऊ जहाज गोव्यांहून मलकास जात होतें त्यास एकाएकीं नौकावेष्टन घालून त्यांनीं त्यावरचा सर्व माल जप्त केला.

सन् १६०३त वलंदेजी लोक नौकासमूहासहवर्तमान **बांदाद्वीप** येथें गेले. त्यावेळीं फिरंगी लोक अगदी बेसावध होते. शत्रु येईल असें त्यांस भासलें नव्हतें. किनाऱ्यावर उतरून वलंदेजांनीं किल्ल्यास वेढा दिला. त्यावेळीं फिरंगी लोक सपराक्रम लढले, त्यामुळें शत्रूचे बहुत लोक रणांगणांत पडले. शेवटीं भगीरथ प्रयत्नानें त्यांनीं फिरंगी लोकांस तेथून लावून दिलें. अशा क्षणिक जयानें रणासक्त होऊन फिरंगी लोकांची मुख्य राजधानी **गोंवें** शहर यावर हल्ला करण्यास ते सिद्ध झाले. परंतु ते समयीं त्यांपाशीं लढाई करण्याजोगें सैन्य नव्हतें. ह्मणून युरोप खंडांतून बलाढ्य सेना आणून ते गोव्यांवर हल्ला करण्यास **आग्वादच्या** उपसागरांत प्राप्त झाले. त्याकालीं फिरंगी लोकांनीं किल्ल्यांतून तोफांचा भडिमार शत्रूंवर चालविला, आणि आपलें अजिंक्य आरमार मांडवी नदीच्या मुखावर ठेऊन, तेथूनही ते तोफांचे आवाज काढूं लागले. या भयंकर मारापुढें निरूपाय होऊन अतिकुत्सित शत्रु मागें हटले. नंतर फिरंगी लोकांनीं **आग्वाद** आणि **मुगांव** एथील किल्ल्यांत युद्ध सामग्री व निवडक रक्षक ठेऊन कडिकोट बंदोबस्त केला.

सन् १६०५त वलंदेजी लोकांनीं आंबोयनावर स्वारी केली. त्यावेळीं फिरंगी लोक मोठे सावध असल्या कारणानें वलंदेजांचा स्मरण राहावयाजोगा पराजय केला. पुढें आणखी कांहीं दिवस पर्यंत युद्ध चालून किती एक वेळां उभयतांचे जय पराजय झाले. शेवटीं **पूर्वद्वीपसमूह** एथील अधिकाऱ्यांच्या साह्यानें सन् १६०७त **आंबोये-**

ना आणि तिरोर हीं दोन शहरें वलंदेजांनीं हस्तगत करून घेऊन फिरंगी लोकांस तेथून समूळ चालवून दिलें.

सन् १६०८त फिरंगी लोक कांहीं फौज व आरमार घेऊन जाहोर एथें गेले. तेथील सरदार व शिपाई यांस कैद करून त्यांनीं तटबंदी वगैरे पाडून टाकिली. त्या काळीं तेथील लोक रानोमाळ झाले. हें वर्तमान फिरंगी लोकांचे प्रतिस्पर्धी वलंदेजी लोक यांस समजतांच ते मोठ्या नौका समूहा सवर्तमान तेथें आले, आणि फिरंगी लोकांशीं युद्ध करून त्यांस तेथून लावून दिलें.

सन् १६०९त चौल एथील सुभेदार अबदुल करीम यानें फिरंगी लोकांचीं जलयानें धरण्यांस समुद्रांत फिरण्यासाठीं तीस जहाजें पाठविलीं, परंतु इतक्यांत असें झालें कीं, फिरंगी लोकांचीं गलबतें उत्तर कोंकणांतून गोव्यांस जात होतीं, त्यांवरच्या मुख्याधिकाऱ्यानें त्यांतील कांहीं मजबूत जहाजें पकडून उत्तरकोंकणांत पाठवून दिलीं. हें कृत्य इतर नाविक जनांनीं अवलोकन करून ते चौलास परत गेले.

नंतर फिरंगी लोकांनीं इंग्रज लोकांच्या अजिंक्य आरमारावर खंबायतच्या आखातांत अकस्मात हल्ला केला, त्यावर वेस्ट नामक इंग्रज मुख्य अधिकारी होता. उभयतांचें किंचित्काल मोठें भयंकर समुद्र युद्ध झालें. परंतु त्याचा कांहीं निर्णायक शेवट झाला नाहीं. कांहींवेळ तसेच चालून फिरंगी लोक सुरत आणि गोगा या शहरांत गेले, आणि तीं लुटून जाळून टाकिलीं.

सन् १६१५त प्रथम महिन्याचे विसावे तारखेस

तोदसांत नामक तारवावर आपलें विजयी निशाण उभारून गोव्यांचा प्रतिनिधि इंग्रज लोकांच्या नौकासमूह समवेत युद्ध करण्यास गेला. उभयतांच्या जहाजांतून गोळ्यांचा भडिमार होऊं लागला असतां दोघांच्या सैन्यांचा नाश झाला. ह्या भयंकर लढाईंत* फिरंगी लोकांचीं दोनशें पन्नास मनुष्यें हतजीवित झालीं.

सन् १६२०त सिंहलद्वीपांतील फिरंगी संस्थानावर वलंदेजी लोकांनीं मोठा नौकासमूह पाठविला, परंतु सर्व अधिकारी फिरंगी लोकांस अनुकूळ असल्यामुळे त्यांचें कांहींच चाललें नाहीं. ह्याचवर्षीं फिरंगी आणि इंग्रज यांच्या आरमारांची लढाई सुरू झाली. त्यावेळीं फिरंगी लोकांनीं गोळ्यांची वृष्टि करून इंग्रजांच्या सेनाध्यक्षास ठार केलें, तेणेंकरून इंग्रज लोक धैर्य खचून मागें हटले. दोन वर्षां नंतर फिरंगी लोकांची आणि इराणच्या बादशाहाची लढाई झाली, तींत बुशायर आणि उरमज हीं संस्थानें मुसलमानांनीं परत घेतलीं.

सन् १६२३त सिंहलद्वीपांतील कांडीचा राजा आणि फिरंगी लोक यांचें भयंकर युद्ध झालें, त्यांत कांडीचा राजा पराजय पावला, त्यामुळें वर्षाचे खंडणी बद्दल फिरंगी लोकांस दोन हत्ती प्रतिवर्षीं देण्याचें त्यानें मान्य केलें.

इसवी सन् १६२७ ह्या सुमारास विजापुरच्या राजा-

---

* इंग्रज ग्रंथकार आपलीं कितीं मनुष्यें मारलीं गेलीं हें लिहीत नाहींत; परंतु ह्याअर्थीं फिरंगी लोक इंग्रजाप्रमाणें नौका युद्धांत निपुण होते, त्याअर्थीं त्यांनीं त्यांचीं कांहीं तरी मनुष्यें मारिलीं असावीं.

कडून डिचोली, सांखळी, पेडणें, व अंत्रुज हे चार प्रांत मराठ्यांनीं जिंकून घेतले. हे प्रांत त्यावेळीं देसाई लोकांच्या ताब्यांत असून ते कुडाळकर देसाई ह्यास खंडणी देत होते.

सन् १६३०त फिरंगी लोकांनीं इंग्रजाच्या व्यापाराचा मोड करण्यासाठीं सुरतची नाकेबंदी केली, व तेथील सुभेदारास असें पत्र लिहिलें कीं, त्या बंदरांतील व्यापार आमच्या स्वाधीन असावा. अन्य लोकांच्या स्वाधीन असूं नये. फिरंगी लोकांचें व त्याचें वैमनस्य असल्यामुळें त्यानें ही गोष्ट नाकारली. इतक्यांत हें वर्तमान इंग्रज लोकांस समजलें, त्यावेळीं कांहीं तारवें व ५०० गोरे लोक घेऊन इंग्रज लोक फिरंगी लोकां बरोबर लढाई करण्यास सिद्ध झाले. त्यांनीं एकदम फिरंगी लोकांवर सुरते जवळ हल्ला केला. तेव्हां फिरंगी लोक मोठ्या शौर्यानें लढले. त्यामुळें इंग्रजांचे पुष्कळ लोक मरण पावले. अशा अपजयानें ते मोठे क्रुद्ध होऊन त्यांनीं सभा केली, तींत असें ठरलें कीं, दुसऱ्या दिवशीं फिरंगी लोकांवर एकाएकीं हल्ला करून त्यांचा नाश करावा. त्याप्रमाणें फिरंगी लोकांवर हल्ला करून त्यांनीं त्यांचा अतिशय तोटा केला. नंतर फिरंगी लोकांस असें वाटलें कीं,इंग्रज लोक आतां राज्य प्राप्ति करून घेण्याविषयीं फार झटत आहेत, तर त्यांस आपण नानाप्रकारें त्रास द्यावे; ह्मणून ते त्यांस सर्व ठिकाणीं त्रास देऊं लागले.शेवटीं निरुपाय होऊन त्यांनीं फिरंगी लोकांकडे तह केला.

सन् १६४०त फिरंगी लोक स्वतंत्र झाले. हें व-

र्तमान इंग्रजांस समजतांच त्यांनीं त्यां कडे सख्याचें बोलणें चालविलें. ह्यावेळीं वलंदेजांनीं फिरंगी लोकांचीं बहुतेक संस्थानें घेतलीं होतीं, यास्तव हें त्यांनीं कबूल केलें नाहीं. ह्याच वर्षीं वलंदेजांनीं साहा महिनें पर्यंत वेढा घालून मलाका फिरंगी लोकांकडून जिंकून घेतलें. उपरांतिक तीन वर्षांनीं वलंदेजांनीं गोव्यावर हल्ला केला; परंतु फिरंगी लोकांनीं त्यांस मागें हटविलें. सन् १६४४त वलंदेजांनीं फिरंगी लोकांबरोबर तह केला.

सन् १६४८त आरब लोक मोठ्या सैन्या सवर्तमान मसकत येथें आले; आणि तें हस्तगत करून घेतलें.

सन् १६५२त फिरंगी लोक आणि वलंदेजी लोक ह्या दोहोंमध्यें लढाई सुरू झाली. ती पुष्कळ वर्षें चालली. फिरंगी लोकांनीं त्यांचा पुष्कळ वेळां पराभव केला; परंतु त्यांचें सैन्य अधिक असल्या कारणानें ते पुन्हा पुन्हा फिरंगी लोकांवर हल्ला करीत. शेवटीं पंधरा वर्षांमध्यें वलंदेजांनीं किलोन, कागानोर, काननूर, बातेविया, पोर्का, कोची, कालिचर, कलाकोट, जफनापट्टण, नेगापट्टण, कोलान, इत्यादि संस्थानें फिरंगी लोकांकडून जिंकून घेतलीं.

सन् १६६३त फिरंगी लोकांनीं शिवाजी राजाकडे वकील पाठविला. शिवाजीनें त्यांस असें लिहून पाठविलें कीं, तुह्मी आह्मास सर्व युद्ध सामग्री पुरवाल तर आह्मी तुह्मावर शस्त्र धरणार नाहीं, व तुह्मास कोणत्याच तऱ्हेचा त्रास देणार नाहीं ही गोष्ट फिरंगी लोकांनीं मान्य

केली नाहीं ह्मणून त्यानें दाबूलचे खाडींत फिरंगी लोकाची लढाऊ जाहजें होतीं त्यांवर छापा घातला. त्या वेळीं फिरंगी लोकांस मोठा क्रोध येऊन त्यांनीं शिवाजीचीं कांहीं तारवें पकडून वसई येथें नेऊन ठेविलीं. शिवाजीनें मोठ्या सैन्यासहित वसईवर जाऊन फिरंगी लोकांच्या घोडबंदर किल्ल्यावर एका एकीं हल्ला केला; परंतु तो त्याचे हातीं लागला नाहीं. **सिंहलद्वीप** एथील राजावर आणि त्याचे रयतेवर फिरंगी लोक मनास मानेल तसा जुलूम करूं लागले. कांदी एथील राजास हें असह्य होऊन फिरंगी लोकांचे प्रतिस्पर्धी वलंदेज यांस त्यानें साह्यासाठीं विनंती केली. त्यांनीं हालंडांतून एक मजबूत आरमार कांदिच्या राजाचे कुमकेस पाठविलें. त्यांचीं व फिरंगी लोकांचीं युद्धें चोवीस वर्षेपर्यंत होऊन शेवटीं फिरंगी लोकांचा शेवटचा किल्ला कोलंबो हा त्यांच्या हातीं लागला.

सन् १६७४त **सदाशिव** राय सवंदेचा राजा यानें विजापुरच्या सुलताना कडून पंचमहाल स्वाधीन करून घेतला. त्याचा मुलगा **बसवलींगराय** यानें सन् १६९७ पर्यंत स्वतंत्र राज्य केलें. इमोडी **सदाशिव** ह्मणून त्यास मुलगा होता. तो गादीवर बसल्या नंतर १७६२त मराठे लोक मोठ्या सैन्या सवर्तमान सवंद्यास आले आणि त्यास जिंकलें. त्यावेळीं त्यांस चवथाई देण्यास त्याकडे पैसा नवता. यास्तव **गोपाळराव** याकडे त्यानें पंचमहाल गहाण ठेविला, तो त्यानें पैसे देऊन सोडविला. पुढें १७६३त हैदरअल्लीनें सवंद्यावर एकदम हल्ला केला, त्यावेळीं तो फिरंगी लोकांनीं आश्र-

यास आला, आणि त्यांस पंचमहाल दिला. फिरंगी सरकारानें त्या बद्दल त्यास ४८००० रुपये वर्षासन करून दिलें.

सन् १७०९त फिरंगी लोक आणि सावंतवाडीचा सरदेशाई ह्या उभयतांमध्यें लढाई सुरू झाली, ती बहुत दिवसपर्यंत चालली. मराठ्यांनीं बहुत पराक्रम केले; परंतु फिरंगी लोकांपुढें त्यांचें कांहींच चाललें नाहीं. शेवटीं ते निरुपाय होऊन मागें हटले.

नंतर गोव्यांच्या सरसुभेदारानें इराणच्या राजाकडे वकील पाठविला, त्याचा त्यानें उत्तम सत्कार केला. इतक्यांत असें झालें कीं, आरब लोकांनीं मोठ्या लष्करा सर्वतमान इराण देशावर स्वारी केली. त्यावेळीं आपल्या मित्राचें राज्य परस्वाधीन होऊं नये म्हणून एक मोठा बलाढ्य नौकासमूह तयार करवून गोव्यांच्या प्रतिनिधीनें राजाच्या साह्यार्थ पाठविला.

सन् १७३७त कुलाबा घेण्यास मानाजी नामक मराठा सरदार यास फिरंगी लोक अनुकूळ होऊन, कुलाबा त्याच्या स्वाधीन झाला; परंतु त्यांस देण्याकरितां रेवदंड्याच्या जवळचा मुलूक त्याणें कबूल केला होता तो तो देईना. यास्तव फिरंगी लोक संभाजी आंग्र्यास अनुकूळ होऊन मानाजी कडून कुलाबा घ्यावयास सिद्ध झाले. त्याच्या निवारणार्थ पेशवा गेला. त्यानें तें कामसिद्धीस नेऊन ७००० रुपये रोख व ३०००, रुपयाचें सामान, कांहीं चिनाई व कांहीं युरोपी, प्रतिवर्षीं आपणास द्यावें असा मानाजीपासून करार करून घेतला.

त्यानंतर फिरंगी व मराठे यांचीं कितीएक युद्धें झालीं, त्यांत प्रतमत: चवथ्या महिन्याचे सहावे तारखेस रात्रौ वसई जवळचा एक लहानसा किला मराठ्यांनीं स्वाधीन करून घेतला; आणि तेथील मुख्याधिकाऱ्यांस ठार मारिलें. फिरंगी लोकांनीं आपला सूड उगविण्यास येऊं नये ह्मणून त्यांनीं सर्वत्र निवडक सैन्य ठेऊन रस्ते बंद केले. लोकांस नदी उतरून पलिकडे ठाणें ऐथें जावें लागलें. तसेंच साष्टीच्या मुख्याधिकाऱ्यानें तेथील किल्याच्या रक्षणार्थ फेराज आणि ठाण्याच्या किल्याचे रक्षणार्थ त्या सरदारास निवडक सैन्यानिशीं ठेऊन तो कारांजा बेटांत जाऊन राहिला.

तो तेथें पोंचला नाहीं इतक्यांत मराठ्यांनीं ठाण्यावर ऐकदम दोन जबरदस्त हल्ले केले. प्रथमत: फिरेरानें शौर्यें करून शत्रूचें निवारण केलें; परंतु दुसऱ्या हल्यांत तो लढाई करतां करतां पराकष्टेचा जखमी झाला. नंतर पेशव्यानें जिंकून घेतलेला मुलूक निर्भय करण्याकरितां आणि फिरंगी लोकांसमेत लढाई चालू ठेवण्याकरितां कांहीं आरब लोक चाकरीस ठेविले. मुंबईतिल इंग्रज लोकांनीं त्यावेळीं मराठ्यांस मदत करण्याकरितां कांहीं सेना व युद्ध सामग्री पाठविली; आणि पुढें ते मध्यस्थपणा दाखवूं लागले. एका वर्षानंतर व्यंकटराव घोरपडे ह्मणून एक पेशव्याचा सरदार कोंकणामध्यें फिरंगी लोकांचें पारिपत्य करण्याकरितां कितीएक स्वार घेऊन गोव्यांकडे आला. दुसरा सरदार खंडोजी मानकर यानें कोंकणाच्या उत्तरेस लष्करा सह-

वर्तमान आसरी किल्ल्यास वेढा दिला, तेथें पाचशें गोरे व चारशें एतद्देशीय क्रिस्तांव इतकें सैन्य होतें. त्यांनीं मोठ्या शौर्यानें युद्ध केले. त्या युद्धांत मराठ्यांच्या फौजेचा अगदीं मोड झाला. इंग्रजांनीं फिरंगी लोकां बरोबर तह करण्याची मराठ्यांस मसलद दिली, आणि ते गुप्तपणें दारू गोळा त्यांस विकूं लागले. मराठ्यांचे कित्येक मुख्य सरदार चिमणाजी आपा, शिंदे, होळकर, वगैरे सरंजाम घेऊन त्यांशीं लढाई करण्याकरितां गेले होते, त्याबरोबर लढाई करतां करतां बहुतेक फिरंगी लोक मरण पावले. तेसमयीं मुंबई हें बेट लहानसें गांव होतें. तेथील इंग्रज लोकांमध्यें व फिरंग्यांमध्यें राजकीय वैर आणि हेवारूप व्यापारासंबंधी मनोधर्म यांहीकरून द्वैत भाव उत्पन्न झाला. दुसरें कारण असें होतें कीं, सन् १६६१त पोर्तुगालच्या बादशहानें आपली कन्या इफांत कातेरीन हिला इग्लंद देशाचा राजा दुसरा चार्लस यास देऊन आपल्या जामातास मुंबई आंदणांत दिली. त्याचवर्षीं पांच सहा जहाजाचें आरमार त्यावर सर आंद्रु शीपमन याची नेमणूक करून अर्ल आफ मार्लबरो हा सनदी सवर्तमान नव्या महिन्याचे १८ वे तारखेस मुंबई बेटांत दाखल झाला. परंतु तेथील पोर्तुगीज लोकांच्या मनांत तें बेट आपल्या स्वाधीन असावें असा मनोदय होता; ह्मणून ते तें देईनात. यास्तव मार्लबरो साहेबास पाय मोकळे करण्याकरितां कोठें तरी ठिकाण शोधणें भाग पडला त्या वेळीं तो वर्षा करण्यास आद्यद्वीप* बेटावर उतरला. तेथें

* हें बेट गोव्यापासून सुमारें १८ मैल अंतरावर आहे.

कांहीं दिवस विश्रांति घेण्यास राहिला, तेणेंकरून त्याचे ३०० गोरे शिपाई आणि सर आंद्रु शीपमन हे रोगकारक हवेनें मरण पावले. पुढें पोर्तुगाल एथील बादशहाच्या आज्ञेनें मुंबई बेट इंग्रजाचे स्वाधीन झाल्यावर ते फिरंग्याकडे साष्टी मागूं लागले. तेव्हां ते ह्मणाले कीं, साष्टीशीं आणि मुंबईशीं मुळींच संबंध नाहीं. यास्तव आह्मीं तुह्मास साष्टी देणार नाहीं. पुढें ज्यावेळीं त्यांपासून मराठे लोक साष्टी घेऊं लागले, त्यावेळीं इंग्रजांसें अत्यानंद झाला, व त्यास गुप्तपणें मदतही देऊं लागले. कारण ते समजले होते कीं, मराठे लोकांपासून साष्टी कधीं तरी आपल्यास प्राप्त होईल.

सन् १७३९त पर्जन्य काळ संपल्यावर फिरंगी लोकांबरोबर लढाई करण्याकरितां व्यंकटराव नारायण घोरपडे गोव्यांच्या सन्मुख आला. त्यांच्या बरोबर पुष्कळ घोडदळ होतें. चिमाजीआपा, शिंदा, होळकर, हे कोंकणांत आले. त्यांबरोबर बलढ्य सैन्य, पुष्कळ तोफा, व असंख्य पायदळ होतें. फिरंगी लोक हिमतीनें लढत असतां त्यांचे बहुतेक किल्ले शत्रूंनीं घेतले. शेवटीं तारापूर एथील किल्ल्यावर बाजी भिवराव, रामचंद्र हरि, यशवंतराव पोवार, व तुकाजी पोवार ह्यांनीं एकदम चढाव केला. परंतु फिरंगी लोकांनीं त्यांस शौर्य करून मागें हटविलें. शेवटीं राणोजी भोसला खंदक उतरून तटाचे भिंतीस शिडी लाऊन किल्ल्यांत शिरला, तथापि फिरंगी लोक सर शेवट पर्यंत मोठ्या शौर्यानें लढले.

नंतर दुसऱ्या महिन्याच्या सत्तावे तारखेस चिमणाजी

**आपाच्या** बिनिवाला व **शंकराजी नारायण** यांनीं वसईच्या किल्ल्यास खुशकी करून वेढा घातला; आणि त्या किल्ल्यास ज्या बाजूनें पाणी आहे, तेथें **मानाजी** आंगऱ्या येऊन त्यानें तो वेढा पुरा केला. तेथील किल्लेदारांनीं नम्रपणानें विनंती केली कीं, जसा तुह्मी जंजिरा एथील शिद्धी यां कडे करार केला तसाच आह्माशीं कराल तर आह्मी किल्ला रिकामा करून देतों. परंतु चिमणाजी आपाच्या मनास ती गोष्ट येईना. कारण त्याला असें वाटलें कीं, या प्रकारचें मजबूत आणि बळकट स्थळ फिरंग्यांच्या स्वाधीन असलें तर निःसंशय आपण घेतलेला सर्व मुलुख ते परत घेतील; आणि पर्जन्य काळाच्या अगोदर हें काम तडीस न गेलें तर ही सर्व खटपट व्यर्थ जाईल. मैदानामध्यें जागोजाग मोर्चे बांधून एका मोर्चाहून दुसऱ्यास किल्लेकऱ्यांच्या तोफांचा मारा चूकवून जाण्या करितां जमीन खणून मोठ मोठाले चर पाडून रस्ते केले. किल्लेकरी गरनाळांतून कुलपी गोळे व दगड वगैरे भरून त्या चराच्या वाटेवर टाकून दर रोज शत्रूंचे लोक पुष्कळ मारीत. याप्रमाणें बहुत दिवस पर्यंत हा प्रकार चालला होता. ह्मणून मराठ्यांनीं फार तोफांचा भरणा आणून त्यांच्या तोफांचा उपाय चालेनासा केला. नंतर किल्ल्याच्या तटास भोंक पाडिलें; परंतु त्यांस त्यांतून आंत शिरतां आलें नाहीं. तेव्हां किल्ल्यांत जाण्यास पुरेशी वाट व्हावी ह्मणून ते खालीं सुरुंग पाडूं लागले. किल्लेकरी यांनीं त्या सुरुंगाच्या सुमारें आंतून सुरुंग पाडून त्यांचे यत्न व्यर्थ केले. असे पुष्कळ

वेळां झालें. शेवटीं त्या मराठयांनीं मसलत केली कीं, एकदम पांच सुरुंग उडऊन तटास मोठें खेंडार पाडावें; ह्मणजे मार्ग मोठा होईल. नंतर पांच सुरुंग तयार केले. त्यांत तीन जवळ आणि दोन दूर. त्या दोहोंतल्या एकाला प्रथमतः आग घातली. तो चांगला उडाला नाहीं. मग जे जवळ तीन होते, त्यांस एकदांच आग लाविली; तेंव्हां त्यांतील दोन उडाले; तेणें करून खेंडार मोठें पडलें. त्यावेळीं मराठे किल्ल्यांत शिरण्याकरितां जवळ गेले. तों तिसरा सुरुंग उडाला. आणि त्यांत ते सांपडून पुष्कळ मेले गेले. बाकी राहिले त्यांस किल्लेकऱ्यांनीं फार हैराण केलें. त्यामुळें ते मागें हटले. नंतर दुसरा एक सुरुंग मराठ्यांनीं पाडून त्यास आग घातली. तो चांगला उडाला, तेणें करून अर्धा बुरूज कोसळला. त्यावेळीं त्यांनीं पुन्हा हल्ला केला, तेंव्हां फिरंगी लोक मातीच्या टोपल्या भिंती प्रमाणें रचून तेथून तोफा मारूं लागले. शेवटीं मराठ्यांनीं फारच सपाट्यानें हल्ला केला. तेंव्हां फिरंगी लोकांनीं मातीच्या टोपल्या भिंती सारख्या रचून तेथून तोफा लागू करून आपला जीव वांचविला; आणि मराठ्यांस जवळ येऊं दिलें नाहीं. पुढें त्यांच्या खाण्यापिण्याचा पुरवठा संपल्यामुळें त्यांस तह करणें भाग पडलें. ह्मणून त्यांनीं शत्रूशीं करार करून आठ दिवसांचे आंत किल्ला त्यांच्या स्वाधीन केला. या किल्ल्याच्या युद्धांत मराठयाचे ५००० वर लोक मारले गेले, व फिरंगी लोकांचे ९०० जायां झाले. **ग्रांटडफ इंग्रजी ग्रंथकार** ह्मणतो कीं, याप्रकारचें निग्रहाचें युद्ध मराठे लो-

कांहीं कधींच केलें नाहीं. याप्रमाणें वसई, साष्टी, ठाणें, तारापुर, इत्यादि संस्थानें मराठ्यांच्या स्वाधीन झाल्यावर ते गर्विष्ट होऊन गेले. इकडे व्यंकटराव घोरपडे यानें गोमांतकांत येऊन साष्टी आणी बार्देश ह्या प्रांतांवर हल्ले केले. तेथील लोकांस लुटून कित्येक घरांस आग लाविली व त्यांवर फारच जुलूम चालविला. त्याच्या पराभवार्थ फिरंगी लोक मोठ्या शौर्यानें लढले. परंतु जिकडे तिकडे त्यांचा अपजय झाल्यामुळें त्या वेळीं त्यांस शत्रूला हाकून देतां आलें नाहीं. फिरंगी लोकांच्या समुद्रावरील स्वामित्वाचा नाश करण्यासाठीं आंग्र्यानें त्यांचे आरमाराचा समूळ विध्वंस केला.

सन् १७४१त गोव्यांच्या प्रतिनिधीनें ब्राझील देशांतून १२००० शिपाई आणून मराठ्यांकडून सासष्टी आणि बार्देश हे दोन प्रांत परत घेतले. व फोंडेच्या मर्दनगड किल्ल्यास वेढा घालण्यास हुकूम केला. किल्लेकरी लोक जीवावर उदार होऊन लढले. तथापि युरोपस्थांच्या शौर्यापुढें त्यांचें कांहींच चाललें नाहीं. शेवटीं तो किल्ला फिरंगी लोकांच्या स्वाधीन झाला. त्याच दिवशीं गोव्यांचा प्रतिनिधि एका एकीं मरण पावला.

फिरंगी लोकांशीं व मराठ्यांशीं वारंवार युद्धें चाललींच होतीं. त्यांत फिरंगी लोकांनी वाडीचा सरदेसाई रामचंद्र सावंत याकडून त्याच्या राज्यांतील डिचोली, फोंडें, पेडणें, सतरी, आणि मणेरी, हे पांच परगणे घेतले.

यानंतर जयराम सावंत जो वाडी संस्थानांत रामचंद्रसावंत याबरोबर राज्यकारभार चालवीत होता. त्यानें

गोमांतकावर स्वारी केली. तो मोठा शूर आणि योद्धा होता. मराठी सरदारांत जेवढे गुण असावेत तेवढे त्याच्यामध्यें होते. त्यानें बारदेशावर हल्लाकरून तो प्रांत लुटून जाळून फस्त केला, त्यामुळें फिरंगी लोकांनीं येशवंतगड व पांच परगणे सोडून देऊन आपला मुलूक संरक्षण करण्या करितां फौज माघारां आणिली. बारदेश येथें फिरंगी लोकांची व जयराम सांवत याची भयंकर लढाई झाली, तींत जयराम सांवतानें बरीच छकड खाऊनें तो माघारां वाडीस गेला. पुढें दोन वर्षेंपर्यंत मराठ्यां बरोबर समुद्रांतून व जमिनीं वरून लढाया सतत चालल्यां होत्या, त्यांत गोव्यांच्या प्रतिनिधीनें मोठें सैन्य पाठवून फोंडें महाल परत घेतला; परंतु तो फार दिवस त्यांच्या हातीं टिकला नाहीं. कारण तेथून सैन्य निघतांच मराठ्यांनीं एकदम त्यावर हल्ला करून तो माघारां घेतला. मराठ्यांच्या लढायांनीं फिरंगी लोक अगदीं त्रासून गेले होते, ह्मणून त्यांनीं पेशव्याकडे सल्ल्याचें बोलणें लाविलें. तें त्याणें संतोषपूर्वक मान्य केलें. नंतर परस्परांमध्यें तह झाला. त्यांत असें ठरलें कीं, मराठ्यांचा भूखंडा वरील मुलूक भोंसल्यास परत करून फिरंगी लोकांनीं पुण्याच्या दरबारांत वकील पाठवावा.

सन् १७६३ त संवदेचा राजा इमोदी सदाशिव याकडून पंचमहाल. व कानकोण हे प्रांत आणि रामाचें भूशिर एथील किल्ला फिरंगी लोकांच्या ताब्यांत आला. नंतर मराठे लढाईंत गुंतले आहेत असें जाणून गोव्यांच्या

तिनिधीनें मर्दन गडावर पुनः हल्ला केला, आणि थोड-क्याच वेळांत तो आपल्या ताब्यांत घेतला.

इकडे असें वर्तमान घडलें कीं, फिरंगी लोक **चोला**-हून गोव्यांस येत असतां ३०० घोडेस्वार व ५००० शिपाई यां सहित वाडीकर देसाई **खेमसावंत** एकाएकीं त्यांवर पडला. कांहीं वेळ पर्यंत उभयतांचें युद्ध झालें. दोन्ही पक्षांचे लोक हात घाईवर येऊन जीवित्वाची आशा नधरितां लढले. या साहसी युद्धांत फिरंग्याचे १००. शिपाई मरण पावले, व शत्रूचेंही फार नुकसान झालें.

सन् १७८१त पोर्तुगालच्या बादशहानें **साष्टी** वगैरे ठाणीं मराठ्यांकडून परत घेण्या करितां एक मोठें बलाढ्य आरमार गोव्यांस पाठविलें; परंतु तीं ठाणीं त्या वेळीं इंग्रजाच्या ताब्यांत गेल्यामुळें त्या आरमारास मागें जावें लागलें. कारण कीं त्या दोन्ही युरोपस्थ राष्ट्रांचा पहिल्यानेंच तह झाला होता.

इकडे वाडीच्या **भोसल्या** बरोबर गोवा सरकारच्या लढाया पुनः चालल्या. सतरींतील **राणे** व **सरदेसाई** यांणीं बंड करून त्या प्रांतांतील फिरंगी लोकांचा अधिकार नष्ट करण्याचा प्रसंग आणिला. ते दिवसें दिवस लोकांस लुटून फार त्रास देऊं लागले. त्यांमुळें कित्येक गांव तर त्यांच्या भयानें निर्जन होऊन गेले होते.

सन् १७८१त गोव्यांच्या प्रतिनिधीनें हा त्यांचा दंगा बंद करण्यास कांहीं फौज पाठवून त्यांस तेथून हाकून दिलें, आणि डिचोली व मणेरी हे दोन प्रांत **खेम सावंत** याकडून घेतले. परंतु लवकरच मराठे लोक मोठ्या से-

त्यानिशीं येऊन त्यांनीं **मणेरी** प्रांत परत घेतला. कांहीं दिवसां नंतर सतरीच्या राण्यांनीं पूर्ववत् बंड केलें. त्या वेळीं फिरंगी लोक मोठे क्रुद्ध होऊन त्यांनीं तेथील शिपाई लोकांस बरतर्फ करून **राणे** व **देसाई** यांकडून सर्व अधिकार घेतला, आणि त्यांस बैठा पगार, मोकासे, इनामें, वगैरे देण्याचें कबूल केलें.

सांप्रतकाळीं गोमांतकांत समावेश होणारा पेडणें प्रांत गोवा सरकाराचे ताब्यांत येण्याला असें कारण झालें कीं, **शिवाजी विश्राम सबनीस** ह्मणून एक ब्राह्मण खेम सांवताच्या पदरीं होता. त्यानें खेमसांवता करितां आपलें वजन पुणें दरबारांत खर्चून **महादाजी** शिंध्याची मुलगी **लक्ष्मीबाई** त्याची बायको होई सारखें केलें. तेणेंकरून आणि **जिवबा केरकर** याच्या योगानें दिल्लीच्या बादशहाकडून त्यास दोन मोर्चलें, व राज बाहदूर असा किताब मिळाला. हा योग्य सन्मान कोलापुरच्या राजास असह्य झाल्यामुळें त्यानें **भरतगड** हा किल्ला घेतला. नंतर **वेगुर्लें** व **निवती** हीं स्थानें अदथळ्या शिवाय त्याच्या स्वाधीन झालीं.

अशावेळीं फिरंगी लोकांकडे **कुशबा नाना** यास खेम सांवतानें पाठविलें. या वकीलानें असें बोलणें लाविलें कीं, लढाई बद्दल जो खर्च तुह्मास होईल त्याच्या ऐवजीं **पेडणें महाल** तुमच्या स्वाधीन करितों. हें फिरंगी लोकांनीं मान्य करून त्यांस मदत केली.

## प्रकरण सातवें.

### इसवी सन् १८०० पासून १८७२ पर्यंत झालेलें वर्तमान.

इसवी सन् १८०१त इंग्रज लोकांनीं आग्वाद आणि काव्र हे दोन किल्ले हस्तगत करून घेतले. परंतु सन् १८१५त फिरंगी व इंग्रज लोकांचा तह झाल्यामुळे ते त्यांचें त्यांस परत मिळाले.

इसवी सन् १८१७त शंभू गोविंद ह्या नांवाच्या वाडी संस्थानांतील सरदारानें फिरंगी लोकांचा तेराखोल नामक किल्ला लुटला, त्यावेळीं त्यांस मोठा राग येऊन त्यांनीं रेडीच्या किल्ल्यास वेढा दिला. ह्या वेळीं उभयतांची मोठी भयंकर लढाई झाली; परंतु फिरंगी लोकाचें कांहींच चाललें नाहीं. फिरंगी लोक किल्ल्यास सत्तावीस दिवस पर्यंत तळ देऊन उभे होते. शेवटीं ते निरुपाय होऊन मागें हटले.

इसवी सन् १८२१त पोर्तुगाल देशांत राज्यसंबंधी फेरफार झाल्यामुळे गोव्यांतील सैन्यानें बंड केलें आणि रीयुदेपार्द ह्या सुभेदारास काव्रच्या किल्ल्यांत कैद करून चौघे असामी राज्यव्यवस्था राखण्यास नेमिले.

इसवी सन् १८४४त वाडी संस्थानांतील फोंडसावंत नामक सरदारानें इंग्रज सरकारा विरुद्ध बंड केलें. फोंड

सांवत यास आठ मुलगे होते. ते सर्व येऊन त्यास मिळाले. बंडास विशेष दृढता यावी एतदर्थ वाडीच्या राजाचा जेष्ट मुलगा फोंडसांवत ऊर्फ आना साहेब यास पाठऊन त्यांनीं मनोहर किल्ला आपल्या स्वाधीन करून घेतला. कांहीं दिवस गेल्यावर मेजरदेलामोत ह्यानें मनोहर किल्ल्यावर छापा घातला. त्यावेळीं ते निरुपायहोऊन गोमांतकाच्या सरहद्दीवर उसपकर आणि हवेळकर देसाई यांच्या आश्रयास येऊन राहिले. यांनींही ह्या वेळीं बंड माजविलें होतें. कर्नल आवत्राम साहेबानें त्या बंड वाल्यांचा पुष्कळ नाश केला. मेजरजकब सांवतवाडीच्या पोलिटिकल यानें सरकारचे आज्ञेवरून जाहिरनामा प्रसिद्ध केला तो असा कीं, जो बंडवाल्यांस पकडून देईल त्यास ३००० रुपये इनाम दिले जातील. व फोंडसांवताचे मुलगे, भिम सांवत ऊर्फ नाना देसाई, तान सांवत ऊर्फ बाबा देसाई, हनुमंत सांवत, आपू देसाई, आणि फोंडसांवत यांस जो पकडून देईल त्यास २००० रुपये इनाम दिले जातील.

हें वर्तमान बंडवाल्यांस समजतांच ते दुसऱ्या महिन्याचे समाप्तीस आना साहेबा सहित पडणें प्रांतीं आले, आणि गोव्यांच्या सरसुभेदार 'जुजे फरैर पेस्तान' यास असें सांगून पाठविलें कीं, जर तुह्मी आह्मास आश्रय द्याल तर आह्मी तुमच्या स्वाधीन होतों. सरसुभेदारानें आश्रय देण्याचें कबूल केलें, त्यावेळीं फोंडसांवत व आना साहेब पणजीस आले. फिरंगी सुभेदारानें त्यांचा उत्तम इतमाम राखून त्यांस रहाण्यास उत्तम स्थळ दिलें.

बंडवाल्यांस फिरंगी सरकारानें आश्रय दिल्याचें वर्तमान

इंग्रज सरकारास समजतांच मुंबईच्या सुभेदारानें **कपतान आर्थर** यास गोमांतकांत पाठविलें, परंतु त्याच्या वकीलीचा कांहींच उपयोग झाला नाहीं. नंतर **जेकब साहेब** स्वतः पणजीस आला, परंतु त्याचाही परिश्रम व्यर्थ गेला.

सन् १८४७त आनासाहेब व दुसरे बंडवाले ह्यांनीं वाडींतील पोलिटिकल **जेकब साहेब** यास आपण केलेल्या अपराधाची क्षमा करावी म्हणून एक पत्र लिहिलें व फिरंगी सरकारानेंही त्याविषयीं शिफारस केली. तेव्हां मुंबईच्या सुभेदारानें जेकब साहेबाच्या अनुमोदनानें त्यांस अपराधाची माफी केली. त्यावेळीं आनासाहेब, उसपकर देसाई, हवेलकर देसाई, फोंडसांवताचे चार मुलगे, व एक नातू इतके लोकांस फिरंगी लोकांनीं सोडून दिलें, व बाकीच्यांस समुद्र पार केलें. गोमांतकांत फिरंगी लोकांच्या आश्रयाखालीं १६१ वाडीचे बंडवाले आले होते, त्या पैकीं सुमारें २० असामी वजनदार होते.

इसवी सन् १८५२त सत्तरी येथील राणे व सरदेसाई यांच्या कांहीं मागण्या गोव्यांचा सुभेदार **बारांव दें वोरें** यानें कबूल केल्या नाहींत, म्हणून त्यांनीं दिपा राण्यास प्रमुख करून फिरंगी सरकारा विरुद्ध बंड केलें. बंड वाले सुमारें ५०० होते. ते प्रसिद्धपणें फिरंगी सरकारा बरोबर शस्त्र धरण्यास सिद्ध झाले. त्यांनीं असा निश्चय केला कीं, जिकडे तिकडे लूट काढून रयतेस व फिरंगी सरकारास त्रास द्यावा. म्हणून ते श्रीमंत लोकांस लुटून गरीब लोकांस त्रास देऊं लागले. ह्या प्रमाणें त्यांनीं आपला क्रम पुष्कळ दिवस चालविला, त्यावेळीं गोमांतकांतील लोक अगदीं कि-

गलीत व भयाभीत होऊन गेले. रात्र झाली ह्मणजे सर्व लोक दरवाजे बंद करीत. अशा प्रसंगीं वाडे लोकांनीं ही संधी साधून तेही लोकांस लुटूं लागले. ते बहुत करून पद्ये (करचेभट) असत. ते फार क्रूर असल्यामुळे लोकांस फार त्रास देत. एकदा असें झालें कीं, त्यावेळीं दीपाराण्यानें कुंभारजुवें बेट लुटलें त्या वेळीं पद्यांनीं तेथील बहुतेक घरें जाळून टाकिलीं. राणा आलारे! राणा आला! असें एकानें ह्मटलें ह्मणजे सर्व लोक आपला माल मत्ता कोठें तरी दडवून डोंगरावर जाऊन लपत, व सकाळ उजेडली ह्मणजे घरीं येत. ह्या बंडवाल्यांची लूट कांढण्याची अशी चाल होती कीं, एकदम घरांत शिरून मालकास पकडावें आणि त्याकडे जो माल मत्ता असेल तो लुटून घ्यावा. जर त्यानें कुरकुर केली तर त्यास लागलेंच भोसकून अगर शस्त्र घातानें मारावें. ते कधीं कधीं बायकांवर देखील जुलूम करीत.

अशी गोष्ट घडून आली कीं, सांखळी ह्या गांवांत गुर्ळीकर उपनामक एक ब्राह्मण रहात असे. तो राण्याचा अतिशय शत्रु होता, त्यास व त्याच्या [illegible] कुटुंबास मारण्याच्या उद्देशानें राण्यानें त्याच्या घरास रात्रौ एकदम वेढा दिला, आणि आंत जाण्यास दरवाजा फोडूं लागले. त्या वेळीं त्या धीट ब्राह्मणानें तीन तास पर्यंत बंदुकाचे आवाज काढिले, आणि त्यांस आंत शिरूं दिलें नाहीं. ते पळून जाण्याच्या बेतांत असतां त्या ब्राह्मणाच्या एका मुलानें दारू गोळा संपला असें आपल्या बापाला सांगितलें. हें बंडवाल्यांनीं ऐकतांच पुन्हा ते दरवाजा फोडूं लागले,

आतां शत्रु घरांत खचीत शिरतात असा त्या ब्राह्मणाचा निर्धार होऊन तो तत्क्षणीं दुसऱ्या दरवाज्यांतून बाहेर पडून आपलें कुटुंब संरक्षण करावें ह्या हेतूनें इतर लोकांस जागृत करूं लागला; परंतु कोणीएक त्याच्या मदतीस गेला नाहीं. नंतर राण्यांनीं त्या ब्राह्मणाच्या घरांत शिरून त्याचें सर्व घर लुटलें, इतकेंच नाहीं, परंतु त्याचे तीन मुलगे पकडून नेले व मार्गांत दोघांस ठार मारिलें. व तिसऱ्यास अतिशय मार दिल्यामुळें तो जमिनीवर पडला. त्यास ते उठऊं लागले, त्या वेळीं त्यानें मेल्याचें सोंग घेऊन आपला प्राण रक्षण केला.

इकडे केरीचे भट यांनीं तर फारच अनर्थ केलें. त्यांनीं मोठ मोठाले भरवस्तीचे गांव अगदीं जमीन दोस्त करून सोडिले. अशा तरेचा कृतोपद्रव फिरंगी सुभेदारास सहन न होतां त्यानें त्यांतून कित्येक पकडून तोफेच्या तोंडीं दिले. व जे अतिशय अपराधी होते त्या भटांस अर्धे गाढून मारिलें.

ह्या प्रमाणें चहुंकडे बंड उठलें असतां, सरकारानें आपलें बहुतेक लष्कर बंडवाल्यांचा पाटलाग करण्यास पाठविलें. परंतु त्यांनीं जरी त्या बंडवाल्यांस पकडलें नाहीं तरी त्यांतील कित्येकांस ठार मारिलें. कारण ह्यावेळीं फिरंगी लोकाचें सर्व सैन्य बहुत करून काळ्या लोकांचें होतें. सरकारी लोक गावांत आले असें समजलें ह्मणजे बंडवाले दुसऱ्या गावांत जाऊन लुटीत. कदाचित् बंडवाल्यांची त्यांस गांठ पडली तर ते बंडवाल्यां समोर निजातां त्यांस पळून जाण्यास संधि देत. फौजेवरच्या अम्मलदारांतील कांहीं युरोपस्थ अम्मलदार शूर आणि चपळ होते. त्यांनीं

सरकाराची फार चांगली चाकरी बजाविली. त्यांत फोंडें येथील पलटणीवरचा सेनाध्यक्ष माजोर हा फार हुशार होता. त्याच्याच प्रयत्नामुळें बंड शांत झालें. त्यानें प्रत्येक परगण्यांत आपले शिपाई ठेवून जेथें बंडवाला सांपडेल तेथें त्यास गोळी घालून मारावा, असा त्यांस हुकूम दिला. एका वेळीं त्या सरदारानें केरीच्या बहुतेक बंडखोर पद्यांस पकडून फोंड्या जवळ त्यांस फाशीं दिलें.

असा लष्करी कायदा अमलांत आणिल्या मुळें दीपा राणा व त्याची बंडखोर मंडळी भिऊन त्यांनीं नवीन सर सुभेदार पेस्तान या बरोबर सल्ला केला. तो असा कीं दीपा राण्यास दरवर्षी सरकारानें ५०० रु० पेनसन द्यावें आणि त्यानें सरकाराच्या चाकरीस हजीर असावें. तेव्हां राण्याच्या नांवावर जे लुटारू लोक लुटीत ते नाहींसे झाले.

सन् १८७०त पेस्तान साहेब सरसुभेदाराचे कारकीर्दींत गोमांतकांत सर्वत्र शांतता होती. इतक्यांत एथील फौजेनें एकाएकीं बंड केलें. हें बंड करण्याचें कारण असें झालें कीं, सन् १८६९त बाराव्या महिन्याच्या दुसऱ्या तारखेस पोर्तुगालच्या बादशाहाकडून जें आज्ञापत्र आलें होतें, त्यांतील हुकुमाप्रमाणें कांहीं लष्करी लोकांस बरतर्फ करून बाकीच्यांचा पगार कमी करावा. असें सरकारि वर्तमानपत्रांत वारंवार प्रसिद्ध होत होतें. ह्या वरून कोणास दूरकरतील आणि कोणास ठेवतील ही सर्व लष्करास धास्ती पडून ते बंड करण्यास सिद्ध झाले.

ह्या वेळीं गोमांतकांत चार पलटणी, कांहीं गोलंदाज, आणि कांहीं नगरीय शिपाई इतकें लष्कर होतें. त्यांतून पणजींत गोलंदाज आणि नगरीय सैन्य;मठग्राम येथें पहिली पलटण; फोंडयथें दुसरी पलटण; तिसरी डिचोलींत आणि चवथी ह्मापसें येथें होती. हें सर्व लष्कर सुमारें ३०००वर होतें.

पोर्तुगेज राजाच्या आज्ञेप्रमाणें गोमांतकांतील सरकारानें मठग्राम येथील पहिल्या पलटणीचे कांहीं शिपायांस बरतर्फ केलें. हें वर्तमान डिचोली एथील तिसऱ्या पलटणीस समजतांच त्यांनीं असा विचार केला कीं, दुसरी पाळी आपणावर येईल त्यापक्षीं आपण अगोदरच कांहीं तरी उपाय योजावा हें बरें. असा निच्छय करून दुसऱ्या महिन्याचे चोविसावे तारखेस त्या पलटणीचे सुमारें २०० शिपाई आपल्या सैन्यालयांतील बंदुका व दारूगोळा वगैरे युद्ध सामग्री सहित असनोडें येथे गेले, आणि ह्मापसें एथील चवथ्या पलटणीची वाट लक्षीत राहिले. ह्या बंडखोर शिपायांचा वाईट कित्ता मठग्राम येथील बरतर्फ केलेल्या शिपायांनीं घेऊन त्याच रात्रीं सुमारें तीन वाजतां त्या शहरांत बंडाचा ध्वज उभारिला. आपला सेनाध्यक्ष **माजोर तेलीस्** याच्या सांगण्याकडे आणि धमकीकडे लक्ष न देतां त्यांनीं तेथील कांहीं युद्ध सामग्री स्वसत्तेनें घेऊन तेथून कूच करून ते आंबोडाच्या तरीजवळ गेले आणि नंतर ती तर उतरून बोरी ह्या गावांत फोंडच्या पलटणीची मार्गप्रतीक्षा करीत राहिले. त्यांचा असा बेत होता कीं, चारही पलटणी एकत्र जमल्यावर कुलालद्वी-

पाची खाडी उतरून नीट राजधानीवर चालून जावें.

मडग्राम येथील पलटणीनें खरोखर बंड केलें आहे असें समजतांच फोंडेची पलटण बंडवाल्यांस येऊन मिळाली. त्या रात्रीं त्या दोनही पलटणी कुरटी ह्या गावांत वस्तीस राहिल्या.

हें वर्तमान जिकडे तिकडे पसरलें; तेव्हां रहिवासी लोकांत एकच गोंधळ होऊन गेला. सरसुभेदारानें तात्काळ आपल्या मंत्र्यांस जमवून, लोकांचे प्राण आणि मालमत्ता राखण्यासाठीं बंडवाल्यांस समजावून परत लावण्यास कांहीं अधिकारी पाठवावे असें ठरविलें. नंतर त्यानें तोफखान्यावरचा मुख्य अधिकारी, लिमा साहेब व दुसरे कांहीं कामदार यांस पाठविलें त्यांनीं बंडवाल्यांस समजावून बहुत प्रकारें सांगितलें, परंतु त्याचा अनुपयोग झाल्यामुळें ते निराश होऊन सरसुभेदाराकडे आले.

पंचविसाव्या तारखेस त्या बंडखोर लोकांनीं वळवई येथील मैदानांत तळ दिला. तेथें असतां डिचोलीची तिसरी पलटण त्यांस येऊन मिळाली.

नंतर त्या बंडखोर लोकांनीं सरकारास असें लिहून कळविलें कीं, जर आह्मास ह्या अपराधाची क्षमा होईल आणि पूर्वीं प्रमाणें पगार मिळेल तर आह्मी आमच्या सैन्यालयांत परत जातों. सरकारानें तें त्यांचें बोलणें मान्य केलें. इतक्यांत सत्ताविसाव्या तारखेस ह्मापसेंची चवथी पलटणी बंडवाल्यांस येऊन मिळाली, तेव्हां त्यांनीं आपल्या वचनाचा परित्याग करून ते सरकारावर पुनः उलटले.

घारही पलटणी फिरल्या असें जेन्हां सुभेदारानें ऐकिलें, तेन्हां त्यानें मंत्री समूहाच्या अनुमतानें शांतता राखण्यासाठीं पुनः कांहीं निवडक मंडळी बंडवाल्यांचा काय उद्देश आहे हें समजून घेण्यास्तव पाठविण्याचा निश्चय करून, कुंभारजुंवेंचा बारांव, लष्करावरचा चिटणीस माज्योर ओ. से. से. दे आलबुकेर्क, आणि जे. कोरेय सिव्ल ई गामा यांस पाठविलें. ते तेथें गेल्यावर बंडवाल्यांनीं त्यांचा योग्य आदर सत्कार केला; नंतर त्यांच्या प्रमुखांचें आणि त्या तीन अधिकाऱ्यांचें संभाषण होऊन ते बंडवाल्यांचे हेतू सरसुभेदारास कळविण्यास गेले.

बंडवाल्यांच्या सर्व कर्तव्य प्रतिज्ञा सरकारानें मान्य करून जेथें लष्करी ठाणीं होतीं तेथें त्या छापून प्रसिद्ध केल्या. त्यांत लष्करी लोकांचे पहिले सर्व हक्क कायम राखिले होते. बंडवाल्यास ही बातमी समजतांच ते संतुष्ट होत्साते गर्वानें फुगून तिसऱ्या महिन्याचे दुसऱ्या तारखेस आपापल्या छावणी प्रत गेले. ह्या प्रमाणें हें लष्करी लोकांचें नाटकरूप पहिले बंड संपलें.

विस्कोंद दे सांव जानुआरी या बुद्धिमान आणि विद्वान सरसुभेदाराचे कारकीर्दींत गोमांतकांतील फौजेनें बंड करण्याचा निश्चय केला. हें वर्तमान सरसुभेदारास समजतांच त्यानें चौकशी केली. त्यावेळीं ह्यापसें एथील पटालनीवरचे दोन अधिकारी व आठजण दफेदार हे बंडांत प्रमुख आहेत असा त्यांचा अंदेशा आल्यामुळें त्यांस आग्वाद आणि मुर्गांव ह्या दोन किल्ल्यांत कैद केलें, व दुसऱ्या अधिकाऱ्यांस बोलावून आणून आपल्या पटाल-

मींची व्यवस्था राखण्यास हुकूम केला. असा बंदोबस्त केला असतां दुसऱ्या दिवशीं रात्रौ ११ वाजतां डिचोली एथील पळटन आपल्या सेनाध्यक्षास कैद करून जुन्या गोव्यांस गेली, आणि तेथें बोंजेजूस् नामक मठांत तळ देऊन तिनें युद्धसंग्रहालयांतील तोफखाना, टंकसाळ, व इतर युद्धसामग्री आपल्या स्वाधीन करून घेतली.

जेव्हां डिचोलीच्या पटालनीनें बंड केल्याचें वर्तमान सरसुभेदारास समजलें, तेव्हां त्यानें पणजी शहर रक्षणार्थ कडीकोट तयारी चालविली. रात्र समयीं सर्व शहरांत पाहारे ठेऊन त्यानें स्वतः सर्व शहराचें रक्षण केलें.

बंडाची बातमी ऐकतांच पणजी शहर केवळ समरंगण होऊन गेलें. लष्करी कामदार मोठ्या दक्षतेनें तयारी करूं लागले. सरसुभेदार भर लष्करी पोशाख करून तयार झाला. सरकारी राजवाड्या सभोंवतीं शहरांतील लोकांचा रगाडा पडून ते बंदुकांचे आवाज काढूं लागले. ह्याप्रमाणें नगरवासी लोकांत लढाईचा एकच गोंधळ होऊन गेला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं १०० मनुष्यांची एक टोळी पिमातेल नामक अधिकाऱ्या सहित मठग्राम शहरांतील सैन्यालयांत गेली; परंतु तेथील सैन्यानें पूर्वींच कूच केलें असें जाणून ती तिसऱ्या पटालनीस जाऊन मिळाली.

सर्व पटालनी एकत्र झाल्या हें वर्तमान जेव्हां सरसुभेदारास समजलें, त्या वेळीं राज वाड्याकडे येण्यास जेवढे मार्ग होते तेथें त्यानें चार मेढेकोट उभारिले, आणि गोलंदाज लोकांस असा हुकूम केला कीं, जर बंडवाले

शहरावर चालून येतील तर त्यांवर एकदम तोफा सोडाव्या. नंतर शहर रक्षणार्थ जेवढे राजनिष्ठ लोक होते त्यांकडून शपथ घेतली.

दुसऱ्या दिवशीं सरसुभेदारानें देशवासी लोकांत जाहीरनामा प्रसिद्ध केला तो येणें प्रमाणें:—

## जाहीरनामा.

### "पोर्तुगेज संस्थान इंदिया एथील लोक यांस.

कळविण्यांत येतें कीं, डिचोली एथील तिसरे पटालनीनें चालत्या महिन्याचे २१ वे तारखेस रात्रौ ११ वाजतां बंडाची हाक देऊन आपल्या सेनाध्यक्षास कैद केलें, आणि दुसऱ्या दिवशीं पहाटेस कूच करून ती जुन्या गोंव्यांस गेली. तेथें फोंडेची दुसरी पटालन आणि मठग्राम एथील पहिली पटालन ह्या दोन पटालनींची मार्गप्रतीक्षा करीत राहिली. फोंडेची पटालन २३ वे तारखेस संध्याकाळीं ६ वाजतां आणि मठग्रामची २४ वे तारखेस ८वाजतां राज्यपरिवर्तनाची हाक देऊन, त्या दोन्ही पटालनी तिसरे पटालनीस जाऊन मिळण्यास निघाल्या. ह्या कृत्यावरून हा त्यांचा संकेत पूर्वीच ठरला होता असें दिसतें.

ह्या आकस्मिक गोष्टीचें वर्तमान देशभर पसरलें, त्यामुळें लोक विस्मयान्वित होऊन बंडवाले रस्त्यांनी चालून जात असतां त्यांच्या ह्या वर्तणूके करितां त्यांस त्यांनी दोषी ठरविलें.

अशा अपराधाची वर्तणूक करण्याचें कारण काय, हें कोणास समजलें नाहीं, कोणास समजत नाहीं, व कोणाच्या लक्षांत देखील येणार नाहीं. ज्या सरकाराचे ते तावेदार आहेत त्या सरकाराशीं, व ज्या प्रजेचे ते रक्षक आहेत त्या प्रजेशीं, वागण्याचे जे त्यांचे अलंघनीय धर्म आहेत, ते सोडून अन्य मार्ग धरण्याचें निमित्त औद्धत्यानें जेव्हां लागूं लागतील, त्यावेळीं मात्र त्यांच्या अंधत्वाचा आह्मास खेद वाटेल. अद्यापि आह्मास अशी आशा आहे कीं, त्यांचें अंत:करण हें त्यांला सुविचाराच्या पंथास लावील, व बादशहांच्या कृपेस पात्र होण्यास हा एकच सुगमोपाय त्यांस राहिला आहे.

देशवासी लोकांनीं ह्या सेवेगनिस्सरणास भिऊं नये. अधिकाराचें जें मूळतत्व आहे तें आह्मी सर्व प्रकारें अनाहत प्रतिपालन करूं असा भरंवसा धरून राहवें.

आह्मी सदोदीत सैन्याचा मित्र असावें अशी इच्छा करीत असतां, त्यांचें वास्तविक हित होण्याविषयीं त्यांचा पक्ष धरून बोलत असतां, त्यांस नवनवे फायद्याचे संभव उघड करून दाखवीत असतां, त्यांस सदैव न्यायानें वागवून त्यांशीं धर्मरूप उत्सुकतेनें वागत असतां, त्यांनीं हा उपाय योजिला, तर तो त्यांचा उपाय कबूल केला जाणार नाहीं, असें त्यांनीं खचीत समजावें.

बंडाच्या पोकळ स्वरा पेक्षां अंत:करणाची गर्जना मोठी आहे. देशवासी लोकांनीं व पोर्तुगेज सैन्यानें स्वत: सांगावें कीं, जो हा प्रकार ते पहातात, तो धडधडीत प्रत्युपकाराभाव व प्रय: अश्रुत अव्यावहारिक कृत्य नव्हे

कीं काय! राज्यपरिवर्तक काय इच्छीत आहेत! जीं आपल्या पताकेवर त्यांच्या देशाचीं जयस्वी चिन्हें आहेत, त्यांच्या ऐवजीं कांहीं नांव किंवा स्वकपोलकल्पित क्षिति लिहिण्याचा त्यांचा इरादा आहे कीं काय? एकच कांहीं तरी हेतु लिहून ती पताका उचलून घ्या. ज्या पताकेचा सत्कार होऊन गेला, व अजून पावेतों ह्या संपूर्ण समुद्रांत व बहुतेक किल्ल्यांत सत्कारपूर्वक आणि प्रीति पूर्वक होत आहे, त्या पताकेचा धि:कार करूं नका. ही पताका आह्मी कुत्सित राज्य लोभाच्या अपवित्र धुळींत लोळवीत नेणार नाहीं. परमविश्वासनिधि महाराज यांनीं जसी ती पताका निष्कळंक आमचे स्वाधीन केली, ती जययुक्त न झाली तरी तसीच त्यांकडे आह्मी परत करणार. आतां जर तिच्या शुभ्रपणांत कांहीं फेरफार होऊन तिच्यावर डागपडले, तथापि ते डाग बेअब्रुचे नसतील. जे राजनिष्ट आहेत ते आमच्या प्रमाणें ती उराशी धरून आपला प्राण देतिल व तीं क्षतें त्यांच्या रक्ताचीं पडतील.

ज्या यशाचा हेवा सर्व लोक करितात, त्या यशास आह्मी बट्टा लावून घ्यावा हें ह्या देशांतील लोक देखील कबूल करणार नाहींत.

आतां ज्या अर्थीं त्यांनीं बंड केलें, त्या अर्थीं त्यांनीं आपले हेतु बोलून दाखवावे, आणि आपल्या छावणींत प्रवेश करावा. कारण कीं, लष्करी लोकांस छावणी हें सत्काराचें मंदीर होय. अतिक्रांति आणि सरळ मार्गाचा त्याग हीं पोर्तुगेज शिपायांस योग्य नाहींत.

बंडवाल्यांनीं विचार करावा कीं, व्यापार नाहींसा

होण्यास; कृषिकर्म तहकूब राहण्यास, धान्याचीं पिकें नष्ट होण्यास, शाळा बंद पडण्यास, आणि ज्यांत आनंद व सौख्य आहे त्यावर दु:खाची काळीमा येण्यास बंड कारण भूत आहे.

आह्मी चिंताक्रांत झालों असतां शांततेने आणि दृढ निश्चयानें सांगतों कीं, ह्या बंडानें आमचा न्याय किंवा जनहितेच्छा यांत कांहींच फेरफार होणार नाहीं. आह्मी व सरकारी अधिकारांचे मूलतत्व संरक्षण करण्या करितां जे अधिकारी आहेत, त्यांनीं 'बळाच्या इनसाफा पेक्षां इनसाफाचें बळ अधिक आहे' असें दाखविण्याचा निश्चय केला आहे.

आह्मास देशवासी लोकांचा आश्रय आहे. राज्यपरिवर्तकांस ह्मणाल तर जेवढ्या जमिनीवर ते राहतात तेवढ्या जमिनी खेरीज त्यांस कशाचाच आश्रय नाहीं. अधिकाऱ्यांनीं आपापलीं कामें करावीं! अह्मास लोकांनीं समतें द्यावीं. देशवासी लोकांनीं आमच्या फेरफार नहोणाऱ्या निश्चयावर, न्यायाच्या अधिकारावर, आणि राज्यपरिवर्तकांच्या अंत:करणावरहि विश्वास ठेवावा.

विस्कोंद दे सांवजानुआर्य, नवीनगोवा ता० २५ सप्तेंबर इ० स० १८७१".

हा जाहीरनामा प्रसिद्ध होतांच बंडवाले आपापल्या छावणींत पळत गेले.

बंडाचें वर्तमान पोर्तुगाल देशांत समजतांच तेथील राजानें नवीन सरसुभेदार बरोबर देऊन आपला बंधु दों आगुस्त यास गोमांतकांत पाठविलें. नंतर नवीन सरसुभेदारानें राजकार्य धुरंधर विस्कोंद दे सांव जानुवार्य याकडून राज्याचा अखत्यार घेतला.

# प्रकरण आठवें.

गोवें पोर्तुगेज सरकारच्या ताब्यांत आल्यापासून आज पर्यंत जे जे पोर्तुगाल देशच्या राजाकडून राज्यकारभार चालविणारे प्रतिनिधि किंवा सुभेदार आले त्यांचीं नांवें.

| | इसवी सन् |
|---|---|
| दों फ्रांसिस्क दे आल्मेद. प्रतिनिधि ........ | १५०५ |
| आल्फोंस दे आल्बुकेर्क. सरसुभेदार............ | १५०९ |
| लोपेज सोवारेज दे आल्वार्गारी. सुभेदार...... | १५१५ |
| दियोग लोप्रेज दे सिकैर. सुभेदार............ | १५१८ |
| दुवार्त दे मेनेजीस. सुभेदार................ | १५२१ |
| वास्को दे गाम. प्रतिनिधि... ................ | १५२४ |
| येनरीक दे मेनेसीस. सुभेदार................ | १५२५ |
| लोप वास दे सांपाय. सुभेदार ................ | १५२६ |
| नुञ्ज दे कुञ्ज. सुभेदार...................... | १५२९ |
| मार्सीयस् दे नोरोञ्ज. प्रतिनिधि............ | १५३८ |
| यसतेवांव दे गाम. सुभेदार ............... | १५३९ |
| आल्फोंस मारतीन दे सौज. सुभेदार............ | १५४२ |
| जुवांव दे कास्त्र. प्रतिनिधि.................... | १५४५ |
| ग्रासीयस् दे सा. सुभेदार.................... | १५४८ |
| ज्यार्ज काब्राल. सुभेदार........... ........... | १५४९ |
| आल्फोंस दे नोरोञ्ज. प्रतिनिधि....... .. .... | १५५१ |
| पेद्रु दे मासकारेञ्जस्. प्रतिनिधि ............ | १५५४ |
| फ्रांसिस्क दे बारेत. सुभेदार................ | १५५५ |
| कोंस्तान्तीन दे ब्रागांज. प्रतिनिधि........... | १५५८ |

फ्रांद दे रेदोंद, फ्रांसिस्क कौतिञ्ज. प्रतिनिधि १५६१
जुवांव दे मेंदोज, आ. सुभेदार ................ १५६३
आन्तोनीय दे नोरोञ्ज. प्रतिनिधि........... १५६४
लुइज दे आतायद. प्रतिनिधि ............... १५६८
आंतोनीय दे नोरोञ्ज. प्रतिनिधि. ........... १५७१
आंतोनीय मोनीस् बार्रेत. सुभेदार............ १५७३
दियाग. दे मेनेजीस. सुभेदार.................. १५७६
लुईस दे आतायद. प्रतिनिधि. ................ १५७८
फेर्नांद तेलीस. सुभेदार...................... १५८०
फ्रांसिस्क दे मास्कारेञ्ज. प्रतिनिधि............ १५८१
दुवार्त दे मेनेजीस. प्रतिनिधि.................. १५८४
मानवेल दे सौज कौतिञ्ज. सुभेदार........... १५८८
माथीयस् दे आल्बुकेर्क. प्रतिनिधि.............. १५९०
फ्रांसिस्क दे गामा. प्रतिनिधि.................. १५९७
आरीस् दे सालदाञ्ज. प्रतिनिधि.............. १६००
मार्तीम आल्फांस दे कास्त.................... १६०४
फ्रे आलेक्स दे मेनेजीस्. सुभेदार............. १६०७
आंद्रु फुरत दे मेंदोज. सुभेदार............... १६०९
जेरोम दे आजावेद. प्रतिनिधि. . . . . . . . १६१२
जुवांव कौतिञ्ज. कों. रे. प्रतिनिधि. . . . . . १६१७
फेरनांद दे आल्बुकेर्क. सुभेदार . . . . . . . . १६१९
फ्रांसिस्क दे गाम. कों. वि. प्रतिनिधि. . . . . १६२२
फ्रा. लुईस दे ब्रीतु. सुभेदार. . . . . . . . . १६२७
मिगेल दे नोरोञ्ज. प्रतिनिधि. . . . . . . . . १६२९
पेद्रु दे सिल्व. प्रतिनिधि. . . . . . . . . . . . १६३५

आंतोनीयु तेलीस्. सुभेदार. . . . . . . . . . १६३९
जुवांव दे सील्व तेल दे मेनेजीस. प्रतिनिधि. . १६४०
फिलीप दे मास्कारेञ्ज. प्रतिनिधि. . . . . . . १६४५
आंतोनीयुं दे सौज कोतीञ्ज. इ०. . . . . . . १६५१
वास्क दे मास्कारेञ्ज. प्रतिनिधि. . . . . . . . १६५२
रुद्रीग दे सिलवैर. कोंद दे सारजेदस्. प्रतिनिधि. १६५५.
मानवेल मासकारेञ्ज, फ्रांसिस्क दे मेल दे कास्त,
आगि आतोनीय दे सौज कौतिञ्ज. . . . . १६५६
लुवीस् दे मेंदोस फुर्तादि आल्बुकेर्क. सुभेदार. . १६६१
पेद्रु दे लांकास्त. सुभेदार. . . . . . . . . . . १६६२
आंतोनीय दे मेल. प्रतिनिधि. . . . . . . . . . १६६२
जुवांव नुञ्ज दे कुञ्ज. स. वि. प्रतिनिधि . . . १६६६
आंतोनीय दे मेल. प्रतिनिधि. . . . . . . . . १६६८
लुवीस दे मेंदोस फुर्तादि आल्बुकेर्क का. लो.... १६७१
पेद्रु दे आलमेद. प्रतिनिधि ....... ...... .... १६७७
फ्र आंतोनीय दे ब्रांदांव आगि आतोनीय पायज
दे साउद......................... १६७८
फ्रांसिस्क दे तावर. कोंद दे आलवोर्द. प्रतिनिधि १६८२
रुद्रीग दे कोस्त. सुभेदार..................... १६८६
मिगेल दे आलमेद. सुभेदार................ १६९०.
फेरनांद मारतीन मास्कारेञ्ज व लुवीस
गोंसाल्वेज...................... . . १६९१
पेद्रु आंतोनीय दे नोरोञ्ज. का. वि. प्रतिनिधि १६९३
आंतोनीयु लुवीस गोंसाल्वेज दे कामर कोतीञ्ज. .
प्रतिनिधि ......... . . . . . . . . . . १६९८

फ्रे आगोस्तीन दे आनसीयासांव व वास्को लुवीस कोतीन्ज ........................... १७०१
कायतान दे मेल दे कास्त, प्रतिनिधि ........ १७०२
रुद्रीग दा कोर्त, प्रतिनिधि..................... १७०७
वास्को फेर्नांद सेजार दे मेनेजीस, प्रतिनिधि.. १७१२
सेबास्तीयांव दे आद्रांद पासान्ज इ० .......... १७१७
लुविस दे मेनेजीस, को. मे. प्रतिनिधि.......... १७१७
फ्रांसीस्क जोजे दे सांपय इ कास्त प्रतिनिधि.... १७२०
क्रिस्तोवांव दे मेल, सुभेदार.................... १७२३
इग्नासिय दे सांत थेरज इ० .................. १७२३
जुवांव दे सालदान्ज देगाम, प्रतिनिधि ........ १७२५
इग्नासिय देसांत थेरेज इ० .................... १७३२
पेद्र दे मास्कारेन्ज, प्रतिनिधि ................ १७३२
लुवीस, दे मेनेजीस, मा, लो, प्रतिनिधि .... १७४१
फ्रांसिस्क दे वासकोंसेल, लोरेंस दे नोरोन्ज, आणि लुवीस कायतान दे आल्मेद........ १७४२
पेद्र मिंगल दे आलमर्द इ पोर्तुगाले, प्रतिनिधि १७४३
फ्रांसिस्क दे तावर, प्रतिनिधि................ १७५०
लुवीस दे मास्कारेन्ज कोंदालव, प्रतिनिधि.... १७५४
आंतोनीय तावैर दे नैव इ बोऊं, जुवांव मिस्कीत मोतुस तशोर, आणि फिलिप वालादारीस १७५६
मानवेल दे साल्दान्ज दे आल्बुकेर्क, कोंद दे एग, प्रतिनिधि.............................. १७५८
आंतोनीय तावैर दे नैव इ बोंतु, जुवांव बाव्तीस्त पिरेर, आणि जुवांव जोजे दे मेल.... १७६५

जुवांव जुजे दे मेल, सुभेदार.................... १७
फिलीप दे वालादारीस. सुभेदार.............. १७
जुजे पेद्रु दे कामर. प्रतिनिधि................ १७
फ्रेद्रीग उलयांव दे सौज. सरसुभेदार . . . . १७
फ्रांसिस्क दे कुञ्ज दे मेनेजीस. सरसुभेदार. . १७
फ्रांसिस्क आंतोनीय दे वियोग कान्नाल.सरसुभेदार १७
बेनार्द जुजे लोरेंन, कोंद दे सारजेद. प्रतिनिधि १
दीयेग दे सौज, कोंद दे रीय दे पार्द.प्रतिनिधि १८१
मानवेल दे कामर. प्रतिनिधि . . . . . १८
फ्रे मानवेल सांत गालदीञ्ज आणि दुसरे . . १८२
दों मानवेल दे काम्र इ पोर्तुगाल. . . . . . १८२
बेनार्द पेर दा सिल्व. सरसुभेदार ........... १८३
जोकीं मनवेल कोरेय दा सिल्व इ० ........ १८३
सिमाव इफांत दे लासेर्द. सरसुभेदार ....... १८३
दों आंतोनीय फ. दे सांतारीन कार्वाल्य इ०.. १८३
जुजे आंतोनीय वियर दा फोंसेक. सरसुभेदार .. १८३
मनवेल जुजे मेंदीस्. सरसुभेदार............... १८३
जुजे आं. वियर दा फोंसेक. सरसुभेदार .....: १८४
जुजे जोकीं लोपीस् दे लीम. सरसुभेदार....... १८४
आंतोनीय बा. दे सा इ० . . . . . . . . . १८४
जोकीं मौरांव गा० पाल्प. सरसुभेदार. . . . १८४
फ्रांसीस्क शावीयर दा सी. पिरेर. सरसुभेदार... १८४
जुजे फेरेर पेस्तान सरसुभेदार. . . . . . . १८४
जुजे जोकीं जा. लाप, बारांव दे वोरें. सरसुभेदार १८५

ांसीस्क जो. दे सांत रीत बातेला इ०.... १८५५
ानीय सेजोर दे वा. को, विस्कोंदे दे तोर-
स्नोव. सरसुभेदार . . . . . . . . . . . १८५५
फेरेर पेस्तान. सरसुभेदार : . . . . . . १८६८
ोंद दे सां भार्य. सरसुभेदार . . . . १८७१
ज़ुजे मासेद मभेदार. . . . १८७२

---

**दुसरा भाग समाप्त.**